प्रथम वर्ष कला

शिक्षणाची मूलतत्त्वे व

२१ व्या शतकासाठी शिक्षण

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. सुहास पेडणेकर
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. कविता लघाटे
प्राध्यापक नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

अनिल आर. बनकर,
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

अभ्यास समन्वयक एवं संपादक : **डॉ. धनेश्वर हरीचंदन**
सहयोगी प्राध्यापक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विश्वविद्यालय, मुंबई.

लेखक : **डॉ. रेखा जगदाळे**
सहाय्यक प्राध्यापक,
एच.बी. बी.एड. कॉलेज ऑफ एड्युकेशन, नवी मुंबई

: **डॉ. संजय निंबाळकर**
सहयोगी प्राध्यापक
सेवा सदन कॉलेज ऑफ एड्युकेशन, उल्हासनगर

: **डॉ. किशोरकुमार चौधरी**
सहाय्यक प्राध्यापक
ओरियन्टल कॉलेज ऑफ एड्युकेशन, सानपाडा

: **श्रीमती वंदना के. चौधरी**
सहय्याक प्राध्यापक
आर.बी.टी. कॉलेज ऑफ एड्युकेशन, डोंबीवली

: **दत्तात्रय एम. तोंडे**
सहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विश्वविद्यालय, मुंबई.

फेब्रुवारी २०२०, प्रथम वर्ष कला, शिक्षणाची मूलतत्वे व २१ शतकासाठी शिक्षण

प्रकाशक : प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

अक्षर जुळणी : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

मुद्रण :

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
	विभाग - १	
१.	शिक्षणाचा अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये	१
२.	शिक्षणाचे अध्यापनशास्त्र	१४
३.	शिक्षणाची ध्येये	२७
४.	शिक्षणाचे आधार / अधिष्ठान	४०
५.	अध्ययन संकल्पना	५२
६.	अध्यापनाची संकल्पना	६५
७.	शिक्षकाचे गुण आणि पात्रता	८०
८.	शिक्षणाची भूमिका व आव्हाने	९८
	विभाग - २	
१.	शिक्षण आणि संस्कृती	१२०
२.	विकासासाठी शिक्षण	१३६
३.	शाश्वत विकासाची संकल्पना	१५०
४.	शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका	१६६
५.	शिक्षण समाजशास्त्राची मूलतत्वे	१७५
६.	भारतीय संदर्भात बहुसांस्कृतिकता	१८९
७.	शिक्षणातील समस्या	२०३
८.	शिक्षणातील नविन कल (प्रथा)	२१९
९.	व्यावहारिक काम	२३६

❖❖❖❖

अभ्यासक्रम प्रथम वर्ष कला (शिक्षण)
शिक्षणाची मूलतत्वे व २१ व्या शतकासाठी शिक्षण

विभाग - १

उद्दिष्ट्ये :

१. विद्यार्थी शिक्षणाची मूळ संकल्पना व्यक्त करतील.
२. शिक्षणाच्या मूलभूत ध्येयांचे आकलन करतील.
३. अध्ययन व अध्यापनाच्या मूलभूत संकल्पनाचे विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करणे.
४. शिक्षणाची वैशिष्ट्ये

घटक १ : शिक्षणाची मूलभूत संकल्पना :

१) अर्थ व्याख्या व वैशिष्ट्ये

अ) शिक्षणाचा अर्थ व स्वरूप
ब) शिक्षणाची व्याप्ती व कार्य
क) शिक्षणाची वैशिष्ट्ये

२) शिक्षणाचे अध्यापनशास्त्र

अ) अध्यापनशास्त्र : अर्थ व महत्त्व
ब) चिकित्सक अध्यापनशास्त्र : अर्थ व गरज
क) पाश्चात्य व भारतीय विचारवंतांच्या शिक्षणाविषयी संकल्पना (रविंद्र टागोर, स्वामी विवेकानंद, जॉन ड्यूई व महात्मा गांधी)

घटक २ : शिक्षणाचा पाया व उद्देश

३) शिक्षणाचा उद्देश

अ) वैयक्तिक
ब) सामाजिक
क) वैयक्तिक विरुद्ध सामाजिक

४) शिक्षणाचा पाया

अ) तात्वीक
ब) सामाजिक
क) मानसशास्त्रीय

घटक ३ : अध्यापन व अध्ययन

५) अध्यनाची संकल्पना

अ) अध्ययन अर्थ व वैशिष्ट्ये
ब) शिक्षणावर परिणाम करणारे घटक
  १) लक्ष (अर्थ, प्रकार व शैक्षणिक उपयोजन)
  २) प्रेरणा (अर्थ, प्रकार व शैक्षणिक उपयोजन)
  मार्शल लॉ चा पदानुक्रम (विविध श्रेणी) सिद्धांताची गरज

६) अध्यापनाची संकल्पना

अ) अध्यापन : अर्थ व वैशिष्ट्ये

ब) वर्ग अध्यापन दृष्टिकोन : विद्यार्थी केंद्रीत व शिक्षक केंद्रित

घटक ४ : विविध स्तरांवर शिक्षकांचा व्यवसायिक वादे

७) शिक्षणाची योग्यता व गुणवत्ता

अ) पूर्व प्राथमिक

ब) प्राथमिक

क) माध्यमिक

ड) उच्च शिक्षण

८) शिक्षकाची भूमिका व आव्हाने

अ) व्यवसायिक वाढ

ब) व्यवसायिक नितिमत्ता व आचारसंहिता

क) शिक्षकांची संक्रमणकालीन भूमिका (सुविधेसाठी अध्यापन)

प्रात्यक्षिक कार्य :

शाळा भेटी (पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक) शाळांच्या कार्याचा अभ्यास व सविस्तर तुमचा दृष्टिकोन व्यक्त करणारा अहवाल (अहवालामध्ये संस्थेचा थोडक्यात इतिहास, त्यांचा संस्थात्मक पदानुक्रम, दृष्टिकोन, विशिष्ट कार्यासाठी मंडळ ध्येय, पायाभूत सुविधा अभ्यासक्रम विषयक व अभ्यासक्रमपूरक उपक्रम इ.)

विभाग - १

उद्दिष्ट्ये :

१. शिक्षण व संस्कृती मधील नात्यांचे आकलन करणे.

२. शाश्वत विकासासाठी शिक्षणाच्या गरजेचे आकलन करणे.

३. समाजशास्त्र व शिक्षण ह्यामधील नात्याचे आकलन करणे.

४. २१ व्या शतकातील आव्हाने व शिक्षणाची बदलती भूमिका ह्यांचे अवलोकन करणे.

घटक १ : शिक्षण संस्कृती व विकास

१) शिक्षण व संस्कृती

अ) संस्कृतीची संकल्पना

ब) आधुनिकतेची संकल्पना

क) शिक्षण व संस्कृतीमधील संबंध

२) विकासासाठी शिक्षण

अ) राष्ट्रीय एकात्मता

ब) आंतरराष्ट्रीय आकलन (समज)

क) नागरीकत्व

घटक २ : शाश्वत विकासासाठी शिक्षण

३) शाश्वत विकासाची संकल्पना

अ) अर्थ
ब) गरज
क) उद्दिष्टे

४) शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका

अ) शालेय अभ्यास क्रमामध्ये शाश्वत विकासाचे स्थान
ब) शिक्षकाची भूमिका
क) युनेस्को (UNESCO) ची भूमिका

घटक ३ : शिक्षण व समाजशास्त्र

५) शैक्षणिक समाजशास्त्राची मूलतत्वे

अ) शैक्षणिक समाजशास्त्राची अर्थ व व्याप्ती
ब) समाजशास्त्राचे शिक्षण व शैक्षणिक समाजशास्त्र ह्यामधील फरक स्पष्ट करा.
क) शांतता शिक्षणाची संकल्पना व शांतता शिक्षणाची उद्दिष्टे

६) भारतामधील बहुबिध संस्कृती

अ) बहुबिध सांस्कृतिक शिक्षणाची ध्येये व वैशिष्ट्ये
ब) बहुविध संस्कृती शिक्षणाचा आकृतीबंध
क) सांस्कृतिक शिक्षणाचा दृष्टीकोन

घटक ४ : शिक्षणाच्या समस्या व कल (Trends)

७) शिक्षणातील समस्या

अ) मानवी हक्क शिक्षण
ब) बहुविध संस्कृती शिक्षण
क) मूल्यांसाठी शिक्षण

८) शिक्षणातील कल (Trends)

अ) मुक्त अध्ययन
ब) ऑनलाईन अध्ययन
क) माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान

प्रात्यक्षिक कार्य :

प्रत्येक विद्यार्थ्याने योग केंद्र / स्वयंसेवी संस्था, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र ह्यांना भेट देऊन त्यांच्या कार्याचा अभ्यास करुन योग्य ते अहवाल लिहावा. (अहवालामध्ये थोडक्यात संस्थेचा इतिहास, मूळ उभारणी, त्यांचे कार्य व ध्येये उपक्रम व त्यांनी चालविलेले कोर्स इ. ह्यांचा समावेश असावा.

पेपर १
विभाग १ व २
प्रात्यक्षिक कार्य १ व २

घटक रचना :

९.० प्रात्यक्षिक कार्य १ व २ ची उद्दिष्टे
९.१ प्रास्ताविक
९.२ प्रात्यक्षिक कार्य १ व २ प्रकार

९.० प्रात्यक्षिक कार्य १ व २ ची उद्दिष्टे :

प्रात्यक्षिक कार्य १

- शाळेमध्ये शिक्षकांना विविध भूमिकांना सामोरे जाण्यासाठी प्रशिक्षण देणे.
- अभ्यासक्रमा बाहेरील समृद्ध अध्ययन अनुभवाची संधी देणे.
- शाळेच्या कार्याचा (कामकाजाचा) समावेश करणे व गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्यासाठी उपक्रम राबवणे.

प्रात्यक्षिक कार्य २

- वर्तमान परिस्थितीमध्ये योगा ची ध्येय व उद्दिष्टे अध्ययन कर्त्यास परिचय करुन देणे.
- योग उपक्रमाचे आकलन व त्याचा प्रभाव ह्यासाठी उपक्रमांची संधी देणे.
- कार्यरत असलेल्या विविध अशासकीय संस्थाना शिक्षण, संघटन, उपक्रम व सामाजिक प्रभाव साठी अध्ययन कर्त्यास प्रशिक्षण देणे.
- शालेय अभ्यासक्रमाबरोबर असलेल्या विविध व्यवसायिक अभ्यासक्रमाची माहिती करुन देणे व ह्याचा भविष्यातील चारीत्र (career) निर्माणासाठी उपयोग समजावून देणे.

९.१ प्रस्तावना

प्रात्यक्षिक अभ्यासक्रमा दरम्यान प्रात्यक्षिक कार्याचा भाग म्हणून विद्यार्थ्याकडून दोन प्रात्यक्षिक कार्य कर्तव्याची अपेक्षा असते. त्यास प्रात्यक्षिक कार्य १ व प्रात्यक्षिक कार्य २ असे संबोधले जाते.

प्रात्यक्षिक कार्य २ (PW I)

पूर्व प्राथमिक, प्राथमिक, शाळांना भेटी देऊन त्यांचा कार्याचा अभ्यास करुन तुमच्या दृष्टिकोनातून विस्तृत अहवाल लिहा. (अहवालामध्ये संस्थेची थोडक्यात माहिती, पदानुक्रमानुसार त्यांचे संस्थात्मक कार्य, दृष्टिकोन, ध्येये, पायाभूत सुविधा, अभ्यासक्रम व अभ्यासक्रम पूरक उपक्रम ह्याविषयी संक्षिप्त माहिती असावी.

प्रात्यक्षिक कार्य २ (PW II)

प्रत्येक विद्यार्थ्याने योग केंद्र / अशासकीय शैक्षणिक संस्था / व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र ह्यांना भेट देऊन त्यांच्या कार्यात्मकतेचा अभ्यास करुन लगेच अहवाल लिहावा.

(अहवालामध्ये संस्थेची थोडक्यात माहिती, संस्थात्मक उभारणी, ध्येये, धोरणे, राबवलेले उपक्रम, व अभ्यासक्रम ह्यांचा समावेश असावा)

९.२ प्रात्यक्षिक कार्य १ व २ वर्णन

प्रात्यक्षिक कार्य १

प्रत्येक विद्यार्थ्याने प्रात्यक्षिक कार्यासाठी उपक्रमास पसंती द्यावी व उपक्रमाचा आधार घेऊन मार्गदर्शक तत्वानुसार अहवाल तयार करावा.

प्रात्यक्षिक कार्य १ रुपरेखा / मागदर्शक तत्वे

१) सर्वसाधारण माहिती :

- शाळेचे नाव
- पत्ता
- उभारणीचे वर्ष
- शाळेचे स्वरूप : अनुदानीत / विनाअनुदानीत
- मुले / मुली / सहकारी शिक्षण
- पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक
- पदानुसार व्यवस्थापनाचे नाव
- संस्थेचा दृष्टिकोन, ध्येय, व्यवस्थापक मंडळ
- शिक्षणाचे माध्यम
- शाळेच्या (शिफ्ट) वेळा : वेळापत्रक
- एकूण विद्यार्थी संख्या

२) शाळा इमारत : (पायाभूत सुविधा)

- एकूण क्षेत्रफळ
- एकूण वर्ग खोल्या
- परिषद खोल्या
- आमीसी खोल्या
- संगणक प्रयोगशाळा खोल्या
- वाचनालय : एकुण पुस्तके, पुस्तक वितरण, नियतकालीन, वाचनालयाची उपयोगिता, सेवा (प्रत्येक मुद्दा सविस्तर चर्चा करावी.
- खेळांचे पटांगण : खेळाचे साहित्य, अंतर्गत व बाह्य खेळ खेळणारे खेळाचे प्रकार इतर संबंधित उपक्रम (प्रत्येकाचे सविस्तर वर्णन करा)
- स्वच्छता खोल्या / आरोग्य खोल्या
- विज्ञान प्रयोगशाळा : प्रयोगशाळेतील उपकरणे, शिक्षकांचे स्पष्टीकरण, विद्यार्थ्यांचे प्राविण्य - सविस्तर उल्लेख करा.

३) शैक्षणिक (अध्यापन कर्मचारी व अध्यापन न करणारे कर्मचारी)

- अध्यापक कर्मचारी संख्या (विषयानुसार पात्रता, एकूण अध्ययन अनुभव संख्या, शिकवलेले विषय, चर्चा सत्रांचा सहभाग, परिषद, राष्ट्रीय व राज्य स्तरांवर कार्यशाळा)
- कर्मचाऱ्यांचे अभ्यासक्रमा व्यतिरिक्त योगदान उदा. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा इ.
- कर्मचाऱ्यांचे विशेष शैक्षणिक कार्य

वरील मुद्याचा सविस्तर वर्णन करा तसेच शिक्षकेतर कर्मचारी लक्षात ठेवून पहिल्या मुदयाचे वर्णन करा.

४) कार्य (प्रशासकीय)

केलेले विभागीय कार्य म्हणजेच विविध मंडळे व त्यांचे कार्य थोडक्यात लिहा.

५) अभ्यासक्रम पूरक उपक्रम

१. खेळांची (अंतर्गत व मैदानी) शाळांमधील संख्या
२. शाळांचा विविध स्तरावर स्पर्धात्मक सहभाग
३. विविध स्पर्धात्मक स्तरांवर मिळवलेली बक्षीसे व सन्मानचिन्ह
४. एन.सी.सी. / स्काऊट व गाईड (उपक्रम निश्चित करा)
५. सामाजिक सेवा (उपक्रम निश्चित करा)
६. महत्त्वाचे दिवस व सण साजरे करा. (उपक्रम निश्चित करा)
७. शैक्षणिक सहल / सफर / सहल पिकनीक
८. शालांतर्गत व शाळांनी आयोजित केलेल्या विविध स्पर्धा - वक्तृत्व, वादविवाद, चित्रकला, गायन, भित्तीपत्र (उपक्रम निश्चित करा)
९. गणित, विज्ञान, नाट्य विषयासंदर्भात उपक्रम
१०. समाजकार्य
११. शालेय मासिकाच्या स्वरूपात प्रकाशन
१२. विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थ्याकडून करमणूकीचे कार्य
१३. स्व संरक्षण उपक्रम, प्रथमोपचार प्रशिक्षण
१४. शाळेचा वाद्यवृंद
१५. अनुभवी तज्ञ व्यक्तींना निमंत्रण
१६. प्रदर्शन (प्रकार व उपक्रम विषद करा)
१७. वार्षिक दिवस

इतर उपक्रम उल्लेख करा
उदा. कादंबरी सराव शालेय स्तरांवर व बाह्य स्तरावर

६) कार्यालयीन नोंद :

कार्यालयीन नोंदी द्वारे अहवाल

नोंदवही, हजेरी वही, सेवा पुस्तक, कार्डस, जी.आर. अहवाल, संकलित अहवाल इ.

७) सखोल मनन (भेटीचा दृष्टिकोन म्हणजे अनुभव थोडक्यात)

प्रात्यक्षिक कार्य २

प्रत्येक अध्ययन कर्त्याने योग केंद्र / व्यवसायिक प्रशिक्षण / अशासकीय संस्थांना भेटी देऊन दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार किंवा बाह्य रूपरेखानुसार सरावात्मक उपक्रम तयार करुन अहवाल तयार करावा.

मार्गदर्शिका / बाह्यरुपरेखा नुसार प्रात्यक्षिक कार्य २

१) सामान्य माहिती (थोडक्यात इतिहास)

- संस्थेचे / केंद्राचे नाव
- पत्ता
- स्थापनेचे वर्ष
- पदानुक्रमानुसार व्यवस्थापनाची नावे
- संस्थेची ध्येय धोरणे व दृष्टिकोन
- संस्थेची उद्दिष्टे
- संस्थेच्या शाखा

२) संस्थेचा नियोजित एकसंघ कार्यालयीन उभारणी

सदस्यांची संख्या (चेअरमन) (अध्यक्ष) सचीव (सेक्रेटरी) खजीनदार, विश्वस्त, प्रभारी सदस्य, स्वयंसेवक इ. निधी, संस्थात्मक निधी, उत्पनाचा स्त्रोत

३) आयोजित उपक्रम :

आयोजित उपक्रमांची संख्या (संस्थेच्या आत मध्ये व बाहेर) त्यांची उद्दिष्टे व गटाच्या ध्येयांवर होणारा परिणाम सविस्तर लिहा.

४) आयोजित अभ्यासक्रम (योग केंद्र व व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र)

अभ्यासक्रम दरम्यान कार्यक्रमांच्या संख्येचा उल्लेख करा. फी व फी चा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम थोडक्यात वर्णन करा.

५) सखोल मनन (तुमच्या भेटीचा दृष्टीकोन म्हणजेच तुमचा अनुभव) थोडक्यात.

❖❖❖❖

विभाग - १

१

शिक्षणाचा अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये

घटक रचना :

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ शिक्षणाचा अर्थ व स्वरूप

१.२.१ शिक्षणाचा अर्थ

१.२.२ शिक्षणाची व्याख्या

१.२.३ शिक्षणाचे स्वरुप

१.३ शिक्षणाची व्याप्ती व कार्य

१.३.१ शिक्षणाची व्याप्ती

१.३.१.१ इतर शिस्तीशी संबंध

१.३.१.२ शिक्षणाचे प्रकार

१.३.२ शिक्षणाचे कार्य

१.४ शिक्षणाची वैशिष्ट्ये

१.५ सारांश (आढावा)

१.६ स्वाध्याय

१.० उद्दिष्ट्ये

ह्या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्ही करु शकाल.

- शिक्षणाची व्याख्या कराल व अर्थ प्राप्त कराल.
- शिक्षणाचे स्वरूपाचे वर्णन कराल व अर्थाचा खुलासा कराल.
- शिक्षणाच्या विविध कार्याची चर्चा कराल.
- शिक्षणाच्या वैशिष्ट्यांची यथार्थता स्पष्ट कराल.

१.१ प्रस्तावना

मानवी जीवन हे परमेश्वराची उत्कृष्ट निर्मिती आहे व त्याचे दोन पैलू आहेत.

१) जैविक
२) सामाजिक संस्कृती

जैविक पैलू हे शेतात व प्राण्यांच्या जीवनामध्ये असतात. सामाजिक संस्कृती हा मानवी जीवनाचा दुर्मिळ असलेला पैलू आहे. हा जैविक सामाजिक मधला फरक आहे. फक्त मानव समाजच फक्त शिक्षण घेण्यास सक्षम आहे.

सर्वसाधारणपणे शिक्षण हे अध्ययनाचे असे स्वरुप आहे की ज्यामध्ये ज्ञान, कौशल्य, सवयी एका समूहाकडून दुसऱ्या समूहाकडे व एका पिढीकडून दुसऱ्या पिढी (Generation) कडे अध्यापनाद्वारे प्रशिक्षणाद्वारे, संशोधनाद्वारे रुपांतरीत होते. शिक्षण हे वारंवार इतरांच्या मार्गदर्शनाखाली घडून येते. कोणताही अनुभव विचारसरणीला आकार देणारा जाणीव, कला हे सर्व शैक्षणिक ग्राह्य धरतात. शिक्षण हे सर्वसाधारण पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, विद्यापीठ, प्रशिणार्थी, स्तरांवर विभागलेले आहे.

अशाप्रकारे शिक्षणाद्वारे नवीन विचार, संकल्पना शोधले जातात. तसेच जीवनाचा नवीन मार्ग सापडतो. शिक्षणाद्वारे बुद्धीमत्तेचा विकास होऊन ज्ञानामध्ये भर पडते व हे जगातील चांगल्या व वाईट माणसाच्या इच्छेनुसार त्यांना उपयोगी आहे. सभोवतालच्या संबंधातून स्वतः स्वतःचे आकलन केले पाहिजे व मिळवलेले ज्ञान यशस्वीपणे पुढील पिढीस रुपांतरण केले पाहिजे.

१.२ शिक्षणाचा अर्थ व स्वरूप

१.२.१ शिक्षणाचा अर्थ :

"Education" शिक्षण हा शब्द विविध स्त्रोतांमधून आलेला आहे. हा लॅटीन शब्द आहे. "educo"चा अर्थ ह्या ठिकाणी E म्हणजे बाहेर duco म्हणजेच अंधारातून प्रकाशाकडे असा आहे. ह्या ठिकाणी शिक्षक अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जातो. हिंदी व संस्कृत मध्ये ह्यास विद्या संबोधले जाते. प्राथमिक शिक्षणाचा अर्थ म्हणजे विज्ञान, ज्ञान, तत्वज्ञाव, विद्वता व कोणतेही ज्ञान जे खरे असो की खोटे त्याचे अध्ययन करणे होय. ह्याचे मूळ म्हणजे कारणे शोधणे, माहिती मिळवणे, माहित करुन घेणे ओळखणे, संपादन किंवा आकलन करणे होय.

शिक्षणाचा दूसरा दृष्टीकोन education हा शब्द educare पासून घेतलेला आहे. ह्याचा अर्थ मागील घेऊन त्याचे पोषण करणे म्हणजेच मुलांना जेव्हा पूर्व ज्ञानाचा अभाव असतो. त्यावेळी पूर्वकालीन संकल्पना, विचारसरणी, आणून त्यास ज्ञान प्राप्ती योग्य प्रकारे करवून देणे होय. म्हणजे पुन्हा एकदा ह्याचा अर्थ सांगताना मुलांना सरते शेवटी त्याच्या उद्दिष्टानुसार व त्यांच्या दृष्टीकोनानुसार ज्ञान दिले जाते.

आधुनिक शिक्षण तज्ञांच्या मते मुले सक्ती स्वीकारत नाहीत. त्यांच्यासाठी निरिक्षण करुन, विचार करुन निष्कर्ष काढला जातो. म्हणून शिक्षण म्हणजे माणसातील सुप्त बुद्धीमत्ता (talent) गुण बाहेर काढणे होय. शिक्षण हे मानसिक, वैचारीक, शारीरिक व नैतिक विकासाची कला आहे. काहीतरी दिल्या शिवाय काहीतरी घेता येत नाही. ह्या नियमाप्रमाणे मुलांचा विकास हा स्वयंचलित होत नाही. त्यासाठी विशेष ज्ञान व अनुभवाची गरज आहे. मुलांच्या मधील सुप्त गुण व बुद्धीमत्तेच्या उत्तम विकास साधण्या अगोदर त्यांना ज्ञान व अनुभव देण्याची आवश्यकता आहे.

मुलांच्या आतमधील शक्तींचा उच्चतम स्तरांपर्यंत विकास करण्यासाठी त्यांच्या आवडीचे ज्ञान व आवडीचा अनुभव देण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण आहे. मुलांना विश्वात्मक स्तरांवर पोहचण्यासाठी ज्ञान व अनुभव संपादन व कौशल्य, सवयी, स्वभाव ह्यांमध्ये विकास ह्या दोघांची ही गरज आहे. स्वतःस उत्तम सिद्ध करण्यासाठी प्रशिक्षणाद्वारे जीवनातील विविध अनुभव घेण्याची शिक्षण ही एक वास्तविकता आहे.

गांधीजींच्या मते, शिक्षण म्हणजे मुले व माणसांचा सर्वांगीण मन, शरीर व आत्मा विकास करण्याचे साधन आहे. स्त्रिया व पुरुष साक्षर होणे म्हणजे शिक्षण नव्हे.

सर्वांगीण विकास म्हणजे मानवाची बुद्धी मन, ह्रदय व आत्मा व प्राण्यांची बुद्धी, मन ह्रदय व आत्मा ह्यामध्ये फरक आहे. ह्रदय, मन, बुद्धी व आत्मा ह्यांचा एकत्रित सुसंगत विकास हा पूर्ण माणूस बनविण्यासाठी गरजेचा आहे. शिक्षण ही दुहेरी प्रक्रिया आहे. शिक्षक मुले किंवा मुली ह्यांचा आधुनिक विकास करण्यासाठी अध्यापन करीत असतात. मुला-मुलींच्या निश्चित वागण्यानुसार शिक्षण त्यांच्या विकासासाठी एकाग्रतेने प्रयत्न करीत असतात.

जॉन ड्यूई मतानुसार जीवनातील अनुभवांची सतत पुर्नरचना करण्याची शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. वैयक्तिकरित्या सर्व क्षमतांचा विकास करुन त्यांना त्यांच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी वातावरण निर्मितीची गरज व नियंत्रण म्हणजे शिक्षण होय. ड्यूई पुढे म्हणतो कि, शिक्षण ही सामाजिक व मानिसक प्रक्रिया आहे. मानसिक पैलू मंद मुलांची कुवत व अभ्यास करण्याच्या इच्छाशक्तीचा समावेश आहे. ह्यामुळे वस्तुस्थिती प्रस्तुत होऊन शिक्षणाचा सुरुवातीचा बिंदू मिळतो. सामाजिक पैलू वैयक्तिक सहभागांवर जोर देतो व सामाजिक पैलू ची जाणीव करुन देतो. सामाजिकीकरणाची सुरुवात जन्मापासून होते, व नंतर त्यास आकार देऊन त्याचे परिणाम वैयक्तिक व्यक्तीमत्वावर व विचारसरणीवर होतात. म्हणून आपण निश्चितपणे म्हणू शकतो विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वास आकार आहे. समाजाच्या मागणी व गरजांनुसार त्यामध्ये सुधारणा करणे ही शिक्षकाची भूमिका आहे.

वैयक्तिकरित्या शिक्षण ही बाल्या अवस्थेपासून म्हातारपणापर्यंत जीवन म्हणजे शिक्षण व शिक्षण म्हणजे जीवन अशी सतत चालणारी प्रक्रिया आहे. थोडक्यात शिक्षणामध्ये विचारपूर्वक नियोजन करुन त्यातील मोजका प्रभाव हा सभोवतालच्या वातावरणातून समायोजन करुन मानवी स्वभावामध्ये परिणामकारक बदल घडवून आणता येतो. शिक्षण हे वैयक्तिक रित्या स्वतः आत्मनिर्भर व निस्वार्थी बनवू शकते. शिक्षण हे फक्त अनुदेशनापेक्षा उत्तम व उच्च प्रतीचे आहे. अनुदेशनामध्ये संप्रेषण ज्ञान व उपयोगी कौशल्यांचा समावेश होतो. अनुदेशन हे शिक्षणाचे अत्यावश्यक साधन आहे.

१.२.२ शिक्षणाची व्याख्या :

ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार शिक्षणाची व्याख्या :

- शिक्षण घेण्याची प्रक्रिया किंवा कृती हे प्रगतीचे पहिले पाऊल (टप्पा) आहे.
- थोडेसे शिक्षण घेऊन शिक्षित होऊन ज्ञान व विकासाची प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय.
- मुख्यत्वे शिक्षणाचा अभ्यासाचे क्षेत्र, अध्यापन पद्धती व शाळेतील अध्ययनाशी जवळून संबंध येतो.

भारतीय विचारवंत / तत्वज्ञ व प्राचीन लिखाणानुसार शिक्षणाची व्याख्या :

- शिक्षण हे मानवास आत्मनिर्भर व निस्वार्थी बनविते - ऋग्वेद
- शिक्षण हे शेवटी उदारतेकडे घेऊन जाते - उपन्यास
- शिक्षण म्हणजे स्व-समाधान होय - कंद
- शक्य तितका संपूर्ण विकास करण्याची मानसिक प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय. हे शिक्षण आयुष्यभरासाठी (टिकून राहते) उपयोगी पडते - जाकीर हुसेन
- माणसामध्ये अगोदरच असलेल्या दैवी शक्तीचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय - विवेकानंद

१.२.३ शिक्षणाचे स्वरुप :

जॉन ड्यूई च्या मतानुसार शिक्षण म्हणजे सततच्या अनुभवाची पुर्नरचना करुन जीवन जगण्याची प्रक्रिया होय. ह्या विचारधारेनुसार शिक्षणाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होय.

- शिक्षण ही जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे कारण वैयक्तिकरित्या जीवनाचा प्रत्येक स्तर / टप्पा शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.
- शिक्षण ही पद्धतशीर प्रक्रिया आहे. म्हणजेच सर्व कृती ह्या पद्धतशीर संस्था व नियमांद्वारे आचरणात आणल्या जातात.
- शिक्षण हे वैयक्तिक व समाज विकासासाठी आहे; समाजाच्या प्रत्येक पैलूमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्नपूर्वक सामाजिक विकास करणे.
- शिक्षण हे वर्तणूकीतील आधुनिकीकरण आहे : मानवी जीवनाचे शिक्षण प्रक्रियेद्वारा सुधारणा व आधुनिकीकरण करता येते. हे प्रत्येकाचा वैयक्तिक विकास घडवून आणते.
- शिक्षण हे प्रशिक्षण आहे : समाजाच्या गरजेनुसार मानवी संवेदना, मन, वागणूक, कृती, उपक्रम कौशल्य ह्यांचे सकारात्मक प्रशिक्षण म्हणजे शिक्षण आहे.
- शिक्षण हे जीवन आहे : शिक्षणाशिवाय जीवन अर्थहीन आहे. जीवनाचा प्रत्येक पैलू व प्रसंगाच्या विकासासाठी शिक्षणाची गरज आहे.
- शिक्षण हे सतत आपल्या अनुभवांची पुर्नरचना आहे : जॉन ड्यूई नुसार आपल्या अनुभवांचे पुर्नरचना व उपाय योजना समाजाच्या गरजेनुसार (इच्छेनुसार) असावयास हवी.
- मानव जातीसाठी शिक्षण ही एक शक्ती आहे. ह्या शक्तीद्वारे मानव पृथ्वीवरील मानव सर्व शक्तीमान होऊ शकतो.
- शिक्षण ही तिप्पट प्रक्रिया आहे : ह्यामध्ये शिक्षक, विद्यार्थी व समाज ह्यांचा संबंध आहे.



आकृती १.१ शिक्षक, समाज व संबंध विद्यार्थी

परिपूर्ण समाज व मानवांसाठी शिक्षणाची भूमिका अगणित आहे. समाज व राष्ट्रासाठी व वैयक्तिक समग्र आनंद, उत्कर्ष, समृद्धीसाठी शिक्षणाची गरज आहे.

आपली पग्रती तपासा :

१) विद्यार्थी, शिक्षक व समाज शिक्षण पद्धतीचे तीन आधारस्तंभ आहेत. समर्थन करा.

२) भारतीय संदर्भात शिक्षण संज्ञेची व्याख्या औपचारिकपणे करा.

१.३ शिक्षणाची व्याप्ती व कार्य

१.३.१ शिक्षणाची व्याप्ती :

व्याप्ती म्हणजे पाहण्याची श्रेणी, दृष्टीकोन क्षेत्र, उपक्रमाची संधी, विविध कामे करण्यासाठी संधी व उपयोजन होय. शिक्षणाचा अर्थ व उपयोजन विस्तृत आहे.

शिक्षणामध्ये व्याप्तीची सद्यस्थिती पुढील प्रमाणे :

- इतर शिस्तीशी संबंध
- शिक्षणाचे क्षेय
- शिक्षणाचा प्रकार

१.३.१.१ इतर शिस्तीशी संबंध

१) शिक्षण व तत्त्वज्ञान :

शिक्षणाचे तत्त्वज्ञान मध्ये शिक्षणाचे ध्येय, शिक्षणाचे स्वरूप, शिक्षणाचे महत्त्व, कार्य ह्यांचा अंर्तभाव असतो. हा शिक्षणाचा अतिशय जुना व महत्त्वाचा भाग आहे.

२) शिक्षण व मानसशास्त्र :

शिक्षणाचे मुल्य ध्येय म्हणजे मुलाचा विकास करणे हे आहे. मानसशास्त्र हे बालकाचा (मुलाचा) शारीरिक, मानसिक, भावनिक समायोजन, वैयक्तिक भेद, व्यक्तीमत्व, विचारसरणी, समस्या निराकरण (problem solving) संबंधी मुलांना समजून घेऊन त्यांचा विकास करण्यास मदत करते.

३) शिक्षण व समाजशास्त्र :

मूल समाजात राहते. म्हणून त्यास समाजाविषयी माहिती, समाजाचे स्वरूप, संस्कृती व समाज यांचे आंतरसंबंध माहिती असणे अत्यावश्यक आहे.

४) शिक्षण व इतिहास :

पार्श्वभूमी, मूळ विकास, वाढ व विकासाचे पैलू माहिती असणे महत्त्वाचे आहे. प्राचीन काळ मध्यवर्ती काळ, ब्रिटीश काळ व आधुनिक काळातील अध्यापन पद्धती जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

५) शिक्षण व अर्थशास्त्र :

व्यवसाय वाढ व जागतिक बाजार (market) जाणून घेण्यासाठी शैक्षणिक अर्थशास्त्र प्रत्येकासाठी महत्त्वाचे आहे.

६) शिक्षण व राज्यशास्त्र :

सुरुवातीपासून राजकीय पद्धतीचा शिक्षणाच्या सिद्धांत व प्रात्यक्षिकांवर प्रभाव दिसून येतो. राजकारणाचा प्रभाव लोकांना शोषणाविरुद्ध लढण्यासाठी, अन्याय व मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी, एक नागरीक व ग्राहक म्हणून हक्क अबाधित राखण्यासाठी कारणीभूत आहे.

७) शिक्षण व लोकसंख्येचा अभ्यास :

शिक्षणाचे व्यवस्थापन हे शिक्षणाच्या प्रशासन पद्धतीशी संबंधित आहे. हे मानवी व साहित्य स्त्रोताचे पर्यवेक्षण, योजना, धोरणे ह्यांचे शैक्षणिक पद्धतीमध्ये उपयोजन व अंमलबजावणीशी संबंधित आहे.

८) शैक्षणिक तंत्रज्ञान :

शैक्षणिक तंत्रज्ञान शारीरिक हार्डवेअर व सॉफ्टवेअर व शैक्षणिक सिद्धांत ह्यांचा अध्ययनाचा सोयीसाठी आहे. तसेच ह्यांचा उपयोग योग्य तांत्रिक प्रक्रियांचे व्यवस्थापन, तयारी व कामगिरी सुधारण्यासाठी आहे.

१.३.१.२ शिक्षणाचे प्रकार

शैक्षणिक विचारवंत, तत्वज्ञानी, हुशार ह्यांनी शिक्षणाचे विविध प्रकार व श्रेणी मध्ये विभाजन केलेले आहे. ह्याप्रमाणे शिक्षणाचे प्रकार पुढीलप्रमाणे -

१) औपचारिक शिक्षण (Formal Education):

औपचारिक शिक्षण, हे शाळा, विद्यालये व महाविद्यालयां मधून दिले जाते. औपचारिक शिक्षण हे निश्चित ध्येय व उद्दिष्टे समोर ठेवून अभ्यासक्रमानुसार तयार केलेले असते. ह्यांची एक निश्चित वेळापत्रक, परीक्षा पद्धत व शिस्त असते. शाळा व महाविद्यालये ह्यांच्या नुसार नियम व शिस्त लावण्याची प्रक्रिया पुरवलेली असते. ह्यांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

- हे पूर्व निर्धारीत व पूर्व नियोजित आहे.
- वेळेचे बंधन नियमानुसार नियंत्रित आहे.
- जागेचे बंधन म्हणजे संस्थात्मक होय.
- वयाचे बंधन आहे.
- गुणवत्तापूर्ण शिक्षकांकडून दिलेले आहे.
- कडक शिस्तीचे पालन आहे.
- ह्याचे स्वरूप पद्धतशीरपणे आहे.

२) अनौपचारिक शिक्षण (Informal Education):

अनौपचारिक किंवा प्रांसगिक शिक्षण हे प्रत्येकाच्या जीवनामध्ये घडून येते. हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होते. उदा. सायकल चालवणे, घोडे सवारी करणे, मासेमारी करणे इ. कुटुंब हे अनौपचारिक शिक्षण मुख्य स्रोत आहे. कुटूंबातील सदस्यांकडून भरपूर गोष्टी शिकावयास मिळतात.

अनौपचारिक शिक्षणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- हे हेतू पुरस्सर व पूर्व नियोजित नाही.
- हे कोणत्याही संस्थेत निश्चित नाही.
- ह्या ठिकाणी वेळापत्रक व विहित असा अभ्यासक्रम नाही.
- वेळेचे व वयाचे बंधन नाही.
- अनौपचारिक शिक्षणाचे प्रतिनिधीत्व करण्याला पुष्कळ संस्था आहेत.
- ह्यास शाळा बाह्य शिक्षण असेही संबोधिले जाते.

३) न औपचारिक शिक्षण (Non Formal Education):

न औपचारिक शिक्षणामध्ये शैक्षणिक कृतींचे पद्धतशीरपणे आयोजन हे औपचारिक पद्धती रचने बाहेर आहे. न औपचारिक शिक्षण हे योग्य ठिकाणी वेळेवर, आकलन स्तराव मुलांची व वयस्करांची वाढ होण्यासाठी आहे.

मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- न औपचारिक शिक्षण मुक्त आहे व ते स्पर्धात्मक नाही.
- न औपचारिक शिक्षणाची रचना व नियोजन औपचारिक शिक्षणाबाहेर जाऊन केलेले आहे.
- एकसारख्या गटाच्या गरजांसाठी ह्याचे कार्यक्रम आयोजन केलेले आहे.
- ह्याचे उपयोजन जाणीवपूर्वक, हेतुपुरस्पर आहे.
- ह्याचे मूल्यमापन, प्रक्रिया, रचना व अभ्यासक्रम लवचिक आहे.
- न औपचारिक शिक्षणामध्ये शिक्षक-विद्यार्थी संबंध हे जिव्हाळ्याचे आहेत.
- न औपचारिक शिक्षणामध्ये हजेरी / उपस्थिती ऐच्छिक आहे.

न औपचारीक शिक्षणामध्ये बहुतेक लोक हे काम करणारे आहेत.



आकृती १.२ औपचारीक, अनौपचारीक व न औपचारीक शिक्षणाचा आढावा

१.३.२ शिक्षणाचे कार्य :

१) सामाजीकरणाची प्रक्रिया पूर्ण करणे :

हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. उदयास येणाऱ्या उदारमतवादी कुटूंब, शाळेची भूमिका व इतर शैक्षणिक संस्था त्यामुळे निश्चितच समाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये वाढ दिसून येत आहे. मुलांमध्ये प्रामाणिकपणाच्या विकास इतरांना समजून घेणे, खरे व खोटे ह्यामधील तफावत समजून घेणे ह्यासाठी शाळा प्रशिक्षण देत आहे. सामाजीकरणाची प्रक्रिया ही मुलांना सहकार्यात्मक बनविणे व समाजातील नियमांचा एक चांगला नागरीक म्हणून आदर करण्यासाठी उद्युक्त करते. समाजीकरणाची प्रक्रिया ही पाठ्यपुस्तके अध्ययन अनुभव ह्या द्वारे खरोखरच सामाजिक कौशल्य विकासास मदत होत आहे.

२) सांस्कृतिक वारसा रूपांतरीत करणे :

सर्व सामाजिक संस्था चढत्या क्रमाने सांस्कृतिक वारसा अधोरेखित करुन सामाजिक आयोजनाद्वारे सांस्कृतिक ठेवा पुढील पिढीसाठी रुपांतरीत करीत आहे.

सर्व प्रकारचे शिक्षण व शैक्षणिक संस्था वाङमय, इतिहास, तत्वज्ञान ह्याचे अध्यापन करुन सांस्कृतिक कार्याचे रुपांतरण करीत आहेत.

३) सामाजिक व्यक्तिमत्वाचे सूत्रीकरण :

समाजातील वैयक्तिक व्यक्तीमत्वामध्ये सर्वसाधारणपणे समान सांस्कृतिक लक्षणे दिसून येतात. सामाजिक व्यक्तीमत्वाच्या निर्मितीसाठी संस्कृतीच्या रुपांतरण प्रक्रियेबरोबरच शिक्षणाचे सुद्धा योगदान आहे. सामाजिक व्यक्तिमत्व निर्मिती वातावरणाशी समायोजन व स्वतः व इतरांशी पूर्णपणे सहकार्य करण्यास मदत करते.

४) सुधारण्याची वृत्ती :

विकास प्रक्रियेमध्ये, मुलांच्यामध्ये अवांछित वृत्ती, विश्वास व अविश्वास, स्थानिक, पूर्वग्रह मत्सर हेवा, प्रेम इ. असते. अवांछित वृत्ती नकारात्मक पैलू, अंधविश्वास काढणे, अनैतिक पूर्वग्रह, अवास्तव परिसर, भिती इ. मुलांच्या मनातून काढणे हे शिक्षणाचे कर्तव्य आहे. मुलांची वृत्ती व नेत्रदीपक (यश) परिणाम आणण्यासाठी शाळा व घरातून एकत्रित प्रयत्नांची गरज आहे.

५) जीवनामध्ये व्यावसायिक नियोजन नोकरी साठी शिक्षण हे साधन :

सर्वात जास्त प्रमाणात नोकरीसाठी व व्यवसायासाठी शिक्षणाचा वापर होत आहे. शिक्षणाच्या प्रात्यक्षिक ध्येयाशी हे कार्य संबंधित आहे. समाजाच्या विविध गरजांचे लक्ष शिक्षण वेधून घेत आहे. शिक्षण फक्त विद्यार्थ्यांना भविष्यातील व्यवसायाची आगाऊ सूचना देण्याासाठी नसून ते जीवनाचा प्रभावी मार्ग प्राप्त करुन सक्षम बनविण्याचे साधन आहे. ह्या कार्याची उपयुक्तता म्हणजे आपण महत्त्वाचे असे व्यावसायिक प्रशिक्षण देत आहोत.

६) प्रदान दर्जा (Confering Status) :

कोणते शिक्षण व कोणत्या प्रकारचे व प्रकारे शिक्षण वैयक्तिक रित्या घेतलेले आहे. ह्यावरुन ह्या व्यक्तीचा समाजातील दर्जा ठरविला जात आहे. किती शिक्षण घेतले ह्या पेक्षा सद्य स्थितीत किती ज्ञान प्राप्त केले हे महत्त्वाचे आहे. उदा. पदवीकाधारक नर्स, पदवीधर नर्स व पारंपारीक विषयामध्ये पीएच.डी. (विद्यावाचस्वती)

७) खऱ्या व योग्य हेतू च्या स्पर्धेस शिक्षण प्रोत्साहन देते :

लोकशाही समाजाच्या वाढीसाठी सुदृढ स्पर्धा अत्यावश्यक आहे. सुदृढ स्पर्धा ह्या गुणवत्ता पूर्ण सेवा व उत्पादनाच्या स्वरूपात असतात. अधिक जीवन मान उंचावण्यासाठी शालेय स्तरांवर सुदृढ स्पर्धेची गरज व जाणीव विद्यार्थी दशेत करुन दिली पाहिजे. दुर्दैवाने सद्याची शिक्षण पद्धती अस्वस्थ (Unhealthy) स्पर्धा वाढवत आहे.

८) आर्थिक गरजेसाठी शिक्षण कौशल्य प्रशिक्षण देते :

शिक्षण व अर्थशास्त्र ह्यांचा द्विपक्षीय संबंध आहे. उदा. चांगल्या हॉस्पीटलमधील गुणवत्ता ही त्या हॉस्पीटलमधून पास होणाऱ्या गुणवत्तापूर्ण नर्स वर अवलंबून असते. काळजी घेणाऱ्या नर्सवरुन अधिक अधिक पेशंट त्या हॉस्पीटल मध्ये येत असतात. म्हणजेच त्या हॉस्पीटलची गुणवत्ता पूर्ण सेवा ही ह्या हॉस्पीटलला अधिक पैसे मिळवून देते. अर्थातच हॉस्पीटल असलेल्या विभागाची आर्थिक प्रगती होते.

९) लोकशाहीचा सहभाग वाढवणे :

सर्वसाधारण नागरीक हा हक्क व कर्तव्ये विषयी जागरुक असतो व तो लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी होतो. साक्षरता हा लोकशाही सहभागाचा अत्यावश्यक भाग आहे आणि साक्षरता हा शिक्षणाचा अभिमान आहे. शिक्षण हे लोकशाहीचा सहभाग वाढविते.

१०) शिक्षण मूल्ये देते :

सामाजिक जिवनामध्ये चांगले जीवन जगण्यासाठी शिक्षण विद्यार्थ्यांना मूल्यांची भूमिका ओळखण्यास समजून घेण्यास मदत करते. विविध उपक्रमांमधून शिक्षण पुढील मूल्ये देते.

- प्रामाणिकपणा
- सहकारी वृत्ती
- संघ प्रवृत्ती
- आज्ञापालन
- खरे बोलणे

११) शिक्षण एकात्मिक बलाची भूमिका करते :

समाजातील विविध घटकांना मूल्याचे संप्रेषण करुन शिक्षक समाजामध्ये एकात्मिक बलाची भूमिका करते. शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर सामाजिक कौशल्ये शिकत असतात. एकात्मिक बलाचा विकास करण्यासाठी भारतामध्ये शिक्षणाद्वारे विविधतेमध्ये एकता शिकवली जाते.

१२) एखाद्या विशिष्ट व्यवसायासाठी शिक्षणाद्वारे मूल्ये व उद्‌बोधन पुरविले आहे :

हे शिक्षणाच्या व्यवसायासाठी व्यवहारिक दृष्ट्या संबंधित आहे. उदा. नर्सिंग संस्था. नर्सिंग संस्था ह्या समाजातील गरजांची पूर्तता करण्यासाठी विद्यार्थी घडवत असतात.

आपली प्रगती तपासा :

१) शिक्षणाच्या तीन प्रकारामधील फरक स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२) शिक्षणाचे इतर शिस्तीशी संबंध स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

३) शिक्षण कशाप्रकारे स्पर्धेसाठी प्रोत्साहन देते ?

१.४ शिक्षणाची वैशिष्ट्ये

शिक्षण ही अनुभवांची सत पुर्नरचना करण्याची प्रक्रिया आहे.

शिक्षणाची विस्तृत वैशिष्ट्ये आहेत त्यापैकी महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१) शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे :

शिक्षण हे सामाजिक वातावरण घडविते. शिक्षणाशिवाय कोणताही अनुभव संपादन करु शकत नाही. शिक्षणामध्ये अनुभव हा फार महत्त्वाचा आहे. सामाजिक वातावरणातून अनुभव निर्माण होतो. म्हणून शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया आहे.

२) जीवन व शिक्षण आंतरसंबंध :

आपल्या शिक्षण व जीवनामध्ये विविध परिस्थिती मध्ये विविध प्रसंग येत असतात. हे दोन्हीही आपल्या जीवनावर प्रभाव टाकत असतात म्हणूनच शिक्षण म्हणजे जीवन व जीवन म्हणजे शिक्षण असे आपण म्हणतो.

३) शिक्षण विकास आहे :

मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षण हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्य साधन आहे. शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे मुलांचा संपूर्ण स्तरावर विकास करणे आहे. म्हणून शिक्षण म्हणजे विकास व विकास म्हणजे जीवन होय.

४) शिक्षण हे सृजनात्मकतेचे मूळ कारण आहे :

शिक्षण वैयक्तिकरित्या नवीन अनुभव देते व नवीन सृजनात्मकतेस मदत करते.

५) शिक्षण हे अनुभवांची पुर्नरचना आहे :

मनुष्य विविध परिस्थिती मध्ये विविध अनुभव संपादन करत असतो. काही वेळा त्याचे रुपांतरण नवीन अनुभवांमध्ये होते व नवीन अनुभव मानवाच्या जीवनातील रिकामेपण भरुन काढतो. मानवी जीवनामध्ये अनुभवांची पुर्नरचना व रुपांतरण म्हणजेच शिक्षण होय.

६) सामाजिक संवादामध्ये शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते :

प्रत्येक समाजामध्ये त्या समाजाची स्वत:ची वैशिष्ट्ये, नैतिकता, भाषा, संस्कृती, विश्वास इ. असतात. शिक्षण त्या समाजास संवाद करण्यास मदत करते.

७) शिक्षण ही एक कला आहे :

शिक्षण ही कला आहे. शिक्षण हे मुलांच्या अंतर्गत गुणवत्तेमध्ये सुंदर रीतीने कलेप्रमाणे विकास करते. अध्यापन ही सुद्धा कला आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांचे चांगले आरोग्यदायी व्यक्तीमत्व जडण-घडणी मध्ये मदत करतात.

८) शिक्षण ही सामाजिकीकरणाची प्रक्रिया आहे :

प्रत्येक समाजास त्यांची स्वत:ची नैतिक मूल्ये आहेत. शिक्षणाच्या मदतीने नैतिक मूल्यांचा विकास करू शकतो. म्हणून शिक्षणास सामाजिकीकरणाची प्रक्रिया असे म्हटले जाते.

९) शिक्षण हे मानवी स्वभावामध्ये इच्छित बदल आणू शकते :

इच्छित मार्गाने शिक्षण मानवी स्वभावामध्ये बदल आणू शकते. चांगले व नैतिक वागणे माणसास चांगली व्यक्ती व त्याच्या विकासामध्ये मदत करते.

१०) नवीन परिस्थितीमध्ये समायोजन करण्याची शक्ती शिक्षणामध्ये आहे :

शिक्षण हे दैनंदिन जीवनामध्ये येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याची शक्ती देते.

आपली प्रगती तपासा :

१) शिक्षणाची वैशिष्ट्ये लिहा.

२) शिक्षण ही एक कला आहे. समर्थन करा.

१.५ सारांश (आढावा)

वरील विवेचनावरुन प्राचीन काळापासून ते आधुनिक युगापर्यंत जॉन ड्यूई, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी इ. विविध शिक्षण तज्ञांनी विविध मार्गाने आपले विचार स्पष्ट केले आहेत. शिक्षण क्षेत्र फार विस्तृत आहे. विशिष्ट अशी शिक्षणाची व्याख्या करणे फार कठीण आहे. हे शिक्षण तज्ञांनी मान्य केलेले आहे. आपण पाहिले शिक्षण तंज्ञानी शिक्षणाच्या एका पैलूवर

व्याख्या केली आहे व इतरांनी शिक्षणाच्या दुसऱ्या पैलूवर जोर दिलेला आहे. ह्याचे कारण म्हणजे विविध शिक्षणतज्ञांनी आपआपली विविध मते मांडली आहे. बहुतेक तत्वज्ञानी लोकांनी जीवनाचा उद्दिष्टा विषयी दृष्टीकोन व्यक्त केलेला आहे.

शिक्षणाचे विविध अर्थ व व्याख्या त्यावरुन असे आढळून आले की शिक्षण हे व्यापक असावे. म्हणून शिक्षणाची व्याख्या ही सहेतूक, जाणीवपूर्वक, मानसिक, सामाजिक, वैज्ञानिक व तात्त्वीक प्रक्रिया असावी. शिक्षणामुळे वैयक्तिक विकास व सामाजिक विकास वैयक्तिक स्तरांवर पूर्णपणे होण्यास मदत होते. शिक्षणामुळे जास्तीत जास्त सुख व उत्कर्ष होऊन समाजाचा जास्तीत जास्त विकास होतो.

थोडक्यात त्याच्या / तिच्या गरजा व समाजाच्या मागणी (demand) नुसार शिक्षण हे विकासाचे साधन आहे.

१.६ स्वाध्याय

१) तीन प्रकारच्या शिक्षणामधील फरक स्पष्ट करा.

२) शिक्षणाची विविध क्षेत्र उदाहरणासह वर्णन करा.

३) शिक्षणाच्या व्याप्तीची संबंधित उदाहरणासह चर्चा करा.

४) शिक्षणाचा अर्थ काय आहे ? भारतीय तत्ववेत्या नुसार शिक्षणाची व्याख्या करा.

५) "माणसामध्ये अगोदरच असलेल्या दैवी शक्तीचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय." असे कोणी म्हटले -

अ) स्वामी विवेकानंद ब) जॉन ड्यूई

क) महात्मा गांधी ड) झाकीर हुसेन

६) शिक्षणाच्या तिप्पट प्रक्रियेचा पुढीलपैकी कोणता भाग नाही.

अ) शिक्षण ब) विद्यार्थी क) शिक्षक ड) समाज

७) खालीलपैकी कोणती प्रक्रिया शिक्षण प्रदान करीत नाही.

अ) औपचारीक ब) अनौपचारिक क) न औपचारिक ड) प्रांसगिक

८) खालीलपैकी कोणते विधान शिक्षणासाठी सत्य नाही.

अ) शिक्षण ही एक कला आहे ब) शिक्षण ही सामाजिकीकरणाची प्रक्रिया नाही

क) शिक्षण विकास आहे ड) शिक्षण सृजनात्मकतेचे कारण आहे

❖❖❖❖

२

शिक्षणाचे अध्यापनशास्त्र

घटक रचना :

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ अध्यापनशास्त्र : अर्थ व महत्त्व
२.२.१ अध्यापनशास्त्राचा अर्थ
२.२.२ अध्यापनशास्त्राचे महत्त्व
२.३ चिकित्सक अध्यापनशास्त्र : अर्थ व गरज
२.३.१ चिकित्सक अध्यापनशास्त्राचा अर्थ
२.३.२ चिकित्सक अध्यापनशास्त्राची गरज
२.४ पाश्चात्य व भारतीय विचारवंताचे शिक्षणाविषयीचे विचार
२.४.१ पाश्चिमात्य विचारवंताचे शिक्षणविषयक विचार
२.४.२ भारतीय विचारवंताचे शिक्षण विषयक विचार
२.५ सारांश
२.६ स्वाध्याय

२.० उद्दिष्ट्ये

ह्या घटकाचा अभ्यास केल्यास तुम्ही करु शकाल.

- अध्यापनशास्त्र ही संज्ञा समजून घ्याल.
- अध्यापनशास्त्राचा अर्थ व महत्त्व साध्य कराल.
- चिकित्सक अध्यापनशास्त्राची गरज व महत्त्व यांचा खुलासा कराल.
- विविध पाश्चात्य विचारवंताचे शिक्षण विषयक विचार समजून घ्याल.
- विविध भारतीय विचारवंताचे शिक्षण विषयक विचार समजून घ्याल.

२.१ प्रस्तावना

मागील घटकामध्ये आपण जॉन ड्यूई ह्यांची शिक्षणाची व्याख्या पाहिलेली आहे. तसेच स्वामी विवेकानंद, डॉ. मारीया व इतर विविध शिक्षणतज्ञांची शिक्षण विषयक व्याख्या आपण पाहिलेली आहे. काही शिक्षण तज्ञांनी शिक्षणाच्या एखाद्या पैलू ची व्याख्या केलेली आहे आणि इतरांनी शिक्षणाच्या इतर बाजूंचा विचार केला आहे. शिक्षणाच्या संकल्पनेविषयी विविध शिक्षण तज्ञ, विचारवंत, तत्ववेत्यांची मते भिन्न आहे.

ह्या घटकांमध्ये आपण शिक्षणाचा अर्थ व अध्यापनाच्या शिक्षणशास्त्राची गरज व महत्त्व समजून घेणार आहे. नंतर ह्या घटकांमध्ये आपण चिकित्सक अध्यापनशास्त्राची गरज जाणून घेणार आहे.

२.२ अध्यापनशास्त्र : अर्थ व महत्त्व

अध्यापनशास्त्र :

सर्वसाधारणपणे विस्तृतपणे अध्यापनाचा दृष्टीकोन हा शिक्षणा शिक्षणाची (थेअरी) सिद्धांत, उपपती व सराव व त्याचा अध्ययनावर होणारा परिणाम व वाढ समजून घेतले पाहिजे. अध्यापनशास्त्रामध्ये शैक्षणिक शिस्तीमुळे शिक्षणामध्ये ज्ञान व कौशल्य ह्यांचा अभ्यास कसा करावयाचा व त्याचे महत्त्व समजून घेण्यास मदत होते व अध्ययनामध्ये आंतरक्रिया घडून येण्यासाठी उपयोगी पडते. अध्यापनशास्त्राचे प्रतिबिंब विविध सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संदर्भात जेथून त्यांचा उदय होतो त्या ठिकाणी पडते. अध्यापनशास्त्र ही लहान मुलांना तसेच प्रौढ अध्यापनामध्ये प्रौढांना अध्ययन करण्याची कला आहे.

२.२.१ अध्यापनशास्त्राचा अर्थ :

- शिक्षणाची उद्दिष्ट्ये व शिक्षणाचे ध्येय संपादन करण्याचा मार्ग ह्यांचा समावेश असलेल्या अध्यापन पद्धतींचा अभ्यास म्हणजे अध्यापनशास्त्र होय. हे क्षेत्र प्रभावीपणे शैक्षणिक मानसशास्त्राचा अधिपत्याखाली अध्ययनाच्या वैज्ञानिक उपपत्ती (Theories) कार्य करतात. तसेच संभाव्य तात्वीक शिक्षणापासून शैक्षणिक मूल्ये व ध्येये ग्राह्य ठरवितात.
- शिक्षकांच्या कृतींचा आकृतीबंध, मते व इतर शैक्षणिक निती अध्ययनाच्या उपपत्ती (Theory) ग्राह्य धरुन अध्यापनशास्त्र दत्तक घेतले जाते. तसेच हे करत असताना विद्यार्थ्याचे आकलन व त्यांच्या गरजा, विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी व वैयक्तिक विद्यार्थ्यांची आवड ह्यांचा चिकित्सक विचार अध्यापनशास्त्रा मध्ये करतात. ह्यांची ध्येये कदाचीत काही ठिकाणी उदार तर काही ठिकाणी म्हणजे व्यावसायिक शिक्षणामध्ये विशिष्ट संपादन व विशिष्ट कौशल्यांसाठी शिथील असतात.
- अनुदेशनात्मक निती ही विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीनुसार व अनुभव, परिस्थिती व विद्यार्थ्यांनी निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार नियंत्रित होते.

२.२.२ अध्यापनशास्त्राचे महत्त्व

शैक्षणिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्यापनशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे -

- विद्यार्थ्यांद्वारे विषयाचे सखोल आकलन
- मुख्य संकल्पनेसंदर्भात कमीत कमी गैरसमज
- विशेष आशयाचा दृष्टीकोन सुलभतेने समजण्यासाठी
- अध्यापन हे अधिक मनोरंजनात्मक व विविध दृष्टीकोनातून परिपूर्ण करण्यासाठी
- जास्तीत जास्त प्रमाणात प्रयोग शाळेतील वस्तू एकत्रित करण्यासाठी
- व्याख्यानावर आधारित विरुद्ध शोधात्मक दृष्टीकोनाचा वापर वाढविण्यासाठी
- विज्ञान (Science) व अभियांत्रिकी (Engineering) ह्यांच्या सरावाद्वारे सखोल आकलनासाठी
- प्रमाणित (Authentic) मूल्यमापनाचा मोठ्या प्रमाणात वापर

आपली प्रगती तपासा :

१) अध्यापनशास्त्राचे महत्व विषयी चर्चा करा ?

_____

_____

_____

_____

_____

२) शिक्षणामध्ये अध्यापनशास्त्र म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

२.३ चिकित्सक अध्यापनशास्त्र : अर्थ व गरज

चिकित्सक अध्यापनशास्त्र म्हणजे अध्यापनशास्त्रीय दृष्टीकोन व विस्तृत सामाजिक चळवळ होय. चिकिस्तक अध्यापनशास्त्र हे शैक्षणिक सराव व ऐतिहासिक आकृतीबंध, राजकारण विरहित शाळेचे ठिकाण व राजकारणाने प्रभावीत नसलेले अध्यापन ह्यांची पोच देणारे असे आवश्यक आहे. अभ्यास क्रमाविषयी शिस्त सराव, शिस्त, विद्यार्थी चाचणी पाठ्यपुस्तकांची निवड शिक्षकांनी वापरलेली भाषा हे सर्व विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनविण्यासाठी तर काही विद्यार्थ्यांना दंडीत करण्यासाठी आहे.

२.३.१ चिकित्सक अध्यापनशास्त्राचा अर्थ

चिकित्सक अध्यापनशास्त्र हे शैक्षणिक सराव काही विद्यार्थ्यांना आवडणारा तर काही विद्यार्थ्यांना न आवडणारा ह्यासाठी परिचित आहे. हे शास्त्र शैक्षणिक सरावाचा आवाज काहींना प्रिय आणि काहींना अर्थपूर्ण किंवा दुसऱ्यांना दुर्लक्षित करण्यासाठी परिचित आहे. ह्याचा दुसरा परिक्षण केलेला पैलू म्हणजे विद्यार्थ्यांना नियंत्रित करण्याचा अधिकार (Power) व ह्याची अंमलबजावणी करण्यासाठीचा अधिकार शिक्षकांना आहे. ह्याचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना सतत चांगला नागरिक होण्यासाठी सक्रिय करुन त्यांना कार्यरत करुन सक्षम बनविणे हा आहे. ह्यामुळे विद्यार्थी सक्रियतेने त्यांचे व त्यांच्या जमातीचे जीवनमान सुधारतात.

चिकित्सक अध्यापनशास्त्राचा सरावामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे.

- सर्वसमावेशीत विद्यार्थ्यांनी ऐकून घेणे
- ज्ञान व दृष्टीकोनाची वर्गामध्ये जाण
- विस्तृतपणे समाज / जमात व शाळा ह्यांचा संबंध प्रस्थापित करणे.
- विद्यार्थी वागणूकीतील समस्या निराकारण व ज्ञान वाढेल असे प्रश्न विद्यार्थ्यांकडून विचारले जाण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे
- विद्यार्थी आकलन

विद्यार्थ्यांच्या वागणूकीतील समस्यांमधून विद्यार्थी त्यांच्या वागणूकीतील समस्या स्वत:च निराकरण करण्यासाठी त्यांना सक्षम करणे. शिक्षक त्यांच्या स्वायतत्तेच्या अधिकाराच्या स्थिती जाणून घेऊन त्यांच्या कृतीद्वारे त्या व्यक्त करवून घेऊन विद्यार्थ्यांना आधार देतात.

२.३.२ चिकित्सक अध्यापनशास्त्राची गरज :

चिकित्सक अध्यापनशास्त्र हे पुरोगामी अध्यापन तत्वज्ञान आहे. हे शास्त्र विद्यार्थ्यांची बलस्थाने, रचना व असमानतेचा आकृतीबंध व त्यांचा दर्जा ह्यांचे परिक्षण करण्याचे आव्हान स्वीकारते. त्यांना प्रश्न विचारण्याचे अधिकार दिल्यामुळे विद्यार्थी त्यांचे स्वत:चे अध्ययन नियंत्रित करु शकतात. त्यांना जे (शिकवले) अध्यापन केलेले आहे. त्याबद्दल असणाऱ्या त्यांच्या मतांचे चिकित्सकपणे मूल्यमापन करता येते.

राजकीय विचारधारेने चिकित्सक अध्यापनशास्त्र हे शिक्षा म्हणून विद्यार्थ्यांना ओझे आहे असा गैरसमज सुद्धा करुन दिला जातो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना राजकीय घटकावर लिहिण्यापूर्वी मूलभूत लिखाण प्रथमत: समजावून देण्याची गरज आहे. शिक्षकांनी आपण वर्गांमध्ये आहोत. आपण राजकीय आखाड्यामध्ये नाही ह्याचे भान लिखाण शिकवताना ठेवले पाहिजे. उघडपणे बोलणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे प्रचंड अडथळे असतात. हे अडथळे त्यांना अर्थशास्त्र राजकीय विचारधारा ह्या चर्चे मध्ये प्रकट होतात. ह्यामुळे विद्यार्थी अध्ययनासाठी लिखाणाचे संपादीत ध्येयापासून नाउमेद होतात.

चिकित्सक अध्यापनशास्त्र म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ राजकारणावरच केंद्रीभूत करणे नव्हे. चिकित्सक अध्यापनशास्त्र म्हणजे सद्याच्या सामाजिक समस्यांवर समर्थक व फसवेगीरवर चर्चा करणे नव्हे. तसेच विरुद्ध राजकीय (पार्टी) पक्षांवर टीका करणे नव्हे. चिकित्सक अध्यापन शास्त्र हे विद्यार्थ्यांना त्यांच्या सभोवतालच्या वैचारिकतेसाठी अज्ञात प्रदेशात जाऊन शोध

लावण्याचा अधिकार देते. विशेषत: ह्या वैचारीकतेचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या सभोवतालच्या अज्ञात संस्कृतीचा निर्णय घेण्यासाठी पडतो. ह्यामुळे विद्यार्थी वैयक्तिक मधून सामाजिकतेमध्ये रुजण्यास मदत होते. समाजामध्ये सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांना परिक्षण व पुर्नपरिक्षण करण्यास त्यामुळे मदत होते. कधी कधी असामान्य दर्शविण्यासाठी सुद्धा मदत होते. परंतु अध्यापन हे नैतिकतेने व काळजीपूर्वक हाताळले जाते. विद्यार्थी हे ज्ञानाची जडणघडणीसाठी असावे ते फक्त निष्क्रीयपणे अध्यापना पोच घेणारे नसावेत.

आपली प्रगती तपासा :

१) चिकित्सक अध्यापनाची शिक्षणातील गरज ह्यावर चर्चा करा.

२) शिक्षणामध्ये चिकित्सक अध्यापनशास्त्र म्हणजे काय ?

२.४ पाश्चात्य व भारतीय विचारवंताचे शिक्षणाविषयीचे विचार

२.४.१ पाश्चिमात्य विचारवंताचे शिक्षणविषयक विचार :

१) डॉ. मारीया मॉन्टेसरी :

(मारीया तेला अर्टेमिसीया मॉन्टेसरी ऑगस्ट ३१, १८७०, मे ६, १९५२) ह्या एक डॉक्टर होत्या व शिक्षणातील एक उत्कृष्ट विचारवंत व शिक्षणातील तत्वज्ञानाच्या जाणकार होत्या. तसेच त्या शास्त्रीय अध्यापनशास्त्राच्या लेखिका होत्या. मॉन्टेसरी ने ज्या तांत्रिक शाळेत मुले शिकत होती त्या शाळेत आपले नाव नोंदवून लैंगिकतेचा अडथळा दूर केला. तिला इंजिनियअर होण्याच्या अपेक्षेने तिने तंत्रशाळेत प्रवेश घेतला होता. परंतु तिचे मन बदलले व तिने स्पेन्झा मेडीकल शाळेत जाण्यास सुरुवात केली व १८९६ साली तिने वैद्यक शास्त्रात पदवी घेतली. तिची शैक्षणिक पद्धत सर्व जगामध्ये खाजगी व सार्वजनिक शाळेमध्ये आज ही आहे.

मॉन्टेसरी शिक्षण :

डॉ. मारीया मॉन्टेसरीच्या नावावरुन मॉन्टेसरी ही एक शैक्षणिक पद्धत आहे. तिने शिक्षणास शास्त्रीय स्तरावरुन पाहिले. व्यक्तीला जीवनाच्या सर्व दृष्टीकोनातून शिक्षणाद्वारे तयार

करता येते ह्यावर तिचा दृढ विश्वास होता. नैसर्गिकपणे विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये वाढ करण्यासाठी अध्ययन साहित्य व तंत्रे तयार केली. सर्व मॉन्टेसरी बालवर्गासाठी ही पद्धत सारखीच आहे. ह्या अध्ययन साहित्य व तंत्रांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना नैसर्गिकपणे वाचन, लेखन व गणित येण्यास एक आकृतीबंध तयार करण्यात आला. प्रत्येक कौशल्य एकमेकांशी दुव्याने जोडलेले आहे.

मॉन्टेसरी तत्त्वज्ञान :

मॉन्टेसरी तत्वज्ञान हे मुलाच्या जन्मापासून तारूण्यापर्यंत पूर्णतः विकास व प्रगतीसाठीच्या आधारावर आहे. हे शिक्षणाच्या विस्तृत दृष्टीकोन जीवनाच्या मदतीसाठी आहे. मॉन्टेसरी अध्यापन हे केवळ शब्द ऐकून निष्क्रीयतेचे नसून सभोवतालच्या वातावरणातून सक्रीय अनुभवाद्वारे दिले जाते. त्यामुळे मॉन्टेसरी दृष्टीकोन हा मुलांना आयुष्यभर अध्यापनासाठी प्रेम निर्माण होईल अश्या प्रकारे वर्ग तयार केला जातो. तयार केलेल्या वर्गाच्या गुणवत्ते मध्ये पुढील बाबींचा समावेश असतो.

- रचना
- योग्य अनुक्रम
- निवडीचे स्वातंत्र्य
- हालचालीचे (movement) स्वातंत्र्य

संरचित (structured) जागेमध्ये मुले स्व हस्ते अनुभवातून अध्ययन करतात. विशेषतः संबंधित अध्ययन साहित्य मुलांनी वैयक्तिक काम (कार्य) करुन अध्ययन सुंदर व शोधात्मक होते. मॉन्टेसरी शिक्षक वातावरण व मुले ह्यांच्यामधील दुवा (link) होऊन मुलांना मार्गदर्शन करीत असतो.

वर्ग तयार करणे व विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मार्गदर्शन करणे ही शिक्षकांची मुख्य भूमिका आहे. परिणामी मुले स्वतःच्या गतीने व स्वतःच्या क्षमतेने प्रगती करतात. मॉन्टेसरी वातावरणाद्वारे मुले स्वतः कार्य करुन स्वयंशिस्त, एकाग्रता व अध्यनामध्ये रूची निर्माण करतात. हल्ली मॉन्टेसरी संस्था अध्ययनाच्या कार्यक्रमाचे उपयोजन अशा प्रकारे करतात की जेणेकरुन विद्यार्थी त्यांचे संभाव्य यश पूर्णतः संपादन करू शकतील.

सरतेशेवटी प्रत्येक विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मूल्यमापन करून, त्यांच्यामध्ये मूल्यांची रूजवणूक करुन आपण त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व वैयक्तिकपणे अध्ययन करण्यास प्रवृत्त करु शकतो. मॉन्टेसरी शिक्षण सर्व जगभर आहे. ही पद्धत विद्यार्थ्यांना कार्यरत, कार्यक्षम, जबाबदार व आदरयुक्त नागरिकांची जाणीव व अध्ययन हे जीवनभरासाठी आहे हे समजून घेण्याची संधी देते. प्रत्येक मूल हे मौल्यवान व अद्वितीय आहे. विद्यार्थी विविध मार्गांनी अध्ययन करू शकतो ह्यासाठी ही पद्धत परिचित आहे ही पद्धत अध्ययनाच्या पैलूंना सामावून घेते.

- शिक्षकांनी वैयक्तिकरीत्या योजलेल्या अध्ययन योजनेनुसार व मार्गदर्शनानुसार व प्रगत अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी स्वतःच्या ठिकाणी अध्ययनास मुक्त असतो.

- लहान वयामध्ये मॉन्टेसरी विद्यार्थी योग्य क्रय, सहकार्य, एकाग्रता व स्वतंत्रता ह्यांचा विकास करतो. वर्गाची रचना, अध्ययन साहित्य विद्यार्थ्यास वैयक्तिक आधार व मार्गदर्शन स्व नियंत्रण ह्यांची योजना लहान मुलांपासून प्रौढावस्थेतील मुलांसाठी योग्य अशी असते.
- विद्यार्थी हा जमातीच्या अगदी जवळचा भाग आहे. विविध वयोगटाचा वर्ग हा ३ वर्षापासून असतो. लहान मुले मोठ्या मुलांचे अनकरण करतात व मार्गदर्शन व आधार घेऊन आत्मविश्वास संपादन करतात व आव्हानांचा सामना करतात. शिक्षक मुलांचा आदर करतात, मुलांना प्रेम करतात व संघर्ष ठरावावर शांततापूर्ण विश्वास ठेवतात.
- विद्यार्थ्यांना सक्रिय ज्ञान संपादनासाठी आधार दिला जातो. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी शिक्षक वातावरण निर्मिती करतात.
- स्व-दुरुस्ती (self - correction) स्व - मूल्यमापन हा मॉन्टेसरी वर्गाचा मुख्य दृष्टीकोन आहे.
- विद्यार्थी समंजस झाल्यावर त्यांचे कार्य ते चिकित्सकपणे करतात व त्यांच्या चुकांमधून ओळखणे, दुरुस्ती व अध्ययनामध्ये प्रवीण होतात.

२) जॉन ड्यूई :

जॉन ड्यूई (१८९२-१९५२) हा एक प्रसिद्ध अमेरीकन तत्ववेत्ता, मानसशास्त्रज्ञ व शिक्षक होता. ग्रामीण वातावरणामधून त्याला असे आढळून आले कि परंपरागत अनुदेशन पद्धती ही परिणामकारक नव्हती. सामाजिक दररोजच्या जीवनातील संबंध परिणामकारक, गतीशील व अमर्याद अध्ययनाच्या स्थिती निर्माण करणारे होते. नंतर त्यास ह्यामधून शिक्षणाची उपपत्ती (सिद्धांत) आढळून आला.

जॉन ड्यूईच्या शिक्षणाची उपपत्ती व उद्देश :

- शिक्षणाचे महत्त्व विषद करताना जॉन ड्यूई लिहतो, "पोषण व पुर्ननिर्माण हे मानसशास्त्रीय व सामाजिक जीवन आहे." शिक्षण ही समाजाची अत्यावश्यकता आहे. म्हणजे सामाजिक जीवनामध्ये शिक्षण ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.
- शिक्षण हे व्यक्तीच्या मदतीसाठी, अनुभवासाठी उपयोगी आहे. व्यक्ती स्वत:च्या वेळेनुसार सकारात्मक शिक्षणाच्या बदलामुळे व्यक्तीच्या सामाजिक आर्थिक जीवनामध्ये परिणामकारक बदल घडून येतात.
- शिक्षणाची व्याख्या करताना जॉन ड्यूई म्हणतात, "शिक्षण हे वैयक्तिक क्षमतांचा विकास करणारे व त्यायोग्य वातावरण नियंत्रण व जबाबदाऱ्या पूर्ण करणारे आहे." म्हणजेच शिक्षण हे मानवी क्षमतांचा, शक्यतांचा विस्तार करणारे आहे. शिक्षण हे समाजासाठी व वैयक्तिक प्रगतीचे (द्योतक) साधन आहे. जॉन ड्यूईच्या ह्या शिक्षण पद्धतीस दोन बाजू आहेत एक म्हणजे सामाजिक व दुसरी ही मानसशास्त्रीय आहे.
- मानसशास्त्रीय बाजूही लहान मुलांची बुद्धीमत्ता, त्यांची मानसिकता, अंर्तभाव, आवड व जडणघडणीचा अभ्यास करते. ही मूलभूत शिक्षण (तयार) निर्माण करते. सामाजिक बाजू म्हणजे मूल ज्या वातावरणात जन्म घेणे ते सामाजिक वातावरण, ज्या समाजामध्ये राहते व वाढ होते ते वातावरण होय.

पुढे शिक्षणाच्या विश्लेषण सिद्धांतानुसार आपणांस पुढील चार मूलभूत सिद्धांत आढळून येतात.

१) शिक्षण एक वाढ :

- विकास (वाढ) हे शिक्षणाचे वास्तविक कार्य आहे. विकास (वाढ) ही पूर्व निश्चित ध्येय किंवा शेवट ग्रहीत धरुन नसते, (विकास) वाढ ही शेवटी वाढ किंवा विकास असते व शिक्षणाच्या शेवटी अधिक-अधिक शिक्षणामध्ये वाढ होते.
- वैयक्तिकरीत्या व्यक्तीमत्त्व व शिक्षण हे दोन्ही विकासाचा दर बदलतात. प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासाची संधी त्या विद्यार्थ्यांना देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी त्यांच्या समस्यांचे निराकरण करुन त्यांना स्वतः विचार करण्यासाठी उपयुक्त करुन त्यांच्या समस्येविषयी विचार करण्यासाठी शिक्षकांनी मुलांना प्रेरणा व तशी वातावरण निर्मिती केली पाहिजे.

२) शिक्षण एक जीवन :

- शिक्षण हे जीवनाच्या तयारीसाठी नाही. जीवन ही त्याची वैयक्तिक बाब आहे. जीवन हे उत्पादक कृतींचे आहे. तर शिक्षण हे त्या कृतींमध्ये जन्मास आलेले आहे. आता शाळांना समाजामध्ये असणाऱ्या सूक्ष्म समस्यांशी सामना करावा लागत आहे. जसे जीवनामध्ये बाहेरील समस्यांचा सामना करावा लागतो अगदी तसेच शाळांना सुद्धा बाह्य समस्यांशी लढावे लागत आहे.
- शाळेच्या सामुदायिक व सामाजिक जीवनामधील विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभागामुळे त्यांचे जीवन सहकार्य करणारे, मदत करणारे आणि सामंजस्य निर्माण करणारे आहे. शाळेमध्ये असताना जीवनातील नेमक्या समस्यांशी कसा सामना करावा ह्यासाठी मार्गदर्शन दिले जाते. लोकशाहीवादी समाजामध्ये विद्यार्थ्यांना विविध अनुभव दिले जातात. जेणे करुन हे शाळेतील अनुभव जेव्हा ते प्रौढ होतील त्यावेळी ते शालेय अनुभव त्यांना उपयोगी पडतील.

३) शिक्षण एक सामाजिक क्षमता :

- सामाजिक माध्यमांद्वारे मानव उर्जा, क्षमता व ज्ञान घेत असतो. मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याने तो विस्तृत प्रमाणात विचार करतो आणि आंतरक्रिया घडवून आणतो.
- त्याला त्याचे स्वतःचे मन, चारित्र्य, भाषा, शिष्टाचार, चव, आवड, पसंती, सामाजिक संवेदना असतात.
- जेव्हा तो चांगल्या समाजामध्ये राहतो. त्यावेळी तो समाजाकडून जे चांगले घेतले ते परत देण्याचा प्रयत्न करतो व समाजातील इतरांना विकासासाठी मदत करतो. आपली सामाजिक कर्तव्ये पार पाडणे व शैक्षणिक कार्यात शैक्षणिक जागृतीसाठी अदलाबदल (Give & Take) करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.
- शिक्षण हे असंमजस मुलांचे सामाजिक मानवी जातीमध्ये रूपांतरण करते.

- सर्व शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सामाजिक प्रगती व सामाजिक कार्यक्षमता मध्ये वाढ करणे हे होय.

४) शिक्षण हे एक अनुभवाची पुर्नरचना :

- जॉन ड्यूईच्या मतानुसार अनुभव हे सत्य ज्ञान संपादनाचा मुख्य स्त्रोत आहे. एक अनुभव हा पुढील नवीन अनुभवास आमंत्रण देतो. ह्यामुळे मागील अनुभवामध्ये सुधारणा, किंवा तो अनुभव अपाय होऊ शकतो. अशा प्रकारे सुधारणासह जुना आकृती-बंधाचे नवीन आकृतीबंधामध्ये रूपांतरण होऊ शकते. ड्यूईच्या मतानुसार नवीन व सशक्त समाजघडणीसाठी अध्ययन व अनुभवांचे उपक्रम नियंत्रित केले पाहिजेत.
- मानवाची मानसिक, शारीरिक, सामाजिक व नैतिक वाढीसाठी सतत अनुभवांची गरज आहे. सतत अनुभवांमध्ये बढती मिळण्यासाठी शिक्षण वातावरण निर्मिती करते. शिक्षण हे सतत अनुभवाची पुर्नरचना व पुर्न-आयोजन करण्याची व नवीन अनुभव जन्मास घालण्याची प्रक्रिया आहे.

५) शिक्षणाचा कोणताही निश्चित उद्देश नाही :

- व्यवहारी शिक्षणानुसार शिक्षणाचा कोणताही निश्चित उद्देश नाही. बाह्य शारीरिक व सामाजिक वातावरणाच्या बदलानुसार जॉन ड्यूई च्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट बदललेच पाहिजे.
- सर्व वेळी शिक्षणाचे ध्येय एकसारखेच नसते. २१ व्या शतकामध्ये उद्दिष्ट हे पारंपारिक विरुद्ध नैतिक उद्दिष्ट, शिस्त उद्दिष्ट, ज्ञान उद्दिष्ट असे विद्रोही आहे.
- ड्यूई हा भविष्यकालीन जीवनाच्या तयारीसाठी शिक्षणाची संकल्पना नाकारतो. त्यांच्या मते, शिक्षण हे मुलांच्या भविष्यकालीन गरजांपेक्षा वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करणारे असले पाहिजे. कारण मुले ही अज्ञात भविष्य विषयही उत्साही नसतात. म्हणून सद्याच्या जीवनातील आर्थिक व सामाजिक बदलानुसार शिक्षणाचे पुर्नसमीकरण व पुर्न सुरुवात, पुर्ननिर्माण झाले पाहिजे.

२.४.२ भारतीय विचारवंताचे शिक्षण विषयक विचार (संकल्पना) :

१) स्वामी विवेकानंद :

भारतामध्ये समकालीन विचारवंतामध्ये १८६३ ते १९०२ मध्ये ब्रिटीश शिक्षणाच्या विरुद्ध विद्रोह करणारे (विचारवंत) तत्वज्ञ होते. शिक्षण हे माणसांमध्ये परीपूर्णता प्रकट करणारे आहे. आपणास शिक्षण हे चारित्र्य निर्माण, मानसिक क्षमतेमध्ये वाढ, बुद्धी मध्ये वाढ व प्रत्येकास स्वत:च्या पायावर उभे करणारे असणे आवश्यक आहे.

शिक्षणाचा उद्देश :

स्वामी विवेकानंदानुसार शिक्षणाचा उद्देश पुढीलप्रमाणे

- **परिपूर्णतेकडे पोहचण्याचा उद्देश :**

मुलांच्या मध्ये अगोदरच जी सुप्त परिपूर्णता असते ती शिक्षणाद्वारे संपादीत करणे. स्वामीजीनुसार बाह्य सर्व साधने व अध्यात्मिक ज्ञान हे प्रत्येक मनुष्यामध्ये हजर असते परंतु ते अज्ञानाच्या पडद्याने झाकले गेलेले आहे. शिक्षणाने मनुष्यामधील झाकलेल्या ज्ञानास सर्व बाजूंनी उत्साहाने प्रकाशित करुन चमकलवले पाहिजे. म्हणजेच सुप्त परिपूर्णतेस पूर्णतः बाहेर काढून ह्या परिपूर्णतेचे संपादन केले पाहिजे.

- **शारीरिक व मानसिक विकास उद्देश :**

शिक्षणाचा दुसरा उद्देश म्हणजे शारीरिक व मानसिक विकास करणे जेणेकरुन मुले राष्ट्रीय विकास व वाढ करु शकतील व प्रगतपणे मनातील भीती घालवून उद्याचे विकसित चांगले नागरीक बनतील. मुलांच्या वरील मानसिक तणावाचा विकास करुन स्वामीजी हे मुलांना दुसऱ्यावर अवलंबून परजीवी करण्यापेक्षा आर्थिक दृष्टीने सक्षमतेने स्वतःच्या पायावर उभे करु इच्छितात.

- **नैतिक व अध्यात्मिक विकास :**

स्वामीजी नुसार आपले देशाची महानता ही केवळ संसदीय उपक्रमानुसार ठरत नसून ती देशातील नागरीकांच्या महानतेनुसार ठरते. परंतु नैतिक व अध्यात्मिक नागरीकांचा विकास हा त्यांना तसे शिक्षण देऊन व उत्तेजन देऊन करणे शक्य आहे.

- **चारीत्र विकास उद्देश :**

कोणत्याही शिक्षणामध्ये चारित्र्याचा विकास हा फार महत्त्वाचा आहे. त्यासाठी ब्रह्मचर्याचा सरावावर जोर देणे (विशेष लक्ष देणे) आवश्यक आहे. त्यामुळे नैतिक, मानसिक अध्यात्मिक विकास होऊन विचार, उच्चार, आचरण शब्द व कृतीमध्ये शुद्धता येईल.

- **स्वतः स्वतःचा विकास करु शकतो ह्यावर विश्वास ठेवण्याचा उद्देश :**

श्रद्धा व आत्मा हा सर्व संगपरित्यागाचा एक भाग आहे. ह्या द्वारे स्वामीजी वैयक्तिकपणे स्वतःच्या शक्तीवर पूर्णतः आत्मविश्वास ठेवतात. ह्यामध्ये आत्मसमर्पण, त्याग, बाह्य साधनामधून आनंद घेण्याचा त्याग, इतरांसाठी चांगले करण्याचा विचार ह्यांचा समावेश आहे. शिक्षणाद्वारे वैयक्तिक गुणवत्ता सुधारता येते. स्वामीजी देशवासीयांना सांगू इच्छितात, "जागे व्हा, उठा व जोपर्यंत उद्देश सफल होत नाही तोपर्यंत थांबू नका."

- **विविधतेमध्ये एकता शोधणे उद्देश :**

शिक्षणाचा खरा उद्देश हा प्रत्येकांच्या अंर्तमनातून बाह्य जगताचा वेध घेऊन विविधतेमधून एकता स्वतः जाणून घेतली पाहिजे. स्वामी विवेकानंद पुढे स्पष्ट करतात कि शारीरिक व आत्मीक हा शब्द एकच आहे. त्यांच्या मते मोहजाल (माया) ही विशिष्ट आहे. शिक्षण हे विविधतेमधून एकता ह्या संवेदनेचा विकास करु शकते.

- **धार्मिक विकास उद्दिष्ट :**

धार्मिक विकास हे शिक्षणाचे अत्यावश्यक उद्दिष्ट आहे. प्रत्येकाने स्वतःमध्ये असलेल्या धार्मिकतेचा विकास करुन सत्य व वास्तविकता शोधून काढली पाहिजे. म्हणून जाणीव व भावना

ह्यांचे प्रशिक्षण देऊन संपूर्ण आयुष्य शुद्धतेने जगण्यास प्रवृत्त करणे. आज्ञाधारकपणा, समाजसेवा, अध्यापन महान संतांचा सत्संग व उद्‌बोधन हे प्रत्येकाचा विकास साधू शकते. शिक्षणाने त्याच्या विकासाची कास धरली पाहिजे.

२) श्री रविंद्रनाथ टागोर :

रविंद्रनाथ टागोर हे १८६१ ते १९४१ ह्या काळामध्ये संगीतकार, कवी, कलाकार व विविध विषयांचा व्यासंग असणारे असे महान विद्‌वान होते. त्यांनी बंगाली साहित्यास पुर्नआकार दिला. तसेच संगीत व १९ व्या व २० शतकामध्ये भारतीय कलेस आधुनिक बनवण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या तत्वज्ञानाचे दोन स्त्रोत पुढीलप्रमाणे :-

अ) शाळेप्रती प्रेम

ब) निसर्गावर प्रेम

शिक्षणाची संकल्पना :

शिक्षण हे संपूर्णतः मानवासाठी वास्तविक व बुद्धीस संवेदनशील असले पाहिजे. रविंद्रनाथ टागोर म्हणतात. माणसाने वैयक्तिकरित्या केवळ स्वतःसाठीच न जगता संपूर्णता समाजासाठी झोकून दिले पाहिजे. प्रशिक्षण काळामध्ये शाळेत असताना वैयक्तिक पुढाकार घेऊन स्वतःवर विश्वास समानतेवर जोर ठेवून समाजसेवा केली पाहिजे. हे केवळ शैक्षणिक क्षेत्रामध्ये न करता प्रत्येक वेळ घरी सुद्धा केले पाहिजे. जर रोपांची मुळे मातीत रुजवली नाहीत व नुसत्या पर्यावरणाच्या पोकळ गप्पा केल्या तर त्यास काही मूल्य नाही. टागोरांच्या मते प्रत्येकाच्या वैयक्तिक विकास शिक्षणाने झाला पाहिजे. थोडक्यात व्यक्तीमत्व व शिक्षण हे भारतीय पाहिजे ते पाश्चीमात्यांकडून उसने घेता कामा नये.

शिक्षणाची उद्दिष्टे :

रविंद्रनाथ टागोर नुसार शिक्षणाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१) मानवाची मुक्ती व परिपूर्णता :

रविंद्रनाथ टागोर म्हणतात, "उच्च शिक्षण हे म्हणजे केवळ माहिती देणारे नसून ते जीवनाच्या सर्व परिस्थितीमध्ये शांती देणारे असले पाहिजे. मुख्य उद्देश म्हणजे मानवास सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्ती मिळाली पाहिजे. केवळ मन व शरीर परिपूर्ण न होता आत्मा देखील परिपूर्ण पाहिजे. व्यक्तीस आत्म्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. शेवटी प्रत्येकास वरील हे उद्दिष्ट संपादनासाठी शिक्षण हे शक्य तितके विस्तृतपणे तयार करणे गरजेचे आहे."

- **नैतिक विकास :** टागोर ह्यांच्या मतानुसार हे शिक्षणाचे दुसरे उद्दिष्टे. टागोर हे विज्ञानाच्या निकाल (Result) व शारीरिक शक्ती पेक्षा शिक्षणामध्ये नैतिक मुल्यांच्या संबंधास अधिक महत्त्व देत होते.
- **सत्याचा एकसंधपणा :** टागोराच्या नुसार सत्याचा एकसंधपणा हा मानवास देणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. जेव्हा मानव सत्याच्या एकसंधपणा आचरणात आणला जात नाही

तेव्हा शांती मिळणार नाही व बुद्धीमत्ता, शारीरिक व अध्यात्मिक जीवनातील अखंडता नाहीशी होईल.

शिक्षण हे आपले आंतरराष्ट्रीय बाह्य विकास करते

- **शिक्षण हे सृजनशील असावे :** टागोर जास्त माहितीची अपेक्षा न ठेवता ते सृजनशीलतेची अपेक्षा ठेवतात. शिक्षणाचा जास्तीत जास्त वापर म्हणजे तथ्ये गोळा करणे नव्हे, तर माणसाने माणसास ओळखणे व माणसाने स्वत:ला स्वत: ओळखणे होय. अर्थातच शिक्षण शारीरिक दृष्ट्या विकासाचे साधन आहे व ते उपयुक्ततावादी देखील असावे.

आपली प्रगती तपासा :

१) अरविंद घोष नुसार शिक्षणाच्या संकल्पनेची चर्चा करा.

२) डॉ. मॉरीया मॉन्टेसरी व डॉ. जॉन ड्यूईच्या दृष्टीकोनातून शिक्षणाच्या संकल्पनेतील फरकाचे निरिक्षण तुम्ही कसे (काय) कराल ?

२.५ सारांश

ह्या घटकामध्ये आपण अध्यापनशास्त्राची संज्ञा व अर्थ पाहिला अध्यापनशास्त्र एक शैक्षणिक शिस्त आहे. अध्यापनशास्त्र म्हणजे शिक्षणाच्या संदर्भात ज्ञान व कौशल्ये कशी दिली जातात व अध्ययन प्रसंगी ह्यांची आंतरक्रिया कशा प्रकारे ठरविली जाते. ह्यांचा अभ्यास आहे. अध्यापन शास्त्र हे महान आहे. हे उदयोन्मुख विविध सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संदर्भात परिणाम करते. अध्यापनशास्त्र म्हणजे ही एक शिकवण्याची कला आहे.

नंतर आपण अध्यापनशास्त्राचे प्रकार पाहिले. चिकित्सक अध्यापनशास्त्र हे प्रगतशील अध्यापन तत्वज्ञान आहे. हे विद्यार्थ्यांच्या शक्तीशाली रचनेचे परिक्षण करण्याचे व विद्यार्थ्यांच्या दर्जा मधील असमानतेचे आव्हान देते. मुलांना प्रश्न विचारण्याचे अधिकार दिल्यामुळे विद्यार्थी त्यांचे अध्ययन नियंत्रित करतात व त्यांना शिकवलेल्या भागाबद्दल त्यांची मते मोडून सृजनात्मक मूल्यमापन करतात.

नंतर आपण पाश्चिमात्य विचारवंतांची शैक्षणिक विचारधारा पाहिली. स्वामी विवेकानंद रविंद्रनाथ टागोर ह्यांच्या सोबत डॉ मारिया मॉन्टेसरी, जॉन ड्यूई ह्यांची शिक्षण विषयक विचारधारा आपण पाहिली.

२.६ स्वाध्याय

१. शिक्षणामध्ये अध्यापनशास्त्राचे महत्त्व व अर्थ ह्या विषयी चर्चा करा.
२. चिकित्सक अध्यापनशास्त्र म्हणजे काय? तुमच्या मते चिकित्सक अध्यापनशास्त्रांची अंमलबजावणी करताना कोणती आव्हाने येतात?
३. शिक्षण विषयक स्वामी विवेकानंदांच्या विचारांची चर्चा करा.
४. जॉन ड्यूई च्या शिक्षणविषयक विचारासंबंधी टिप लिहा.
५. जॉन ड्यूई हा तत्वज्ञ पुढीलपैकी कोणत्या देशाचा होता.

अ) यू.के. ब) रशिया

क) यू.एस.ए. ड) फ्रान्स

६) चिकित्सक अध्यापनशास्त्र हे ——————— चा अभ्यास नाही.

अ) राजकीय विचारधारा ब) सामाजिक चळवळ

क) सामाजिक विचारधारा ड) सामाजिक आकलन

७) अध्यापन शास्त्र म्हणजे ——————— चा अभ्यास आहे.

अ) अध्यापन पद्धती ब) राजकारण

क) भाषा ड) सामाजिक विज्ञान

❖❖❖❖

३

शिक्षणाची ध्येये

घटक रचना :

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना : शिक्षण
३.२ शिक्षणाचे ध्येय
३.३ शिक्षणाचे वैयक्तिक ध्येय
३.४ शिक्षणाचे सामाजिक ध्येय
३.५ व्यक्तिमत्व विरुद्ध सामाजिक
३.६ सारांश
३.७ स्वाध्याय
३.८ संदर्भग्रंथ

३.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला -

- शिक्षण आणि शिक्षणाची ध्येये समजतील.
- व्यक्तीनिष्ट सामाजिक ध्येयांची माहिती होईल.
- व्यक्तिनिष्ट व सामाजिक ध्येयांची तुलना करु शकाल.
- अध्ययन कृती प्रभावीपणे पूर्ण करु शकाल.

३.१ प्रस्तावना - शिक्षण

शिक्षणाचा अर्थ, व्याख्या आणि व्याप्ती या बरोबरच शिक्षणाच्या अध्यापनशास्त्राचे आकलन याचा अभ्यास तुम्ही मागील घटकात केला आहे. या घटकात आपण शिक्षण आणि शिक्षणाची ध्येये यांचा अभ्यास करणार आहोत.

शिक्षण ही जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंड चालणारी वाढ व विकासाची प्रक्रिया आहे. व्यक्ती आणि समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शिक्षणाद्वारेच व्यक्ती स्वत:मध्ये विचार आणि कार्यकारणभाव, समस्यानिराकरण, सर्जनशीलता, बुद्धीमत्ता व दृष्टिकोन सकारात्मक भावना आणि कौशल्ये, मूल्य आणि अभिवृत्ती यांचा विकास करतो.

कोणतीही व्यक्ती ही / हा प्रत्येक दिवस आणि प्रत्येक क्षणाला शिकत असतो. कारण शिक्षण ही सातत्यपूर्ण व गतीशील अशी प्रक्रिया आहे.

मागील दोन घटकांच्या अभ्यासाच्या आधारे आपण शिक्षणाची व्याख्या करताना असे म्हणू शकतो की शिक्षण ही जन्मभर चालणारी त्रि धृवीय प्रक्रिया असुन यामध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि अभ्यासक्रम / आशय, यासह अध्ययन परिस्थिती म्हणजेच अध्ययन पर्यावरणाचा समावेश होतो. शिक्षण ही प्रागतिक प्रक्रिया आहे आणि ती मानवी संसाधन विकासास मदत करते. तसेच शिक्षण हे समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय असे सुद्धा आहे.

३.२ शिक्षणाचे ध्येये

प्रत्येक कृती किंवा कार्यक्रमाचे वर्गीकरण ध्येयपूर्ण कृती किंवा ध्येयशून्य अशी केली जाते. जॉन ड्यूई यांनी ध्येयाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की -

विकासाला पोषक, पूरक असे वातावरण संधी, अशा समस्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे, बदलत्या परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता, अधिकाधिक विकास क्षमता निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

ध्येय हाती घेतलेल्या कृतीस / कार्यास दिशा देतात आणि कृतीच्या प्रत्येक स्तरास शेवटपर्यंत प्रभावीत करतात. चांगले ध्येय हे जीवनातील परिस्थितीशी संबंधित असते. ध्येय ही लवचिक असतात व वेगवेगळ्या कृतींचे प्रतिनिधीत्व करतात.

व्यक्तिच्या प्रयत्नांना दिशा देण्यासाठी ध्येय महत्त्वपूर्ण असतात. ध्येय निश्चितीमुळे कार्य करताना वेळेचा अपव्यय होत नाही व शक्तीही वाया जात नाही. ध्येयामुळे कृतीकरणाऱ्याचे व सद्य परिस्थितीचे मूल्यमापन करता येते, शिक्षणाचा विचार केला असता ध्येयांमुळे आशय, पद्धती, अध्यापन कार्यक्षमता, ग्रंथालय, भौतिक सुविधा, अभ्यासक्रमाचे नियोजन, आणि सहशालेय कार्यक्रम यांचे उद्दिष्टांच्या अनुशंगाने मूल्यमापन करता येते; तसेच भविष्याचे नियोजन करता येते. शैक्षणिक प्रक्रियेत ध्येय ही दिपस्तंभाचे कार्य करीत असतात. शैक्षणिक ध्येयांना राजकीय विचार प्रणाली, सामाजिक आणि आर्थिक समस्या, तत्वज्ञान आणि उच्च आदर्श जीवन मूल्ये हे अशा प्रकारचे विविध घटक प्रभावित करत असतात.

शिक्षणाचा स्तर त्याचप्रमाणे शिक्षणाचे विविध प्रकार यानुसार शिक्षणाच्या ध्येयांची रचना केली जाते. शिक्षणाच्या ध्येयांची रचना करताना इतर निकष सुद्धा लक्षात घेणे क्रमप्राप्त होते ते निकष म्हणजे - मानवी स्वभावाचे जटील स्वरूप व मानवी पर्यावरण, मानवाचे स्वरूप हे विविधांगी असे असते, मानवी वर्तन व जीवनात शारीरिक, सामाजिक, बौद्धिक, नैतिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक बाबींचा समावेश होतो. त्याचप्रमाणे वेगवेगळे आदर्श, जीवनाचे तत्वज्ञान, हे शिक्षणाच्या वेगवेगळ्या ध्येयांना जन्म देतात.

शिक्षणाची महत्त्वपूर्ण ध्येये खालील प्रमाणे आहेत.

१. शिक्षणाचे व्यक्तिनिष्ट ध्येय
२. शिक्षणाचे सामाजिक ध्येय
३. शिक्षणाचे व्यावसायिक ध्येय
४. शिक्षणाचे सांस्कृतिक ध्येय
५. शिक्षणाचे अध्यात्मिक ध्येय
६. शिक्षणाचे लोकशाही मूल्याचे ध्येय
७. उदारमतवादाचे शैक्षणिक ध्येय
८. सुसंगत / संतुलीत विकासाचे ध्येय
९. नैतिक किंवा चारित्र्य विकासाचे ध्येय
१०. संपूर्ण जीवन रूपी शिक्षणाचे ध्येय

आपली पग्रती तपासा :

१) शिक्षणाचे ध्येय म्हणजे काय ?

२) शैक्षणिक ध्येयांचे महत्त्व स्पष्ट करा.

३.३ शिक्षणाचे व्यक्तिनिष्ठ ध्येय

कोणत्याही देशाची शिक्षणाची ध्येये ही तेथील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीप्रमाणे बदलत असतात. प्रत्येक व्यक्ती जन्मत:च विविध क्षमता व नैसर्गिक, उपजत गुण असतात व या उपजत गुणांना विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक प्रशिक्षकाचे अशते. प्राचीन साहित्य आणि ग्रीक तत्वज्ञांचे लेखनात शिक्षणाच्या व्यक्तिगत ध्येयांवर जोर दिला आहे. परंतू मध्ययुगीन काळामध्ये सामुहिक अध्यापनाचा स्विकार केला गेला आणि व्यक्तिगत विकासात कोणतेही प्राधान्य दिले नव्हे. वर्तमान काळात मानसशास्त्राचा शिक्षण क्षेत्रात समावेश

केल्यामुळे व रूसो, पेस्टॉलाजी, फ्रोबेल, नन या सारख्या शिक्षणतज्ज्ञांमुळे पुन्हा शिक्षणाच्या ध्येयांमध्ये व्यक्तीगत विकासात भर देण्यात येऊ लागला.

शिक्षणाची व्यक्तिनिष्ठ ध्येय - अर्थ :



व्यक्तिनिष्ठ ध्येयाचा संकुचित अर्थ :

शिक्षणाच्या व्यक्तिगत ध्येयांच्या संकुचित अर्थात स्व. अभिव्यक्ती, बालकाच्या शक्तींचा सर्वांगिण विकास आणि नैसर्गिक विकास यांचा समावेश होतो. या तत्वज्ञानानुसार बालकाच्या स्वतःच्या अंतःस्फूर्ती प्रमाणे विकास होण्यासाठी त्यास संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे असे व्यक्त होते.

व्यक्तिनिष्ट ध्येयांचा सखोल / विस्तारित अर्थ :

शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ ध्येयांच्या विस्तारित अर्थामध्ये स्व-प्रतीपूर्तीचा समावेश होतो. यानुसार बालकास आदर्श नागरीक / उत्कृष्ट व्यक्ती होण्यासाठी आवश्यक शक्ती, त्याच्या गरजा, आवड आणि क्षमतांचा विकास करण्यास सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करुन द्याव्यात.

शिक्षणाच्या व्यक्तीनिष्ठ ध्येयांवर भर देणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांची मते :

१) महात्मा गांधी केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे. आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करुन व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

२) पेस्टॉलॉजी यांच्या नुसार शिक्षण म्हणजे मानवाच्या आंतरशक्तीचा नैसर्गिक, सुसंगत व प्रागतिक विकास होय

३) ॲरीस्टॉटल यांच्या मते शिक्षण म्हणजे सुदृढ शरीरात सुदृढ मन विकसित करणे हे होय.

४) फ्रोबेल यांच्या मते शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यात बालकात अंतर बाह्य बदल होतो.

व्यक्तिनिष्ठ ध्येयांवर प्रभाव टाकणारे घटक :

व्यक्तिच्या वृद्धीसाठी शिक्षणाची व्यक्तिगत ध्येय महत्त्वपूर्ण आणि आवश्यक आहेत. त्यांच्यावर विविध घटकांचा प्रभाव व परिणाम होतो. ते घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) जैविक विज्ञानाचा परिणाम :

प्रत्येक सजीव हा दुसऱ्या सजिवापेक्षा वेगळा असतो. व्यक्तिच्या अद्वितिय वैशिष्ट्यांचा विकास म्हणजेच नैसर्गिक विकास होय. प्रत्येक बालकाच्या व्यक्तिगत क्षमतांचा विकास हेच शिक्षणाचे ध्येय आहे. सर पर्सीनन यांनी व्यक्तिविकासात जैविक विज्ञानास महत्त्व देऊन असे मत व्यक्त केले आहे की, व्यक्तिचा स्वायतत्तात्मीक / स्वयंशासीत विकास हेच शिक्षणाचे मध्यवर्ती ध्येय आहे म्हणून फक्त व्यक्ती हाच सर्व शैक्षणिक प्रयत्न व कृतीचा मध्यवर्ती असला पाहिजे. समाज हा यात मध्यवर्ति नसावा.

२) निसर्गवादाचा परिणाम :

रूसो, कॉमेनिअस, पेस्टालॉजी, या निसर्गवादी शिक्षण तज्ज्ञांच्या मते शिक्षणाचे ध्येय हे व्यक्तिमत्वाचा विकास हेच होय. निसर्गाच्या दृष्टीने मुलाचा जसा विकास व्हावयास पाहिजे, तसा तो होण्यास मदत करणे हे शिक्षण होय, शिक्षण हे स्वयंशिक्षण असले पाहिजे. निसर्गाच्या सानिध्यात मुलाने स्वप्रयत्नाने, निरीक्षणाने शिकले पाहिजे.

३) मानसशास्त्राचा परिणाम :

पींडे पींडे मते भिन्ना असे म्हटले जाते. कोणताही व्यक्ती दुसऱ्या सारखा असत नाही. प्रत्येक व्यक्ती हा आवड, क्षमता, अभिवृत्ती व्यक्तिमत्व या सर्वांसंदर्भात वेगळा असतो. मानसशास्त्रज्ञांच्या मते कोणतीही दोन मुले ही एक सारखी नसतात. विद्यार्थी / व्यक्तीमधील अंगभूत शक्तींचा विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य कार्य आहे. ज्या योगे तो जास्तीत जास्त विकास करू शकेल. म्हणून शिक्षण हे बालक केंद्रित हवे.

४) अध्यात्मवाद्यांचा प्रभाव :

अध्यात्मवाद्यांचा मते समाजाचे कल्याण हे चांगल्या गोष्टींवर अवलंबून असते. व्यक्ती मधील उपजत नैसर्गिक मूल्यांवर समाजाचे कल्याण अवलंबून आहे. मानवाच्या व्यक्तिगत अध्यात्मिक विकासासाठी शिक्षणाने प्रयत्न केले पाहिजेत. अशा स्थितीतच व्यक्तीच्या उपजत क्षमतांचा सर्वोच्च विकास होणार आहे. व्यक्तीच्या आत्मोन्नोतीसाठी शिक्षणाने पुढाकार घेतला पाहिजे. स्वामी विवेकानंद म्हणतात की मानव हा संभाव्यतः पवित्रच असतो. शिक्षणाद्वारे मानवाच्या उपजत, नैसर्गिक क्षमतांना प्रकट करण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

५) प्रागतिक विचारवंताचा प्रभाव :

प्रागतिक वादयांच्या मते जगाची प्रगती आणि पुढे जाण्याची क्रिया ही इतिहासातील त्या त्या काळात जन्म घेतलेल्या प्रसिद्ध व्यक्तिमुळेच झालेली आहे. व्यक्तिच्या संपूर्ण विकासासाठी शिक्षण प्रक्रियेने योग्य परिस्थिती निर्माण केली पाहिजे. ज्या योगे प्रत्येक व्यक्ति मानवी जीवनासाठी मूळ / नवनिर्मित योगदान करु शकेल.

६) लोकशाही आदर्शाचा प्रभाव :

लोकशाही मध्ये व्यक्तिच्या स्वातंत्र्यास महत्त्व दिले जाते. सर्व लोकशाही राज्यांनी व्यक्तिस उपयुक्त असेल अशा दिशेने सर्वांगिण विकास होईल, त्यासाठी सुविधा पुरवितात. रसेल यांच्या मते नागरीकांच्या शिक्षणापेक्षा व्यक्तिचे शिक्षण अतिशय चांगले असते. शिक्षणाद्वारे चांगले नागरीकच नाही तर चांगल्या व्यक्ति निर्माण केल्या पाहिजेत.

शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ ध्येयांबाबत टीका :

१) मानवाच्या सामाजिक स्वरूपाकडे दुर्लक्ष :

टी. रेमंट यांच्या मते, "अलिप्त (Isolated) व्यक्ति म्हणजे एक कल्पित कल्पनाच आहे." म्हणजेच व्यक्ति फक्त समाजामध्येच आणि समाजामुळे व्यक्तिमत्व विकास घडवून आणतो. अन्यथा तो प्राणी म्हणूनच राहिला असता.

२) व्यक्तिवादास प्रोत्साहन :

जर शिक्षणाचे ध्येय व्यक्तिमत्व विकास अथवा व्यक्तिमहात्म्य असेल तर त्यातून गोंधळच निर्माण होईल. यामुळे व्यक्ति प्रत्येक गोष्टीवर आपला अधिकार दाखविण्याची सुरुवात करण्याची शक्यता वाढते आणि प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणेच घडली पाहिजे असा विश्वास वाढीस लागतो.

३) पर्यावरणाकडे दुर्लक्ष :

रस्क यांनी नन्स यांच्या व्यक्तिच्या स्वायत्त विकासावर टीका करताना म्हटले आहे की कल्पना जैविक असल्यामुळे त्यात त्रुटी आहेत. बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासात पर्यावरण अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावते हे मानसशास्त्राने सिद्ध केले आहे. रॉस यांनी अतिशय सुंदर विचार मांडतांना म्हटले आहे की सामाजिक पर्यावरणाशिवाय व्यक्तिवादास काहीही मूल्य नाही आणि व्यक्तिमत्व हे निरर्थक होते.

४) सामाजिक समायोजनात अडथळा :

यशस्वी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी मानवास समाजात रहावे लागते. हे समाजात वावरतांना इतरांशी समायोजन करणे त्याच्यासाठी आवश्यक ठरते.

५) व्यावहारिक नाही :

शिक्षणाची व्यक्तिनिष्ठ ध्येय तात्त्विकदृष्ट्या स्विकारली जाऊ शकतात पण व्यावहारिक दृष्टीने नाही. कोणत्याही पातळीवर प्रत्येक व्यक्तीसाठी वेगवेगळ्या प्रकारचा अभ्यासक्रम तयार करणे शक्य नाही. वरील बाबींचा विचार करता व्यक्तिनिष्ठ ध्येय शक्य नाहीत. कोणताही मानवप्राणी समाजाबाहेर नसतो आणि समाज हा मानवांमुळे तयार झालेला असतो. जर शिक्षणाचे ध्येय हे समाज सेवा असेल तर त्यात व्यक्तिवाद आणि मानवता यांना महत्त्व दिले पाहिजे.

आपली पग्रती तपासा :

१) शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ ध्येयांचा अर्थ स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२) शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ ध्येयांप्रती शिक्षणतज्ज्ञांची मते वर्णन करा.

३) शिक्षणाच्या ध्येयांवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

४) शिक्षणाच्या ध्येयांवर कशाप्रकारे टीका केली आहे ?

३.४ शिक्षणाचे सामाजिक ध्येय

स्व-अभिव्यक्ती तेव्हाच अपेक्षित असते जेव्हा ती समाजास एकात्म ठेवते. समाज एकात्म न ठेवणारी अभिव्यक्ती अपेक्षित नाही. त्याप्रमाणेच आत्म-साक्षात्कार हा चांगला असतो. पण तो समाजापासून अलिप्त राहून प्राप्त केलेला नसावा तर समाजात राहूनच केलेला पाहिजे. वर्तमान काळात व्यक्तिनिष्ठ ध्येयांना जरी महत्त्व दिले जात असले तरी सामाजिक ध्येयांना पूर्णपणे दुर्लक्षित करुन चालणार नाही.

सामाजिक ध्येय अर्थ :

सामाजिक ध्येयांना पाठिंबा देणाऱ्यांचा व्यक्तिपेक्षा समाजास अधिक महत्त्व देण्यावर विश्वास आहे. मानव हा सामाजिक प्राणी आहे व तो आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास समाजातच करतो. व्यक्ति हा नेहमी सामाजिक संबंधाच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात अडकलेला असतो. याशिवाय नुकताच जन्म झालेले बालक योग्य प्रकारे वाढू शकणार नाही.



सामाजिक ध्येयाचा संकुचित अर्थ :

संकुचित सामाजिक ध्येयांचा पुरस्कार करणाऱ्यांच्या मते, "आदर्शवत तत्वज्ञान विषयक अस्तित्व हे प्रत्येक ठिकाणी व्यक्तिगत नागरीकापेक्षा वरच्या दर्जाचे असते." व्यक्ति हा समाजासाठी अस्तित्वात असतो म्हणूनच राज्याने शिक्षणाचे ध्येय निश्चित केले पाहिजे, व्यक्तीच्या कल्याणासाठी शिक्षणाचे मार्ग, प्रकार किंवा प्रशिक्षण निश्चित केले पाहिजे.

रॉस यांच्या शब्दात याचे समर्थन करणारे नेहमीच शीस्तबद्ध, संघटीत, अधिकाराचा स्विकार करण्यास इच्छुक, व्यक्तिमत्वास कमी लेखणारे असतात. सर्व काही राज्याचे, सर्वकाही राज्यासाठी, आणि सर्व काही राज्याद्वारे अशी यांची घोषणा असते. या विचाराचे हीटलर, स्टॅलीन, माओ हे पुरस्कर्ते आहेत.

सामाजिक ध्येयांचा विस्तारित अर्थ :

समाजसेवेसाठी शिक्षण, नागरीकत्वासाठी शिक्षण, सामाजिक क्षमतेसाठी शिक्षण या शब्दांच्या अभिव्यक्ती मधुनच सामाजिक ध्येयाची संकल्पना शोधता येते. या ध्येयाच्या पुरस्कर्त्यांच्या मते, "व्यक्तिस यशस्वीपणे सामाजिक कार्यक्रम / कृतीमध्ये सहभागी होण्यासाठी तयार करणे हा शिक्षणाचा हेतू आहे. व्यक्तिच्या विकासामधून समाजाचे कल्याण उन्नत झाले पाहिजे."

लोकशाही माननाऱ्यांच्या मते लोकशाही समाजासाठी व्यक्तिस सामाजिक दृष्ट्या सक्षम करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. सामाजिक दृष्ट्या सक्षम व्यक्ति म्हणजे जो व्यक्ती, शारीरिक दृष्ट्या सुदृढ, बौद्धिक दृष्ट्या प्रबुद्ध / ज्ञानी व्यावसायिक दृष्टीने स्वयंपूर्ण आणि नैतिक दृष्ट्या शिस्तप्रिय असला पाहिजे.

जॉन डयूई यांच्या मते, "सामाजिक दृष्ट्या सक्षम व्यक्ति त्याचे पर्यावरण नियंत्रण आणि नैसर्गिक सामर्थ्याद्वारे संभाव्य गोष्टी पूर्ण करण्यास सक्षम असतो. सर्व प्रकारचे शिक्षण हे व्यक्तिच्या सामाजिक चेतनेच्या शर्यतीतील सहभागातून पुढे जाते." मानवाच्या यशस्वी जीवनाचे मापन त्याच्या सामाजिक क्षमतेवर केले जाते.

सामाजिक ध्येयाचे अर्थनिर्वचन / विश्लेषण :

१) अमुर्तपणे विद्यार्थ्यांना शिक्षण देणे हे शिक्षकांचे ध्येय नसुन, त्यांना अस्तित्वात असलेल्या समाजात जीवनासाठी शिक्षण देणे हे आहे - ब्रुबेकर जे.एस.

२) अनुभवाची पुनर्रचना करण्याची प्रक्रिया हे शिक्षण आहे, ज्यामध्ये वाढलेल्या सामाजिक क्षमतेच्या माध्यमातून सामाजिक मूल्ये दिली जातात - जॉन डयूई

३) शिक्षण म्हणजेच संस्कृती, जी प्रत्येक पीढी जाणीवपूर्वक पुढच्या पिढीस माहिती होण्यासाठी संक्रमीत करतात, ज्या योगे प्राप्त केलेली पात्रता / क्षमता / स्तर अधिक सुधारु शकेल - ब्राऊन एफ. जे.

४) शिक्षण हा एक असा प्रयत्न आहे की ज्यामध्ये मानवी समाजातील प्रौढ सभासद स्वतःच्या जीवनातील आदर्शाप्रमाणे येणाऱ्या पीढीच्या विकासास आकार देण्याचा प्रयत्न करतात - जेम्स वेल्टन

सामाजिक ध्येयांचे महत्त्व :

शिक्षणाचे सामाजिक ध्येयाची का अंमलबजावणी करायची याची चर्चा करु या.

१) व्यक्तिचे सामाजिकरण :

मानव / व्यक्ति प्राण्याच्या काही प्रवृत्ती घेवूनच जन्मास येतो. समाज त्यास सुसंस्कृत आणि योग्य नागरीक म्हणून तयार करतो. सहानुभूती, दया, प्रेम, समाजसेवा, आज्ञाधारकपणा बंधुभाव या गुणांचा विकास समाजामध्ये होत असतो. समाजाद्वारेच व्यक्तिचे सामाजिकीकरण होते.

२) मानवाचे सामाजिक स्वरूप :

आपणा सर्वांना माहिती आहे की मानव हा सामाजिक प्राणी आहे आणि तो समाजाशिवाय राहू शकत नाही. म्हणूनच त्याने समाजाच्या कल्याणास प्राधान्य द्यावे.

३) व्यक्तिचा विकास :

व्यक्तिचा विकास हा फक्त समाजातच शक्य आहे. त्यामुळे व्यक्तिने समाजाच्या उन्नतीसाठी स्वतःचा फायद्याचा आवडीचा त्याग केला पाहिजे.

४) मोक्ष :

अनेक तत्वज्ञानांच्या मते समाजाच्या सेवेतच मोक्ष असतो. त्यांचा यावर पूर्ण विश्वास आहे म्हणून ते व्यक्तिस समाजसेवा करण्यास प्रोत्साहित करतात.

५) शांतता, न्याय आणि सुरक्षा :

व्यक्तिस शांतता, सुरक्षा व न्याय देणे हे समाजाचे आदय कर्तव्य असते. शिक्षणाने व्यक्तिस समाजसाठी तयार केले पाहिजे. रॉस यांच्या मते सामाजिक पर्यावरणाशिवाय व्यक्तिमाहत्म्यास काहीही किंमत नसते आणि व्यक्तिमत्व अर्थहीन होते. जे.बी. बाल्डविन म्हणतात समाजाशिवाय आपण आपले व्यक्तिमत्व सिद्ध करु शकत नाही.

सामाजिक ध्येयावरची टीका :

१) संकुचित राष्ट्रवादाचा विकास :

संकुचित राष्ट्रवाद विकसित करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. माझा देश बरोबर किंवा चुकीचा ही भावना / विश्वास निर्माण होते. यामुळे प्रगतित अडथळा येतो व व्यक्ति संकुचित मानसिकतेचा होतो.

२) व्यक्तिस्वातंत्र्यावर दडपण :

सामाजिक ध्येये व्यक्ति स्वातंत्र्य, विचार आणि भावना यांना विरोध करते. त्यामुळे ते व्यक्तिमत्वास चिरडून टाकते. व्यक्ति बेईमान राजकारण्यांच्या हातातील बाहुले होतो.

३) बौद्धिक व चरीत्र विकासात अडथळा :

सामाजिक ध्येयावर अधिक जोर दिल्यामुळे हे बौद्धिक व चरीत्र विकासास अडथळा निर्माण करतात. तसेच हे भावनिक एकात्मता विकसित होऊ देत नाही.

४) कला आणि साहित्य विकासात अडथळा :

कला आणि साहित्याचा विकास हा व्यक्तिच्या प्रयत्नावर अवलंबून असतो. शिक्षणाच्या सामाजिक ध्येया अंतर्गत व्यक्ती स्वातंत्र्यास जागा नसल्याने कला आणि साहित्य विकासास अडचण निर्माण होते.

५) मानव - ध्येय साध्य करण्याचा मार्ग :

व्यक्तिने समाजाच्या उन्नतीसाठी स्वतःचे जीवन सुद्धा त्याग केले पाहिजे. या तथ्यावर सामाजिक ध्येय जोर देते. यावरुन मानव हा फक्त ध्येय साध्य करण्याचा एक मार्ग आहे असे हे मानतो.

६) अ-मानसशास्त्रीय :

सामाजिक ध्येयांना संकुचित अर्थ असल्यामुळे ती अ-मानसशास्त्रीय आहेत. व्यक्तिची आवड, सुप्तगुण आणि क्षमता याकडे दुर्लक्ष केले जाते. राज्याच्या कल्याणासाठी व्यक्तीने स्वतःच्या इच्छांचा त्याग करण्यास सांगितले जाते.

आपली पग्रती तपासा :

१) शिक्षणाच्या सामाजिक ध्येयाची चर्चा करा.

_____

_____

_____

_____

_____

२) सामाजिक ध्येयांची का अंमलबजावणी केली पाहिजे ?

३) सामाजिक ध्येयावरील टीका स्पष्ट करा.

३.५ व्यक्तिनिष्ठ ध्येय विरुद्ध सामाजिक ध्येय

शिक्षणाचे व्यक्तिनिष्ठ ध्येय विरुद्ध सामाजिक ध्येय व्यक्ति आणि समाज एकमेकांस पुरक आहेत. व्यक्ति किंवा समाज एकमेकांशिवाय जगु शकत नाही. वक्ती ही समाजाची देन आहे आणि याच समाजात प्रत्येक व्यक्तिचा विकास होत असतो. प्रागतिक समाजाताच व्यक्तिचा विकास होत असतो आणि या विकसित व्यक्तिवर समाज आणि उच्च दर्जाची पातळी गाठू शकतो. शिक्षणाचा सामाजिक हेतू आणि शिक्षणाचा व्यक्तिगत हेतू या दोन्ही संज्ञा विसंगत नाहीत. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने असे स्पष्ट केले आहे की, समाजाच्या समाजवादी आकृतिबंधात व्यक्ति स्वार्थी वृत्तीने किंवा संकुचित वृत्तीने स्वत:चा विकास न करता देशाच्या विकासाच्या सर्व मापदंडा संदर्भात निष्ठा ठेवली पाहिजे. प्रत्येक व्यक्तिमध्ये समाजास विकसित भरभराटीस नेण्याची क्षमता असते परंतू व्यक्तिने त्यासाठी समाजासाठी त्याग करण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. त्याने नेहमी समाजाच्या कल्याणाची काळजी घेतली पाहिजे. शिक्षणाचे एकूण दोन स्तर / मार्ग आहेत. व्यक्तिचे प्रतिबिंब आणि समाजाचे चांगले होणे, अलिप्त व्यक्ति हा कल्पनेची कल्पित वस्तू आहे. एका बाजूला व्यक्तिच्या शक्ति आणि समासांचा विकास करणे आणि समाजाच्या पुनरूत्थान कार्यक्रमात कृतिशीलपणे सहभागी होणे हे समाजाचे कार्य आहे. जॉन अडॉम यांच्या शब्दात सांगायचे म्हटले तर व्यक्तिस विकासासाठी सामाजिक माध्यमाची गरज असते. समाज संबंधाशिवाय तो प्राणीच असतो.

व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येयांचे एकीकरण :

काही तज्ञांनी व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येयांच्या एकीकरणावर जोर दिला आहे.

१) महात्मा गांधी - गांधीजी व्यक्ति आणि समाज यामध्ये संघर्ष पाहत नाहीत आणि म्हणतात, "माझा असा विश्वास आहे की जर एका माणसाने अध्यात्म ज्ञान प्राप्त केले त्याबरोबर सर्वजण ते प्राप्त करतील."

२) सर अर्थरनन - "व्यक्तिमत्व हे फक्त सामाजिक वातावरणात विकसित होते. जेथे समान आवड आणि समान कार्यक्रम असतात."

३) **ॲडम्स -** स्व ची जाणीव व विकास हा समाजात सामाजिक आंतरक्रियेद्वारे होत असतो.

४) **मॅक इव्हर -** सामाजिकीकरण आणि वैयक्तिककरण या एकाच प्रक्रियेच्या दोन बाजू आहेत

५) **प्राचीन हिन्दू संस्कृती -** प्राचीन भारतीय हिन्दू संस्कृती सुद्धा उच्च दर्जाजी वैयक्तिक उत्कृष्ठता आणि महान सामाजिक क्षमता यांच्या एकीकरणावर भर देते.

आपली प्रगती तपासा :

१) शिक्षणाचे व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येयांची चर्चा करा.

२) शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येयामधील एकीकरण स्पष्ट करा.

३.६ सारांश

शिक्षणाचे ध्येय विविध कृतींना दिशा देतात आणि प्रत्येक ध्येय साध्यतेच्या पायरीस प्रभावित करतात. ध्येय ही महत्त्वपूर्ण असतात कारण ती आपल्या प्रयत्नांना दिशा देतात. शिक्षणाचे व्यक्तिनिष्ठ ध्येय संकूचित अर्थाने विचार करता यामध्ये स्व-प्रकटीकरण बालकाचा सर्वांगिण विकास आणि नैसर्गिक विकास यांचा समावेश हातो. विस्तारित अर्थाने व्यक्तिनिष्ठ ध्येयांचा विचार करता यात स्वप्रतिपूर्ती याचा समावेश होतो. ॲरिस्टोटल यांच्या मते शिक्षण म्हणजे सदृढ शरीरामध्ये सदृढ मन विकसित करणे सामाजिक ध्येयाचे अर्थनिर्वचन केले असता शिक्षण म्हणजे संस्कृती जी प्रत्येक पिढी आपल्या पुढील पिढीस जाणीवपूर्वक यशस्वी होण्यासाठी संक्रमित करीत असते. शिक्षणाचे सामाजिक ध्येय हे आवश्यक आहे कारण मानव हा सामाजिक प्राणी आहे आणि फक्त समाजातच तो आपले व्यक्तिमत्त्व विकसन आणि ध्येयसाध्य करु शकतो. शिक्षणाच्या सामाजिक आणि वैयक्तिक ध्येयांची चर्चा केली असता, वैयक्तिककरणासाठी सामाजिक माध्यमाची गरज असते हे कळते. सामाजिक संबंधाशिवाय मानव हा प्राण्यांप्रमाणे असतो. शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येयांचे एकीकरण केले असता विविध तज्ञांच्या मता आधारे आपण म्हणू शकतो की स्व-प्रतिपूर्ती आणि समाजसेवा यामध्ये संघर्ष आढळून येत नाही. दोन्ही एकसारखेच आहेत. आपण सामाजिक आणि व्यक्तिनिष्ठ अशा दोन्ही ध्येयांना प्रोत्साहन दिले पाहिजे तेव्हाच आपण व्यक्तिसाठी जग शांततापूर्ण आणि आनंददायी बनवू शकतो.

३.७ स्वाध्याय

प्र. १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा.
२) शिक्षणाचे ध्येय का महत्त्वपूर्ण आहेत ?
३) व्यक्तिनिष्ठ ध्येयांवर परिणाम करणाच्या घटकांची चर्चा करा.
४) व्यक्तिनिष्ठ ध्येयांवर टिका का केली जाते ?
५) सामाजिक ध्येयांच्या अर्थ निर्वचनाचे स्पष्टीकरण द्या.
६) सामाजिक ध्येयांचे काय महत्त्व आहे ?
७) व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येय संकल्पना स्पष्ट करा.

प्र. २ थोडक्यात लिहा.

अ) व्यक्तिनिष्ठ ध्येयांचा अर्थ
ब) सामाजिक ध्ययेांचा अर्थ
क) सामाजिक ध्येयावरील टिका
ड) व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक ध्येयांचे एकीकरण

प्र. ३ वस्तुनिष्ठ प्रश्न योग्य पर्यायाची निवड करा.

अ) शिक्षण म्हणजे नैतिक ————– विकास होय.

i) व्यक्तिमत्व ii) घटक iii) व्यक्ति iv) क्षेत्र

ब) शिक्षणाचे व्यक्तिनिष्ठ ध्येय म्हणजे मानवाच्या सुप्त (अंतस्थ) ————— चा नैसर्गिक, सुसंवादी आणि प्रागतिक विकास होय.

i) ताकद ii) शक्ती iii) क्षमता iv) सर्जनशिलता

क) इतरांबरोबर ———— करणे व्यक्तिस आवश्यक ठरते.

i) समायोजन ii) संबंध iii) करार iv) जोडणी

ड) मानव प्राण्याच्या काही निश्चित ————– घेऊन जन्मास येतो.

i) गुण ii) प्रवृत्ती iii) वारंवारीता iv) प्रामाणिकपणा

३.८ संदर्भग्रंथ

१) पारसनीस न.रा. (१९८७) 'शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका', पुणे नुतन प्रकाशन.
२) कुंडले म. बा. (१९८६), 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', पुणे, श्रीविद्या प्रकाशन.

❖❖❖❖

४

शिक्षणाचे आधार / अधिष्ठान

घटक रचना :

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान / आधार

- ४.२.१ शिक्षणाच्या तात्त्विक अधिष्ठानाची पार्श्वभूमी
- ४.२.२ तत्त्वज्ञान आणि शिक्षण
- ४.२.३ तत्त्वज्ञानाचा शिक्षणावरील प्रभाव

४.३ शिक्षणाचे समाजशास्त्रीय अधिष्ठान / आधार

- ४.३.१ शिक्षणाच्या समाजशास्त्रीय आधाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी
- ४.३.२ समाजशास्त्र आणि शिक्षण
- ४.३.३ समाजशास्त्राचा शिक्षणावरील प्रभाव

४.४ शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान / आधार

- ४.४.१ शिक्षणाच्या मानसशास्त्रीय आधाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी
- ४.४.२ मानसशास्त्र आणि शिक्षण
- ४.४.३ मानसशास्त्राचा शिक्षणावरील प्रभाव

४.५ सारांश

४.६ सराव

४.७ संदर्भ

४.० उद्दिष्ट्ये

शिक्षणाची इमारत ज्या पायावर उभी आहे त्यामध्ये प्रामुख्याने तीन मुख्य आधार आहेत ते म्हणजे तात्त्विक, समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय या तीन प्रमुख आधाराची चर्चा आपण खालील मुद्यातून करणार आहोत.

- शिक्षणाच्या तात्त्विक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय अधिष्ठानाचा अर्थ व संकल्पना समजून घेणे.
- जीवनाच्या विविध पैलुंशी या शाखा कशा संबंधित आहेत.

- तत्वज्ञान, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र व शिक्षण आणि त्याचे विविध घटक यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास करणे.
- शिक्षणाच्या विविध शिस्तीविषयीचे विश्लेषण करणे.

४.१ प्रस्तावना

आपण मागील प्रकरणात शिक्षणाची विविध ध्येये व त्याच्या पैलुची चर्चा केली. शिक्षणाची ध्येय, वेळ, काळानुसार बदलत गेलेली दिसून येतात समाजाच्या बदलत्या गरजा. जीवनाच्या बदलेल्या कलपनानुसार शैक्षणिक ध्येय पूर्ण करण्यासाठी तत्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र इ. विषयाच्या आधाराची गरज आहे. मानवी जीवनाची मूल्ये व आदर्श ठरविण्याचे कार्य तत्वज्ञान करते. समाजात कशा पद्धतीने राहून व्यवहार करावा हे समाजशास्त्र शिकवते तर व्यक्तीच्या वर्तनाचा अचुक अंदाज बांधण्याचे कार्य मानसशास्त्र करते त्यामुळे या तिन्ही शास्त्राचा आधार घेवून शिक्षणाची ध्येय ठरविली जातात. शिक्षण आणि संबंधित विषय यांचा परस्पर संबंधातून व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांना आपण एक प्रकारे आदर्श स्वरुप देऊ शकतो.

४.२ शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान / आधार

या जगात सुरुवातीपासूनच मानवाने सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. सत्याचा शोध घेण्याची तत्वज्ञानाची मूळ प्रवृत्ती आहे. तत्वज्ञान जीवनाला एक नवीन दिशा देते. चांगले किंवा योग्य निर्णय घेण्यासाठी व हेतूपूर्वक कार्य करण्यासाठी तत्वज्ञानाची आवश्यकता आहे. तत्वज्ञान शिक्षणाची प्रेरक बाजू हे. तत्वज्ञानाशिवाय मानवी जीवन समजून घेता येत नाही. सामान्यपणे व्यक्ती आणि तिची कृती समजून घेण्यासाठी तत्वज्ञानाची आवश्यकता असते. तत्वज्ञानाचे आणि जीवनाचे जवळचे संबंध आहेत. जीवनाची निर्मितीच मूळात तत्वज्ञानापासून सुरु होते. तत्वज्ञान स्वत:ची ओळख निर्मान करुन आत्मिक विकास करते आणि सत्याच्या मूळाशी जाते म्हणून जीवन आणि तत्वज्ञान एकमेकांशी अविभाज्य असून त्यांना वेगळे केले जाऊ शकत नाही. जीवनाला एक प्रकारे तात्त्विक आधार आहे आणि त्या पद्धतीनेच शिक्षणाला ही तात्त्विक अधिष्ठान असणे गरजेचे आहे.

४.२.१ शिक्षणाच्या तात्त्विक अधिष्ठानाची पार्श्वभूमी :

व्याख्या :

आपण शिक्षण आणि तत्वज्ञान संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न करु.

तत्वज्ञानाचा अर्थ आणि स्वरूप :

तत्वज्ञान म्हणजे जे विषय अव्यक्त, अदृश्य आहेत त्यांच्याविषयी शोध घेणे. तत्वज्ञान या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्दापासून झालेली आहे. इंग्रजीतील Philosophy या शब्दाचा अर्थ (Philos-Love) (Sophia - Wisdom) सुज्ञपणाचे / शहाणपणाचे प्रेम.

ज्ञान आणि शहाणपणा या दोन्ही बाबी समान नाहीत. ज्ञान तुम्ही सहजपणे घेऊ शकता परंतु शहाणपणा हा सत्य वागण्यातून लक्षात येतो. तत्वज्ञान, सत्य आणि जीवनाच्या निर्माण होणाऱ्या गरजा यांचा चिरंतन शोध आहे. विस्तृत अर्थाने शिक्षण स्वजीवनपद्धतीचा एक टप्पा आहे आणि संकुचित अर्थाने विचार केला तर संपूर्ण जगण्याची तयारी आहे. तत्वज्ञान जीवनाला एक सुसंगत आणि व्यापक अर्थ प्रदान करते आणि जीवनाचे ध्येय निश्चित करते. आपणास सर्व मानवाचे व्यवहार अनुभव यांचे महत्त्व समजून घेण्यासाठी मदत करते. जीवनाच्या मूलभूत प्रश्नाची उत्तरे तत्वज्ञानातूनच मिळालेली आहेत. जीवनात लक्ष्य निश्चित करण्यासाठी पायाभूत प्रश्न समजण्यासाठी तत्वज्ञानाची मदत झाली. तत्वज्ञानामुळे जीवनाच्या मूल्याची बैठक, या विश्वाचे मूळ शोधण्याकरीता तत्वज्ञानाचा उपयोग वेगवेगळ्या संशोधक विचारवंतानी केलेला दिसून येतो. तत्वज्ञानाशिवाय जीवनाला अर्थ नाही आणि शिक्षणाने जीवन आनंदी बनवण्यासाठी तत्वज्ञानाशिवाय पर्याय नाही.

व्याख्या :

रॉस - "तत्वज्ञान म्हणजे जीवनाचे आदर्श समजून घेण्याच्या तात्त्विक श्रद्धाचे, विश्वासाचे व्यावहारिक माध्यमांचे सक्रिय पैलू."

जॉन ड्युई - "असे शहाणपण जे जीवनाचे आचरण प्रभावित करते."

बेहुन - तत्वज्ञान म्हणजे सर्व शास्त्रांचे शास्त्र.

शिक्षणाचे स्वरूप :

शिक्षण व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाची प्रक्रिया आहे. ती एक जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणातून वैयक्तिक, नैसर्गिक क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षणातून सर्व शक्तीचा विकास केला जातो. जसे शारीरिक बौद्धिक, अध्यात्मक इ. त्यामुळे शिक्षणाशी व्यक्तीचे जीवन आणि अनुभव एकमेकांशी घनिष्ठ संबंध असून ती एकाच हाताची बोटे व एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

४.२.२ तत्त्वज्ञान आणि शिक्षण :

तत्वज्ञान शिक्षणाची आई आहे. शिक्षण तत्वज्ञानास जन्म देते तर तत्वज्ञान जीवनाचे ध्येय / साध्य निश्चित करते तर शिक्षण ते ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करते. मनुष्य हा दोन्ही विषयाचा सामान्य भाग आहे. तत्वज्ञान आणि शिक्षण एकमेकांशी संबंधित तसेच अविभाज्य आणि परस्परावलंबी आहेत. प्रत्येक तत्वज्ञानपाशी शैक्षणिक दृष्टिको असतो तर प्रत्येक शिक्षणतज्ञाच्या जीवनासाठी तत्वज्ञान गरजेचे असते. तत्वज्ञानाशिवाय शिक्षण पद्धती पूर्ण होऊ शकत नाही. तत्वज्ञान जीवनाची ध्येय शिक्षणाद्वारे पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. शिक्षण व्यावहारिक जीवनात तत्वज्ञानाची ध्येय / उद्दिष्ट्ये पूर्ण करते.

तत्वज्ञान आणि शिक्षण हे परस्परावर अवलंबून आहे हे आपणास गौतम बुद्ध, गांधी, ग्रीक विचार यांनी पुराव्यानिशी दाखवून दिलेले आहे. त्यांच्या शैक्षणिक योजनातून तात्त्विक दर्शन आपणास पहावयास मिळते.

उदा. प्लेटोच्या आदर्शवादाचा जन्म त्याच्या शिक्षणाच्या सांस्कृतिक योजनेमधून झालेला दिसतो.

- रूसोचे सामाजिक तत्वज्ञान त्याच्या नकारात्मक व नैसर्गिक शिक्षणातून दिसून येते.
- प्रकल्प पद्धती
- कला साहित्यातील पद्धती

त्यामुळे शिक्षण हे तत्वज्ञानावर आधारित नाही असे म्हणता येणार नाही. शिक्षण प्रक्रियामध्ये तत्वज्ञानाद्वारे सत्य आणि तत्व प्रस्थापित केलेले आहेत. सर्व शैक्षणिक कार्यक्रमांचा पाया तत्वज्ञानच आहे. तत्वज्ञान जीवनाची सुत्रे निश्चित करते आणि या सुत्राद्वारे सुखी जीवन कशा पद्धतीने करावयाचे याच्या सुचना देण्याचे काम शिक्षण करते. तत्वज्ञानाशिवाय शिक्षणपद्धती म्हणजे आंधळेपणा. शिक्षणाशिवाय तत्वज्ञान म्हणजे पांगळेपणा आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

तत्वज्ञान शिक्षणाचा निश्चित ध्येय साध्य करुन देण्याचे कार्य करते. त्यामूळे तत्वज्ञानांचा सर्वांगी प्रभाव शिक्षणावर दिसून येतो.

- ध्येय
- अभ्यासक्रम
- पद्धती
- शिक्षक
- पाठ्यपुस्तके
- प्रशासन
- शिस्त
- मूल्यमापन

शिक्षणाचा असा एकही पैलू नाही ज्याना तत्वज्ञानाचा आधार नाही. जीवन पद्धती, शिक्षण पद्धती ठरवतांना असा एकही घटक ज्यावर तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसून येत नाही.

४.२.३ तत्त्वज्ञानाचा शिक्षणावरील प्रभाव :

शिक्षणाची ध्येय धोरणे आणि तत्वज्ञान -

शिक्षणाच्या सर्व ध्येय धोरणावर तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. तत्वज्ञान शिक्षणाचे उद्दिष्ट्ये निर्धारित करते. शिक्षणपद्धतीत काळानुसार ध्येय बदलतात त्यांना वेळावेळी निर्धारित करण्यासाठी तत्वज्ञान उपयोगी पडते.

तत्वज्ञान आणि अभ्यासक्रम :

तत्वज्ञान शिक्षणाची ध्येय ठरविते. हे ध्येय कशा पद्धतीने पूर्ण करावयाची हे अभ्यासक्रमाद्वारे ठरवले जाते. अभ्यासक्रम ठरविण्यासाठी तत्वज्ञानाचा आधार घ्यावा लागतो.

तत्वज्ञानाद्वारे अभ्यासक्रम कसा असावा त्यातून कोणती उद्दिष्ट्ये पूर्ण व्हावीत हे ठरवले जाते. अभ्यासक्रमातील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी तत्वज्ञानाचा आधार घेतला जातो.

तत्वज्ञान आणि पाठ्य पुस्तके :

पुस्तके हे अभ्यासक्रमाचा भाग आहेत. योग्य पाठ्यपुस्तके ही तत्वज्ञानाशी संबंधित असतात. पाठ्यपुस्तकांची निवड करताना त्यामध्ये आदर्श समाज निर्मितीसाठी आवश्यक असणारी मूल्ये समाविष्ट केली जातात व अशा आदर्शांना व मूल्यांना निश्चित करण्याचे कार्य तत्वज्ञान करते. त्यामूळे कोणतेही पाठ्यपुस्तके तयार करताना त्यावर तत्वज्ञानाचे प्रतिबिंब पडते.

तत्वज्ञान आणि शिक्षणपद्धती :

शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना जे कलात्मक ज्ञान देवून संवाद साधला जातो त्याला तत्वज्ञानाची जोड असते. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी बनवण्यासाठी व विद्यार्थ्यांबरोबर प्रभावी संवाद करण्यासाठी वर्गात वेगवेगळे तंत्र व साधने वापरण्यासाठी आणि या सर्व प्रक्रियेचे समाधान होण्यासाठी तत्वज्ञानाचा आधार द्यावा लागतो. निसर्गवादी तत्वज्ञानाने विद्यार्थीकेंद्रित पद्धतीवर भर दिलेला दिसून येतो तसेच विद्यार्थ्यामधील उपजत व सहज असलेल्या क्षमता ओळखण्यासाठीही तत्वज्ञान उपयोगी पडते. रूसो, फिचते आणि मॉटेसरी या सारख्या शिक्षणतज्ञांनी म्हटले आहे. शिक्षकांचा अवावश्यक शिक्षण प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप असता कामा नये. परंतु आदर्शवादी तत्वज्ञानेही हस्तक्षेपाची भूमिका महत्त्वाची मानली आहे. पण त्याबरोबरच आदर्शवादाचा असाही तर्क आहे की मुलांना काही विशिष्ट मूल्ये समजून घ्यावी लागतात. त्यामुळे शिक्षक केंद्री शिक्षणपद्धती असावी. परंतु शिक्षणपद्धती विद्यार्थीकेंद्रित असो किंवा शिक्षक केंद्रित ती तत्वज्ञानाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

तत्वज्ञान आणि शिस्त :

शिस्तीचे स्वरूप असो किंवा शिस्तीचे प्रकार हे तत्वज्ञानाद्वारेच ठरविले जातात. आंधळ्या आज्ञाधारकपणाच्या विरुद्ध निसर्गवादाने कला व साहित्यातून व्यक्तीच्या आत्मदृढतेवर जोर दिला आहे. आदर्शवादी तत्वज्ञानाने असे म्हटले की व्यक्तीने शिस्त स्वत:हून पाळली पाहिजे. त्यांच्या मते शिस्त ही शिक्षकाच्या व्यक्तीमत्वातून निर्माण होते. म्हणून शिक्षकातील शिस्तीवर तत्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो.

तत्वज्ञान आणि शिक्षक :

शिक्षक हा शैक्षणिक प्रक्रियेचा आत्मा आहे. शिक्षक फक्त ज्ञानच देत नाही तर समाजात माणूस म्हणून जगण्यासाठी पात्र बनवतो. परंतु शिक्षकाला परिपूर्ण होण्यासाठी तत्वज्ञानाची आवश्यकता असते. तत्वज्ञानामुळे शिक्षकामध्ये सखोल ज्ञानाची निर्मिती होते. म्हणून शिक्षकावर तत्वज्ञानाचा प्रभाव पडतो आणि शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेचा घटक आहे. पर्यायाने शिक्षणावर तत्वज्ञानाचा प्रभाव पडतो.

तत्वज्ञान आणि शैक्षणिक प्रशासन :

शैक्षणिक प्रशासन हे तत्वज्ञानांच्या मार्गाशिवाय चालत नाही. तत्वज्ञानाद्वारे शैक्षणिक प्रशासन पार पाडण्यासाठी मानसिक चाचण्या, व्यक्तीमत्व चाचण्या तयार केल्या जातात. भविष्यातील अंदाज बांधण्यासाठी शैक्षणिक प्रशासनाला तत्वज्ञानाचा आधार घ्यावा लागतो.

तत्वज्ञान आणि मूल्यमापन :

शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारचे मूल्यमापन करण्यासाठी तत्वज्ञान गरजेचे आहे. जसे मूल्यमापनाची पद्धत कोणती असावी मूल्यमापन साधने कोणती वापरावीत या सर्व प्रश्नाची उत्तरे तत्वज्ञानाद्वारे मिळतात. म्हणून मूल्यमापनावर तत्वज्ञानाचा प्रभाव दिसतो व मूल्यमापन हा शिक्षणप्रक्रियेचा एक भाग आहे.

४.३ शिक्षणाचे समाजशास्त्रीय अधिष्ठान / आधार

तात्त्विक व मानसशास्त्रीय आधाराबरोबर शिक्षणाच्या समाजशास्त्रीय अधिष्ठानही महत्त्वाचे असल्यामुळे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

४.३.१ शिक्षणाच्या समाजशास्त्रीय आधाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

समाजशास्त्राच्या विकासाच्या इतिहासाची सुरुवात फ्रेंच तत्वज्ञ आगष्ट कॉप्त यांनी १८३७ मध्ये केली. त्यांने समाजशास्त्र या शब्दाचा प्रथम वापर केला. समाजशास्त्रामध्ये समाज आणि व्यक्ती यांच्यातील संबंधांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जातो. व्यक्तीने निर्माण केलेल्या समाजातून व्यक्ती शिक्षण घेते. हा एक सामाजिक प्रक्रियेचा भाग आहे. त्यास एक सामाजिक कार्य आणि संदर्भ आहे. एक शाळा समाज निर्मितीचे कार्य करते आणि समाज शिक्षण सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतो म्हणून शिक्षण समाजासाठी एक कारण व उत्पादन दोन्ही आहे. समाजातील निर्माण होणारे प्रश्न आणि गरजा समाजातच सोडविणे आवश्यक आहे. या सोडविण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. त्यामुळे यामधील संबंध हा आंतरिक स्वरूपाचा आहे. या सर्वांची पूर्तता होण्यासाठी समाजशास्त्राचा आधार शिक्षणासाठीही घ्यावा लागतो. म्हणून शिक्षणाला समाजशास्त्रीय अधिष्ठान गरजेचे आहे.

व्याख्या :

"समाजशास्त्र म्हणजे व्यक्ती-व्यक्तीतील संवाद आणि आंतरसंबंध त्यांची प्रकृती आणि परिणाम यांचा अभ्यास होय." - गिन्सबर्ग

"समाजशास्त्र म्हणजे समुहातील मानवी वर्तनाचा अ्यास."

"समाजशास्त्र सामाजिक क्रियांचा अभ्यास."

"सामाजिक जीवनाच्या चालीरिती परंपरा सामाजिक संस्था आणि त्याच्या समूहजीवनाशी निगडीत असणाऱ्या जीवनपद्धतीचा व विचारपद्धतीचा अभ्यास." - किम्बाल यंग

४.३.२ समाजशास्त्र आणि शिक्षण :

शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती :

शैक्षणिक समाजशास्त्र विषयाची व्याप्ती फार विस्तृत व अफाट आहे. यामध्ये विविध सामाजिक शक्ती व संस्था जसे की शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था कुटुंब संस्था क्रिडासंघ, सामाजिक संघ, संघटना इ. विविध कार्यामधून सामाजिक, शैक्षणिक घटकातील संघर्ष स्पर्धा सहकार्य या सर्वांचा अंतर्भाव या विषयांच्या व्याप्तीत होतो. सामाजिक आंतरक्रियामध्ये टी.व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे, सिनेमा या साधनांचा वापर होतो. यांचाही या विषयाअंतर्गत समावेश होतो. त्याबरोबर यातून होणारे सामाजिक नियंत्रण व सामाजिक बदल यांचा सुद्धा अभ्यास या विषयात केला जातो. या सर्व समाजशास्त्रीय बाबींचा परिणाम हा शिक्षणाच्या ध्येय आणि उद्दिष्टांवर होत

असतो. अभ्यासक्रम, शाळा, शैक्षणिक संघटना व्यक्तीमत्त्व विकास शाळा व्यवस्थापन इ. मध्ये सामाजिक दृष्टीने सामाजिक समस्या सोडविण्याचे कार्य समाजशास्त्र करते. अध्यापन करणाऱ्या शिक्षकाचा समाजाशी संबंध येवून त्याचा प्रभाव त्याच्या व्यक्तीमत्वात दिसून येतो. या सर्वांचा अभ्यास शैक्षणिक समाजशास्त्रात केला जातो.

शिक्षणाचे समाजशास्त्रीय आधार खालील घटकातून स्पष्ट होतील.

१) सामाजिक जीवन
२) सामाजिक नियंत्रण
३) संरक्षण आणि सामाजिक वारसा
४) सामाजिक प्रगती
५) सामाजिकरणाची प्रक्रिया

४.३.३ समाजशास्त्राचा शिक्षणावरील प्रभाव :

वरील सर्व चर्चेतून असे लक्षात येते. सततपणे आपणास समाजाचा शिक्षणावर प्रभाव पडतांना दिसून येतो. शैक्षणिक समाजशास्त्र हे आधुनिक शैक्षणिक सिद्धांतावर भर देते. त्यातून शिक्षणाची ध्येये व उद्दिष्ट्ये स्पष्ट करते. म्हणजेच शिक्षणाची उद्दिष्ट्ये ठरवितांना समाजाचा विचार करावाच लागतो. तसेच शिक्षणातील अभ्यासक्रम रचना शिकवण्याची पद्धत शैक्षणिक संघटन आणि प्रशासन या सर्व गोष्टी तेथील समाजाच्या चालीरिती रूढी परंपरा बोलीभाषा संस्कृती यांचा विचार करुनच ठरवाव्या लागतात.

शिक्षणाचा अर्थ :

शिक्षण म्हणजे शालेय शिक्षणापासून फक्त सूचना देणे नव्हे तर विद्यार्थी हा केंद्रस्थानी मानून विद्यार्थ्याचा शारीरिक, मानसिक व भावनिक सामाजिक व व्यावहारिक विकास करणे. तसेच व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास करणे आणि चारित्र्य निर्मिती करणे. यासाठी सामाजिक जीवनात शैक्षणिक संस्था कार्य करतांना दिसून येतात. सामाजिक जीवनात सर्व प्रकारच्या व अतिरिक्त शालेय उपक्रमाचा समावेश होतो. त्यातून व्यक्ती सामाजिक जीवनाचा अनुभव घेतो. या प्रक्रियेद्वारे सामाजिक प्रक्रिया आणि त्यावर प्रभाव पाडणारे घटक याचा शिक्षणावर परिणाम होतो. अध्ययनाद्वारे सामाजिक आंतक्रिया आणि सामाजिक प्रेरणा निर्माण होतात. शिक्षण हे समाजातील प्रत्येक घटकाला विकसित करणे. जेणेकरुन व्यक्ती समाजाचा आदर्श सदस्य होऊ शकतो. यातुन त्याला चांगल्या प्रकारचे अनुभव मिळू शकतात. अशाप्रकारे शिक्षणाला समाजशास्त्राची जोड देऊन शैक्षणिक समाजशास्त्राची निर्मिती झालेली आहे.

शिक्षणाचे हेतू / ध्येय :

शिक्षणाच्या ध्येय / उद्दिष्टावर अप्रत्यक्षपणे शैक्षणिक समाजशास्त्राचा प्रभाव पडतो. समाजशास्त्रज्ञ शिक्षणाच्या वैयक्तिक आणि सामाजिक पैलूना समान महत्त्व देतात. आधुनिक शिक्षणाचा हेतू सामाजिक प्रगती आणि वैयक्तिक विकास करणे आहे. शिक्षण वैयक्तिक जीवन व सामाजिक जीवन आदर्श बनवण्यासाठी उपयोगी पडते. शिक्षण व्यक्तीला वैयक्तिक व सामाजिक घटक म्हणून सक्षम बनविते. शिक्षण व्यक्तीचा सामाजिक बौद्धिक नैतिक सामाजिक सांस्कृतिक, शारीरिक विकास घडवून आणण्यासाठी मदत करते. तसेच त्यामधील चांगल्या सवयी, कौशल्य अभिवृत्ती आणि दृष्टिकोन विकसित करुन सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची क्षमता निर्माण करते.

शिक्षणाची कार्ये :

अ) सामाजिक आणि सांस्कृतिक वारस्याचा प्रसार
ब) नवीन सामाजिक पद्धतीचा विकास
क) सर्जनशील आणि विधायक भुमिका

शिक्षण, कुटुंब, धार्मिक संघटना, रेडिओ, टी.व्ही. सिनेमा वृत्तपत्रे, शाळा यांच्या माध्यमातून सांस्कृतिक वारस्याचा प्रसार करण्यासाठी मदत करते. परंतु शिक्षण भूतकाळातील सांस्कृतिक वारसाच प्रसारित करत नसून नवीन सामाजिक पद्धतीचा विकासपण करते तसेच आरोग्यदायी, आरामदायी, गृहजीवन जगण्यासाठी सर्जनशील आणि विधायक भूमिकाही पार पाडते.

अभ्यासक्रमाची रचना :

अभ्यासक्रमाची रचनेच्या तत्वावर शैक्षणिक समाजशास्त्राचा प्रभाव पडतो. याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. परंतु आधुनिक युगात अभ्यासक्रमाच्या रचनेचे पारंपारिक दृष्टिकोन अशास्त्रीय आहेत म्हणून नाकारले गेले आहेत. अभ्यासक्रमाद्वारे जे शिक्षण द्यायचे आहे ते सामान्य विद्यार्थी गृहीत धरुन असले पाहिजे जेणेकरुन त्याच्या सर्वांगिण विकासासाठी विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल. आधुनिक शिक्षणामध्ये अभ्यासक्रम म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नाही तर त्यामधून विद्यार्थ्याला शाळेतील विविध उपक्रमात समाविष्ट करुन घेणे गरजेचे आहे. आता मुलांना सामाजिक संवादासाठी सर्व प्रकारचे अनुभव एकत्रित देणे आवश्यक आहे.

आधुनिक अभ्यासक्रमाद्वारे सामाजिक गरजा पूर्ण होणे आवश्यक आहे. शिक्षणाद्वारे नुसते विचार न शिकवता वर्तमानात काय घडत आहेत याच्या कल्पनाही देणे गरजेचे आहे. मूल दिर्घकाळ शिक्षण प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन ज्ञान आत्मसात करण्यासाठी सक्षम बनविणे आहे. यातून त्याला उत्पादित उपयोगी मूल्ये साध्य व्हावीत अशी अपेक्षा केली जाते.

त्यामुळे कामावर / रोजगारावर आधारित शिक्षण सामाजिक विकासासाठी मुलांना मदत करते.

१. अभ्यासक्रम समाजाच्या गरजा परिस्थिती व समस्या विचारात घेवून तयार केला पाहिजे.
२. अभ्यासक्रमाद्वारे वास्तविक शंकांचे /समस्याचे समाधान झाले पाहिजे.
३. अभ्यासक्रमातून सामाजिक सेवांचे मूल्य प्रतिबिंबित व्हावे.
४. अभ्यासक्रमातून जागतिक समाजात टिकेल या दृष्टीने मूल तयार असले पाहिजे.

त्यामुळे शाळा या सामाजिक कार्ये व जबाबदारी पार पाडण्याऱ्या सामाजिक संस्था झाल्या पाहिजेत.

शालेय संघटन आणि व्यवस्थापन :

शालेय प्रशासनाचे आता लोकशाहीकरण केलेले आहे. विद्यार्थ्याला शालेय प्रशासनामध्ये सहभागी करुन प्रशासकीय जबाबदारी पार पाडली जाते. सध्या आधुनिक शिक्षणात शिक्षक मित्र तत्वज्ञ व मार्गदर्शकाच्या भूमिकेत आहे. या कामासाठी त्याला स्वत:हाला

तयार करणे आवश्यक आहे. त्याला मिळालेली जबाबदारी पार पाडण्यासाठी त्याचे व्यक्तीमत्व योग्य व उत्तम असणे आवश्यक आहे.

मानवी संबंधाचा विकास करण्यासाठी शाळा समाज आवश्यक आहे. हे संबंध शिक्षणाचे अभ्यासक्रम बनवण्यासाठी उपयोगी पडतात. आता सामाजिक तंत्रे वापरुन शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये गट प्रेरक शक्ती वापरली जाते.

अध्यापन पद्धती :

अध्यापन पद्धतीह शैक्षणिक समाजशास्त्राने प्रभावित झाल्या आहेत. शिक्षक अध्यापन पद्धती व तंत्रे वापरुन उद्दिष्ट्ये व सुचना साहित्य यामध्ये संबंध प्रस्थापित करत आहे.

या पद्धती व तंत्रे तीन तत्वावर आधारित आहेत. ती -

१) सामाजिक परिस्थितीला तडतोड करण्यासाठी किंवा समायोजन करण्यासाठी वर्गात प्राप्त कौशल्याचा व ज्ञानाचा उपयोग करण्याची पद्धत
२) शाळेबाहेरील सामाजिक वर्तनाचे महत्त्व समजून सांगणारी पद्धत
३) सामाजिक शक्तीला एकत्रितपणे तोंड देणारी अशी पद्धती. ज्यामुळे सामाजिक जीवनात सामाजिक समायोजन क्षमता निर्माण होईल.

मुख्य वैशिष्ट्ये :

१) अध्यापन पद्धतीद्वारे विद्यार्थी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सक्षम झाला पाहिजे.
२) सामाजिक समायोजनेची क्षमता विकसित करता आली पाहिजे.
३) सामाजिक तंत्रे, प्रकल्प आणि गट पद्धत यांच्या विस्तृत व्याख्यानातून पुर्नस्थापना केली पाहिजे.

शिक्षक :

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक हा महत्त्वाचा आहे. त्याद्वारे शिक्षणाला गती मिळते. त्यावर समाजाचा घटक या नात्याने तो ज्या समाजात राहातो त्याचा प्रभाव त्यावर कळत नकळतपणे पडलेला असतो व त्याच्या व्यक्तीमत्वात सामाजिक प्रभावाचे प्रतिबिंब दिसून येते. अशा पद्धतीने शिक्षकाच्या माध्यमातून शिक्षणावर समाजशास्त्रीय प्रभाव दिसून येतो. त्याने वापरलेल्या शैक्षणिक साधनावरही अध्यापनाचा सामाजिक साधने वापरतो यावर विद्यार्थ्यांचा विकास घडुन येतो.

४.४ शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान / आधार

आधुनिक शिक्षणावर मानसशास्त्राचा खूप मोठा प्रभाव दिसून येतो. मानसशास्त्र आणि शिक्षण यामध्ये मूलभूत संबंध दिसून येतात. शैक्षणिक सिद्धांताद्वारे मानवी वर्तनाचे स्वरूप स्पष्ट केले जाते.

४.४.१ शिक्षणाच्या मानसशास्त्रीय आधाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मानसशास्त्राचे स्वरूप :

सर्व शास्त्राच्या केंद्रस्थानी मानव असल्या कारणाने त्याला समजून घेणे गरजेचे आहे. मानवाला समजून घेण्यासाठी त्याचा वर्तनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणूनच वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी ज्या शास्त्राची निर्मिती झाली ते म्हणजे मानसशास्त्र होय. या मानसशास्त्राचा उपयोग शिक्षण प्रक्रियेत करुन शिक्षणाची निश्चित ध्येय आपल्याला पूर्ण करता येतील. त्यामुळे मानसशास्त्रातील कल्पना, भावना, प्रेरणा, सहसंबंध व्यक्तीमत्व विकास इ. संकल्पनाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. मानसशास्त्राला इंग्रजीमध्ये Psychology म्हटले जाते. Psyche म्हणजे मन आणि logos म्हणजे शास्त्र याचा अर्थ मनाचा शास्त्र असा होतो. या दोन शब्दापासून Psychology हा शब्द रूढ झाला आहे.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला जे.बी. वॅटसन यांनी मानसशास्त्र म्हणजे वर्तनाचे विज्ञान असे म्हटले आहे. इतर शास्त्राप्रमाणे मानसशास्त्राच्या मुख्य दोन शाखा आहेत.

१) प्रयोगिक मानसशास्त्र

२) व्यावहारिक मानसशास्त्र

मानवी वर्तनाची वृत्ती निर्धारित करण्यासाठी व मानवी जीवन सुधारण्यासाठी मानसशास्त्र उपयोगी पडते.

शैक्षणिक मानसशास्त्र :

शैक्षणिक मानसशास्त्र विद्यार्थ्याच्या वर्तनाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करते आणि शिक्षणप्रक्रिया सुरळीत होण्यासाठी मदत करते. हे विशिष्ट क्षेत्रात उपयोजित मानसशास्त्र म्हणून ओळखले जाते. मूलांचे शैक्षणिक वर्तन आणि त्याद्वारे उपयोगी असणारे ज्ञान मानसशास्त्रातून शिक्षणात अभ्यासणाचा प्रयत्न केला जातो.

रूसोने शिक्षणाला मानसशास्त्राचा आधार आहे असे म्हटले आहे. रूसो एक मानसशास्त्र तर होताच पण त्या अगोदर सुरुवातीला तो समाजसुधारक व शिक्षण तत्वज्ञ होता. त्याच्या मते प्रत्येक मूल एक पुस्तक आहे व शिक्षक एक कथाकार आहे. ते समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बालमानसशास्त्र, मानवी मानसशास्त्र या मानसशास्त्राचा शाखाद्वारे विद्यार्थी वर्तनाचा अभ्यास करुन शिक्षणाला मानसशास्त्रीय आधार दिला.

४.४.२ मानसशास्त्र आणि शिक्षण :

रूसो हर्बाट फ्रोबेल मॉटेसरी, जॉन ड्युई या तत्ववेत्यांच्या नवीन विचारांमुळे शिक्षणात मानसशास्त्रीय विचारप्रणाली सुरु झाली. शिक्षणाच्या प्रक्रियेत शिक्षक विषय व बालक हे तीन घटक असतात. जुन्या शिक्षण पद्धतीत बालकाचे दुर्लक्ष होऊन शिक्षक व विषय यांनाच महत्त्व असे त्यामूळे बालकाच्या गरजा, आवडीनिवडी क्रियाशिलता सहप्रवृत्ती इ. दुर्लक्ष होऊन पुस्तकी ज्ञानावर व पाठांतरावर आवास्तव भर देण्यात येई. शिक्षा, राग, धाक यांच्या साहाय्याने शिक्षक आपले वर्चस्वी व्यक्तिमत्व अबाधित राखीत असे. रूसो नंतर पेस्टॅलॉत्सीनेही शिक्षकाला मानसशास्त्राची बैठक दिली आहे. मुलांनी स्वतःच्या कृती स्वतःचे अनुभव, स्वतःचे निरीक्षण यामधून ज्ञान मिळवायचे. पुस्तकाला फारशे महत्त्व न देता निसर्ग-निरीक्षण व स्वानुभव यांना महत्त्व द्यायचे.

शैक्षणिक मानसशास्त्र विद्यार्थ्याचा विकास अध्ययन प्रक्रिया सामाजिक समायोजन व्यक्तिगत भिन्नता, शारीरिक क्षमता मानसिकरित्या स्थिरता या सर्व समस्या व प्रश्नांना समजून घेऊन सोडविण्याचे काम मानसशास्त्र करते.

शिक्षणाचे विविध मानसशास्त्रीय आधार :

१) मुलांचा अभ्यास :

शिक्षणप्रक्रियेत समाविष्ट असलेल्या महत्त्वाचा घटक एक विद्यार्थी असतो हा विद्यार्थी अभ्यासण्यासाठी त्यांचे वर्तन अभ्यासणे गरजेचे आहे. त्यातून आपल्याला त्याच्या नैसर्गिक गरजा, प्रवृत्ती, त्यांना सुधारण्यासाठी उपाययोजना या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी मानसशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे. मानसशास्त्रामुळे विद्यार्थ्याच्या वर्तनावरुन शिक्षक त्या मूलाला समजून घेऊ शकतो. याकरिता शिक्षण प्रक्रियेमध्ये मुलांचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

२) वैयक्तिक फरक समजून घेण्यासाठी :

विद्यार्थ्यातील वैयक्तिक फरक समजून घेण्यासाठी मानसशास्त्राचा उपयोग होतो. जसे. त्याची अभिवृत्ती, अभिरूची कोणत्या क्षेत्रात आहे तो कोणत्या विषयाकडे जास्त आकर्षित होतो.

३) विद्यार्थी केंद्रित शिक्षण :

आधुनिक युगात विद्यार्थी हा शिक्षणप्रक्रियेच्या केंद्रस्थानी आहे. त्याच्या सर्वांगिण विकासासाठी मानसशास्त्र मदत करते. विद्यार्थी किंवा मुलाला एक मुल किंवा विद्यार्थी म्हणून पाहाणे.

मुलाच्या वर्तनातील बदल ते एक मूल आहे. म्हणून पाहायचा प्रयत्न केला तर त्यामधील बारीक-सारीक वर्तनातून व्यक्तीमत्वाची ओळख होते. त्याच्या वयोमानानुसार त्यांच्या गरजा लक्षात घेऊन उपाययोजना करणे.

४.४.३ मानसशास्त्राचा शिक्षणावरील प्रभाव :

शिक्षणावर मानसशास्त्राचा प्रभाव :

१) मानसशास्त्र आणि शैक्षणिक उद्दिष्ट्ये :

शिक्षणाची उद्दिष्टे मूलात मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून ठरवली जातात. वय, लिंग, समानता या गोष्टीचा विचार करुन योग्य ते मार्गदर्शन ही उद्दिष्ट्ये ठरविण्यासाठी मानसशास्त्र करत असते.

२) मानसशास्त्र आणि अभ्यासक्र :

शिक्षण प्रक्रियेत अभ्यासक्रम ठरवताना कठिण पातळी विद्यार्थ्याचा स्तर विद्यार्थ्याचे वय या सर्व गोष्टींचा विचार मानसशास्त्र करते.

३) मानसशास्त्र आणि अध्यापन पद्धती :

अध्यापन पद्धती मध्ये कोणती अध्यापन तंत्रे वारपल्यानंतर अध्ययन चांगले घडून येईल हे ठरविण्यासाठी मानसशास्त्र मदत करते.

४) मानसशास्त्र आणि पाठ्यपुस्तके :

प्रत्येक पाठ्यपुस्तकांची निर्मिती मानसशास्त्राचा आधार होवून करावी लागते. कारण पाठ्यपुस्तकांचा समाजावर होणारे दुष्परिणाम किंवा व्यक्तीच्या मनावर व भावनावर होणारे परिणाम हे मानसशास्त्र अभ्यासते. म्हणून पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी मानसशास्त्र आवश्यक आहे.

५) मानसशास्त्र आणि शिस्त :

शिस्त व शिस्तीचे प्रकार हे शिक्षण प्रक्रियेसाठी महत्त्वाचे असतात. शिस्तीची संरचना कशी असावी हे ठरविण्याचे कार्य मानसशास्त्र करते.

६) मानसशास्त्र आणि शिक्षक :

शिक्षक हा शिक्षणातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामूळे शिक्षकाचे व्यक्तीमत्व कसे असावे त्याचे आचरण कसे असावे हे निश्चित करण्यासाठी मानसशास्त्र उपयोगी पडते त्यामुळे शिक्षक व शिक्षण यावर मानसशास्त्राचा प्रभाव पडतो.

४.५ सारांश

वरील सर्व बाबीतून असे लक्षात येते की शिक्षण प्रक्रिया आदर्श आणि सुलभ होण्यासाठी त्याला तात्त्विक समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय आधाराची गरज आहे.

४.६ सराव

४.७ संदर्भ

डॉ. न. रा. पारसनिस
प्रा. एल. जी. देशमुख
डॉ. शालिनी कुलकर्णी
डॉ. बी. आर. जोशी

❖❖❖❖

५

अध्ययन संकल्पना

घटक रचना :

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ अध्ययन संकल्पना

- ५.२.१ अध्ययनाचा अर्थ आणि स्वरूप
- ५.२.२ अध्ययनाची वैशिष्ट्ये
- ५.२.३ अध्ययनाचे प्रकार

५.३ अध्ययनावर परिणाम करणारे घटक (अवधान)

- ५.३.१ अवधनाचा अर्थ
- ५.३.२ अवधानाचे स्वरूप
- ५.३.३ अवधानाची वैशिष्ट्ये
- ५.३.४ अवधानाचे प्रकार
- ५.३.५ अवधानाचे शैक्षणिक उपयोजन

५.४ अध्ययनावर परिणाम करणारे घटक (प्रेरणा)

- ५.४.१ प्रेरणेचे अर्थ
- ५.४.२ प्रेरणेचे प्रकार
- ५.४.३ मास्लोची गरजांची श्रेणीबद्ध उपपत्ती
- ५.४.४ प्रेरणेचे शैक्षणिक उपयोजन

५.५ गोषवारा

५.६ प्रकरण सराव

५.७ संदर्भसूची

५.० उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर, तुम्ही पुढील गोष्टी करण्यास सक्षम व्हाल.

- अध्ययनाची व्याख्या, अवधान आणि प्रेरणा
- अध्ययनावर परिणाम करणाऱ्या घटकाचे आकलन
- अवधान आणि प्रेरणेच्या प्रकारांचे स्पष्टीकरण
- अवधान आणि प्रेरणेचे शैक्षणिक उपयोजन

५.१ प्रस्तावना

मानसशास्त्र हे वर्तनाचे शास्त्र आहे व त्यामुळे वर्तनात होणाऱ्या बदलांचा विचार करणे मानसशास्त्राच्या कक्षेत येते. सभोवतालच्या परिस्थितीशी सुयोग्य समायोजन साधण्यासाठी, जीवनाच्या संघर्षात यशस्वी पणे टिकून राहण्यासाठी मानवाला आपल्या सर्व शारीरिक व मानसिक क्षमतांचा विकास घडवून आणणे क्रमप्राप्त ठरते. विकासाच्या विविध अवस्थांमध्ये काही बदल नैसर्गिकरित्या घडतात, तर काही सहेतूकपणे घडवून आणले जातात. मानवी वर्तन अत्यंत जटील आहे. विविध विषयातील ज्ञान, कौशल्ये, वृत्ती, श्रद्धा या गोष्टी मानवाने क्षमतेच्या जोरावर मिळवल्या आहेत.

अध्ययन ही सामान्य तसेच शैक्षणिक मानसशास्त्रातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. या संकल्पनेचा विकास हळू-हळू होत गेला. इ.स. पूर्व ४०० वर्षे अगोदर ग्रीक तत्वज्ञ प्लेटो यांनी 'आत्म्याचा विकास म्हणजे अध्ययन प्रक्रिया' ही कल्पना मांडली. प्लेटो यांचे शिष्य ॲरीस्टॉटल यांनी अध्ययन प्रक्रियेतील आत्म्याच्या विकासास महत्त्वाचे स्थान दिले व त्यामध्ये आत्मसंतोष, तर्कशुद्ध विकास, वाढ व विकासाची उर्मी या प्रेरणा महत्त्वाच्या समजण्यात आल्या. १९ व्या शतकपासून थॉर्नडाईकने प्रथम अध्ययनाचा सिद्धांत मांडला व नंतर २० व्या शतकात जेम्स, पॅवलॉव्ह, कोहलर, वॉटसन, टोलमन, गुथ्री, स्किनर ब्रुनर, गॅग्ने, बँदुरा अशा अनेक मानसशास्त्रज्ञांनी अध्ययनास वेगळे रूप दिले.

अध्ययनामुळे व्यक्तिच्या वर्तनात बदल घडतो. विविध अनुभवाद्वारे मानव अविरत अध्ययन करत असतो.

अध्ययन प्रक्रियेद्वारे व्यक्ति, ज्ञान, वृत्ती व कौशल्ये आत्मसात करु शकते जेणेकरुन तो जीवनाच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम होतो. जळत्या मेणबत्तीला हात लावला असता बालकाला भाजते व तो हात मागे घेतो. हळू हळू बालकास कळते कि केवळ जळती मेणबत्तीच नव्हे तर इतर कोणत्याही जळत्या वस्तुंना हात लावता कामा नये. अशाप्रकारे अनुभवाद्वारे झालेला बदल म्हणजेच अध्ययन होय. अशाप्रकारे अध्ययन म्हणजे अनुभवाद्वारे वर्तनातील कायमस्वरूपी बदल होय. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अनुभवाद्वारे अध्ययन घडते.

५.२ अध्ययन संकल्पना

५.२.१ अध्ययनाचा अर्थ आणि स्वरूप :

विविध मानसशास्त्रज्ञांनी विविध तऱ्हेने (प्रकारे) अध्ययनाच्या व्याख्या दिल्या आहेत. काही व्याख्या पुढीलप्रमाणे -

१. **मर्फी -** "वर्तन व अवबोध या दोन्हीतील सुधारणा म्हणजे अध्ययन होय."

२. **वुडवर्थ -** "मनुष्याचा कोणत्याही प्रकारे विकास घडवून आणणारी व त्याच्या अनुभव परिवेशाचे स्वरूप पूर्वीपेक्षा निराळे करणारी कोणतीही क्रिया म्हणजे अध्ययन होय."

३. **क्रो आणि क्रो -** "अध्ययन म्हणजे सवयी, ज्ञान व वृत्ती संपादन होय."

४. **फ्रॅडसेन -** व्यक्तिच्या अवबोधात्मक, ज्ञानात्मक, प्रेरणात्मक व भावात्मक रचनेमध्ये विशिष्ट स्थितीला अथवा वातावरणाला अनुसरून जे वाचिक, कारक आणि भावात्मक पातळीवर बदल होतात, ते अध्ययन होय.

५. **मन :** अनुभव व वर्तनातील सुधारणा म्हणजेच अध्ययन होय.

वरील व्याख्यांद्वारे अध्ययनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

अध्ययनाचे स्वरूप :

१. अध्ययन हे फलित नसून प्रक्रिया आहे.

२. या प्रक्रियेत विविध अनुभव आणि प्रशिक्षणाचा समावेश होतो जेणेकरुन व्यक्तिला त्याच्या वर्तनात बदल करण्यास सहाय्य होते.

३. अध्ययनामुळे वर्तनात बदल होतो, परंतु याचा अर्थ असा नव्हे कि हे बदल कायम सुधारणा किंवा सकारात्मक विकास घडवून आणतील. येथे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात नकारात्मक बाजूने घडण्याची देखील समान शक्यता असते.

४. अध्ययन व्यक्तिस आवश्यक ठिकाणी समायोजन व अनुकुलनास तयार करते (सक्षम बनवते).

५. अध्ययन हे हेतूपूर्वक व ध्येयपूर्ण आहे. जर हेतू नसेल तर फारच क्वचित तेथे अध्ययन होईल.

५.२.२ अध्ययनाची वैशिष्ट्ये :

१) अध्ययन वैश्विक आहे -

मानव व प्राणी हे दोघेही अध्ययन करत असतात (शिकत असतात) परंतु प्राण्यांपेक्षा मानव जास्त शिकतात. मानवासारखा विकसित मेंदू प्राण्यांकडे नसल्यामुळे प्राणी शिकतात पण त्यांचे अध्ययन सावकाश होते. मानवाची मेंदू प्रणाली खूप जटील असल्यामुळे मानव त्वरीत प्रतिसाद देतात आणि त्यामुळे ज्ञान ग्रहण जलद होते.

२) अनुभवाद्वारे अध्ययन घडते -

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुभवामुळे अध्ययन घडत असते. अनुभवामुळेच व्यक्ती नवीन परिस्थितीत ज्ञान संपादनास तयार होते, अध्ययन करत असताना व्यक्तीस अनुभव उपयोगास येतात.

३) अध्ययन हे आजीवन चालू असते -

जन्मापासून ते मृत्यूपर्यंत अध्ययनाची प्रक्रिया चालूच असते. अशाप्रकारे अध्ययनाचे स्वरूप अविरत चालू असते. वय सापेक्ष व्यक्ति आपले अध्ययन चालू ठेवतो.

४) अध्ययन हे एक समायोजन आहे -

नविन परिस्थितीशी समायोजन करण्यास व्यक्तिला 'अध्ययन' सहाय्यभूत ठरते. मुलांमधील अध्ययनात पुनर्रचना, अनुकुलन आणि स्वतःच्या मूळ स्वभावाचा विकास अशा गोष्टी घडतात. उतरत्या काळात व्यक्ती आपल्या वर्तनाची नवीन शैली अनुभवतात.

५) सरावाचा परिणाम म्हणजे अध्ययन होय -

अध्ययनाचा पाया म्हणजे उजळणी व सराव होय. जेव्हा विद्यार्थी अर्थपूर्ण सराव व उजळणी करतात तेव्हा ती माहिती विद्यार्थ्यांच्या जास्तीत जास्त काळ स्मरणात राहते व विद्यार्थी उत्तमरीत्या शिकतात हे सिद्ध केले गेले आहे.

६) अध्ययन हा स्थिररित्या कायमचा बदल होय -

अध्ययन म्हणजे व्यक्तिच्या वर्तनात होणारा कायमस्वरूपी स्थिर व सकारात्मक बदल होय. वर्तनात झालेला बदल अनेक वर्षानंतर सुद्धा लक्षात राहतो. उदा. जर तुम्ही अनेक वर्षात सायकल चालवली नसेल तरी थोड्या मिनिटाच्या सरावाने तुम्हाला ते कौशल्य प्राप्त होऊ शकते.

७) अध्ययन म्हणजे विकास होय -

बालकाचा सर्वांगिण विकास हा परिणाम अध्ययनाद्वारे दिसायलाच हवा. एखाद्या अपरिपक्व मुलाचे परिपक्व मुलात परिवर्तन झाल्यास अध्ययन झाले असे म्हणता येईल.

८) अध्ययन सक्रिय असते -

अध्ययन प्रक्रियेत सक्रियरित्या गुंतले असता अध्ययन चांगल्याप्रकारे होऊ शकते. अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग हा अध्ययनात अत्यंत महत्त्वाचा असतो.

९) अध्ययन संक्रमणशील असते -

एका क्षेत्रात झालेले अध्ययन दुसऱ्या क्षेत्रात संक्रमित होते. जेव्हा कार्य आशय किंवा पद्धतीत सारखेपणा असतो तेव्हा संक्रमण घडते. परिस्थितीनुसार संक्रमण कमी अधिक होते.

१०) अध्ययन गरजांवर आधारित असते -

मानवी अध्ययन बरेचसे गरजांवर आधारित असते. वैयक्तिक, व्यक्तिगत आणि सामाजिक गरजांमुळे अध्ययन इच्छा होते. गरजेच्या तीव्रतेवर अध्ययनातील जलदता व संथपणा हा अवलंबून असतो.

५.२.३ अध्ययनाचे प्रकार :

अध्ययनाचे प्रकार खालीलप्रमाणे –

१) कारक अध्ययन -

वर्तनातील सुधारणासाठी अध्ययनाचा हा प्रकार अतिशय सोपा आहे. या अंतर्गत बालक सायकल चालविणे, टंकलेखन, चित्र रंगविणे अशी अनेक कौशल्य आत्मसात करतो.

शिक्षणामध्ये असलेले मुलभूत कौशल्य उदा. संभाषण वाचन आणि लेखन यामध्ये प्रभुत्व मिळवून भविष्यकालीन शिक्षणाचा पाया मजबुत करायला पाहिजे.

२) अवबोधात्मक अध्ययन -

एखादी व्यक्ती त्याच्या परिसरातील गोष्टीचे निरीक्षण करते व अवबोधाद्वारे त्या गोष्टीबद्दलचे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करते. व्यक्तीच्या पंचज्ञानेद्रियांद्वारे हे सर्व घडते.

३) संबोधात्मक अध्ययन :

अवबोधात्मक अध्ययन संबोधात्मक अध्ययनास चालना देतो. याचाच अर्थ कि, मूर्त वस्तूंचे ज्ञान अमूर्त विचार प्रक्रियेस चालना देते. मूर्त आणि विशिष्ट तथ्याद्वारे सामान्यीकरण अथवा संकल्पना (मांडली) प्रस्थापित केली जाते. अशा प्रकारच्या अध्ययनात उच्च मानसिक प्रक्रियांची आवश्यकता अशते. उदा. विचार प्रक्रिया, बुद्धिमत्ता इत्यादी . आपण लहानपणापासून विविध संकल्पनांचे अध्ययन करत असतो.

४) साहचर्यात्मक अध्ययन :

आपण अलिप्तपणे नवीन ज्ञान मिळवू शकत नाही. नवीन ज्ञान निर्मिती, जुन्या संपादित तथ्यांशी असलेल्या नवीन तथ्यासोबतच्या साहचर्याने होते. अशाप्रकारे व्यक्तीची ज्ञानवृद्धी तेव्हाच शक्य होते जेव्हा जुन्या ज्ञानाचे साहचर्य नवीन ज्ञानाशी होते यालाच साहचर्यात्मक अध्ययन असे म्हणतात.

५) दृष्टीकोनात्मक अध्ययन :

वृत्ती निर्मितीच्या संदर्भातील हा अध्ययनाचा प्रकार आहे.

आपल्याला माहित असलेल्या अनेक गोष्टी माणसे आणि वस्तू बद्दल आपण लहानपणापासून काही दृष्टिकोन विकसित करतो. आपल्या दृष्टिकोनांवर आपण आपले वर्तन सकारात्मक किंवा नकारात्मक अवलंबून असते. उदा. एखादे बालक आपल्या आईप्रती जिव्हाळात्मक दृष्टिकोन विकसित करतो. बालकाचा मोठ्याप्रती व शिक्षकांप्रती असलेला आदरयुक्त दृष्टिकोन एखाद्या व्यक्तीबद्दलचा तिरस्कार असणारा दृष्टिकोन.

५.३ अध्ययनावर परिणाम करणारे घटक (अवधान)

१) अवधान
२) प्रेरणा

अवधान :

मनोवैज्ञानिक मानसशास्त्रामध्ये अवधान या संकल्पनेचा अभ्यास केला जातो. ज्यामध्ये आपण आपल्या सभोवतालच्या वातावरणात विशिष्ट माहितीवर सक्रियपणे प्रक्रिया करतो.

ही एक महत्त्वपूर्ण मानसिक प्रक्रिया आहे. अवधान शिवाय इतर मानसिक प्रक्रिया उदा. विचार प्रक्रिया, कल्पना, अध्ययन इ. शक्य नाहीत व उपयुक्तही नाहीत.

५.३.१ अवधानाचा अर्थ आणि व्याख्या :

ज्या गोष्टीकडे आपण लक्ष केंद्रित करतो त्या गोष्टीकडे आपले अवधान आहे असे मानले जाते.

अवधान प्रक्रियेमध्ये एखादे इच्छित, ध्येय, साध्य करण्यासाठी श्रवणाचा, एखाद्या घटकांवरील किंवा वस्तुवरील एकाग्रतेचा समावेश होतो.

टिचनेर : अवधान म्हणजे जाणिवांची केंद्रिकरण होय.

रॉस : कोणतीही गोष्ट माहित करुन घेण्यासाठी मनाने केलेली धडपड म्हणजे अवधान होय.

वरील सर्व व्याख्या व विवेचनावरुन असे म्हणता येईल की, "एखाद्या विशिष्ट गोष्टीवर आपली जाणीव केंद्रित करणे किंवा मनाचा ओघ त्या विशिष्ट वस्तुकडे वळवणे म्हणजे अवधान होय."

ज्या प्रक्रियेत व्यक्ति भोवतालच्या अनेक चेतकांपैकी आपल्या अभिरूची नुसार व अभिवृत्तनुसार एका चेतकाची निवड करतो त्या प्रक्रियेला अवधान म्हणतात.

थोडक्यात एखाद्या व्यक्तिकडे, घटनेकडे, वस्तुकडे वळलेला मनाचा कल म्हणजे अवधान होय. जागृत अवस्थेत अवधान हा मनोव्यापार नेहमी चालू असतो.

अवधानाची उदाहरणे -

१) विद्यार्थी घरात अभ्यास करीत असताना अचानक स्वयंपाक घरातून येणारा सुगंध विद्यार्थ्याचे लक्ष वेधून घेतो. या लक्ष वेधून घेण्याची क्रिया म्हणजेच अवधान होय.

२) परीक्षा सुरु असताना विद्यार्थी जाणीवपूर्वक अभ्यासाकडे लक्ष देतात. ते सर्व चेतकांकडे दुर्लक्ष करुन फक्त गरजे मुळे अभ्यासाकडेच लक्ष देतात.

३) शास्त्रज्ञ तास न् तास संशोधनात गढून गेलेले असतात, त्यांना बाहेरच्या जगाची काहीच माहिती नसते हे अभ्यस्त अवधानच असते.

५.३.२ अवधानाचे स्वरूप -

- अवधान ही एक मानसिक शक्ती नसून मानसिक प्रक्रिया आहे.
- आवडीशिवाय अवधान असू शकत नाही.
- अवधानाशिवाय जागृतावस्थेतील जीवनाचा विचार अशक्य आहे.
- अवधानामुळे कार्य करण्याची सज्जता निर्माण होते.
- अवधान ही निवडपूर्ण प्रक्रिया आहे.
- अवधान म्हणजे जागृतावस्था नसून ती जागृतावस्थेचा भूतकाळ आहे.

५.३.३ अवधानाची वैशिष्ट्ये -

- अवधान नेहमी बदलते असते
- अवधान नेहमी आपल्या अनुभवाचा सक्रिय केंद्रबिंदू असते.
- अवधान निवडपूर्ण आहे.
- अवधान सातत्यपूर्ण असते.
- अवधान वस्तूबद्दलची स्पष्टता वाढवते.
- अवधान अदृश्य असते.
- वस्तूंमधील परस्परसंबंधावर अवधानाचा मर्यादा अवलंबून असतात.

५.३.४ अवधानाचे प्रकार -



अनुकुलन कशाप्रकारे घडते ह्याच्या अध्ययनासाठी मनोव्यापाराशी संबंधित अवधानाचे चारही प्रकार माहित असणे आवश्यक आहे.

१) अभ्यस्त अवधान (टिकून राहणारे अवधान) : एखाद्याने अवधान वेधून घेणे हे बऱ्यापैकी सोपे आहे. परंतु विशिष्ठ वेळेसाठी अवधान केंद्रित करणे हे नक्कीच एक आव्हान आहे. एखादी व्यक्ति वारंवार तीच कृती करत असली तरी फार मोठ्या काळाकरिता एकाग्र होण्याची क्षमता म्हणजे अभ्यस्त अवधान होय. अशा प्रकारच्या अवधानाचा उपयोग बऱ्याच प्रकारच्या अध्ययनात केला जातो. तसेच काही कार्यात्मक कृती / उपक्रम सुद्धा केला जातो. उदा. संपूर्ण तासभर शिक्षकांच्या व्याख्यानाचे श्रवण करणे, पुर्नलोकनासाठी रात्रभर पुस्तके किंवा टिपणे वाचणे, सरावासाठी किंवा परीक्षेसाठीच्या प्रश्नांची उत्तरे शोधणे, प्रदीर्घ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, कामाची पुनरावृत्ती करण्यासाठी या अवधानाचा उपयोग होतो. या अवधानाचा खूप फायदा होऊ शकतो परंतू हे अवधान साध्य करणे कठीण आहे.

२) निवडपूर्ण अवधान : अनेक घटकांमधून एखादा घटक निवडण्यासाठी आणि मेंदुने निवडलेल्या किंवा तुम्ही प्राधान्य दिलेल्या कोणत्याही एकाच घटकावर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता म्हणजे निवडपूर्ण अवधान होय. हे अवधान साध्य करणे फार अवघड नाही, तसेच फार सोपे देखील नाही. जवळजवळ प्रत्येक क्षणी माणसे बोधात्मक (विशिष्ट) क्षमतेचा वापर करतात. दररोज, घरी, कार्यालयात, शाळेत, प्रवासात मानवाचा विविध प्रकारच्या वातावरणाशी संबंध येतो परंतू सर्व घटकांना त्याचा मेंदू प्रतिसाद देत नाही. तो एका विशिष्ट घटकावरच लक्ष केंद्रित करतो.

३) पर्यायी अवधान - अवधानाचा पुढचा प्रकार म्हणजे पर्यायी अवधान होय. याच्या नावाप्रमाणेच ही एक अशी क्षमता आहे की ज्यामध्ये व्यक्ति त्वरीत एका कामातून दुसऱ्या कामात लक्ष केंद्रित करते. मेंदू सुद्धा एखादे काम करीत असताना त्या कृति मध्ये क्रमाने येणारे ज्ञान, आकलन यांच्या विविध पातळ्यानुसार गरजांप्रमाणे तात्काळ जुळवून घेतो. निवडपूर्ण अवधानाप्रमाणेच पर्यायी अवधान ही क्षमता जवळजवळ प्रत्येक समयी उपयोगात येते. तुमच्या कार्यात तुम्हाला प्रत्येक दिवशी अचानक बदल करावे लागतात. अशा वेळेस व्यक्ति तात्काळ आपले काम सोडून पर्यायी बाबींकडे कामाकडे लक्ष देतो. हेच पर्यायी अवधान आहे.

४) विभाजित अवधान - अवधानाचा शेवटचा प्रकार हा ज्ञाना संदर्भातील आहे, तो म्हणजे विभाजित अवधान. व्यक्तिची एकाच वेळी दोन किंवा अधिक कामांवर लक्ष केंद्रित करण्याच्या क्षमतेला विभाजित अवधान असे म्हणतात. तज्ज्ञ व्यक्ती या क्षमतेच Multitasking (बहु

कार्यतत्पर) असे म्हणतात. ज्या व्याक्तिंना या क्षमतेचे वरदान आहे त्या व्यक्ती जीवनात फार यशस्वी होतात, पुढे जातात. सर्वच व्यक्तिंना हे कौशल्य आत्मसात करणे हे अवघड आहे. सरावाद्वारे विभाजित अवधान क्षमता साध्य करता येते.

५.३.५ अवधानाचे शैक्षणिक उपयोजन -

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत अवधान महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. अवधानाशिवाय अध्ययन परिणामकारक होऊ शकत नाही. चांगल्या आकलनासाठी अवधानाचे सहाय्य बालकास होते. ह्या कौशल्याचे अध्ययन करणे अत्यावश्यक आहे. खूप चांगल्या पद्धतीने अवधान दिलेले पाठ अधिक काळ स्मरणात राहतात आणि म्हणूनच अवधानाचे अध्ययन हे महत्त्वपूर्ण आहे.

अवधानाचे शैक्षणिक उपयोजन पुढीलप्रमाणे -

१) अध्ययन अध्यापन परिस्थितीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रित करण्याचा प्रयत्न करावा.
२) अध्यापनाच्या वेळी शिक्षकांनी अनुकुल वातावरण निर्मिती करावी.
३) अध्ययन वातावरण हे अवधान विचलित करणाऱ्या घटकांपासून दूर ठेवावे.
४) अवधान केंद्रीकरणाची शिक्षकाने विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रोत्साहन द्यावे.
५) आकृती आणि चित्रांचा वापर आवश्यक समयी करावा.
६) दृक श्राव्य साधनांचा वापर योग्यरित्या करावा.
७) शिक्षकांनी अध्यापन करताना हावभाव, कृती, शारीरिक हालचाल आणि दिग्दर्शन इत्यादी बाबींचा वापर करावा.
८) अध्ययन अध्यापन उपक्रमांमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागास उद्युक्त करावे.
९) शिक्षकाचे वर्तन आणि शिक्षेची भिती टाळावी.
१०)वर्गातील सर्व विद्यार्थ्यांप्रती शिक्षकाने नि:पक्षपाती असावे.

५.४ अध्ययनावर परिणाम करणारे घटक (प्रेरणा)

मानवाद्वारे केलेली कोणतीही क्रिया ही हेतुपुरस्कर असते. हा हेतू कृती करण्यास प्रेरक ठरतो. मानवाला त्याच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यास आणि

५.४.१ प्रेरणेचा अर्थ -

लॅटिन शब्द 'movere' याचा अर्थ म्हणजे पुढे जाणे, पुढे जाण्यास तयार असणे किंवा कृतीसाठी तत्पर असणे. वर्तनाला किंवा विशिष्ट प्रकारे कृती करण्यास हेतु चालना देतो. प्रतिसादास किंवा वर्तनास प्रेरणा नावाची आंतरीक शक्ति बळ देते. कोणत्याही कृतीत पुढाकार घेण्यास या आंतरिक शक्तिचा समावेश असतो. उदा. एखादा विद्यार्थी परिक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी अभ्यास करतो. चांगले गुण मिळवण्याचे ध्येय ठेवणे ही त्या विद्यार्थ्यासाठी प्रेरणा असते. तशाचप्रकारे पैसे कमवण्यासाठी एखादी व्यक्ति नोकरी मिळवण्यासाठी धडपड करते. येथे त्या व्यक्तिसाठी पैसे कमावण्याचे ध्येय ही त्याची प्रेरणा असते.

१) मन - "आंतरिक प्रवर्तक म्हणजे प्रेरणा होय."
२) गुथ्री - "प्रतिक्रियांमधील जोश किंवा आदेश बाळगणारी स्थिती म्हणजे प्रेरणा होय."

३) लिंडस्ले - "साध्य आठवण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या, विशिष्ट दिशेने वाटचाल करावी, त्यास लागणाऱ्या आणि वर्तनासाठी उत्साह टिकवून धरणाऱ्या शक्तिचे मिश्रण म्हणजे प्रेरणा होय."
४) गिलफोर्ड - कोणत्याही क्रियेला प्रारंभ करुन देणारी व ती क्रिया चालू ठेवण्यास प्रवृत्त करणारी आंतरीक शक्ति म्हणजे प्रेरणा होय.
५) कोम्बज आणि स्निग - स्वसंकल्पना राखणयासाठी आणि ती दृढ करण्यासाठी चाललेल्या निरंतर प्रयत्नांमुळे वर्तनाला मिळणारी चालना म्हणजे प्रेरणा .

- प्रेरणेमुळे व्यक्तिचे वर्तन स्पष्ट बनते.
- प्रेरणेवर शारीरिक, मानसिक तसेच बाह्य वातावरणाचा किंवा परिस्थितीचा परिणाम होतो.

अशाप्रकारे प्रेरणा ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया आहे जी व्यक्तिच्या आत घडत असते. व्यक्तिस काही विशिष्ट गरजांची कमतरता जाणवत असल्यामुळे तो त्या गरजांची पूर्ती करण्यासाठी अधिक काम करतो. अहमचे समाधान होण्याची गरज व्यक्तिला त्याच्या नेहमीपेक्षा जास्त चांगले काम करण्यास प्रेरणा मिळते.

५.४.२ प्रेरणेचे प्रकार :

प्रेरणा या प्रामुख्याने २ प्रकारात विभागल्या आहेत.



प्रेरणांचे २ प्रकार आहेत -

१) आंतरीक प्रेरणा
२) बाह्य प्रेरणा

आंतरिक प्रेरणा -

व्यक्तिची आंतरिक (आतील) शक्ति म्हणजे आंतरिक प्रेरणा. व्यक्ति आंतरिक शक्तिने काम करतो. दुसऱ्या शब्दात बाहेरुन असलेल्या चेतकावर हे अबलंबून नसते. आंतरीक प्रेरणा ही नैसर्गिक प्रवृत्ती असून आव्हाने स्विकारणे, त्यांचा सामना करणे, स्वतःच्या गरजांच्या अनुसार व्यक्ती क्षमतांचा वापर करीत असतो. सर्व व्यक्ती बऱ्याच वेळा आंतरीक शक्ती, अंतःप्रेरणेने प्रेरीत होतात व एखादे कार्य तडीस नेतात. या प्रेरणेचा प्रकारात व्यक्तीस बक्षिसे, प्रलोभन म्हणजेच बाह्य चेतकाची गरज नसते. आंतरिक प्रेरेणेने प्रेरीत झालेले विद्यार्थी आपले ध्येय साध्य करण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न करतात. यामुळे विद्यार्थी चांगले यश संपादन करतात.

बाह्य प्रेरणा -

आंतरिक प्रेरणेच्या विरुद्ध म्हणजेच बाह्य प्रेरणा होय. व्यक्तिंना प्रेरणा देण्यासाठी याचा उपयोग केला जातो. जेव्हा आंतरिक प्रेरणेद्वारे अपेक्षित फलनिष्पत्ती प्राप्त होत नाही तेव्हा बाह्य प्रेरणेचा वापर केला जातो. सर्वसाधारणपणे बाह्य प्रेरणा म्हणजे पारितोषिके - प्रलोभने (Incentive), पगाराची वाढ, बढती आणि शिक्षा होय.

वरील व्याख्यांनुसार खालील निष्कर्ष (अनुमान) काढता येईल. बाह्य प्रेरणेचा तात्कालिक आणि शक्तिशाली परिणाम होऊ शकतो परंतु तो परिणाम फार काळासाठी लागू पडेल असे सांगता येत नाही. आंतरिक प्रेरणादायी लोक कि जे 'गुणवत्तापूर्ण कार्यासाठी' सतत काळजीत असतात त्यांना आंतरिक प्रेरणेचे परिणाम दिर्घ काळासाठी दिसतात. कारण ते व्यक्तिमध्ये आणि त्यांच्या कामात मूलतः (अनुवांशिक) असतात. कोणतेही बाह्य घटक त्यांच्यावर लादले जात नाहीत.

५.४.३ मास्लोची गजरांची श्रेणीबद्ध उपपत्ती :

मास्लोची प्रेरणा वर्चस्व श्रेणी म्हणजे काय ?

व्यक्तीला काय प्रेरीत करते, त्यांचे कार्य चांगले करण्यासाठी त्यांना काय प्रेरीत करते आणि त्यांना अधिक चांगले काम करण्यासाठी कसे प्रोत्साहन देता येईल. ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी १९४३ मध्ये अब्राहम मास्लो या मानवतावादी मानसशास्त्रज्ञाने गरजांचे श्रेणीबद्ध प्रतिमान विकसित केले, अब्राहम मास्लो यांची गरजांची श्रेणी ही मानसशास्त्रातील प्रेरणेची उपपत्ती असून यात पाच मानवी गरजांच्या पाच स्तर प्रतिमानाचा समावेश होतो.

मास्लो यांनी मानवी गरजांचे ५ समूहात वर्गीकरण केले आहे.

१) शारीरिक गरजा -

मानवाच्या जगण्यासाठी ह्या जैविक घटकाची अत्यंत आवश्यकता असते. शारीरिक गरजांची उदाहरणे अन्न, पाणी, हवा, ऊब, निवारा, झोप आणि कामवासनेची तृप्ती. जर ह्या गरजांची पूर्तता झाली नाही तर मानवी शरीर पूर्ण क्षमतेने कार्य करु शकणार नाही. जोपर्यंत (शारीरिक) ह्या गरजा पूर्ण भागवल्या जात नाहीत तोपर्यंत इतर गरजा दुय्यम आहेत. म्हणुनच मास्लोने शारीरिक गरजांना महत्त्वाच स्थान दिले आहे.

२) सुरक्षिततेच्या गरजा -

जस जसे आपण मास्लो यांच्या गरजांच्या श्रेणीमध्ये दुसऱ्या पायरीवर पोहचतो तेव्हा आपल्या गरजा थोड्या अधिक जटील होत जातात. या स्तरावर सुरक्षितताविषयक गरजा प्राथमिक ठरतात. काही मूलभूत सुरक्षिताविषयक गरजांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो. उदा. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य विषयक सुरक्षितता, अपघात आणि इजांपासूनची सुरक्षितता.

३) सामाजिक गरजा (प्रेम आणि आपुलकीचा गरजा) :

शारीरिक आणि सामाजिक गरजांच्या पूर्तीनंतर, मानवाच्या गरजांच्या तिसरा स्तर म्हणजे सामाजिक गरजा होय. सामाजिक गरजांमध्ये प्रेम, जिव्हाळा, आपलेपणा व मान्यता यांचा समावेश होतो. या स्तरावर भावनिक संबंध मानवी वर्तनास दिशा देतात. या गरजा पूर्ण करण्याची काही उदा. मैत्री, जवळीक, विश्वासार्हता आणि मान्यता प्रेम आणि जिव्हाळा गटाचा एक भाग (कुटुंब, मित्र व कार्यस्थळीचा एक समूह म्हणून असलेला) आणि संलग्नता असते.

४) आत्मसन्मान -

मास्लोच्या वर्चस्व श्रेणी मधील चौथा स्तर म्हणजे रसग्रहण आणि आदराप्रती असलेल्या गरजा. जेव्हा श्रेणीमधील खालच्या तीन स्तरावरील गरजांची पूर्ती होते तेव्हा आत्मसन्माना संबंधित गरजा वर्तनाला प्रेरणा देण्यास महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात.

मास्लोने या गरजांचे २ विभागात वर्गीकरण केले आहे.

१) स्वत:साठीच्या गरजा (मोठेपणा, संपादन, प्रभुत्व, स्वातंत्र्य)

२) इतरांकडून आदर किंवा प्रतिष्ठेची इच्छा (उदा. प्रतिष्ठा, पत)

५) आत्मप्रचितीची गरजा :

मास्लोच्या वर्चस्व श्रेणीमध्ये सर्वात वर (शिखरावर) आत्मप्रचितीच्या गरजा आहेत. यामध्ये व्यक्ति आपल्यामधील सर्व क्षमतांचा विकास करतो आणि स्व परिपूर्णतेने या गरजा साध्य होतात. याचाच अर्थ स्व वैयक्तिक वाढ आणि वैयक्तिक क्षमता ही त्याची उदाहरणे सांगता येतील.



मास्लोच्या उपपत्तीनुसार, गरजांची एक वर्चस्व श्रेणी आहे. जर एखाद्या व्यक्तिच्या खालच्या गरजा पूर्ण झाल्या नाहीत तर व्यक्ति उच्च स्तरीय गरजा पूर्ण करण्याऐवजी प्रथम गरजांची पूर्ती करण्याचा प्रयत्न करेल. जेव्हा प्राथमिक (खालच्या) व्यक्तिच्या न्यूनतम गरजा पूर्ण होतील तेव्हा व्यक्ति आपले वर्तन गरजांच्या दुसऱ्या स्तरावर केंद्रित करेल.

५.४.४ प्रेरणेचे शैक्षणिक उपयोजन :

१) शिक्षकाने विशिष्ट अध्यापन वर्तनाचा उपयोग करावयास पाहिजे :

अध्ययनकर्त्याची प्रेरणा वाढविण्यासाठी खालील वैशिष्ट्यांचा शिक्षकाने वापर करावा. (पांडे १९८३)

अ) परिस्थितीच्या मागणीनुसार लवचिकपणे वागण्याची इच्छाशक्ति

ब) विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून जगाचा अवबोध करण्याची क्षमता

क) रसग्रहणात्मक वृत्तीवर (दृष्टिकोनावर) चिंतन करण्याची क्षमता

ड) प्रश्न विचारणा कौशल्य

इ) विषय ज्ञान आणि संबंधित क्षेत्राविषयीचे ज्ञान

२) अध्ययनकर्त्याची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन शिक्षकाने प्रेरक घटकांचा क्रमाने वापर करावा -

अध्ययन कर्त्याच्या गरजा लक्षात घेऊन अध्ययन अध्यापन अनुभवांची मांडणी क्रमाने करावी. उदा. अध्ययनकर्त्याचे व्यक्तिमत्व, व्यक्तिभेद लक्षात घेऊन अध्ययनकर्त्याचे व्यक्तिमत्व आकारात घेण्यास विविध तंत्रे आणि पद्धतींचा प्रेरक घटक म्हणून वापर करावा.

३) प्रेरणेसाठी प्रोत्साहना चा उपयोग -

माणसाची काम करण्याची क्षमता बदलता येते. उदा. मानवाने केलेल्या प्रयत्नांचा स्तर वाढवता येतो किंवा कमी देखील करता येतो.

वेगवेगळ्या रूपात (प्रकारे) आणि आकारात देता येतात उदा. जैविक सामाजिक किंवा आदर्शवादी, सामाजिक इत्यादी.

काही प्रोत्साहने खालीलप्रमाणे सांगता येतील.

अ) प्रशंसा आणि निंदा एक प्रलोभन तंत्र
ब) पारितोषिक आणि शिक्षेचा न्यायपूर्ण वापर
क) प्रतिस्पर्धेच्या स्वरूपात स्पर्धा
ड) शैक्षणिक संस्थांमधील सह-शिक्षण

४) विद्यार्थ्यांना यशस्वी अनुभव पुरवणे -

यशस्वी अनुभव हा एक प्रकारचा प्रेरणेचा घटक आहे. ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक यशाचा इतिहास आहे. त्या विद्यार्थ्यांना अधिक यश प्राप्त करण्यास हे प्रेरक ठरते. विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रवासात त्यांचा अनुभाव घेण्यातील सहभाग अधिक यश मिळवण्यात प्रेरक बनतो.

५) अहमचा समावेश -

१९६४ मध्ये शेरीफ आणि कँटरिल यांनी दिलेल्या प्रेरणेच्या अहम समावेशन उपपत्तीनुसार, अहम हे नक्षत्रची वृत्ती आहे. मानवी वर्तनाला अहम समावेश प्रेरक ठरतो. विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना शिक्षकाने खालील गोष्टींची काळजी घ्यावी.

१) घटकाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांच्या कल्पना आदराने ऐकून घ्याव्यात व अध्यापनाच्या वेळी विद्यार्थ्यांच्या कल्पनांचा समावेश करावा.
२) शिक्षकाचे वर्तन हे प्रेमळ आणि विद्यार्थ्यांना स्विकारणारे असावे.
३) विद्यार्थ्यांचे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्याच्या उद्देशाने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वागवावे.
४) विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचे ध्येय ठेवून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वागणूक द्यावी.

६) सहकार्यात्मक वर्ग वातावरणाची तरतूद -

वर्गामध्ये योग्य सामाजिक आणि भौतिक वातावरण निर्माण करुन शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्याच्या आत्मप्रचिती गरजा पूर्ण करण्यास विद्यार्थ्यांना सहाय्य करावे.

७) अनुदेशनात्मक कार्यपद्धती आणि शैक्षणिक साधनांचा परिणामकारक वापर -

योग्य अनुदेशनात्मक कार्यपद्धती आणि शैक्षणिक साधनांद्वारे विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन अनुभवांमध्ये सामिल करुन विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण कराव्यात.

८) अभ्यासक्रमाचा प्रेरक शक्यतांचा वापर करुन त्या ओळखणे -

विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षकाने खालील अध्ययन अध्यापन अनुभवांचा आराखडा निश्चित करावा.

अ) शिक्षकांनी आशयाचा सहसंबंध दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांशी (जोडणे आवश्यक आहे) जोडावा.

ब) प्रेरणा आणि अध्ययनाचा विकसनात विषयज्ञाना संदर्भात मानसशास्त्रीय शक्यता शोधणे.

क) नविन ज्ञानाची पूर्वज्ञानाशी जोडणी करणे आवश्यक आहे.

५.५ गोषवारा

५.६ प्रकरण सराव

५.७ संदर्भसूची

www.adhd-app.com/2013/02/06/understanding- the walia J.S( ) Educational Psychology
शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र

❖❖❖❖

६

अध्यापनाची संकल्पना

घटक संरचना :

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ अध्यापनाची संकल्पना आणि व्याख्या
६.३ अध्यापनाची वैशिष्ट्ये आणि कार्य
६.४ भारतीय परीवेषात अध्यापनाची बदलती संकल्पना
६.५ वर्ग अध्यापनाचे उपागम
६.५.१ विद्यार्थी केंद्रित
६.५.२ शिक्षक केंद्रित
६.६ सारांश
६.७ सराव
६.८ संदर्भग्रंथ

६.० उद्दिष्ट्ये

या घटकाचे वाचन केल्यानंतर आपणास -

- अध्यापनाची संकल्पना स्पष्ट करता येईल.
- अध्यापनाची वैशिष्ट्ये आणि गरज यांची चर्चा कराल.
- अध्यापनाची व्याप्ती वर्णन करता येईल.
- वर्ग अध्यापनाच्या उपगामांचे विश्लेषण कराल.

६.१ प्रस्तावना

मागील घटकात आपण अध्ययनाची संकल्पना आणि अध्ययनावर परिणाम करणारे घटक यांचा अभ्यास केला. यात अवधान आणि प्रेरणा हे महत्त्वपूर्ण घटक पाहिले. आता या घटकात अध्यापनाची संकल्पना अभ्यासणार आहेत. अध्ययन आणि अध्यापन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

त्याचप्रमाणे अध्यापन आणि शिक्षक या सुद्धा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जेव्हा आपण अध्यापन हा शब्द ऐकतो त्या बरोबर तात्काळ आपणास शिक्षक हा शब्द आठवतो. आपण

नेहमीच असे मानत असतो की शिक्षक हे उत्कृष्टच अध्यापन करतात. अध्ययन आणि अध्यापनाचा विद्यार्थ्यांना आनंद घेता आला पाहिजे, शिक्षकाचे अध्यापन विद्यार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहित करीत असते. ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षक सतत प्रामाणिक प्रयत्न करत असतात. शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांचे नेतृत्व करतात व विद्यार्थ्यांना अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेतात. शिक्षक आपल्या अध्यापनाद्वारे शाळेतच नाही तर, महाविद्यालय, कुटुंब, समाज आणि राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. शिक्षक देशाच्या नियतीचे संगोपन / उभारणी करत असतात. शिक्षक विद्यार्थ्यांना बालवाडी पासून ते उच्च शिक्षणापर्यंत अध्यापन करीत असतात.

डॉ. झाकीर हुसेन यांच्या शब्दात "शिक्षक हा आपल्या भविष्याचा रचनाकार असतो." शिक्षण क्षेत्रात अध्ययन-अध्यापन प्रक्रियेस महत्त्वपूर्ण स्थान आहे. शिक्षण प्रक्रियेत अध्यापन आणि अध्ययन हे दोन मूलभूत घटक आहेत. ते एकमेकांशी निगडीत आहेत. जेथे अध्यापन असते ते अध्ययन हे घडतेच.

६.२ अध्यापनाची संकल्पना आणि व्याख्या

अध्यापनाची पारंपारिक संकल्पना :

पारंपारिक वर्ग अध्यापनात शिक्षक विद्यार्थ्यांना विषयाची माहिती देत असत किंवा एखादा विद्यार्थी पुस्तक वाचत असे तर इतर विद्यार्थी स्वतःच्या पुस्तकात पाहून वाचणाऱ्या विद्यार्थ्याचे अनुसरुन पुस्तक पाहतात. वर्गात विद्यार्थ्यांना अनुदेशन / माहिती देण्याची कला म्हणजे अध्यापन होय. आधुनिक शिक्षण तज्ज्ञांना अध्यापनाची ही संकल्पना मान्य नाही. फक्त माहिती सांगणे, अनुदेशन करणे किंवा ज्ञान देणे म्हणजे अध्यापन नाही, तर अध्यापन करताना पाठ्यांशाबरोबरच विद्यार्थ्याचा सुद्धा विचार करणे गरजेचे असते.

अध्यापनाची आधुनिक संकल्पना :

विद्यार्थ्यांस इच्छित ज्ञान कौशल्ये प्राप्त करणे आणि व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी अध्यापन प्रक्रिया मार्ग दाखविने.

अध्यापन विद्यार्थ्यास व्यक्तीमत्व विकासाबरोबरच समाजात जीवन जगण्याच्या मार्गाचे ज्ञान देते. ही एक सुव्यवस्थित व मानसशास्त्रीय प्रक्रिया असून यामध्ये विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, अभ्यासक्रम आणि इतर घटकांचे संघटन केले जाते.

शिक्षणाच्या अध्यापन तज्ज्ञांनी केलेल्या काही व्याख्या आपण पाहूया,

अध्यापनाच्या व्याख्या :

१) **एडमन यांचा विचार -** अध्यापन ही आंतरक्रियात्मक प्रक्रिया असून यामध्ये प्रामुख्याने शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये विशिष्ट कृतीसंदर्भात वर्गात बोलणे होते.

२) **थॉमसन एफ. ग्रीन -** अध्यापन हे शिक्षकाचे कार्य असून बालकाच्या विकासासाठी केले जाते.

३) **जे. वेल्टन -** बालक ज्ञानात्मक दृष्ट्या सद्यस्थितीत कोठे आहे व त्यास कुठपर्यंत घेऊन जावयाचे आहे या दोन मुख्य घटकांचा समावेश चांगल्या अध्यापनात होतो, हे जाणून घेणे म्हणजेच अध्यापन होय.

४) **स्मिथ -** अध्यापन ही अध्ययन होण्यासाठी पद्धतशीरपणे केलेली क्रिया होय.

५) **बर्टन -** अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी बालकास उत्तेजित करणे, मार्गदर्शन, दिशा आणि प्रेरणा देणे होय.

६) **क्लार्क -** बालकाच्या व्यक्तीमत्वात बदल करण्यासाठी निर्मित केलेली कृती म्हणजेच अध्यापन होय.

अध्यापनाच्या व्याख्यांचे विश्लेषण -

अध्यापन म्हणजे अशी हमी की ज्यामध्ये काही नैतिक कार्य किंवा कृतींचा समावेश होतो. ज्याचा मुख्य उद्देश हा अध्ययन घडून आणणे आहे. अध्यापनाच्या व्याख्यांचे विश्लेषण केले असता आपल्याला असे लक्षात येते की -

- अध्यापन ही क्रियांची प्रणाली आहे.
- अध्यापन ही ध्येयदिग्दर्शित क्रिया आहे.
- अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये नियंत्रित व अनियंत्रित घटकांचा समावेश होतो.

व्याख्यांच्या विश्लेषणाच्या आधारे शिक्षकाने अध्यापनाचे खालील महत्त्व जाणून घेणे अपेक्षित आहे.

१) अध्यापन कुणी करावे?

शिक्षकाने अध्यापन करावे. त्याने अध्यापनाचे चांगले प्रतिमान सादर करावे.

२) अध्यापन कुणाला करावे?

अध्यापन बालकास करावे. अध्यापन करताना बालकाच्या क्षमता, आवड यांची काळजी घेतली जावी. तसेच तो कृतीशील राहील याकडे लक्ष द्यावे.

३) अध्यापन का करावे?

अध्यापन म्हणजे माहितीचा साठा करणे असे नव्हे, तर बालकाच्या विविधांगाने विकास करणे हे होय.

४) काय शिकवावे?

अध्ययनकर्त्याला अपेक्षित असे ज्ञान, कौशल्य आणि अभिवृत्ती हे प्राप्त करण्यासाठी विविध अनुभव आणि कृती यांचा समावेश होतो.

५) अध्यापन कसे करावे?

अध्यापन करताना शिक्षकाने विविध अनुभवांबरोबरच अध्यापन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा.

६) अध्यापन केव्हा करावे?

विद्यार्थ्यास अध्ययन करण्याची प्रेरणा विकसित होईल अशाप्रकारे अध्यापन करावे.

७) अध्यापन कोठे करावे?

वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यशाळा, क्रिडांगण इत्यादी ठिकाणी अध्यापन करता येऊ शकते. अध्यापनाची कृती व द्यावयाचा अनुभव यावर वरील ठिकाणांचे महत्त्व अवलंबून आहे.

आपली प्रगती तपासा :

१) अध्यापनाची संकल्पना स्पष्ट करा.

२) अध्यापनाच्या व्याख्यांचे वर्णन करा.

३) अध्यापनाच्या व्याख्यांचे विश्लेषण करा.

६.३ अध्यापनाची वैशिष्ट्ये आणि कार्य

आपणास आता अध्यापनाच्या संकल्पना आणि व्याख्या यांची जाणीव आलेली आहे. तसेच तुम्ही अध्यापनाच्या व्याख्यांच्या विश्लेषणाचा अभ्यास केला आहे. तर आता आपण अध्यापनाची वैशिष्ट्ये आणि कार्ये पाहूया.

अध्यापनाची वैशिष्ट्ये :

१. अध्यापन ही आंतरक्रियात्मक प्रक्रिया आहे. म्हणजेच यामध्ये शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये आंतरक्रिया घडून येतात.

२. अध्यापन ही त्रिध्रुवीय प्रक्रिया आहे. यामध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि अभ्यासक्रम व सुव्यवस्थित पर्यावरणाचा समावेश होतो.

३. अध्यापन हे औपचारिक आणि अनौपचारिक असे दोन्ही असते. वर्गामध्ये आणि वर्गाबाहेर असे दोन्ही ठिकाणी अध्यापन होते.

४. अध्यापन ही कला त्याबरोबर विज्ञान सुद्धा आहे.

५. अध्यापन हे जाणीवपूर्वक तसेच नकळत सुद्धा होत असते.

६. अध्यापनात अध्ययनासाठी प्रोत्साहन, सादरीकरण आणि संतुलन केले जाते.

७. प्रत्याभरण तंत्राद्वारे अध्यापनात सुधारणा करता येते.

८. वेळ आणि जागा यासंदर्भात अध्यापन ही गतीशील प्रक्रिया आहे.

९. अध्यापन हे सामाजिक पर्यावरणात आकार घेत असते.

१०. अध्यापन हे ध्येयाधिष्ठित असते.

११. अध्यापनावर चांगले संज्ञापन कौशल्य वर्चस्व गाजवते.

१२. निरीक्षण तंत्राद्वारे अध्यापनाचे मापन व त्यात वाढ करता येते.

१३. अध्यापन ही बोलणे / सांगणे / दाखविणे / कृती करणे अशी क्रिया आहे.

१४. अध्यापन समोरासमोर घडून येते.

१५. शिक्षकाच्या वर्तनाद्वारे अध्यापनाचे निरीक्षण करता येते.

१६. अध्यापन हा विद्यार्थ्यांसाठी उपचार आहे.

१७. अध्यापन बालकास अध्ययनासाठी उत्तेजित करते.

१८. आपल्या पर्यावरणास प्रतिसाद देण्यासाठी अध्यापन मदत करते.

१९. अध्यापन म्हणजे बालकास मार्गदर्शन करणे होय.

२०. बालकाच्या भावनांना प्रशिक्षण देणे म्हणजेच अध्यापन होय.

२१. अध्यापन बालकास सुविधा पुरविते.

२२. वैज्ञानिक, निरिक्षण, आणि विश्लेषणासाठी अध्यापन ही हेतूपूर्वक कृती असते.

२३. अध्यापनाचे विश्लेषण खालील मार्गाने करता येते.

अ) शिक्षक कृती

ब) शैक्षणिक उद्दिष्ट्ये

क) अध्ययन परिस्थिती आणि रचना

ड) अध्ययनाचे घटक

इ) विद्यार्थी कृती

२४. अध्यापन विद्यार्थी, शिक्षक आणि विषयाचा आशय यामध्ये संबंध प्रस्थापित करते.

२५. अध्यापन हे निदानात्मक आणि उपचारात्मक असते.

२६. अध्यापन हे सर्जनशील आणि मनोरंजानत्मक असते.

२७. अध्यापन हे लोकशाहीयुक्त असते.

२८. अध्यापन ही नियोजीत आणि पद्धतशीर प्रक्रिया आहे.

अध्यापनाची कार्य :

प्राध्यापक एस्.एस्. चव्हाण यांनी शिक्षणाची खालील कार्ये दिली आहेत.

१) आशयाची माहिती आणि स्पष्टीकरण देणे -

- चांगल्या शिक्षकाकडून अध्यापन करताना योग्य असा आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची अपेक्षा केली जाते.
- आरंभ करणे, दिशा देणे आणि प्रशासन करणे.
- अध्यापन हे आरंभ, संघटन, दिशा आणि निर्णयक्षमता यांच्याशी संबंधित आहे.
- शिक्षक हा अध्यापनाशी नेतृत्व करत असून त्यासाठी विविध कृतींचे संघटन करत असतो.

२) गटास एकसंघ ठेवणे -

- गटाचा विकास आणि गटात चैतन्य निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकाची असते.
- गटासाठी समान हेतू आणि घटक यांचा शोध घेणे.

३) सुरक्षाप्रधान करणे -

- शिक्षकांनी बालकांच्या गरजा शोधल्या पाहिजेत. एकटेपणा, नकार, वेगळेपणा आणि आर्थिक असुरक्षितता यासाठी शिक्षकांनी संरक्षण दिले पाहिजे.

४) अभिवृत्ती, श्रद्धा आणि समस्या यांचे स्पष्टीकरण -

- शिक्षकाने विद्यार्थ्यांना तुलना करणे, निरीक्षण करणे, वर्गीकरण, अर्थनिर्वचन करणे हे करण्यासाठी संधी दिली पाहिजे आणि विद्यार्थ्यांना विश्लेषण, चिकित्सा आणि सारांश हे कसे करावे यासाठी सिद्ध केले पाहिजे.

५) अध्ययन समस्यांचे निदान करणे -

- विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षकांनी निदानात्मक प्रक्रिया केली पाहिजे.

६) अभ्यासक्रम साहित्य तयार करणे -

- विद्यार्थी आणि समाज यांच्या गरजांच्या अनुषंगाने शिक्षकाने अभ्यासक्रमात सुधारणा केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रमरचनेत सहभाग घेतला पाहिजे.

७) मुल्यमापन, नोंदी व रिपोर्टिंग करणे -

- वर्गातील विद्यार्थ्यांची प्रगती, परीक्षा आणि चाचणी यांद्वारे तपासली जाते. यात मुल्यमापन करणे, गुणांच्या नोंदी करणे व अहवाल दाखविणे याचा समावेश होतो.

८) सामाजिक कृती समृद्ध करणे -

- शाळा ही एक समाजाची छोटी प्रतिकृती आहे. शाळा आणि समाज यामध्ये सुसंवाद विकसित करण्यासाठी शाळा महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. शालेय जीवनाचा हा महत्त्वपूर्ण भाग आहे.

९) वर्गाचे आयोजन आणि संघटन -

- विविध कार्यानुसार वर्गाचे आयोजन करणे गरजेचे असते. यासाठी वर्गव्यवस्था लवचिक असणे गरजेचे आहे.

१०) सामाजिक कार्यात सहभाग -

- अध्ययन-अध्यापना व्यतिरिक्त शिक्षकाने सहली, क्षेत्रभेटी सामाजिक कार्यक्रम यांच्यात सहभाग घेतला पाहिजे.

११) व्यावसायिक कार्यात सहभाग -

- शिक्षकाने व्यावसायिक विकास होण्यासाठी चर्चासत्र, परिषद, संशोधने यात सहभाग घेतला पाहिजे. ज्यामुळे त्यांचे आपल्या विषयातले ज्ञान अद्ययावत होईल.
- आरंभ करणे, दिशा देणे आणि प्रशासन करणे.

आपली प्रगती तपासा :

१) अध्यापनाची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

२) अध्यापनाच्या कार्यांची चर्चा करा.

६.४ भारतीय परीवेषात अध्यापनाची बदलती संकल्पना

आता आपण अध्यापनाच्या बदलत्या संदर्भात भारताची स्थिती पाहूया.

भारतातील अध्ययन-अध्यापनाची प्रस्थापित, पारंपारिक परंपरा, नैसर्गिक शक्ती विपरित परिस्थितीत सुद्धा राखून ठेवलेली आहे.

स्वामी विवेकानंदांनी अध्यापनामध्ये शिक्षकाची भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, खरा शिक्षक हा असा असतो की जो तात्काल विद्यार्थ्यांच्या पातळीपर्यंत पोहोचतो.

अरबिंदो अध्यापनाचे वर्णन करताना म्हणतात, "कुणालाही शिकवता येत नाही हे अध्यापनाचे प्रथम तत्व आहे." शिक्षक हा अनुदेशक नसतो किंवा अध्ययन-अध्यापक प्रक्रियेचा मालकही नसतो. तर तो मदतकर्ता आणि मार्गदर्शक असतो. त्याचे कार्य सुचना करणे असून

एखादी गोष्ट विद्यार्थ्यांवर लादणे ही नाही. तो विद्यार्थ्यांच्या मनाला प्रशिक्षण देऊ शकत नाही, तर फक्त ज्ञान प्राप्त करण्यासाठी प्रेरणादायी साधन होऊ शकतो. ज्ञान कसे प्राप्त करावे ? यासाठी दिशा दाखवू शकतो. बालकाच्या सुप्त क्षमता या अंत:स्य आहेत आणि त्या बाहेर येऊ शकतात एवढेच तो सांगू शकतो. बालकास विविध प्रकारची मदत आणि मार्गदर्शन विकासासाठी आवश्यक असते.

चांगल्या अध्यापनाचे खालील मुद्दे आहेत.

१. चांगले अध्यापन व्यक्तीभिन्नता ओळखते.
२. चांगले अध्यापन अध्ययनास कारणीभूत ठरते.
३. चांगले अध्यापन हे दयाळूपूर्ण आणि सहानूभूतीशील असते.
४. चांगले अध्यापन कृती करण्यास संधी प्रदान करते.
५. चांगल्या अध्यापनात अध्ययनकर्त्याला मार्गदर्शन करणाच्या कौशल्यांचा समावेश होतो.
६. चांगले अध्यापन हे कोणत्याही पद्धतीशी बद्ध नसते.
७. चांगले अध्यापन शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये अंतर कमी करते.
८. चांगले अध्यापन बालकास त्याच्या पर्यावरणाशी समायोजन साधण्यास मदत करते.
९. चांगले अध्यापन प्रगतीशील असते.
१०. चांगल्या अध्यापनात निदानात्मक आणि उपचारात्मक कार्याचा समावेश होतो.
११. चांगले अध्यापन भावनिक स्थिरतेकडे जाते.
१२. चांगले अध्यापन सहकार्यात्मक असते.
१३. चांगल्या अध्यापनात योग्य नियोजनाचा समावेश होतो.
१४. चांगले अध्यापन अपेक्षित आणि निवडपूर्ण माहिती पुरविते.

चांगल्या अध्यापनाच्या बदलत्या संदर्भात भारताच्या स्थितीला खालील घटक कारणीभूत ठरतात.

१) राष्ट्रीय धोरणाचा प्रभाव -

शालेय शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ व प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण चांगल्या अध्यापनास कारणीभूत ठरते.

२) शिक्षणहक्क कायदा २००८ -

प्राथमिक शिक्षणाच्या विकासामध्ये स्वातंत्र्योत्तर काळामध्ये महत्त्वपूर्ण विकास झालेला आहे. वाढते खाजगीकरण आणि शालेय पद्धतीमधील भेदभाव, विकृतपणे शिक्षणाच्या दर्जावर परिणाम करीत आहे. शिक्षण हक्क कायद्यामुळे सर्व बालकांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

३) शिक्षकाची बदलती भूमिका -

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार शिक्षक हा विद्यार्थ्यांना अध्ययनकर्त्यांना सुविधा पुरविणारा असा आहे. तो विद्यार्थ्यांना ज्ञानाची रचना करण्यास मदत करतो. अभ्यासक्रम पार पाडत असताना शिक्षकाची भूमिका मुख्यत्वे करुन मध्यस्थ / उत्प्रेरकाची असते.

४) शिक्षक-शिक्षणातील आव्हाने -

शिक्षक-शिक्षणामध्ये पूर्णत्वाने आणि सर्वंकषपणे सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षक व्यवसायासाठी तयार करणे आणि सातत्यपूर्ण शिक्षकाचा व्यावसायिक विकास होण्यासाठी शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर मार्गदर्शन करणे, मदत करणे, सुधारणा करणे व रचना बदल करण्याची गरज आहे.

५) संशोधन-नवोपक्रम -

उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यासाठी नवोपक्रम तयार करणे, संशोधन करणे अशी क्षमता प्राप्त करण्याची संस्थांना गरज आहे. बरेच शिक्षक लघु आणि मोठे संशोधन प्रकल्प हाती घेत असतात. संशोधनासाठी मिळणाऱ्या अनुदानामुळे अध्यापनासंबंधित नाविन्यपूर्ण पद्धती निर्माण होतात.

६) समावेशक शिक्षक-प्रशिक्षक -

शाळांमध्ये अक्षम, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास बालकांना दूर ठेवणे प्रचलित होते. नवीन धोरणांनुसार समावेशक शिक्षणाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे सर्व प्रकारचे विद्यार्थी एकाच शाळेत अध्ययन व अध्यापन करु शकतात. सामाजिक हानी टाळण्यासाठी व सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन करण्यासाठी शिक्षकास विशिष्ट ज्ञान संपादित करुन तयार केले पाहिजे.

७) समानता आणि शाश्वत विकास -

सर्व समाज आणि समाजाच्या घटकांसाठी लिंगसमानता, शांतीचे मूल्य यांचा विकास होणे गरजेचे आहे. शाश्वत विकास व्हायचे असेल तर याचे शिक्षण दिले पाहिजे.

८) सामाजिक ज्ञानाची शिक्षणात भूमिका -

शालेय शिक्षणात प्राप्त केलेल्या विविध संकल्पनांचा विकास झाला पाहिजे त्याचबरोबर शालेय ज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनात उपयोजन करण्यासाठी सामाजिक ज्ञान आणि शाळा यांच्यात जोडणी दिली पाहिजे.

९) शाळेतील माहिती तंत्रज्ञान आणि ई-अध्ययन -

शालेय शिक्षणामध्ये माहितीयुक्त तंत्रज्ञानयुक्त अध्ययनास वाढती मागणी आहे. शाळांमध्ये ई-लर्निंग करण्याची अपेक्षा केली जाते. यासाठी शिक्षकांनी स्वत:स तंत्रस्नेही बनवून या क्षमतांची विकसन केले पाहिजे.

आपली प्रगती तपासा :

१) अध्यापनाच्या बदलत्या संदर्भात भारताची स्थिती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२) भारतीय स्थितीत चांगल्या अध्यापनाच्या संदर्भात बदलते घटक वर्णन करा.

६.५ वर्ग अध्यापनाचे उपागम - विद्यार्थी केंद्रित आणि शिक्षक केंद्रित

भारतीय परिस्थितीत अध्यापनाच्या संदर्भात बदलते स्वरूप आपण पाहिले. यात आपण वर्ग अध्यापनाचे उपागम अभ्यासणार आहोत. अध्यापनाचा पारंपारिक शिक्षक केंद्रित दृष्टिकोन बदलुन यात आता विद्यार्थ्यास महत्त्व प्राप्त झाले आहे.

तक्ता ६.१ शिक्षक केंद्रित विरुद्ध विद्यार्थी केंद्रित वर्ग

शिक्षक केंद्रित उपागम	विद्यार्थी केंद्रित उपागम
• शिक्षक केंद्र, स्थिर आराखडा	• विद्यार्थी केंद्र, लवचिक प्रक्रिया
• निर्णय आणि दिशा शिक्षकांद्वारे	• विद्यार्थ्यास स्वायतत्ता
• शिक्षकाद्वारे मार्गदर्शन आणि देखरेख	• शिक्षकाद्वारे सुविधा पाठिंबा आणि प्रोत्साहन दिले जाते.
• अध्ययनात निष्क्रिय सहभाग	• अध्ययनात कृतिशील सहभाग
• वर्गाच्या चार भींतीच्या आत अध्ययन	• विस्तृत सामाजिक संदर्भात वर्ग अध्ययन
• ज्ञान दिले जाते व ते निश्चित असते	• ज्ञान विकसन आणि निर्मिती

६.५.१ विद्यार्थी केंद्रित उपागम :

विद्यार्थी केंद्रित अध्यापनात शिक्षक हा सर्वेसर्वा असतो. शिक्षकच वर्गात अध्यापन करतो, पाठ तयार करतो आणि त्याच्या कृती निश्चित करुन आराखडा तयार करतो. शिक्षक स्वत: सर्व निर्णय घेतो आणि विद्यार्थ्यास मार्गदर्शन दिशा देतो. शिक्षक अध्ययन स्थितीनुसार वर्गावर देखरेख करतो. या सर्वांमुळे विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत निष्क्रीयपणे सहभागी होतो, यात विद्यार्थी आंतरक्रियेस वाव नसतो. विद्यार्थ्यांचे अध्ययन वर्गाच्या चारभींतीच्या आड होत असते. विद्यार्थ्यांना ज्ञान वर्गात दिले जाते. ज्ञानाचे, वर्गात प्राप्त केलेल्या माहितीचे वर्गात किंवा वर्गाबाहेर उपयोजन केले जात नाही. विद्यार्थ्यांना निश्चित स्वरूपाचे ज्ञान दिले जाते. विषयाचा आशय, विषय आणि शीस्त यावर लक्ष केंद्रित केले जाते. विद्यार्थ्यांना विविध संधी मिळत नाहीत. विचार प्रक्रिया ही एकमार्गी असते. आधुनिक जगात या प्रकारास मान्यता दिली जात नाही. कारण या प्रकारचे अध्यापन उपागम ध्येय साध्य करण्यात मदत करीत नाहीत. तसेच बालकाचा सर्वांगीण

विकास ही करू नाहीत. म्हणूनच आधुनिक जगात विद्यार्थी केंद्रित अध्यापनास महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे.

६.५.२ शिक्षक केंद्रित उपागम :

या उपागमात विद्यार्थी हा प्रमुख असल्याने हा विद्यार्थी केंद्रित उपागम आहे. या उपागमात विद्यार्थ्यांच्या गरजे अनुसार अध्यापन केले जाते. येथे विद्यार्थी हाच वर्ग अध्यापनाचा आत्मा असतो; सर्वकाही असतो याठिकाणी विद्यार्थ्यांची स्वायतत्ता महत्त्वपूर्ण असते. विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन होण्यासाठी शिक्षक प्रक्षेपणयंत्र (Projector), शैक्षणिक साधने, तंत्रविज्ञान यांचा वापर करतात. या वर्गात शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी-शिक्षक आंतरक्रिया महत्त्वपूर्ण असतात. विद्यार्थ्यांच्या कल्पना, विचार यांचा स्विकार केला जातो. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सर्व प्रकारची सुविधा, मदत आणि पाठिंबा दिला जातो. या उपागमात विद्यार्थ्यांना अध्ययन करण्याचे स्वातंत्र्य असते. यामुळे चांगले अध्ययन घडून येते. विद्यार्थी केंद्री अध्यापनामुळे विद्यार्थी अध्यापनात कृतीशील असतो. शिक्षकाचे ज्ञान देण्यापेक्षा विद्यार्थी स्वतः ज्ञानाचे विकसन व निर्मिती करतो. या उपागमात सहशालेय उपक्रम, अभ्यासपुरक कार्यक्रम शैक्षणिक कार्यक्रमांना महत्त्व दिले जाते. अध्यापन हे फक्त वर्गातच न होता भेटी, सहल, दिग्दर्शन, प्रकल्प कार्य, समाजसेवा, इ. माध्यमाद्वारे घडते. विद्यार्थ्यांना त्यांनी वर्गात व वर्गाबाहेर प्राप्त ज्ञानाचे उपयोजन करण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. येथे शिक्षक विद्यार्थ्यांना मित्र, मार्गदर्शकांची भूमिका निभावतात. या उपागमात विद्यार्थी बहुदिश विचार करतात. या उपागमामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना भरपूर संधी तर मिळतातच व सर्वांगिण विकास घडून येतो.

अध्यापनाची संरचना :

अध्यापनाच्या संरचनेत तिन मुख्य चलांचा समावेश होतो.

१) शिक्षक स्वाश्रयी चल (Independent)
२) विद्यार्थी आश्रयी चल (Dependent)
३) आशय आणि सादरीकरणाची कार्यनिती - मध्यस्थी चल (Intervening)



आकृती ६.२ अध्यापन संरचना

अध्यापनाचे टप्पे :

अध्यापन ही एक जटील क्रिया आहे. यासाठी पद्धतशीर नियोजनाची आवश्यकता असते. अध्यापन प्रक्रियेत विविध टप्यांचा उपयोग केला जातो. या प्रक्रियेत समाविष्ट असणाऱ्या विविध पायऱ्यांना अध्यापनाचे टप्पे म्हणतात.



आकृती ६.३ अध्यापनाचे तिन टप्पे

१) पूर्व कृती टप्पा (Pre-Active Stage) :

वर्ग अध्यापनापूर्वी, शिक्षक विविध प्रकारची पूर्व तयारी / कृती करीत असतो, यालाच पूर्व-कृती टप्पा म्हणतात. या कृतीमध्ये पाठ-नियोजन तयार करणे, शैक्षणिक साधन निर्मिती / शोध / निवड, घटकचाचणी अहवाल, वाचन कौशल्य, विद्यार्थ्यांचे अडथळा आणणारे वर्तन इ. या कृती शिक्षकास अध्यापनाचे कार्य करताना महत्त्वपूर्ण असतात.

यात खालील गोष्टींचा समावेश होतो -

- ध्येय निश्चित करणे
- आशयाच्या संदर्भाने निर्णय घेणे
- सादरीकरणासाठी योग्य साहित्य व मार्गाचा शोध
- योग्य कार्यनीती आणि अध्यापनाची तंत्रे ठरविणे
- विशिष्ट आशयधारकासाठी कार्यनिती विकसित करणे

२) आंतरक्रियात्मक टप्पा :

हा प्रत्यक्ष वर्ग अध्यापनाचा टप्पा आहे. ठरविलेले ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षक विविध कार्यनीतींचा वापर करतात. वर्ग अध्यापनात शिक्षकाचे वर्तन हे मोठ्या प्रमाणात उत्स्फुर्त असते कारण हे आंतरक्रियात्मक सत्र असते. या टप्प्यात शिक्षक प्रत्यक्ष अध्यापन करत असतो व त्याबरोबरच शीस्त राखणे व वर्गनियंत्रण सुद्धा करत असतो. विद्यार्थ्यांना आपल्या अध्यापनात गुंतवून ठेवण्यासाठी शिक्षक, स्पष्टीकरण, दिग्दर्शन, व्याख्या, तार्किक क्रिया करीत असतो.

आंतरक्रियात्मक पायरीवर शिक्षक -

- विद्यार्थ्यांना ओळखण्यासाठी वर्गाचा आकार जाणून घेतो.
- विद्यार्थ्यांच्या संपादणूकीचे निदान करतो.
- कृती किंवा संपादणूक यात
  - चेतकाची निवड व सादरीकरण
  - प्रबलणाचे प्रत्याभरण
  - अध्यापनासाठी कार्यनीतीचे विकसन यांचा समावेश होतो.

३) अंतिम कृती टप्पा (Post-Active Stage):

हा टप्पा मूल्यमापनाचा आहे. कार्यमानात अपेक्षित सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आवश्यक प्रत्याभरण दिले जाते. हे अध्यापन आणि अध्ययन या दोहोंसंबंधित असते. शिक्षकाला आपले अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी याचा उपयोग होतो, तसेच विद्यार्थ्यांस चांगल्याप्रकारे अध्ययन करण्यास सहाय्य करते. प्रत्याभरणामुळे शिक्षकाला समजते की आपण पुन्हा अध्यापन करावे की नवीन घटकाचे अध्यापन सुरु करावे.

अंतिक-कृती टप्प्यामध्ये खालील क्रिया होतात.

- ठरविलेल्या उद्दिष्टांची अनुकुलता तपासली जाते.
- पुर्नअध्यापन करावे की नवीन आशय शिकवावा हे ठरविले जाते.
- शैक्षणिक साहित्याची अनुकुलता तपासली जाते.
- वर्ग वातावरणाच्या प्रभावाचे मूल्यमापन केले जाते.

अध्यापनाचे तिनही टप्पे एकमेकांशी संबंधित आहेत. चांगला शिक्षक होण्यासाठी विविध अध्यापन कौशल्यांची आवश्यकता असते. अध्यापनात आंतरक्रियांचा समावेश होतो. शिक्षकाचे व्यक्तिमत्व, वृत्ती आणि आवड प्रभावी अध्यापनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात.

आपली प्रगती तपासा :

१) अध्यापनाचा शिक्षक केंद्री उपागम स्पष्ट करा.

२) अध्यापनाच्या विद्यार्थी केंद्रित उपागमाचे वर्णन करा.

३) अध्यापनाची संरचना व टप्पे याची चर्चा करा.

६.६ सारांश

- ✓ शिक्षक आणि अध्यापन हे शिक्षण पद्धतीचा कणा आहेत. अध्यापन / शिक्षक हा समाजावर प्रभाव टाकणारा एक महत्त्वपूर्ण व्यवसाय आहे. शिक्षक बालकाच्या जीवनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकू शकतो. शिक्षकाचे ज्ञान, कौशल्य, वर्तन, मूल्य, संबंध प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकीत असते.
- ✓ अध्यापनात विविध कृतींचा समावेश होतो. चांगले संज्ञापन कौशल्य अध्यापन प्रभावित करीत असते. शिक्षणाचे मुख्य कार्य बालकास ज्ञान संपन्न करणे, तसेच विद्यार्थ्यांपर्यंत स्पष्टीकरणाद्वारे आशय व माहिती पोहचविणे हे असते.
- ✓ कोणताही चांगला शिक्षक एखाद्या अध्यापन पद्धतीशी बद्ध नसतो. शाळेतील चांगले वातावरण, शाळेचा चांगला विकास आणि शिक्षकाची तज्ज्ञता यामुळे चांगले अध्यापन होते.
- ✓ अध्यापनाच्या शिक्षककेंद्री उपागमापेक्षा विद्यार्थी केंद्रित उपागम विद्यार्थ्यास बहुमार्गी विचार करण्याची संधी देतो, शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया वाढवून, विद्यार्थी विचार कृती, यांना स्वीकृती देतो.
- ✓ अध्यापनाचे एकूण तिन टप्पे आहेत. यात पूर्व-कृती टप्पा, आंतरक्रियात्मक टप्पा, आणि अंतिम कृती टप्पा प्रभावी अध्यापन हे अध्यापन कौशल्य आंतरक्रिया, मूल्य, वृत्ती, आवड आणि शिक्षक व्यक्तिमत्त्व यांच्या सहाय्याने होत असते.

६.७ सराव

प्र. १ योग्य उत्तर निवडा

१) चांगले अध्यापन अध्ययनास ————————– करते.
अ) परावृत्त ब) निशिध क) सुविधा ड) निर्मिती

२) शाळा ही ———————— ची छोटी प्रतिकृती आहे.
अ) देश ब) समाज क) संस्कृती ड) धर्म

३) ————— आणि ——————- हे अध्यापनाचे दोन उपागम आहेत.
अ) शिक्षक केंद्री विद्यार्थी केंद्री ब) मुक्त वर्ग बद्ध वर्ग
क) अध्यापन, अध्ययन ड) व्याख्यान, शैक्षणिक सिनेमा

४) अध्यापनाचा विद्यार्थी केंद्रीत उपागम ही ————————– प्रक्रिया आहे.
अ) नाजूक ब) निश्चित क) लवचिक ड) ताठर

५) ————— हा टप्पा वर्ग अध्यापनाचा आहे.
अ) निष्क्रिय ब) आंतरक्रियात्मक क) अकृतीशील ड) कृतीशील / सक्रिय

प्र. २ थोडक्यात उत्तर लिहा.

१. अध्यापनाची व्याख्या लिहा. अध्यापनाची संकल्पना स्पष्ट करा.
२. अध्यापनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
३. चांगल्या अध्यापनाचे सविस्तर वर्णन करा.
४. अध्यापनाचा शिक्षक-केंद्री उपागम स्पष्ट करा.
५. अध्यापनाचा विद्यार्थी-केंद्री उपागम स्पष्ट करा.
६. अध्यापनाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यांची चर्चा करा.

प्र. ३ टीपा लिहा.

१. अध्यापनाची कार्ये
२. चांगल्या अध्यापनाचे घटक
३. अध्यापनाची संरचना
४. अध्यापनाचे महत्त्व

६.८ संदर्भग्रंथ

१) पारसनीस न. रा. (१९८७) शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, पुणे, नुतन प्रकाशन.

❖❖❖❖

७

शिक्षकाचे गुण आणि पात्रता

घटक रचना :

७.० उद्देश

७.१ परिचय

७.२ पूर्व प्राथमिक शिक्षक

७.२.१ पूर्व प्राथमिक शिक्षकाची पात्रता

७.२.२ पूर्व प्राथमिक शिक्षकाचे गूण

७.३ प्राथमिक शिक्षक

७.३.१ प्राथमिक शिक्षकाची पात्रता

७.३.२ प्राथमिक शिक्षकाचे गुण

७.४ माध्यमिक शिक्षक

७.४.१ माध्यमिक शिक्षकाची पात्रता

७.४.२ माध्यमिक शिक्षकाचे गुण

७.५ उच्च शिक्षण शिक्षक

७.५.१ उच्च शिक्षण शिक्षकाची पात्रता

७.५.२ उच्च शिक्षण शिक्षकाचे गुण

७.६ सारांश

७.७ अभ्यास

७.८ संदर्भ

७.० उद्देश

खाली उद्देश प्राप्त करण्यास तुम्ही सक्षम बनाल

- पूर्व प्राथमि शिक्षकाचे गुण आणि पात्रता यांचे आकलन करणे विद्यार्थ्यांना शक्य करणे.
- प्राथमिक शिक्षकाचे गुण आणि पात्रता नमूद करण्यास विद्यार्थ्यांना समर्थ करणे.
- माध्यमिक शिक्षकाचे गुण आणि पात्रता यांची आकलनक्षमता विकसीत करणे.
- उच्च शिक्षण शिक्षकाचे गुण आणि पात्रता यांची आकलन क्षमता विकसित करणे.

७.१ परिचय

सहाव्या विभागात तुम्हाला अध्यापन आणि त्यांचे वैशिष्ट्यांच्या आशयाविषयी परिचीत करण्यात आलेले आहे. तसेच तुम्ही विद्यार्थी केंद्रित व शिक्षक केंद्रित वर्ग अध्यापनाच्या वेगवेगळ्या मार्गाचा अभ्यास केला. सध्य विभाग हा पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षण शिक्षक यांचे गुण आणि पात्रता यांच्याशी संबंधित आहे.

अध्यापन हे कठीण कार्य आहे आणि काही शिक्षक हे कधीही सामान्य शिक्षकापेक्षा अधिक चांगले विकसीत होऊ शकत नाही. तथापी थोर शिक्षक हे त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी एक आव्हानात्मक आणि पोषक वातावरण निर्मितीसाठी अथक प्रयास करित असतात. थोर अध्यापनाला आपले विद्यार्थी आपला विषय आणि आपल्या कार्याप्रती आपली प्रवृत्ती यांच्यापेक्षा आपले ज्ञान व कौशल्य यांच्याशी कमी देणे घेणे असते. त्याला विषय, अभ्यासक्रम आणि इयत्ता याचे सखोल ज्ञान; उत्साह, काळजीवाहू वृत्ती, अध्यापनाविषयी प्रेम; शिस्त आणि वर्गव्यवस्थापन तंत्राचे ज्ञान आणि तरूण मुलांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची तळमळ यांची अधिक गरज असते. या सर्व बाबींची आवश्यकता असल्याने थोर शिक्षक सापडणे कठिण आहे यात आश्चर्य वाटायला नको.

७.२ पूर्व प्राथमिक शिक्षक

१ ते ८ वर्ष वयोगटातील मुलाची आकलन क्षमता आणि अध्ययन क्षमता सर्वोच्य असल्याने मानवातील बुद्धी विकासाची हा महत्त्वाचा काळ आहे. अशाप्रकारे शाळापूर्व अवस्था हे बालकासाठी असे पहिले ठिकाण आहे जेथे बालक त्याचा / तिचा आत्मगौरव उभारतो. एक मूल हे त्याचे नाव, त्याच्या वस्तू आणि मित्रांचे महत्त्व शिकते. शाळापूर्व अवस्थेत प्रत्येक मूल हे त्याचे शिक्षक व सहविद्यार्थ्यांशी संवाद सादायला शिकते. विद्यार्थ्यांच्या जीवनभराच्या प्रगतीच्या पायासाठी हेच सुयोग्य स्थान आहे. शाळापूर्व अवस्थेत मूल जी कौशल्य आणि ज्ञानाचा विकास करते त्याचा त्याच्या नंतरच्या जीवनाच्या ग्रहणशक्ती आणि प्रवृत्ती जबरदस्त प्रभाव असतो.

सहसा जी मुले बाल्यावस्थेत शिक्षण प्राप्त करतात ती अधिक चांगल्या प्रकारची सामाजिक आणि आकलन कौशल्य प्राप्त करतात. ही मुले भविष्यात अधिक लक्ष दिल्याविना चांगला दर्जा आणि कमी वर्तणूक समस्या दर्शवितात याहून अधिक म्हणजे पूर्व प्राथमिक स्थरावर खेळीमेळीच्या वातावरणात शिकल्यामुळे प्राप्त होणाऱ्या आत्मविश्वासाचा परिणाम या मुलांचा आदर्श व्यक्तिमत्व विकास होण्यात होतो.

"मला विद्यार्थ्यांचा जीवनात बदल घडवून आणण्याची गरज आहे आणि त्यांना गरज असलेल्या आणि त्यांच्या हक्कांच्या सर्व संधी आणि पोषक गोष्टी त्यांना मिळाव्यात याची खात्री हवी आहे."

'खरोखरच बालशिक्षणातील नोकरीला तुम्ही अनअपेक्षित बदलाशी किती चांगल्या प्रकारे जुळवून घेऊ शकतात याची गरज असते.'

७.२.१ पूर्व प्राथमिक शिक्षकाची पात्रता

NCTE नुसार पात्रता

५० टक्के गुणांसह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र + उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र

पूर्व आणि प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा मॉन्टेसरी शिक्षक प्रशिक्षण किंवा Early Childhood care and Education (ECCE) NCTE norms 2014 नुसार Diploma in pre school किंवा e- Education (DPSE)

नर्सरी शिक्षक प्रशिक्षण (NTT) :

वरील सर्व अभ्यासक्रम हे पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या सर्व अंगाशी निगडीत असून ते मुलाच्या सर्वांगिण विकासावर जोर देतात. महत्त्वाकांक्षी शिक्षकांना बालकाचा भौतिक, भावनिक आणि सामाजिक विकास सुखर होण्याच्या अध्यापन पद्धतींशी परिचित केले जाते. हे अभ्यासक्रम बहुव्याप्ती स्वरूपाचे असतात आणि हे बालशिक्षणाचे सिद्धांत आणि पद्धतींचे आकलन करून देतात.

बालविकासातील पदवी (Bachelor Degree) :

बालशिक्षण हे इतर अध्यापन अभ्यासक्रमासारखे नाही तर योग्य शिक्षणासह भावी शिक्षक हे वर्गात यशस्वी होण्यासाठी बहुमोल ज्ञान आणि अनुभव अर्जित करू शकतात. बालविकास आणि शिक्षणातील पदवी ही त्यांना त्यांच्या मूलांसाठी मूलभूत अध्ययन हेतू आणि विकासात्मक मैलाचा टप्पा समजून घेण्याची खात्री देतात.

ही अधिकार पत्रे शिक्षकांना बालक मंदिरातील तत्परता आणि भावी शालेय प्राप्ती यांना पाठिंबा देणारी कौशल्य प्रधान करतात. एक बॅचलर डिग्री बालशिक्षकांना या गोष्टींचे समर्थक बनविते जे बालकाच्या भावी शालेय यशासाठीचा पाया म्हणून शालेयपूर्व शिक्षणाची किंमत जाणतात.

शिक्षणाचे कार्य करण्यासाठी बरेच लोक बोलावले जाऊ शकतात परंतू ५ वर्षापर्यंतचा लहान मुलांसोबत कार्य करण्यासाठी विशेष प्रकारच्या शिक्षकाची गरज असते. या शिक्षकांना मूलभूत आकलनक्षम, वर्तणूकविषयक, सामाजिक भौतिक विकासात्मक कार्य सोपवले जाते. संयम, सृजनशीलता, क्षेत्राविषयी आवड / प्रेम आणि बालविकासातील बॅचलर पदवी, हे कार्यक्षम बालशिक्षक असण्यासाठीचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. पूर्व प्राथमिक शिक्षकाने असे गूण विकसीत करावयास हवे जेणेकरून तो वर्गात यशस्वी होईल आणि विद्यार्थी जीवनभरात यशस्वी होतील.

७.२.२ पूर्व प्राथमिक शिक्षकाचे गूण

बालशिक्षणाची आवड :

शिक्षण हे असे क्षेत्र नाही की ज्यात कोणीही प्रवेश करावा आणि या व्यवसायात यशस्वी आणि परिपूर्ण व्हावे. भावी शिक्षकांना लहानमुलांना शिकवण्यासाठीचा ध्यास हवा. हा उत्साह मैदानावरील गमतीजमतीच्या पलिकडे जायला हवा आणि लहानमूलांचा विकास करण्यावर केंद्रित व्हायला हवा.

संयम आणि विनोदी वृत्ती :

लहान मुले ही ऊर्जा व जिज्ञासेने परिपूर्ण असतात, पूर्व प्राथमिक शिक्षकाजवळ पुरेसा संयम हवा व त्याला वर्गात विनोदी वृत्ती जोपासता यायला हवी जेणेकरुन मुले दिवसभर अभ्यासात गुंतून राहतील.

सृजनशीलता :

विद्यार्थ्यांच्या विकासाच्या सद्यस्थितीशी पाठांचा संबंध जोडतांना मार्गदर्शन करतेवेळी त्यांना शिकण्यास मदत करतांना सृजनशीलतेची गरज असते. पूर्व प्राथमिक शिक्षकांनी पाठ नियोजनाचा अवलंब अशा आशयाशी करावा जेणेकरुन विद्यार्थ्यांना समजणे सुलभ होईल. अध्ययन खेळ व इतर अध्यापन तंत्राचा समावेश मुलांना दिवसभर गुंतवून व केंद्रित करुन ठेवतो.

संवाद कौशल्य :

बालवयातील मुले ग्रहणशील असतात परंतु अध्ययनाशी ते नवीनपण असतात. पूर्व प्राथमिक शिक्षकाला या लहान अध्यायनकर्त्याशी त्यांच्या पातळीवर संवाद साधता यायलाच हवा. त्याला एखाद जटील विषय सोपा करता यायला हवा. मुलांच्या वर्गातील प्रगतीचा तपशील त्यांनी पालकांना द्यायलाच हवा जेणेकरुन ते मुलांची कामगिरी व संपादन पातळीशी अवगत होतील. संवादामुळे पालकांना दैनंदिन जीवनातील शिकविण्याजोगे प्रसंग ओळखण्यात व मुलांच्या बालक-मंदिरातील तत्परतेला उत्तेजन देण्यास मदत होते.

लवचिकता :

अनपेक्षित परिस्थिती किंवा अध्यापन भारामुळे अगदी सर्वांत चांगले पूर्व प्राथमिक शिक्षक सुद्धा दिवसभर अभ्यासक्रमापासून दूर जाऊ शकतात. कुठल्याही वर्गासाठी पाठ नियोजन तयार करताना अभ्यासक्रमता नमूद करावयाच्या महत्त्वाच्या आशयाची आखणी करणे महत्त्वाचे असते. पण तरीसुद्धा काही काही वेळेस सवोत्कृष्ट पाठ नियोजनसुद्धा आपल्या अपेक्षेप्रमाणे घडत नाही. अशा वेळेस लवचिक राहण्याने ताणतणाव कमी होण्यास व गाडी रूळावर राहण्यास मदत होते.

विविधतेचे आकलन :

मुले ही वेगवेगळ्या घरांतून, वातावरणातून आणि पार्श्वभूमिकेतून येत असल्याने विविधरंगी अध्ययन पद्धतींचा अवलंब केला जावा. पूर्व प्राथमिक शिक्षकाने हे फरक समजून घेणे गरजेचे आहे आणि तद्नुसार विविधांगी अध्ययन पद्धतींसह कार्य करण्यास तत्पर असावे जेणेकरुन विद्यार्थ्याने गर्व सोडतना अपेक्षित अध्ययन हेतू साध्य केला असल्याची खात्री व्हावी.

आपली प्रगती तपासा :

१) पूर्व प्राथमिक शिक्षकाचे गुण कोणते ?

२) पूर्व प्राथमिक शिक्षकाचे अत्यावश्यक गुण कोणते हवे ?

७.३ प्राथमिक शिक्षक (६ ते १२ वयोगट)

भारतातील प्राथमिक शिक्षण पद्धती : प्राथमिक शिक्षण मुलाच्या ५-६ वर्षापासून सुरु घेते व पुढे ४-५ वर्षे चालते. प्राथमिक शिक्षकांजवळ मुलांवर अनुकुल प्रभाव टाकण्याची एकमेव संधी असते कारणे ते बाल ह्रदयात व मनात वाचन, लिखाण व गणिताप्रती प्रेम रूजवतात. प्राथमिक शिक्षक हे अध्ययन व आाजुबाजुच्या जगाच्या गुढतेचा रोमांच नुकतेच शोधू लागलेल्या विकसनशील मनाला मार्गदर्शन करतात.

भारतातील उच्च प्राथमिक शिक्षण - उच्च प्राथमिक शिक्षण हे तीन वर्ष काळाचे असते आणि मूल १०-११ वर्षाच्या दरम्यान असताना सुरु होते. ते बहुधा १३-१४ वर्षापर्यंत चालते. या टप्प्यात अध्यापन हे अधिक विषय केंद्रीत असले तरी या शिक्षणात प्राथमिक शालेय स्तराच्या मूलभूत कार्यक्रमाचा समावेश असतो.

चांगल्या प्राथमिक शिक्षकाच्या महत्त्वपूर्ण गुणांमध्ये प्रेमळपणा, उत्कृष्ट संवाद व वर्ग व्यवस्थापन कौशल्य, उत्साह, मुलांप्रती व आजीवन अध्ययनाप्रती प्रेम आणि एक निखळ विनोदी वृत्ती यांचा समावेश होतो.

आपण जीवनात जसे विकसित होतो तसतश्या अध्ययनाच्या गरजा बदलतात. शिक्षणाची सुरुवातीची वर्षे ही मुलांची सुस्थिती, जाणिवेत्मक व सामाजिक-भावनिक विकासाठीचा टप्पा ठरतात. जगात प्रवेश करणाऱ्या मुलांना स्थिरता, आश्वस्थता व उत्तेजनाची गरज असते आणि म्हणून त्यांना एक प्रेमळ व काळजीवाहू शिक्षकाची गरज असते.

७.३.१ प्राथमिक शिक्षकाची पात्रता :

- ५०% गुणांसह उच्च माध्यमिक शालेय प्रमाणपत्र (HSC) किंवा त्या समकक्ष आणि राष्ट्रीय अध्यापन शिक्षण मंडळ (NCTE) मान्यताप्राप्त शिक्षणातील दोन वर्षाची पदविका.
- नितिन ऊपासनी (शिक्षण विभागाचे संचालक अधिकारी) यांच्या अनुसार " D.Ed. अभ्यासक्रम लहान मुलांना कसे हाताळावे याचे विशेष अध्यापन व प्रशिक्षण देतो जो इतर कोणताही पदवी अभ्यासक्रम देत नाही. त्यांना जर मुलांची मानसिकता कळाली नाही तर ते त्यांना वर्गात कसे हाताळू शकतील ?"
- राष्ट्रीय अध्यापन शिक्षण मंडळाच्या (NCTE) दुरुस्ती विधेयक २०१९ नुसार पूर्व प्राथमिक ते प्राथमिक आणि उच्च प्राथमिक ते माध्यमिक शिक्षकांची पात्रता म्हणजे ५०% गुणांसह उच्च माध्यमिक शालेय प्रमाणपत्र (HSC) किंवा समकक्ष आणि ४ वर्षांचा ITEP (एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम) (Integrated Teacher Education Program) किंवा
- B.EL.ED. म्हणजेच Bachelor of Elementary Education (मूलभूत शिक्षणाची पदवी) हा अभ्यासक्रम तुम्हाला प्राथमिक शालेय शिक्षकाची भूमिका बजावण्यासाठी प्रशिक्षण देतो व सक्षम करतो. D.EL.ED (Diploma in Elementary Education (मूलभूत शिक्षणाची पदविका) हा B.EL.ED. साठी चांगला पर्याय आहे. शिक्षक पात्रता परीक्षा TET ६०% गुणांसह

७.३.२ प्राथमिक शिक्षकाचे गुण :

प्राथमिक शिक्षक हे असे विशेष लोक असतात ज्यांचे कार्य म्हणजे मुलांना मूलभूत जीवन कौशल्य शिकविणे असते.

१) संयम आणि चिकाटी :

एक प्राथमिक शिक्षक पुनः पुनः प्रयत्न करण्याचे मोल जाणतो. प्राथमिक शिक्षक तोपर्यंत मुलांचे निरिक्षण करतो व त्यांना मार्गदर्शन करतो जोपर्यंत त्यांच्या चेहेऱ्यावरील भाव हे "ओ हो" पासून तर 'ओ, तर असे करता तुम्ही' मध्ये परिवर्तित होत नाहीत. याचा परिणाम खरोखरच आश्चर्यजनक असतो.

२) एक प्रामाणिक काळजीवाहू वृत्ती :

एक सच्चा प्राथमिक शिक्षक हा मुलाची बुद्धी आणि शरीर या दोघांना पोषण देतो. बुटांच्या नाड्या बांधणे हे सुद्धा प्राथमिक शिक्षकाच्या अनेक कार्यांपैकी एक कार्य आहे जे त्याच समर्पिकतेने केले जावे ज्या समर्पिकतेने मुलाला लिहिणे व वाचणे शिकविले जाते.

३) एक विश्वास ह्रदय :

ह्रदयापासून शिकविणारा एक प्राथमिक शिक्षक जाणतो की मुलाला बुद्धीच्या खुराकापेक्षा कधी कधी एक दृढ अलिंगनाची गरज असते.

४) एक हुशार निरिक्षक :

एक खराखुरा प्राथमिक शिक्षक जाणतो की मुलांना जर योग्य भूमिका व जबाबदारी दिली तर ते सर्वच लुकलुकणारे लहान तारे बनू शकतात. प्रत्येक मुलाची विशेष बुद्धीमत्ता शोधल्याशिवाय प्राथमिक शिक्षकाचे शोधकार्य थांबत नाही.

५) एक सर्वकाळ अध्ययनकर्ता :

एक प्राथमिक शिक्षक हा सर्वकाळ अध्ययनकर्ता असतो जो जाणतो की चुका करणे व पुनः प्रयत्न करणे हे पूर्णपणे योग्य आहे. याचाच अर्थ आव्हानात्मक विद्यार्थ्यांनी त्यांच्या आरामदायक स्थितीतून बाहेर पडावे आणि दररोज नवनवीन कौशल्य विकसित करावे.

६) वर्गव्यवस्थापन कौशल्य :

एक सुनियोजित प्राथमिक शिक्षक वर्गव्यवस्थापन कौशल्य जाणतो त्याची / तिची वर्तणुक साहित्यपिटी ही खुप साऱ्या वस्तू व डावपेचांनी भरलेली असते. तथापी खरेखुरे रहस्य हे दृढ आणि सुसंगत राहण्यात असते.

७) एक खराखुरा आव्हान वीर :

एक प्राथमिक शिक्षक विश्वास ठेवतो की मुले ज्या गोष्टीवर चित्त स्थीर करतात ती कोणतीही गोष्ट ते करू शकतात. याचाच अर्थ एक समृद्ध अध्ययन वातावरणात मुलांनी आधीच्या धड्यात केलेल्या पेक्षा अधिक चांगले काम करण्याकरता त्यांच्यापुढे सतत आव्हान ठेवणे.

८) एक परिणामक्षम आरसा :

वर्गात मुलांसाठी प्राथमिक शिक्षक म्हणजे एक आरसा असतो मुलांना ज्या आव्हानांवर मात करायची असते त्यासाठी आवश्यक असलेल्या योग्य प्रवृत्ती आणि विश्वास परावर्तित करून शिक्षक उदाहरण घालून देतो.

९) लवचिक :

एक प्राथमिक शिक्षक हा नेहमीच वर्गाच्या विशिष्ठ गरजा पूर्ण करण्याकरता नियोजनपाठ अवलंबण्यासाठी तयार असतो. प्राथमिक शिक्षक जाणतात की मुलांच्या नैसर्गिक जिज्ञासेला प्रत्येक पाठात खतपाणी घालणे गरजेचे आहे.

१०) मुल कसे असते हे न विसरणे :

खेळणे आणि शिकणे यामध्ये किती मजा आहे हे प्राथमिक शिक्षक कधीही विसरत नाही. ते मुलांना वर्गात दररोज खूप साऱ्या वैविध्यपूर्ण आणि गुंतवणून ठेवणाऱ्या खेळकर आणि अध्ययनपर क्षणाची आणि कृषीची योजना करतात.

आपली प्रगती तपासा :

१) प्राथमिक शिक्षकाचे कोणते गुण असायला हवे ?

_____

_____

_____

_____

_____

२) प्राथमिक शिक्षकाची पात्रता काय ?

७.४ माध्यमिक शिक्षक

भारतातील माध्यमिक शालेय पद्धती :

माध्यमिक शालेय शिक्षणात दोन वर्षाचा निम्न माध्यमिक आणि दोन वर्षाचा उच्च माध्यमिक शिक्षणाचा समावेश होतो निम्न माध्यमिक स्तर हा १४ ते १६ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी आहे. यात प्रवेशासाठी उच्च प्राथमिक शालेय शिक्षण पूर्ण असणे गरजेचे आहे. यात विशिष्ट विषयाभोवती माहिती अधिक केंद्रीत असते.

भारतातील उच्च माध्यमिक शालेय पद्धती :

वरिष्ठ माध्यमिक शिक्षणात उच्च माध्यमिक शिक्षणाच्या दोन वर्षांचा समावेश होतो. जे साधारणत: मुलाच्या १६ व्या वर्षी सुरु होते आणि १७ व्या वर्षी संपते. वरिष्ठ माध्यमिक स्तरावर विद्यार्थी विशिष्ठ विषय किंवा ऐच्छिक विषय निवडू शकतात (शैक्षणिक मंडळ आणि आवडीच्या गरजा लक्षात घेऊन)

७.४.१ माध्यमिक शिक्षकाची पात्रता (१४ ते १८ वर्ष वयोगटासाठी):

५०% सह BA / BSC / B.Com ची तीन वर्षाची पदवी किंवा ५०% सह पदव्युत्तर पदवी किंवा ५५% सह व्यवस्थापन, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र, तंत्रज्ञान, शेती, BBI, औषधनिर्मिती, कायदा, फाईन आर्टस् (ललितकला) संगित, नृत्य, नाटक आणि शिक्षण पदवीदर (B.Ed).

राष्ट्रीय अध्यापन शिक्षण मंडळाच्या (NCTE) दुरुस्ती विधेयक २०१९ नुसार पूर्व प्राथमिक ते प्राथमिक आणि उच्च प्राथमिक ते माध्यमिक शिक्षकांची पात्रता म्हणजे ५०% गुणांसह उच्च माध्यमिक शालेय प्रमाणपत्र (HSC) किंवा समकक्ष आणि ४ वर्षाचा ITEP (एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम) (Integrated Teacher Education Program) शिक्षक पात्रता परीक्षा TET ६०% गुणांसह.

७.४.२ माध्यमिक शिक्षकाचे गुण :

पूर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आणि प्रेरित करण्यासाठी विशेष प्रकारच्या शिक्षकाची गरज असते. सर्व वयोगटाची स्वत:ची अशी काही आव्हाने असतात असे असले तरी किशोरवयीन मुलांच्या काही विशेष आणि कठिण समस्या असतात. एक थोर शिक्षकाजवळ असलेले १० गुण खाली दिलेले आहेत.

ध्येयवडे बना :

तुमच्या कार्याला इंधन पुरवण्याचा एक मार्ग म्हणजे तुमचे प्रशिक्षण व शिक्षण चालू ठेवा. यामुळे तुम्ही तुमच्या क्षेत्रातील सद्यस्थितीतील कल आणि विचारसरणीचे नविन मार्ग यांच्या शिखरावर रहाल आणि सोबतच यामुळे तुम्ही ताजातवाना दृष्टीकोन टिकवून ठेवाल आणि शिक्षक म्हणून तुमच्या व्यवसायाविषयी तुम्हाला वाटणाऱ्या सुरुवातीच्या उत्सुकतेशी तुम्ही जुळवून घ्याल.

तुम्ही काय शिकवतात ते जाणून घ्या :

प्राथमिक शालेय शिक्षकापेक्षा माध्यमिक शिक्षक हा बहुधा अधिक विशिष्ट विषयांवर केंद्रित होतो. गणिताच्या शिक्षकाला बिजगणिताइतकेच प्रभावीपणे त्रिकोणामिती व कॅलक्युलस शिकवता यायलाच हवे आणि इतिहासाच्या शिक्षकाला बदलत्या समाज प्रवृत्ती संदर्भात आखणी करताना विशिष्ट कालखंड समाविष्ट करता यायलाच हवे. त्याचप्रमाणे विशेष शिक्षण शिक्षकाला त्याच्या विद्यार्थ्यांच्या वर्तुणुकविषयक व अध्ययन विषयक कमतरतांची सखोल जाण असायला हवी आणि त्यावर उतारा म्हणून वापरायच्या योग्य तंत्राची सुद्धा जाण हवी. म्हणूनच पूर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकासाठी ते त्यांचे स्वत:चे शिक्षण चालू ठेवून असताना जसे माध्यमिक शिक्षणातील पदव्युत्तर पदवी मिळवतांना ते शिकवत असलेल्या अभ्यासक्रम आणि विषयात पारंगत असणे विशेष महत्त्वाचे आहे. म्हणजेच तो चालूप्रवाहानुसार वागणारा हवा.

वास्तविक जीवनाशी जोडा :

जेव्हा तुम्ही किशोरवयीन मुलांना शिकवता तेव्हा त्यांचे असे म्हणणे तुमच्या कानावर सहज पडते. "ह्याचा माझ्या वास्तविक जीवनात कधी उपयोग होणार आहे"? तुम्ही जे शिकवीत आहात त्यात मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांना समर्पकता दाखवून द्या. जर तुम्ही त्या शिकवण्याला वास्तविक जीवनाशी जोडू शकाल आणि तुम्ही जे शिकवीत आहात त्याला खरोखर मुल्य आहे हे दाखवून द्या. तेव्हा मुलांना प्रेरित करण्यातील शिक्षकाला येणारे अडथळे तुम्ही दूर सारू शकता.

उद्देश स्पष्ट असू द्या :

विद्यार्थी, विशेषत: किशोरवयीन हे सर्वोत्कृष्ठ कामगीरी करुन दाखवतात जेव्हा ते जाणतात की त्यांच्याकडून काय अपेक्षित आहे. एक माध्यमिक शिक्षण शिक्षक म्हणून तुमच्यासाठी विशेष महत्त्वाचे आहे की तुम्ही तुमचे पाठनियोजन आणि तुमच्या विद्यार्थ्याकडून तुमच्या असलेल्या अपेक्षा या दोहोंबाबत स्पष्ट हेतू असू द्या.

शिस्त परिणामकारकरित्या वापरा :

प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यापेक्षा किशोरवयीन विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठी वेगळा मार्ग हवा असतो आणि चांगल्या माध्यमिक शिक्षकांसाठी वर्गावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. शिस्त आणि अध्ययनाच्या पद्धतीवरील नवीन कल्पना या सतत विकसीत करून शिकवल्या जायला हव्या. म्हणून बरेचसे शिक्षक हे कार्यक्षम ताजेतवाने राहण्यासाठी आणि सद्य स्थितीला धरुन असण्यासाठी सततच्या अभ्यासाचा मार्ग निवडतात.

विद्यार्थ्यांशी नाते जोडा :

सर्वोत्कृष्ठ माध्यमिक शिक्षक ते असतात जे विद्यार्थ्यांशी स्वत:ला जोडून घेतात. जेव्हा तुम्ही हे साद्य करतात तेव्हा तुम्हाला त्यांना शिकवण्याची त्यांना प्रेरीत करण्याची आणि त्यांच्या जीवनावर कायमची छाप पाडण्याची संधी तुमच्याजवळ असते.

दृढ रहा :

पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षक लहानमुलांसोबत व्यवहार करताना दृढतेच्या महत्त्वाविषयी ऐकून असतात. किशोरवयीन मुलांसोबत सुद्धा दृढ असणे तितकेच महत्त्वाचे आहे. किशोरवयीन मुलांजवळ पूर्ण करण्यासाठी जेव्हा अपेक्षांचा एक दृढ संच असतो तेव्हा ते सर्वोत्कृष्ठ कामगिरी बजावतात.

लवचिक रहा :

दृढता आणि लवचिकता हे दोन विरोधी पैलू असतात. तुम्ही तुमच्या अपेक्षांबाबत जर दृढ असाल, तर तेथे लवचिकतेचे काय स्थान? पण हे विसरू नका की तुम्ही किशोरवयीन मुलांशी संबंधीत आहात जे अप्रत्यक्षित असतात. केव्हा दृढ असावे आणि केव्हा लवचिक असावे हे कुठलेही यशस्वी माध्यमिक शिक्षकासाठी महत्त्वाचे कौशल्य आहे. लवचिक असणे गरजेचे आहे कारण पाठयोजना कितीही काळजीपूर्वक काढली गेलेली असली तरी पेपरवर लिहिल्याप्रमाणेच सर्व काही होईल असे अजिबात नसते.

पालकांशी संवाद साधा :

एक शिक्षक म्हणून तुमची, तुमचे विद्यार्थी शाळा आणि पालकांप्रती बऱ्याच जबाबदाऱ्या असतात. तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांचे सर्वोत्कृष्ठ शिक्षक कसे होऊ शकतात याविषयी आधी चर्चा केलेली आहे परंतु हे विसरू नका की त्यांच्या पालकांसोबत परिणामकारकरित्या संवाद साधणे हे सुद्धा चांगल्या शिक्षकाचे एक महत्त्वाचे अंग आहे. किशोरवयीन मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे पालक यामध्ये मोकळा संवाद असण्यासोबतच प्रगाढ भागीदारी असणे गरजेचे आहे. जेणेकरुन समस्या चुटकीसरशी सुटू शकेल आणि संपादीत कामगिरी योग्य प्रकारे ओळखली जाईल.

विधायक बना :

एक विधायक दृष्टीकोन असणे हा एक माध्यमिक शिक्षकाचा एक महत्त्वाचा गुण आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे तुम्ही चांगले किंवा वाईट दिवस अनुभवाल आणि वाईट दिवसांची मळभ (सावली) दूर सारणे आणि पुढे जाणे अत्यंत जरूरीचे आहे अर्थात यासाठी तुम्हाला कार्याप्रती ध्यास असणे जरूरीचे आहे.

संपूर्ण देशभर सक्त राज्य आणि स्थानिक अंदाजपत्रकाने अध्यापन कार्य हे पूर्वीपेक्षा अधिक स्पर्धात्मक बनलेले आहे. म्हणून जेव्हा शिक्षणातील संधीचा पाठपूरावा करताना किंवा पूर्वमाध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा नेतृत्वाची भूमिका वठवताना एक विशेष पदव्युत्तर पदवी आणि माध्यमिक शिक्षणातील प्रमाणपत्र तुम्हाला इतर शिक्षकांपेक्षा वेगळे दाखवण्यात मदतगार ठरू शकते.

आपली प्रगती तपासा :

१) माध्यमिक शालेय शिक्षकाच्या गुणांची चर्चा करा.

२) माध्यमिक शालेय शिक्षकाची पात्रता काय ?

७.५ उच्च शिक्षण शिक्षक

उच्च शिक्षण हे तृतीय स्तराचे शिक्षण असून ते शैक्षणिक पदवी बहाल करण्याकडे घेऊन जाते. उच्च शिक्षण ज्याला माध्यमिकोत्तर शिक्षण किंवा तृतीय स्तराचे शिक्षण म्हटले जाते तो माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर येणाऱ्या औपचारीक शिक्षणाचा पर्यायी अंतिम टप्पा आहे.

एक शैक्षणिक पदवी ही विद्यार्थ्याने उच्च शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर बहुधा कॉलेज किंवा विद्यापीठ स्तरावर बहाल केली जाणारी पात्रता आहे. या संस्था सहसा विविध स्तरावर पदवी बहाल करतात ज्यामध्ये पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट यासह इतर शैक्षणिक प्रमाणपत्र आणि व्यावसायिक पदवींचा समावेश होतो.

उच्च शिक्षणात अध्यापन, संशोधन, उपयोजित कार्याची अचूकता साधणे (उदा. वैद्यकीय व दंतवैद्यकीय कॉलेज) आणि विद्यापीठाचे समाजसेवा उपक्रम यांचा समावेश होतो. अध्यापनाच्या क्षेत्रात यामध्ये पदवीपूर्व स्तर व पदव्युत्तर स्तर या दोहोंचा समावेश होतो. कुठल्याही विशिष्ट पदवीसोबत असलेल्या विशेष कौशल्या व्यतिरिक्त कुठल्याही व्यवसायातील संभाव्य मालक वर्ग हा टीकात्मक विचारसरणी व विश्लेषणात्मक तार्किक कौशल्य, संघकार्य कौशल्य, माहिती साक्षरता, नैतिक अंदाज, निर्णय घेण्याचे कसब, लिहिण्या-वाचण्यातील सहजता, समस्या निराकरण, कसब आणि मुक्त कला व विज्ञानाचे विशाल ज्ञान या गोष्टींच्या पुराव्याची चाचपणी करतो.

७.५.१ उच्च शिक्षण शिक्षकाची पात्रता :

कला, वाणिज्य, विज्ञान, वाङमय, कायदा, समाज शास्त्र, भाषा, ग्रंथविज्ञान, शारीरिक शिक्षण आणि पत्रकारिता व जनसंवाद च्या शाखांसाठीचे शिक्षक विद्यापीठ निधी आयोगानुसार (UGC).

अ) सहाय्यक प्राध्यापक : पात्रता

१. भारतीय विद्यापीठातील संबंधित विषयातील ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी (किंवा श्रेणी पद्धत असल्यास पॉईन्ट स्केल मधील समवृक्ष श्रेणी) किंवा अधिकृत परकीय विद्यापीठातील समकक्ष पदवी.

२. वरील पात्रता पूर्ण करण्याव्यतिरिक्त त्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) (UGC किंवा CSIR द्वारा संचलित) किंवा UGC द्वारा अधिकृत समकक्ष परीक्षा जसे SLET / SET किंवा विद्यापीठ निधी आयोग नियम २००९ किंवा २०१६ आणि त्यातील वेळोवेळी होणारी दुरुस्ती ज्याद्वारे त्यांना NET / SLET / SET मधून वगळले जाते त्याद्वारे ज्यांना Ph.D. पदवी बहाल केली गेली / केली जाईल. ज्या उमेदवारांनी ११ जुलै २००९ पूर्वी Ph.D. साठी नोंद केलेली आहे त्यांना त्यावेळच्या पदवी बहाल करणाऱ्या संस्थांच्या उप-कायदे / नियम यानुसार असे उमेदवार विद्यापीठ / कॉलेज / संस्थांमधील सहाय्यक प्राध्यापक किंवा समकक्ष पदाच्या भरती आणि नेमणूकीसाठी NET / SLET / SET च्या पूर्ततेतून वगळले जाते.

३. टीप : अशा विद्याशाखांतील पदव्युत्तर कार्यक्रम ज्यासाठी UGC / CSIR द्वारा NET / SLET / SET संचलित केली जात नाही त्यांना NET / SLET / SET गरजेची नाही किंवा UGC द्वारा अधिकृत अशीच परीक्षा जसे SLET / SET.

ब) सहयोगी प्राध्यापक : पात्रता

- संबंधीत शाखेतील Ph.D. पदवीसह एक उत्कृष्ठ शैक्षणिक नोंदी.
- ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी (किंवा श्रेणी पद्धत असल्यास पॉईन्ट स्केल मधील समकक्ष श्रेणी)
- विद्यापीठ, कॉलेज किंवा अधिकृत संशोधन संस्था / उद्योगातील सहाय्यक प्राध्यापकाच्या समकक्ष शैक्षणिक / संशोधक पदावरील अध्यापन आणि / किंवा संशोधनाचा कमीत कमी आठ वर्षाचा अनुभव आणि UGC अधिकृत जर्नल्स (नियतकालिक) मधील कमीत कमी ७ प्रकाशने आणि परिशिष्ट ११, तक्ता २ मधील निकषानुसार एकूण ७५ संशोधक गुण.

क) प्राध्यापक पात्रता (अ किंवा ब)

अ) i) संबंधीत शाखेतील पदवीधारक आणि एक ख्यातनाम विद्वान, उच्च दर्जाचे प्रकाशन कार्य UGC च्या यादीतील नियतकालिकातील कमीतकमी १० संशोधन प्रकाशने आणि परिशिष्ट ११ तक्ता २ मधील निकषानुसार एकूण १२० संशोधक गुण. या पुराव्या सह संशोधन कार्यात गुंतलेली सक्रीय व्यक्ती.

ii) सहाय्यक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / प्राध्यापक म्हणून विद्यापीठ / कॉलेजमधील कमीत कमी १० वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि / किंवा Ph.D. धारक विद्यार्थ्यांना यशस्वीपणे मार्गदर्शन केल्याच्या पुराव्यासह विद्यापीठ / राष्ट्रीय स्तरावरील संस्था यामधील संशोधनाचा अनुभव

ब) i) एक सुप्रसिद्ध व्यावसायिक ज्याच्याजवळ कुठल्याही शैक्षणिक संस्थेतील (वरील अ मध्ये समाविष्ठ नसलेली) संबंधीत शाखेतील Ph.D. पदवी आहे आणि ज्याने लेखी

पुरव्यासह संबंधीत शाखेतील ज्ञानात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे आणि ज्याच्याजवळ १० वर्षाचा अनुभव आहे.

ड) विद्यापीठातील वरिष्ठ प्राध्यापक :

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या मान्यताप्राप्त अस्तित्वात असलेल्या १०% पर्यंतच्या प्राध्यापकांची प्रत्यक्ष भरतीद्वारे विद्यापीठात वरिष्ठ प्राध्यापक म्हणून नेमणूक केली जाते.

पात्रता :

१. UGC यादीतील नियतकालीकातील उच्च दर्जाच्या संशोधन प्रकाशनाच्या चांगल्या नोंदीसह एक ख्यातनाम विद्वान त्या शाखेतील पुरेसे संशोधन योगदान आणि संशोधन देखरेखीत गुंतलेली व्यक्ती.

२. एक प्राध्यापक म्हणून कमीत कमी १० वर्षाचा अध्यापन / संशोधनाचा अनुभव किंवा विद्यापीठ कॉलेज किंवा राष्ट्रीय स्थरावरील संस्थामधील समकक्ष श्रेणी.

३. निवड ही शैक्षणिक कामगिरीवर आधारीत हवी, वरिष्ठ प्राध्यापकापेक्षा कमी पदावर नसलेले किंवा कमीत कमी १० वर्षाचा अनुभव असलेले प्राध्यापक अशा तीन ख्यातनाम विषय तज्ञांच्या अनुकूल पुनरावलोकनावर आधारित निवड.

४. निवड ही पुढील बाबींवर आधारीत हवी. UGC यादीच्या नियतकालिकातील १० उत्कृष्ठ प्रकाशने, मागील दहा वर्षात त्याच्या / तिच्या देखरेखीखाली कमीत कमी २ विद्यार्थ्यांना Ph.D. पदवी, आणि UGC नियमानुसार स्थापित निवड समितीशी सुसंवाद.

७.५.२ उच्च शिक्षण शिक्षकाचे गुण :

१) उत्तेजक शैली :

- आकर्षक आणि मिलनसार मार्गांनी स्वतःला सादर करतो.
- लक्ष टिकवून ठेवण्यासाठी विनोदी वृत्तीचा वापर करतो.
- प्रत्येक प्रमुख मुद्याला अर्थपूर्ण संदर्भ उदाहरण देऊन बळकटी देतो.
- विषयाचा संबंध विद्यार्थ्याच्या जगाशी जोडतो.
- विषयाचा संबंध वास्तव जीवनातील खऱ्याखुऱ्या अनुभवाशी जोडते.
- अध्ययनावर लक्ष केंद्रित करतो ते एखाद्याच्या जीवनाचा कायम स्वरूपी भाग बनून राहील आणि शाळाबाह्य जगात पुन्हा पुन्हा वापरले जाईल.
- जाणून घेण्याची इच्छा विकसित करतो.
- विद्यार्थ्यांनी शिकण्यासाठी उदयुक्त व्हावे म्हणून वेळ खर्च करतो.

२) स्पष्टपणे संवाद साधण्याची क्षमता :

- माहिती स्पष्ट, आकलनीय पद्धतीने मांडतो.
- ज्ञानाला सोप्या घटकांत रूपांतरीत करण्याची कला जाणतो.

- माहिती एकत्रीतपणे मांडतो.
- सिद्धांत, तत्वे आणि आशयांना व्यावहारिक उपयोजनांशी निगडीत करतो.
- उद्देश उपलब्ध आणि स्पष्ट करतो.
- प्रश्नांची उत्तरे पूर्णपणे आणि मुक्तपणे देतो.
- अभिप्राय नियमीतपणे देतो आणि अशा पद्धतीने देतो की, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत होईल.
- टिकाटीप्पणीचे स्पष्टीकरण करतो.

३) सदैव तत्पर आणि सुसंघटीत :

- सहामाही, घटक, आठवडा आणि दिवसांच्या कृतींची योजना करतो.
- उद्देश, संदर्भग्रंथसुची, गृहपाठ, प्रयोगशाळा अहवाल, नेमलेले कार्य, परीक्षा वेळापत्रक, विशेष गरजा, श्रेणी, मार्गदर्शक तत्वे यांचा समावेश असलेला अभ्यासक्रम देतो.
- वर्गात येऊन विषयाला हात घालतो.
- वर्गातील वेळ परिणामकारकरित्या व कार्यक्षमपणे वापरतो.
- सुसंघटीतपणे सादरीकरण करतो जेणेकरुन विद्यार्थी मजकुरातील संबंध जाणू शकतात.
- मुख्य कल्पना प्रकर्षाने मांडतो.
- सुचनांचा प्रभावीपणे वापर करतो.

४) विषयावरील प्रभुत्व :

- संबंधीत विषयात ज्ञानवंत
- संबंधीत क्षेत्रात बांधील (साहित्य वाचतो, प्राध्यापकांच्या सभांना हजेरी लावतो)
- त्या क्षेत्रातील सहकाऱ्यांशी संबंध टिकवतो (शैक्षणिक आवारात आणि बाहेरसुद्धा)
- महत्त्वाच्या आशयांचे सोदाहरण स्पष्टीकरण देऊ शकतो आणि प्रात्यक्षिक देऊ शकतो.
- विषय चांगल्याप्रकारे जाणतो जेणेकरुन सर्वात महत्त्वाच्या आशयावर जोर देता येईल.
- विविध सिद्धांत आणि तत्वांचे विरोधाभास आणि परिणाम दर्शवितो.
- महत्त्वपूर्ण वास्तव आणि आशयांची अभ्यासाच्या संबंधीत क्षेत्रांशी जुळणी करतो.
- अध्ययन आणि लक्षात राहण्यासुलभ व्हावे म्हणून सारांश पद्धतीने मांडतो.

५) खळखळता उत्साह :

- अध्यापनाविषयी उत्साही असतो व तो दाखवितो.
- विषयात प्रामाणिकपणे रूची घेतो.

- अध्ययनाला एक आनंददायक अनुभव बनवितो.
- सामान्यत: जीवनाप्रती विधायक दृष्टीकोन बाळगतो.
- मानवीयतेची स्वत:ची वेगळी पद्धत विकसीत करतो.
- विषय आणि शिकविणारा अशा दोहोंप्रती विद्यार्थ्यांची वृत्ती सुधारण्यासाठी उत्साह व उत्तेजनाचा वापर करतो.
- शिकण्यासाठी जे काय करायला हवे ते विद्यार्थ्याने करावे म्हणून एक पाऊल पुढे जातो.

६) विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तीगत रूची :

- विद्यार्थ्यांचा खरोखरच आदर करतो आणि ही मदतगार, काळजीवाहू वृत्ती दर्शवितो.
- त्याला / तिला विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत करायची इच्छा आहे हे स्पष्ट करतो.
- विद्यार्थी व त्यांचा गरजा समजून घेण्यासाठी वेळ काढतो व प्रयत्न करतो.
- प्रत्येक विद्यार्थ्यासोबत व्यक्तीश: कार्य करतो.
- विद्यार्थ्यांसोबत वर्गात व वर्गाबाहेरसुद्धा बोलतो.
- विद्यार्थ्यांना स्वत:च्या प्रश्नाची उत्तरे देण्यात मदत करतो.
- वर्गकृती व वर्गाबाहेरील समस्यावरील उपदेशासाठी किंमत केली जाते.

७) परस्पर संवाद कौशल्य :

- विद्यार्थ्यांच्या गरजा जाणतो आणि व्यक्तीश: प्रगतीवर लक्ष ठेवून असतो.
- कृतीत सुधारणा व मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया व अभिप्राय यांचा वापर करतो.
- अशाब्दिक खुणा अचुकपणे वाचतो व संवाद साधतो.
- वर्ग केव्हा संभ्रमात पडतो ते जाणतो.
- वर्गात तसेच वर्गाबाहेर विद्यार्थ्यांशी बोलताना त्यांच्याकडे बघतो -प्रत्यक्ष नजरानजरीतून वास्तविक जाण दिसते.
- विद्यार्थ्यांनी परस्परांना समजून घेण्यासाठी प्रयत्न करतो.
- भावी अध्ययनाला प्रेरणा देण्यासाठी यशस्वी कामगिरीचे गोडवे गातो.

८) लवचिकता, सृजनशीलता, मुक्तपणा :

- सादरीकरणाच्या विविध पद्धती व मार्ग वापरतो.
- प्रत्येक तास हा कमीत कमी तीन विविध कृतींमध्ये विभाजित करतो.
- वेगवेगळ्या विद्यार्थ्यांसोबत जुळवून घेण्यासाठी मार्ग बदलतो.
- नवनवीन आणि वेगवेगळ्या कल्पना अधूनमधून वापरतो.

- सतत नवनवीन कल्पना, मार्ग व पद्धतींचा शोध घेतो.
- विषय मजकुर, पद्धती व प्रकल्पांवरील विद्यार्थ्यांच्या सूचना मुक्तपणे स्विकारतो.
- अध्यापन - अध्ययन कृतींची मांडणी करताना स्वतंत्र शैली आणि कल्पकतेचा वापर करतो.

९) ठोस व्यक्तीत्व :

- विद्यार्थ्यांशी सर्वच व्यवहारात एकता व प्रामाणिकता बाळगतो.
- कुठलीही लपविलेली अपेक्षा नसताना सर्व नियम, कायदे व विशेष गरजांमध्ये आघाडीवर असतो.
- विद्यार्थ्यांना काळजीपूर्वक न्याय केल्याशिवाय नियम बदलत नाही.
- वर्गवारी व चाचपणी करताना खूपच सावधानता व न्यायप्रियता बाळगतो.
- विद्यार्थ्यांसोबतची गुप्तता टिकवितो.
- चुक झाल्यास ती स्विकारण्याची तयारी ठेवतो व ती चुक नंतर दुरुस्त करतो.
- नवीन विद्यार्थ्यांप्रती संयम व समंजसपणा बाळगतो.

१०) बांधिलकी :

- शिकविण्याची प्रामाणिक इच्छा सप्रमाण सिद्ध करतो.
- शिकविण्याला सर्वात पहिला प्राधान्यक्रम देतो.
- कार्य योग्य होण्यासाठी त्यातील बंधनांचा स्विकार करतो.
- विद्यार्थ्यांना त्यांची प्रगती, यश व गरजा यांची माहिती होण्यासाठी जे करणे शक्य आहे ते करतो.
- सुधारणा करण्याच्या हेतूस्तव विद्यार्थी, सहकारी व संचालक यांचा अभिप्राय मिळवितो.
- टीकाटिप्पणी व सूचना ह्या बदलासाठीचे विधायक चिन्ह म्हणून स्विकारतो.
- शिकविण्याच्या नवनवीन व अधिक चांगल्या मार्गांचा सतत शोध घेतो.
- सहकाऱ्यांच्या विकासासाठी सर्वोत्कृष्ट कल्पनांमध्ये सहकाऱ्यांना सहभाग करुन घेतो.

आपली प्रगती तपासा :

१) उच्च शिक्षण शिक्षकाला विषयावरील प्रभुत्व किती चांगल्या प्रकारे कळायला हवे ?

_____

_____

_____

_____

_____

२) सहयोगी प्राध्यापकाची पात्रता काय हवी ?

७.६ सारांश

शिक्षकाची कार्यक्षमता ही शिक्षणाच्या दर्जाची एक प्रमुख निर्धारक आहे आणि कार्यक्षमता ही एकाच वेळेस संपादन करण्याची बाब नाही. म्हणूनच हे गरजेचे आहे की शिक्षकांच्या संपूर्ण कारकिर्दी दरम्यान त्यांना अधूनमधून सतत शिक्षण देणे.

- **पूर्वप्राथमिक -** २ ते ६ वर्षे वयोगटासाठीच्या शैक्षणिक आस्थापनांसाठी पुढील नावे वापरली जाऊ शकतात - बालवाडी, आंगणवाडी, नर्सरी, किंडनगार्टन, प्ले हाऊस, डे केअर, पूर्वप्राथमिक शिक्षकाने अधिक संयमी व उत्साही असावयास हवे.
- प्राथमिक शाळेत शिक्षण वर्ग व्यवस्थापन बघतात, सर्व विषय शिकवितात आणि विद्यार्थ्यांनी फक्त मूलभूत कार्यक्षमताच नव्हे तर भावनिक व सामाजिक जाण सुद्धा विकसित व्हावी म्हणून मदत करतात. यासाठी बऱ्याच विषयांचे विस्तृत ज्ञान गरजेचे असते. विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भावनिक विकासाशी प्रत्यक्ष संबंध येत असल्याने शिक्षकांचे वर्गासोबत दृढ बंध तयार होतात जे या वयात शिकण्यासाठी आवश्यक आहेत. प्राथमिक शालेय शिक्षकाने अधिक सृजनशील, प्रेमळ व उत्साही असावयास हवे.
- **भारतातील माध्यमिक शालेय पद्धती -** माध्यमिक शालेय शिक्षणात दोन वर्षाच्या निम्न माध्यमिक व दोन वर्षाच्या उच्च माध्यमिक शिक्षणाचा समावेश होतो. निम्न माध्यमिक स्तर हा १४ ते १६ वर्षे वयोगटासाठी आहे. यात सूचना या विशेष विषयाला धरुन अधिक संघटीत झाल्या आहेत. भारतातील उच्च माध्यमिक शालेय पद्धती - वरिष्ठ माध्यमिक शिक्षणात दोन वर्षाच्या उच्च माध्यमिक शिक्षणाचा समावेश होतो जे साधारणतः १६ व्या वर्षी सुरु होते व मुलाच्या १८ व्या वर्षी संपते. वरिष्ठ माध्यमिक स्तरावर विद्यार्थी विशिष्ट विषय / ऐच्छिक विषय निवडू शकतो. (शैक्षणिक मंडळ व आवडीच्या गरजा लक्षात घेऊन) शिक्षकाला मुलांचे मानसशास्त्र आणि चांगले संवादकौशल्य माहित असावयास हवे.
- उच्च शिक्षणात अध्यापन, संशोधन, उपयोजित कार्याची अचुकता (उदा. वैद्यकीय व दंतवैद्यकीय कॉलेज) आणि विद्यापीठाच्या समाजसेवा कृती यांचा समावेश होतो. उच्च शिक्षण शिक्षकाचे विषयावर प्रभुत्व हवे व त्याच्याजवळ संघटीत, व्यावसायिक कार्यमूल्ये हवीत.

७.७ अभ्यास

प्र. १ रिकाम्या जागा भरा.

१. शिक्षक पात्रता परीक्षा ही ————– टक्के हवी.

२. लहान मुले ही ————- व ———— ने परिपूर्ण भरलेली असतात.

३. पूर्व प्राथमिक शिक्षक हा खूप मोठ्या प्रमाणावर ————– घडवून आणतो.

४. दररोजच्या जीवनातील शिकविण्याजोगे क्षण ओळखण्यात पालकांना ————– मदत करतात.

५. प्राथमिक शिक्षण साधारणतः मुलाच्या ————– वर्षी सुरु होते.

६. ————- हे तृतीय स्तराचे शिक्षण असून ते पदवी बहाल करण्याकडे नते.

प्र. २ सविस्तर उत्तरे द्या.

१. उच्च शिक्षण शिक्षकाची पात्रता काय ?

२. पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षकाच्या पात्रतेतील फरक सांगा.

३. प्राथमिक शिक्षकाचे गुण सोदाहरण स्पष्ट करा.

४. पूर्व प्राथमिक शिक्षकाच्या गुणांचे वर्णन करा.

५. प्राथमिक, माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षकाची पात्रता काय असावयास हवी ?

७.८ संदर्भ

❖❖❖❖

८

शिक्षणाची भूमिका व आव्हाने

घटक रचना :

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ संकल्पना
८.३ व्यावसायिक वाढ
८.४ व्यावसायिक नितीमत्ता व शिक्षकाची आचारसंहिता
८.५ संक्रमण काळातील शिक्षकाची भूमिका (शिकवणे (अध्यापन) व सुविधा)
८.६ सारांश

८.० उद्दिष्ट्ये

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्ही खालील बाबींचे आकलन करु शकता.

- शिक्षकांच्या भूमिकेविषयी सांगू शकाल
- शिक्षकांची आव्हाने स्पष्ट करु शकाल.
- व्यवसायाची संकल्पना सांगू शकाल
- व्यवसायिक वाढ स्पष्ट कराल
- शिक्षकाच्या शिक्षणासाठी व्यावसायिकवादाचा विकास कसा करावा ते स्पष्ट कराल
- शिक्षकाची व्यवसायिक नितीमत्ता व आचारसंहिताचा विकास कशा प्रकारे करावा ह्याचे स्पष्टीकरण द्याल.
- शिक्षण व सुविधा संबंधी संक्रमणकाळातील शिक्षकाची भूमिका स्पष्ट कराल.

८.१ प्रस्तावना

शिक्षकाचे शिक्षण हे धोरणे, कार्यपद्धतीशी संबंधित आहे. हे शिक्षकाचे ज्ञान, वृत्ती वागणूक व कौशल्यांशी निगडीत आहे. शिक्षकाचे शिक्षण समाजामध्ये विस्तृत प्रमाणात व वर्गामध्ये शाळेत परिणामकारक शिकवण्याशी संबंधित आहे.

शिक्षकाची मुख्य भूमिका ही विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रवृत्त करणे, शिक्षणाविषयी शिकणाऱ्याच्या मध्ये आवड निर्माण करणे व त्यांच्या मधील शिकण्याच्या वृत्तीचा विकास करणे आहे. हे सर्व योग्य नियोजन, अध्ययन - अध्यापनाचे उपक्रम वैयक्तिकरित्या किंवा गटा-गटाने शिकणाऱ्यांच्या गरजेप्रमाणे तयार करुन त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे हे गरजेचे आहे.

शिक्षकांच्या भूमिकेचे धोरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये काल्पनिक, प्रश्न विचारण्याची, आव्हानात्मक विचार करण्याची प्रक्रिया सुरु होण्यास मदत होते. शिक्षकाचे प्रशिक्षण शिक्षक शिक्षणामध्ये महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकांचे शिक्षण हे त्यांचे ज्ञान सतत अद्ययावत करण्यासाठी व त्यांची व्यवसायिक कौशल्ये सद्य परिस्थिती नुसार अद्ययावत करण्यासाठी गरजेचे आहे. अध्यापन वातावरण निर्मिती शैक्षणिक-करिअर वाढ होण्यासाठी शिक्षकांचा व्यावसायिक विकासाचे स्वरूप सुधारणे महत्त्वाचे आहे.

ह्या घटकांमध्ये आपण व्यावसायिक वाढ, व्यावसायिक नितिमत्ता, शिक्षकाची आचार-संहिता, संक्रमण काळातील शिक्षकाची भूमिका ह्या बद्दल चर्चा करणार आहोत.

८.२ व्यवसायाची संकल्पना

व्यवसायाचे रूपांतरण हे औपचारिक शिक्षण विकासाद्वारे, औपचारिक गुणवत्ताद्वारे, शिक्षण व प्रशिक्षणार्थी व परिक्षाद्वारे निर्माण होते. व्यवसाया पेक्षा विशेष शैक्षणिक प्रशिक्षण पुरवठ्याच्या हेतू, प्रत्यक्ष सेवा, खात्रीशीर भरपाई, दुसऱ्यांच्या अपेक्षा विरहीत व्यवसाय प्राप्ती ह्यावर आधारीत आहे.

तीन मुख्य व्यवसाय पुढीलप्रमाणे -

१) देव - धर्म अभ्यास
२) कायदा
३) औषधे

व्यवसाय शक्तीच्या विविध स्तरांद्वारे दर्जा वाढवतो. चर्चमधील मुख्य धर्मोपदेशक लाल वेष परिधान करतात. वकील काळा वेष परिधान करतात व डॉक्टर पांढरा कोट वापरतात. आर्किटेक्चर व इतर सर्व व्यावसायिक समान आहेत.

व्यवसायामुळे दर्जा व सार्वजनिक प्रतिष्ठांचा आनंद घेता येतो. सर्वच व्यावसायिक / व्यवसायामधून उच्च प्रतीचे उत्पन्न मिळत नाही. त्यांच्यामध्ये काही प्रमाणामध्ये सर्व प्रक्रियमध्ये समानता लपलेली आहे.

व्यवसायाची उदाहरणे -

१. इंजिनिअरिंग
२. फार्मासिस्ट
३. नर्सेस व फिजिशियन
४. अकाउटंटस्

५. नोटरीज
६. वकिल
७. शैक्षणिक कोर्सेस
८. व्यावसायिक कोर्सेस

प्रत्येक व्यवसाय त्यांच्या दर्जा द्वारे जबाबदारीने नियोजित केला जातो. हा व्यवसाय नियंत्रित करणारी कमिटी व्यवसायाचे परवाने व त्यासाठी परीक्षा घेऊन त्यांची क्षमता, निष्ठा व सरावाची नैतिक आचारसंहिता निर्धारित करतात.

एनसीटीई ने शिक्षकासाठी आदर्श आचारसंहिता तयार केलेली आहे. व्यावसायिक कल स्वायत्ततेकडे असतो. तो स्वतंत्र बनवतो. व्यवसायामुळे उच्च सामाजिक दर्जा समाजाकडून प्राप्त होतो. उत्कृष्ट सामाजिक कार्यामुळे हा दर्जा मिळतो. सर्व व्यावसायामध्ये विशेष व तांत्रिक तज्ञ व उच्च प्रतीचे कौशल्य प्राप्त असलेल्या व्यक्तींची गरज असते. अशा प्रकारच्या तज्ञ लोकांना घडविण्यासाठी तसे प्रशिक्षण पदवी द्वारे त्यांच्या व्यावसायिक पात्रतेमध्ये वाढ करता येते. सतत प्रशिक्षणामुळे त्यांचे कौशल्य अद्ययावत होण्यास मदत होते.

सर्व व्यवसायांना शक्ती (उर्जा) असते. त्या उर्जेचा उपयोग त्यांच्या सभासदांना नियंत्रित करण्यासाठी व तज्ञांच्या क्षेत्रांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी केला जातो. ह्याचा उपयोग व्यवसायाची धोरणे निश्चितीसाठी होतो. तसेच सभासदांचे संरक्षण व तज्ञांचे संरक्षणासाठी होतो.

शिक्षकांचे शिक्षण एक व्यवसाय :

शिक्षकाचे व्यवसायिक प्रशिक्षण शिक्षकांच्या प्रौढांच्या अध्यापनामध्ये व अध्यापन तंत्रामध्ये त्यांच्या ज्ञानामध्ये प्राविण्य प्राप्त करण्यास मदत करते. शिक्षकांच्या शिक्षणामध्ये शिक्षकांचे प्रशिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण त्यांच्या अध्यापन व्यवसायामध्ये समाविष्ट असणारे सर्व उपक्रम चांगल्या प्रकारे हाताळण्याचे अद्ययावत ज्ञान व कौशल्यामध्ये सुधारणा करण्याचे ज्ञान व माहिती देते. प्रशिक्षणाने शिक्षकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. प्रशिक्षणामुळे शिक्षकांना नवनवीन संकल्पना आत्मसात करण्याची व त्यास व्यवसायिक बनविण्याची संधी मिळते. शिक्षकांचे प्रशिक्षण ही सद्याच्या विज्ञान युगात त्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी व्यावसायिक म्हणून महत्त्वाचे आहे. तसेच सामाजिक बदल नव-नवीन तंत्रे चालू घडामोडीची माहिती ठेवण्यासाठी महत्त्वाचे आहे.

८.३ व्यावसायिक वाढ



व्यावसायिक वाढ म्हणजे नव-नवीन कौशल्ये व अनुभव आपल्या व्यवसाय वृद्धींगत करण्यासाठी सतत मिळवत राहणे, स्पर्धेच्या जगामध्ये टिकून राहण्यासाठी सतत नवीन शिकून आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे. सतत सूरक्षित कायदेशीर, क्षमतेने काम करण्याची सवय अंगीकृत करणे म्हणजेच व्यवसायिक वाढ होय.

- प्रत्येक स्टाफ मेंबर त्याचा व्यवसायिक विकास होण्यासाठी वैयक्तिक शिकण्याचा राजमार्ग आहे तो त्याच्या परीने व्यवसाय वाढ होण्यासाठी स्वतः सर्वोत्तम प्रयत्न करीत असतो.
- आपल्या संस्कृती शिकणे (अध्ययन) ही आवड आहे. परंतु प्रत्येकास अध्ययनाची गोडी नसते.
- वैयक्तिक वाढीची आवड लोकांना मदत व आधार व्यवसायिक दृष्टीकोन ठेवून करु शकते.
- जे स्वतःचे प्रावीण्य सुधारु इच्छितात व स्वतःचे ज्ञान वाढवू इच्छितात त्यांच्यासाठी उपक्रमांचे डिझाईन (आयोजन) केले जाते.

८.३.१ महत्त्व :

व्यावसायिक वाढीने तुम्ही सतत तुमच्या व्यवसायामध्ये तुम्ही सक्षम राहू शकतात. व्यवसाय करीअर (कारकीर्द) प्रगतीशील ठेवण्यासाठी ही वाढ सतत चालू राहिली पाहिजे. तुमच्या समाजास, ग्राहकास, गिऱ्हाईकास व्यावसायिक सेवा तत्परतेने देण्यासाठी तुमचे ज्ञान व कौशल्ये व तंत्रे वाढवली पाहिजेत. ह्यामुळे तुमचा आत्मविश्वास व विश्वासार्हता कामामध्ये निर्माण होतो. तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांना व्यावसायिक वाढीचे प्रशिक्षण दिल्यास त्यांच्या कार्यामध्ये देखील त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास निश्चितच मदत होते.

१) विश्वासार्हता व आत्मविश्वास :

शिकण्याची कला तुम्हास तुमच्या क्षेत्रामध्ये नवीन दृष्टीकोन देते व त्या क्षेत्रामध्ये तुमचा तज्ञपणा वाढीस लागण्यास मदत करते.

२) कार्यक्षमता :

तुम्ही नवीन कौशल्यामध्ये प्रावीण्य मिळवल्यास त्या क्षमतेस कार्यक्षमता असे संबोधले जाते.

३) क्षमतेचा प्रभाव :

आत्मविश्वास विश्वासार्हतेने प्राप्त केलेले ज्ञानाचा क्षमतेवर प्रभाव पडतो. ह्यामुळे कमी विषयांतर व जास्त प्रमाणात तथ्याच्या जवळ जाऊन अचूक निष्पती करता येते.

४) नेटवर्क :

नेटवर्क वैयक्तिकरीत्या जी माहिती हवी आहे ती शोधण्यासाठी तसेच हवी असलेली माहिती पुरविण्यासाठी मदत करते.

५) सद्य स्थिती (Keep Current) :

सद्य स्थितीमध्ये असलेले ज्ञान जतन करु ते स्वतःचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी उपयोगी आहे.

६) करिअर ध्येय सिद्धी :

हे तुमच्या संघास (team) ला ध्येय प्राप्तीसाठी आवश्यक आहे.

७) अधिक रोजगार :

तुमच्या कर्मचाऱ्यामध्ये संप्रेषण कौशल्याचा विकास होऊन अधिक-अधिक रोजगारासाठी हे ध्येय असणे गरजेचे आहे.

८.३.२ शिक्षकाची व्यवसायिक वाढ :

शिक्षक व्यवसायिक अध्ययन अनुभव कशा प्रकारे घेतात त्याचा परिणाम त्यांच्या व्यावसायिक सरावावर (practice) वर होतो. शिक्षक त्यांची व्यावसायिक वाढीसाठी सहयोग करत असतात. व्यवसायिक वाढीच्या सहाय्याने शिक्षक त्यांची कारकीर्द (carrear) उज्वल करतात. ह्या अशा सततच्या प्रयत्नांमुळे शिक्षक त्यांच्या स्वतःमध्ये व शैक्षणिक व्यवसायामध्ये सुधारणा करतात. ह्यासाठी शिक्षक परिसंवाद व कार्यशाळा मध्ये सहभाग घेऊन नव-नवीन तंत्रे, ज्ञान अवगत करुन स्वतःस अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न करतात. तसेच परिसंवाद व कार्यशाळा शिक्षक संशोधन व प्रशिक्षण करीत असतात. शिक्षक सतत स्वतःच्या कामाबद्दल जागरुक व चिकित्सक असतात. शिक्षक स्वतःच्या कामाबद्दल इतरांकडून म्हणजे विद्यार्थी व इतर सहकारी शिक्षकांकडून अभिप्राय (feedback) घेत असतात. ही शिक्षकाची व्यवसायिक ओळख आहे.

शिक्षक समाजामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. शिक्षक उद्याच्या पिढीचे भारताचे नेतृत्व करणाऱ्या आजच्या मुलांना जबाबदारीने शिकवत असतात. शिक्षक मुलांचे सामाजिक व शैक्षणिक व सामाजिक ज्ञान वाढवण्याची जबाबदारी स्वीकारतात व नेटाने तसे प्रयत्न करतात. महत्त्वकांक्षी शिक्षकाची परिणामकारता व चिकत्सकपणा त्यांची व्यवसायिक ओळख पटवून देतो. धोरणांमध्ये सुधारणा करुन आपणास हवा असलेला शिक्षकांचे मानक

(standard) समजून घेतले पाहिजे. शिक्षकाच्या अध्यापनाचे मानक (standard) हे तात्त्वीक दृष्ट्या त्यांच्या अक्कल हुशारी व लेखी किंवा छापील कागदपत्रावर आधारित (paper based) आहे.

८.३.३ शिक्षकांचे व्यवसायिक अध्यापन कौशल्य (Professional skill as a Teacher) :

ह्या क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी शिक्षकाने आयुष्यभर सतत शिकत राहिले पाहिजे. ह्या शैक्षणिक क्षेत्रांमध्ये शिक्षकांचे शिकणे हे कॉलेजमधून, विद्यार्थ्यांकडून, त्यांच्या सततच्या सरावामधून, इतरांच्या उपदेशाद्वारे व ह्या व्यवसायातील इतरांच्या निरिक्षणाद्वारे आत्मसात करु शकतो. शैक्षणिक क्षेत्रांमध्ये पसरलेल्या असंख्य व्यवसायिक संस्थांमधून अवलोकन करुन शिक्षक म्हणून त्यांचे व्यवसायिक कौशल्यामध्ये सहज वाढ करु शकतो.

८.३.४ व्यवसायिक वाढ - योजना / नियोजन :

सततच्या शिक्षणातून शिक्षक त्यांच्या गरजा पूर्ण करीत असताना शिक्षक त्यांची व्यवसायिक बांधीलकी त्यांच्या योजनांच्या विकासाद्वारे करीत असतात.

योजना वाढीचा मुख्य घटक म्हणजे शिक्षकांच्या योजनेची धोरणे व वार्षिक नियोजन नियंत्रित करणे होय.

- ध्येय व धोरणांचे प्रतिबिंब हे शिक्षकांच्या वैयक्तिक अध्ययनाच्या गरजांच्या आधारावर असते.
- शिक्षकांच्या गुणवत्तेचा दर्जाचा संबंध हा प्रात्यक्षिक दर्शवितो.
- शैक्षणिक योजना / नियोजना मध्ये शाळा, शैक्षणिक मंडळ / संस्था साठी विचार केलेला असतो.
- शिक्षकांच्या व्यवसायिक वाढी साठी सतत प्राध्यापक - शिक्षक व तज्ञ सल्लामसलत करत असतात. ह्यामध्ये वार्षिक शिक्षक व्यवसाय वाढीसाठी विस्तृतपणे त्यांच्या गरजांचा विचार केला जातो.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार उद्बोधन (Orientation) कार्यक्रमाचे आयोजन हे तरूण प्राध्यापक / व्याख्याते ह्यांचा दर्जा सुधारण्यासाठी व त्यांच्यामध्ये अंतर्गत व बाह्य जागरूकता येण्यासाठी केले जाते.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी १४४ तास किंवा दररोज ६ तास असे ४ आठवडे उद्बोधन (Orientation) कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

घटक अ : समाज, वातावरण, विकास व शिक्षण ह्यांच्यामध्ये दुवा साधून जागृती निर्माणासाठी

घटक ब : शिक्षणाचे तात्वीक अधिष्ठान भारतीय शिक्षण पद्धत व अध्यापनशास्त्र ह्यांच्या विकास व जागृतीसाठी

घटक क : जागृतीचे स्त्रोत (resource) व ज्ञानाची उत्पत्तीसाठी

घटक ड : व्यवस्थापन व व्यक्तीमत्व विकास

वरिल घटक व्याख्या त्यांच्या स्वभावानुसार व गरजांनुसार शैक्षणिक पार्श्वभूमीच्या विचार करुन ठरविले जातात. शैक्षणिक स्टाफ महाविद्यालये, अध्ययनांच्या पद्धती व अध्ययनाचे विविध घटक (topics) अध्ययनासाठी निवडतात.

आपली प्रगती तपासा :

१) व्यवसायिक वाढ म्हणजे काय ?

२) व्यवसायाची उदाहरणे द्या.

३) व्यवसायिक वाढीचे महत्त्व काय ?

४) शिक्षकाची व्यवसायिक वाढीचा खुलासा करा.

८.४ व्यावसायिक नितीमत्ता व शिक्षकाची आचारसंहिता

ऑक्सफर्ड डिक्शनरी नुसार नितीमत्ता हे नैतिकतेच्या तत्वानुसार व्यक्तींच्या वागणूक किंवा त्यांच्या उपक्रम / हालचालीचे वैज्ञानिक दृष्ट्या नियंत्रण होय. मूल्ये, नियम, मानके सदाचरण भावना व्यक्त करणे हे शब्द नैतिकतेच्या अर्थासारखे आहेत. सद्या त्यास सामाजिक जबाबदारी सुद्धा संबोधले जाते. आपण जे कार्य करतो ते चांगले की वाईट हे समजून घेण्याची संवेदना म्हणजे सामाजिक जबाबदारी होय.

व्याख्या : व्यवसायिक नितीमत्ता ही नियम, तत्वे ह्यांच्याशी निगडीत असून हे शिक्षकांची आचार संहिता नियंत्रित करतात.

८.४.१ स्ट्राईक व ट्रेन्की च्या मतानुसार :

व्यवसायिक नितिमत्तेची आचारसंहिता ही स्वकेंद्रित स्वनिर्मित कल्पनांचा संच व अत्यावश्यक क्षमतांची तत्वे किंवा स्वत:चे व्यवसायिक समाधान व उत्तम व्यवसायासाठी असू शकते.

ज्यावेळी शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज व उच्चसंबंधितांशी व्यवहार करतो त्यावेळी तो अध्यापन व्यवसायाची नितीमत्ता, तत्वे, नियम सदाचरण ह्या व्यवसायिक नितीमत्तेच्या मार्गदर्शन पर सुचनांचे अनुकरण करीत असतो.

व्यावसायिक नितिमत्तेचे मापदंड (parameter) हे समाजाप्रमाणे वेळेनुसार बदलत असतात. हे निसर्गानुसार गतीशील असतात.

समाजाच्या सेट-अप (निर्माणानुसार) समाजाच्या नैतिकतेचा आकृतीबंध व नमुने बदलत असतात. ह्या ठिकाणी नितिमतेसाठी अशी कोणतीही निश्चित अशी मार्गदर्शनपर सीमा रेषा नाही.

नैतिकता नियंत्रणामुळे मानवजातीस खरेपणा नियम, सुधारात्मकता मूल्ये व मानवाची प्रगती हे फायदे होत आहेत.

८.४.२ व्यावसायिक नितीमत्तेची गरज :

- स्वत:मध्ये सुधारणा करण्यासाठी
- स्वत:च्या समाधानासाठी
- स्वत:ची वागणूक व वर्तणूकीस मार्गदर्शनासाठी
- व्यक्तीमत्त्वास आकार देण्यासाठी
- विद्यार्थ्यासाठी संकल्पना, कल्पना विस्तारासाठी
- समाज विकासासाठी

- व्यवसायिक वातावरण सुधारणेसाठी
- व्यवसायाचे नियम व तत्वे अनुकरण करण्यासाठी
- शिक्षकी (पेशा) व्यवसायाचा सन्मान व प्रामाणिकपणा टिकवून ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी
- मजूर / चतुर्थ श्रेणी कर्मचारी व व्यवसायिक समाज ह्यांच्याशी सन्मानजनक व्यवहार करण्यासाठी
- समाज व विद्यार्थी ह्यांच्या विषयी दायित्व स्वीकारण्यासाठी
- अध्यापन कौशल्ये, प्रॅक्टीकल मध्ये नैपुण्यता ह्यांचा उच्च प्रमाणात शैक्षणिक प्रवास मध्ये प्रतिबिंबित होण्यासाठी.

८.४.३ व्यवसायिक नितिमत्ता संकल्पना :

जर शिक्षकाकडे आदर्श ध्येय नसेल व तो त्याच्या क्षमतेमध्ये आदर्श नसेल तर त्याने दुकान टाकून व्यवसाय करावा.

स्वत:ची परिपूर्णता स्वयं-भावना व्यक्त करण्यासाठी शिक्षकाने स्वत:ची व्यवसायिक नितिमत्ता विकसित करावयास हवी. शिक्षक चिंतनशील, नवनिर्माण, सत्याची कास धरणारा, व प्रगतीसाठी सतत प्रयत्न करणारा असावा.

शिक्षक व्यवसायिक नितीमत्ता म्हणजे तो व्यसनापासून मुक्त प्रामाणिक, भ्रष्टाचार करणारा नसावा. शिक्षक हा समाज घडविणे प्रक्रियेचा शिल्पकार आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे नागरीक आहेत. ते सुसंस्कृत आदर्श निर्माण होण्यासाठी प्रयत्न शिक्षकाने जीवनमूल्ये, संस्कार, चांगली विचारधारा स्वत:मध्ये आत्मसात करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे शिक्षकांसाठी आवश्यक आहे. शिक्षकांकडे सूचनांचे ज्ञानामध्ये रूपांतरण करण्याची कला अवगत असावयास हवी. शिक्षक निष्पक्ष असावा. उच्च-नीच, गरीब, श्रीमंत असा भेदभाव न करता सर्व विद्यार्थ्यांमध्ये समानता ठेवणे आवश्यक आहे. समानतेची बीज लहानपणीच शिक्षकाने आपल्या आदर्श आचरणातून विद्यार्थ्यांमध्ये रूजवणे गरजेचे आहे.

८.४.४ व्यवसायिक नितीमत्ता :

- व्यवसायिक चांगल्या गुणांचे बंधन
- विस्तृत चांगल्या तत्वाचा संच
- फक्त शैक्षणिक तंत्रज्ञानावर विश्वास न ठेवता आदर्श तत्वांच्या विचारसरणींचे समर्पणाविषयी विश्वास हवा.
- शिक्षकाची व्यवसायिक नितीमत्ता ही शब्दातीत आहे.

रविंद्रनाथ टागोर -

आपल्या आदर्श जीवनशैली मध्ये माणसास प्रत्येक वेळी सत्याचे प्रकटीकरण हे अंतर्गत व बर्हिगत वैखीक सत्य आहे.

८.४.५ व्यवसायिक नितीमत्तेचे घटक :

व्यवसायिक नितीमत्तेचे घटक पुढीलप्रमाणे -

- शिक्षकाची भूमिका व जबाबदारी
- शिक्षकाची कर्तव्ये व कार्ये
- शिक्षक परिषद किंवा अध्यापनाचे (निकष) नियमांचे अनुकरण
- आदर्श शिक्षकांचा विश्वास, मूल्ये यांचे अनुकरण
- अध्यापन व्यवसायाच्या अटी व शर्थी चे अनुकरण

८.४.६ शिक्षकांसाठी व्यवसायिक नितीमत्ता :



व्यवसाय, नितिमत्ता शिक्षकांसाठी फार महत्त्वाची आहे व अध्यापनासाठी चिकित्सक आहे. व्यवसायिक नितीमत्ता शिक्षकांच्या वैयक्तिक व व्यवसायिक जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षकाची नैतिकता विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनामध्ये व सूचना देण्यामध्ये व नियंत्रण करणाऱ्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावते. अध्यापन हे तसे अवघड कार्य आहे. ते सोपे करण्यासाठी वर्गामध्ये व वर्गाबाहेर वैयक्तिकरित्या नैतिक उदाहरणे देणे गरजेचे आहे. जेव्हा शिक्षक अध्यापनाच्या स्थिती मध्ये असतात त्यावेळी शिक्षकांनी नैतिकतेची आचारसंहिता समजून घेणे महत्त्वाचे आहे.

वरीलप्रमाणे शिक्षकाने वर्गामध्ये निपक्षपणे सचोटीने नैतिक वातावरण प्रामाणिकपणे विद्यार्थी व सहकाऱ्यांशी व पालकांविषयी असणे महत्त्वाचे आहे.

शिक्षकाने त्याच्या चारित्र्याविषयी, विशेषतः प्रामाणिकपणे, सन्मानजनक, कायदेशीर संयम, जबाबदारी, एकता व जबाबदारी विषयी मजबूत राहिले पाहिजे.

८.४.७ व्यवसायिक (जाणीव) जबाबदारी व शिक्षक :

शिक्षक प्रामाणिकपणे व्यवसायिक जबाबदारी (जाणीव) कार्यरत असताना संबंधितांची विद्यार्थ्यांची वाढ, विकास व अध्ययन जास्तीत प्रमाणात घडून आल्याचे दिसून येते. प्रशिक्षकाचा शाळेमध्ये मुख्य हेतू म्हणजे विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे शिक्षण देणे व त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण करुन विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी जास्तीत अध्ययन क्षमता निर्माण करण्याचे कार्य करणे असतो.

८.४.८ शिक्षणामध्ये नैतिकतेचे तत्त्व :

शिक्षकांची मूल्ये व नैतिक तत्त्वे हा अध्ययनाचा आत्मा आहे. ह्यामध्ये चार मूलभूत मूल्ये पुढीलप्रमाणे -

१) प्रतिष्ठा
२) खरेपणा
३) प्रामाणिकपणा
४) जबाबदारी (जाणीव) व स्वातंत्र्य

सर्व अध्ययन ह्या नैतिकतेमध्ये आढळून येते. अध्ययन हे शिक्षक-विद्यार्थी संबंधी व त्यांचे कार्य ह्यामधून देखील नैतिकता आवश्यक आहे.

नैतिक अध्यापनाची वैशिष्ट्ये :

नैतिक अध्यापनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१. नैतिक विवेचनासाठी कृतज्ञता
२. सहानुभूती
३. ज्ञान
४. तर्क
५. धैर्य
६. आंतर-वैयक्तिक कौशल्ये

८.४.९ चांगल्या शिक्षकाची नैतिकता :

शिक्षकाने त्याची सचोटी, निपक्षपातीपणा व नैतिक वागणूक वर्गामध्ये ठेवली पाहिजे. तसेच शिक्षकाने विद्यार्थी-पालक, सहकारी व समाजाशी त्यांचे नैतिक आचरण चांगले ठेवले पाहिजे. शिक्षकाचे स्वचारित्र्य स्वच्छ प्रामाणिक, कायदेशीर संयमी, समानता, खरे व जबाबदारी जाणीवपूर्वक असे असले पाहिजे.

८.४.१० अ) आचारसंहिता (Code of Conduct) :

- कामाच्या ठिकाणी कर्मचारी व कामगारांनी त्यांची नैतिक कर्तव्ये योग्य वागणूक, क्षमाशील वृत्ती शांतपणे नैतिकतेचे आचरण केले पाहिजे.
- काय करावयास हवे व काय करावयास नको ह्याचा प्रत्यक्षात विचार करावयास हवा.
- कायदेशीर संवेदनशीलतेचे पालन करणे गरजेचे आहे. कायदेशीर पण सेवा शर्थींचे पालन केल्यास पुढे होणारे असंतोष मांडणे, हिंसा टळू शकते.
- नैतिक आचार संहितेचे नैतिक नियम हे औद्योगिक संस्था, समाज, कारखाने, शाळा ह्या ठिकाणी तसेच सर्वत्र मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक कार्यामध्ये मार्गदर्शन करतात.
- नैतिक आचार संहिता आंतरसंबंध दृढ (चांगले) ठेवण्यास मदत करते. जास्तीत जास्त लोकांना चांगली नैतिक आचार संहिता आत्मसात करून त्यांना समृद्ध शांततामय मार्गाने जीवन जगण्यास सहाय्यक आहे.
- शैक्षणिक संस्थांमध्ये बहुपर्यायी, उपक्रम राबवण्यासाठी नैतिक आचारसंहिता व तीची तत्वे वैयक्तिक रित्या काम करण्यासाठी परिणामकारक आहेत.
- एक मनुष्य प्राणी म्हणून मूलभूत सेवा देण्यासाठी नैतिक सेवा मोठ्या प्रमाणात आवश्यक आहे.
- महाविद्यालयाच्या कार्यस्थळी आचारसंहिता म्हणजे कार्यस्थळ सेवा गरजेची आहे.
- चांगल्या नेतृत्वासाठी नेतृत्व नैतिकता हवी आहे.
- विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरणा व सुविधा साठी अध्यापन व्यवसायिक नैतिकता महत्त्वाची आहे.

८.४.१० ब) शिक्षकांसाठी नैतिक आचारसंहिता :



८.४.११ सेवा नैतिकता :

- शिक्षण ही मानवाची मूलभूत मानवी सेवा आहे.
- समाजामध्ये जागृतीसाठी शिक्षण हा लोकांचा मुलभूत अधिकार आहे.

- शैक्षणिक संस्थांमध्ये वैयक्तिकपणे उर्जा व स्त्रोतांचा वापर करुन परिणामकारकपणे शिक्षणाच्या हक्कांची अंमलबजावणी सद्या करण्याचा प्रयत्न जोरदारपणे चालू आहे.

८.४.१२ कार्यस्थळ नैतिकता :

- कोणत्याही कार्यस्थळी मग ते शैक्षणिक असो अथवा औद्योगिक अहिंसा ही नाशास कारणीभूत ठरते.
- शैक्षणिक संस्थेमध्ये प्रत्येकास ज्याला / तिला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे.

८.४.१३ नेतृत्व नैतिकता :

- कामामध्ये सुदृढ नाते संबंध टिकवून ठेवण्यासाठी शैक्षणिक संस्थेमध्ये सर्वांमध्ये समानतेने वागले पाहिजे. हा माझ्या गटाचा तो परका अशी गटबाजी करता कामा नये व तशी गटबाजी दिसून आल्यास वेळीच पायबंद करणे गरजेचे आहे.
- शैक्षणिक संस्थेमध्ये असंतोष असता कामा नये. आनंदाचे व उत्साहाचे व सर्वांना आपलेपणाची वातावरण निर्मिती होणे गरजेचे आहे.
- जास्तीत जास्त उर्जा मिळविण्यास संघ (टिम) मधील प्रत्येकास सतत प्रेरणादायी वातावरणाची नितांत गरज आहे.
- व्यवसायिक व वैयक्तिक संबंधामध्ये एक सीमा रेषा असलीच पाहिजे.
- काम करणाऱ्यास त्याच्या कामाची पोचपावती व त्यास पसंती मान-सन्मान दिला पाहिजे.

८.४.१४ सार्वजनिक जीवनामध्ये नैतिकता :

- समजूतदारपणा व जागृती हे आपले सार्वजनिक जीवन नियंत्रित करण्यास मदत करतात.
- व्यवसाय हा नैतिकतेचा बळावर पुढे नेण्यामध्ये अडचण येत नाही.
- नैतिकतेने कठोर परिश्रम करुन मालमत्ता प्राप्त करता येते म्हणजेच "कठोर परिश्रमास पर्याय नाही".
- आनंदी वातावरण एकाग्रता वाढवण्यास मदत करते.
- राजकारण हे नैतिकतेच्या तत्वांच्या आधारावर असावे.

८.४.१५ अध्यापन व्यवसाय नैतिकता :

- अध्यापन ही सर्व व्यवसायांची जननी आहे.
- इतरांपेक्षा शिक्षकांकडून नैतिक आचारसंहितेचे आचरण मोठ्या स्तरांवर समाजामध्ये शैक्षणिक संस्थांमध्ये अपेक्षित आहे.
- १९८६ चे शैक्षणिक धोरण पुढील तीन प्रकारे शिक्षकांची नैतिक आचारसंहिता नियंत्रित करण्यास सुचविते.

१. प्रोत्साहन - प्रतिबंध

२. नैतिक - सक्ती

३. कायदेशीर - क्रियात्मक

८.४.१६ एक शिक्षक म्हणून आचारसंहिता :

एक शिक्षक म्हणून नेमून दिलेले शैक्षणिक कार्य मग ते अध्यापन, खाजगी शिकवणी, प्रॅक्टीकल (प्रात्यक्षिक) कोणत्याही अभ्यास क्षेत्रातील कार्य शिक्षकाने एकाग्रतेने, मन लावून सतत केले पाहिजे.

- विद्यार्थ्यांच्या हक्कांचा व प्रतिष्ठेचा मान राखला पाहिजे. वर्गाबाहेर सुद्धा त्यांना त्यांच्याकडून कोणतेही मानधन न स्वीकारता त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे.
- मूल्ये व प्रतिष्ठा ह्यांची कास धरुन जगले पाहिजे.
- संप्रेषण (Communication) करताना शिक्षकाने स्वभावाने शांत, संयमी व धैर्याने मानसिक संतुलन ठेवून राहिले पाहिजे.
- आपल्या शिक्षकी व्यवसायाची प्रतिष्ठा जोपासण्यासाठी आपल्या उच्च सदस्यांशी सन्मानाने सहकार्याने, प्रेमाने वागून आपल्या शैक्षणिक संस्थेची प्रतिष्ठा कशी वाढेल ह्याचा विचार केला पाहिजे.
- उपक्रमाच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास काही तरी चांगले करण्यासाठी प्रवृत्त करावे.
- चांगल्या कामगिरीसाठी प्रोत्साहन व वाईट कामगिरीस प्रतिबंध करावा.
- समजा त्यांनी चुकीचे काम केल्यास किंवा बेकायदेशीर कार्य केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कृती शिक्षकांनी करावी.

आपली प्रगती तपासा :

१) आचारसंहितेची व्याख्या स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२) शिक्षकांसाठी नैतिक आचारसंहिता स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

३) शिक्षकांसाठी व्यवसायिक नैतिकता स्पष्ट करा.

४) व्यवसायिक नैतिकतेचे संकल्पना स्पष्ट करा.

५) व्यवसायिक नैतिकतेची गरज स्पष्ट करा.

६) व्यवसायिक नैतिकतेची बांधिलकी स्पष्ट करा.

८.५ संक्रमण काळातील शिक्षकाची भूमिका (शिकवणे (अध्यापन) व सुविधा)

८.५.१ संक्रमण काळातील शिक्षक म्हणजे काय?

संक्रमण काळातील शिक्षक हा विशेष परवानाधारक व विशेष (स्पेशल) शिक्षण-प्रशिक्षण घेतलेला असतो. तो माध्यमिक शाळेत विशेष संक्रमण सेवा व स्त्रोत विद्यार्थ्यांना देण्यासाठी नेमलेला असतो. अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना कशा प्रकारे चांगल्या सेवा देवू शकतो त्यासाठी

अशा विशेष शिक्षकांची गरज असते. अशा विद्यार्थ्यांना करिअर घडविण्याच्या मार्गामध्ये चांगले अध्यापन करुन तो मार्गदर्शन करत असतो.

माध्यमिक (हायस्कूल) मधील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य दिले जाते. अशा विद्यार्थ्यांना प्रौढ संस्थांशी जोडून त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी मदत करतात किंवा त्यांना रोजगाराचे प्रशिक्षण किंवा महाविद्यालयीन शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी संक्रमण काळातील शिक्षक प्रयत्नशील असतात.

दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांना द्वितीय प्राधान्य दिले जाते किंवा (फेल) नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक कार्यक्रम, पर्यायी कार्यक्रमांशी जोडून त्यांना कामाचा अनुभव सुद्धा दिला जातो.

८.५.२ संक्रमण काळातील शिक्षक :

संक्रमण काळातील कार्यक्रमाद्वारे मुख्य उद्देश / ध्येय म्हणजे शिक्षक वैयक्तिकरित्या विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी मदत करीत असतात. जेणेकरुन अशा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सुखी भावना व समाजातील आपण उत्पादक सभासद आहोत ही भावना दृढ होण्यासाठी आयोजन असते.

८.५.३ शिक्षकाची बदलती भूमिका समजून घेणे :

सद्य समकालीन शिक्षक पूर्वकालीन ठळक घटना / प्रसंग ह्यांचा उपयोग शिक्षक आपला दृष्टिकोन, भूमिका, कर्तव्ये व आपल्या व्यवसायाचे स्वरूप वृद्धींगत करण्यासाठी करत असतो.

शिक्षकांच्या अध्यापनाची तयारी, अध्यापनाचा सराव (practice) इतिहासाचे अध्यापन सद्य स्थिती मध्ये कसे परिणामकारकपणे करता येईल ह्यासाठी शिक्षक नेहमी कार्यरत असतो. शिक्षकांच्या भूमिकेचा आकृतीबंध हा शैक्षणिक संस्था, शिक्षणाचे माध्यम, शिक्षकाचे माध्यम, चर्चेचे स्वरूप, शांतता व शिक्षकाच्या संधीशी संबंधित असतो.

८.५.४ वर्गातील संक्रमण काळ :

प्रत्येक वर्गामध्ये दररोज उपक्रम / कृती राबवल्या जातात. वर्ग संक्रमण म्हणजे अध्यापनाचया मार्गदर्शनाखाली तासीकेमध्ये विद्यार्थी गटा-गटाने असतात. किंबहुना शिक्षक विद्यार्थ्यांना प्रत्येक उपक्रमाच्या शेवटी वर्गामध्ये गट तयार करण्यासाठी सांगतात व सुरुवातीपासून शेवटपर्यंत तयारी करवून घेतात. नेहमी दोन कृती / उपक्रमामधील जो वेळ असते ती रिकामी असते. संक्रमणाची नियमानुसार अध्यापन व स्थापना केल्यामुळे विद्यार्थी अध्ययन करु शकतात. कमीतकमी मार्गदर्शनामध्ये वारंवार शिक्षकांना महत्त्व देऊन विद्यार्थी अध्ययन करतात.

८.५.५ संक्रमणाचे महत्त्व :

एका कृती / उपक्रमामधून कृती / उपक्रमाकडे अध्यापना मधील आव्हानात्मक पैलू आहे.

- अध्ययन प्रक्रियेचे फायदे समजून घेण्यासाठी मुलांनी अध्ययन दृष्टीकोन सकारात्मक ठेवून अध्ययन प्रक्रिया व कौशल्ये ह्याविषयी जागरूक राहणे हे त्याचे कर्तव्य आहे.
- आरामशीर / ओघवते व चांगल्या सरावाचे वर्गातील वातावरण असणे फार महत्त्वाचे आहे. ह्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यामध्ये अध्ययन वातावरण निर्मिती, सक्षम, कार्यक्षम व सकारात्मक होते.
- वर्गातील आनंददायी वातावरणामुळे वर्गात वेळेची बचत होते. ह्या वेळेचा उपयोग चांगले अध्ययन होण्यासाठी अध्यपनाच्या प्रक्रियेसाठी, सुचना देण्यासाठी होतो.
- शिक्षकांनी त्याच्या विद्यार्थ्याना समजेल अशा स्वरूपात संक्रमण कौशल्ये शिकवली पाहिजेत.
- जेव्हा विद्यार्थी एका कृती मधून दुसऱ्या पुढील कृतीकडे संक्रमित होत असतो. त्यावेळी वर्गातील इतर उपक्रम / कृतीचा व्यत्यय होता कामा नये.

८.५.६ संक्रमणाची गरज :

- संक्रमण ही त्यांची मुख्य समस्या नसून त्यांच्या आव्हांनाना कसा प्रतिसाद द्यावयाचा हे महत्त्वाचे आहे.
- संक्रमण काळामध्ये अध्ययन फार महत्त्वाचे आहे कारण विद्यार्थी अध्ययनावर अवलंबून असतात.
- जर शिक्षकांनी प्रगत अध्यापन केले नाही तर संक्रमण काळ हा वेळकाढूपणाचा ठरेल.
- सक्षम संक्रमण हे अध्ययन वाढवणारे आहे.
- सक्षम संक्रमण हे वेळेच्या बचती बरोबर वर्गातील वातावरण हे शांत व संयमी ठेवण्यास मदत करते.
- योग्य दिग्दर्शित प्रात्यक्षिक संक्रमण सूचनात्मक वेळ कमी करु शकते.
- योग्य सराव व योग्य नियोजनीत वर्ग संक्रमण सूचनात्मक वेळ वाढविण्यास मदत करते.
- म्हणून प्रवाही योग्य संक्रमण हे वर्गातील अनुकूल अध्ययन वातावरण निर्मितीसाठी महत्त्वाचे आहे.

८.५.७ प्राथमिक - माध्यमिक शाळेतील संक्रमण :



८.५.७ अ) यशस्वी संक्रमणाची तयारी व समर्थन :

बहुतेक प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व पालक माध्यमिक कोणती शाळा चांगल्या दर्जाची आहे ह्यांचा उहापोह करतात. माध्यमिक शाळा निवडी संबंधी शिक्षक-विद्यार्थी व पालक समाविष्ट असतात.

प्राथमिक मधून माध्यमिक यशस्वी संक्रमणासाठी विद्यार्थी तयार असतात. विद्यार्थ्यांकडे असलेल्या ज्ञान व कौशल्यांचा आधारे पुढील स्तर गाठण्यासाठी सज्ज असतात.

८.५.८ औपचारीक व अनौपचारीक संदर्भात :

विद्यार्थ्यांच्या संक्रमण अनुभवा संबंधात एकमत नाही. संक्रमणाचे दोन आकृतीबंध आहेत.

औपचारीक शाळा (शाळेच्या आकारानुसार) विविध शिक्षक, कार्याची घनता ह्यानुसार अनौपचारीक सामाजिक-तुलना प्रणाली : (विविध प्रकारची मुले, वयस्कर, युवक, गरीब-श्रीमंत)

मुले एका क्षेत्रामध्ये यशस्वी होतात चांगले गुण मिळवतात परंतु दुसऱ्या क्षेत्रामध्ये किंवा दोन्ही आकृती बंधामध्ये उच्च गुण मिळू शकतीलच असे नाही. माध्यमिक शाळेतील मुले नेहमी शाळेच्या गुणवत्तेबद्दल सतर्क असतात, माध्यमिक शाळेतील मुले मित्र जोडण्यामध्ये भावना-विवश असतात. किंबहुना ते मित्रांजवळ व्यक्त होत असतात, पालक व शाळा ह्यांच्या मध्ये संप्रेषणासाठी (Communication) एक परिणामकार माध्यम (रेषा) (Lines) असावयास पाहिजे जेणेकरुन शाळा व पालक एकत्रितपणे मुलांच्या फायद्यांचासाठी सक्षमपणे कार्य करु शकतील. संक्रमण काळामध्ये विद्यार्थी इतर गटांकडून आधार (Support) मिळण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात. पालक गृहपाठ (Homework) साठी सन्मानजनक आधार (Support) करीत असतात. माध्यमिक शाळेतील शिक्षक मुलांना यशस्वी संक्रमणासाठी जास्त प्रमाणात उपलब्ध असून ते त्यांना सुविधा देण्यामध्ये सुद्धा पुढे असतात. थोडक्यात मुलांना आधारासाठी शिक्षक नेहमी उपलब्ध असतात. माध्यमिक शाळेतील वातावरणाशी जुळवून घ्यायला व सकारात्मक संबंधासाठी मुले तयार असतात. शिक्षक त्यांची माध्यमिक स्तरांवर चांगल्या प्रकारे महत्त्वाची भूमिका निभावत असतात.

आपली प्रगती तपासा :

१) संक्रमणाची गरज स्पष्ट करा.

२) संक्रमणाचे महत्व स्पष्ट करा.

३) वर्ग संक्रमण म्हणजे काय ?

४) यशस्वी संक्रमण व आधारासाठी लागणारी तयारी विषद करा.

८.६ सारांश

शिक्षकाच्या शिक्षणामध्ये शिक्षकाचे प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकाचे शिक्षण हे शिक्षकाची व्यावसायिक कौशल्ये अद्ययावत करण्यासाठी गरजेचे आहे.

भूमिकेतील शिक्षकाची योजना विद्यार्थ्यांना त्यांची प्रश्न विचारण्याची, आव्हानांसाठी व त्यांच्या विचारसरणी निर्माणासाठी परवानगी देते.

विविध स्तरांमधून शिक्षकांमध्ये व्यावसायिक वाढ व दर्जा वाढ होत असते. सर्व व्यवसायांमध्ये (power) शक्ती आहे. व्यवसायाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

- कौशल्यावर आधारीत थेअरी (theoretical) ज्ञान
- व्यवसायिक संघटना
- कार्य स्वायतत्ता
- व्यवसाय आचारसंहिता व नैतिकता
- उच्च दर्जा व नफा / उच्च परतावा
- लवचिकता

व्यवसायिक वाढ सतत तुमच्या उद्योगामध्ये ठाम राहण्यास मदत करते. ह्यामुळे आत्मविश्वास, प्रामाणिकपणा पत निर्माण करण्यासाठी फायदेशीर आहे.

व्यावसायिक योजनां (plan) चा विकास करुन शिक्षक त्यांची बांधिलकी जन्मभर सतत व्यावसायिक शिक्षण घेऊन ठेवत असतो.

व्यवसायिक नितीमत्ता ही तत्वे मार्गदर्शन व नैतिकतेच्या निकषा संबंधी असते. व्यावसायिक नैतिकता ही अध्यापनामध्ये चिकित्सेकतेसाठी महत्त्वाचा घटक आहे. आणि ही शिक्षकांची वैयक्तिक व व्यवसायिक जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

अध्यापनासाठी महत्त्वाची चार मूल्ये पुढीलप्रमाणे -

- खरेपण सत्यता
- प्रतिष्ठा

- प्रामाणिकपणा
- स्वातंत्र्य व जबाबदारी

शिक्षक स्वत:स बरोबर करण्यासाठी व स्व-समाधान मिळवण्यासाठी व्यवसाय नैतिकता व नैतिकतेची आचारसंहिता ह्यांचा विकास करीत राहतो. शिक्षक स्वत:ची वागणूक सुधारुन, आचरण सुधारुन, व्यक्तिमत्व सुधारुन स्वत:मध्ये सकारात्मक बदल करण्यास व व्यवसायिक समाधान मिळविण्यासाठी मदत हाते.

शिक्षक व शिक्षकांचे शिक्षक स्वत:मध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करुन व विद्यार्थी, पालक, समाज, उच्चपदस्य व व्यवसाय ह्यांच्या कर्तव्याची जाण निर्माण करुन व्यवसायिक नितीमत्तेचा विकास करु शकतात. प्रत्येकाने जीवनमूल्ये दुसऱ्यांस शिकवण्यापेक्षा स्वत:मध्ये जीवनमूल्ये अंगीभूत केल्यास नैतिकतेचा विकास मोठ्या प्रमाणावर होणे शक्य आहे.

सध्या शिक्षकाची भूमिका बहुउद्देशिय आहे. शिक्षक राजकारणी, समाज, महाविद्यालयातील सहकारी, कर्मचारी, (कमिटी मेंबर) कॉलेजमधील उच्च पदस्य ह्यांच्या बरोबर त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पायावर उभा राहण्यासाठी व त्यांचे स्पष्टपणे स्थिरीकरणासाठी काम करीत असतो.

शिक्षक नैतिकतेच्या विकासासाठी सर्वांचा सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या अध्ययनामधील समस्या कमी करीत असतो. शिक्षक, समाज, विद्यार्थी, ह्या सर्वांनी नैतिकतेची आचारसंहिता व नैतिकतेची मूल्ये, तत्वे ह्याप्रमाणे सदैव आचरण केल्यास आचरण करणाऱ्याचे व इतरांचे देखील आयुष्य सुखकर होण्यास निश्चितच मदत होईल. तसेच आपल्या देशाचा नैतिक विकास देखील निश्चितच होईल.

आपली प्रगती तपासा :

१) 'शिक्षकाचे शिक्षण एक व्यवसाय' स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२) व्यवसायाची संकल्पना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

३) आचारसंहिता स्पष्ट करा.

४) व्यवसायिक नैतिकता व शिक्षकांसाठी आचारसंहिता स्पष्ट करा.

५) संक्रमणाची गरज स्पष्ट करा.

६) प्राथमिक व माध्यमिक संक्रमण स्पष्ट करा.

❖❖❖❖

१

शिक्षण आणि संस्कृती

घटक रचना :

१.० उद्देश
१.१ परिचय
१.२ संस्कृतीची संकल्पना
  १.२.१ संस्कृतीचा अर्थ व स्वरूप
  १.२.२ संस्कृतीची वैशिष्ट्ये
  १.२.३ संस्कृतीचे प्रकार
१.३ आधुनिकीकरणाची संकल्पना
  १.३.१ आधुनिकीकरणाचा अर्थ
  १.३.२ आधुनिकीकरणाचे घटक
  १.३.३ आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे
  १.३.४ भारतातील शिक्षण आणि आधुनिकीकरण
१.४ शिक्षण आणि संस्कृती यांच्यातील संबंध
  १.४.१ शिक्षण हे संस्कृतीचे एक साधन
  १.४.२ सांस्कृतिक अंतर
  १.४.३ शिक्षणाचा संस्कृतीवरील प्रभाव
  १.४.५ संस्कृतीचा शिक्षणावरील प्रभाव
१.५ सारांश
१.६ विभागवार अभ्यास

१.० उद्देश

या विभागाचा अभ्यास केल्यावर तुम्ही पुढील गोष्टी करू शकाल.

- संस्कृती व त्यांचे प्रकार यांची व्याख्या करणे.
- संस्कृतीचे जतन, प्रसार व नुतनीकरणामध्ये शिक्षणाच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
- संस्कृती आधारीत अध्यापन शास्त्राची उपयोगिता स्पष्ट करणे.
- शिक्षण आणि संस्कृतीचा आंतरसंबंध समजून घेणे.

१.१ परिचय

आपण मानव फक्त सामाजिक प्राणी नाही तर संस्कृतिक प्राणी सुद्धा आहोत. तथापी आपण या समाजामध्ये राहतो तो जितका भूतकाळातून वंशपरंपरेने आलेला आहे तितकाच आपण त्याला सद्यस्थितीत आकार देतो. यावरून दिसते की समाज हे चलनशील आहे. आपण जोपर्यंत भूतकाळात जात नाही आणि ज्या प्रक्रियेतून वेगवेगळे समाज रूपांतरीत झालेले आहेत त्यांचा अभ्यास करत नाही. तोपर्यंत आपल्याला समाजाचे हे चलनशील अंग सहसा दिसत नाही. प्रत्येक सरल आणि जटील समाजात मानके, निकष रूढी, मूल्ये, श्रद्धा आणि वर्तणुकीचे पंरपरागत मार्ग असतात. जे त्यांच्या सदस्यांच्या वर्तणूक आणि प्राधान्ये यांना आकार देतात. ही वर्तणूक समाजा समाजात आणि युगायुगात वेगवेगळी असू शकते. परंतू ते ती प्रक्रिया दाखवतात ज्याद्वारे सामाजिक वारसा किंवा संस्कृती ही पिढ्या न पिढ्या पुढे पाठवली जाते. संस्कृतीत सामान्यतः शिकलेल्या वर्तणूकीचे नमूने व उत्पादने तसेच समाजाच्या भौतिक वस्तू आणि कलाकृती यांचा समावेश होतो.

या विभागात आपण जाणणार आहोत की, संस्कृती कशी स्थिर नाही आणि बदल ही सततची प्रक्रिया आहे जी समाजाच्या भौतिकतेच्या संदर्भातच नाही तर शैक्षणिक व सांस्कृतिक संदर्भात सुद्धा ओळखली जाऊ शकते. ही गोष्ट आपल्याला संस्कृती आणि शिक्षणाद्वारे त्यात होणारे बदल याविषयीचा अभ्यास करण्याकडे घेऊन जाते. आधुनिकीकरण हा घटक सुद्धा समाज आणि संस्कृतीवर परिणाम घडवितो. याशिवाय आपण शिक्षणाची भूमिका आणि कार्य यांचाही अभ्यास करणार आहोत. जे सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांना आकार देण्यात उत्प्रेरकाची भूमिका बजावतात तसेच सामाजिक विकास व बदलाचा प्रक्रियेत मार्गदर्शन करतात. या भागात आपण संस्कृती आणि आधुनिकीकरणाची संकल्पना तसेच शिक्षण आणि संस्कृतीमधील संबंध जाणून घ्यायचा प्रयत्न करुया.

१.२ संस्कृतीची संकल्पना

प्रथम आपण संस्कृती म्हणजे काय हे समजून घेऊ या. आधी नमूद केल्याप्रमाणे मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. त्यांला जगण्यासाठी आणि अस्तित्वासाठी समाजाची गरज असते. सामाजिक असणे ही पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक अट आहे. उलटपक्षी समाज तो असतो जो लोकांनी बनलेला असतो. परंतू दीर्घकाळपर्यंत एकत्र राहण्यासाठी लोक तोपर्यंत एकत्र येत नाहीत जोपर्यंत त्यांच्यामध्ये सहभागी होण्यास समानता नसते. या समानतेत समान सांस्कृतिक वैशिष्ट्ये, समान अधिवास क्षेत्र आणि वेगळी ओळख यांचा समावेश होतो. अशाप्रकारे आपण म्हणून शकतो की समाज ही एक अशी स्वतंत्र अस्तित्व असलेली गोष्ट आहे जी अशा व्यक्तींच्या गटाने बनलेली असते जे वेगळ्या संस्कृतीत सहभागी होतात आणि त्या संस्थांमधून भरभराट पावतात. ज्याद्वारे त्यांना त्यांच्या अस्तित्वाची खात्री पटते आणि त्या क्षेत्रात प्रगती करतात ज्यात ते ओळखायला शिकतात.

E.B. Taylor नुसार "संस्कृती ही अशी जटील संपूर्णता आहे ज्यात समाजाचा घटक म्हणून मानवाने संपादीत केलेल्या इतर क्षमतांसोबत ज्ञान, श्रद्धा, कला, नैतिकता, कायदा, रूढी यांचा समावेश होतो."

१.२.१ संस्कृतीचा अर्थ व स्वरूप :

व्याख्या :

सर्वसामान्य भाषेत संस्कृती म्हणजे चांगले शिष्टाचार व चांगले वर्तन.

E.B. Taylor नुसार "संस्कृती ही अशी जटील संपूर्णता आहे ज्यात समाजाचा घटक म्हणून मानवाने संपादीत केलेल्या इतर क्षमतांसोबत ज्ञान, श्रद्धा, कला, नैतिकता, कायदा, रूढी यांचा समावेश होतो."

Ellwood म्हणतो की, "संस्कृतीमध्ये मानवाच्या सर्व भौतिक सभ्यता, साधणे, शस्त्रे, वस्त्र, निवारा, यंत्रे आणि उद्योगपद्धती सुद्धा समाविष्ट आहेत."

Brown नुसार भौतिक आणि अभौतिक हे दोघेही एकमेकांवर अवलंबून असतात. परंतू संस्कृतीची व्याख्या केली जाऊ शकत नाही तिचे वर्णन करणे अधिक चांगले आहे.

लोकांची संस्कृती म्हणजे त्या लोकांचा जिवनाचा मार्ग, ते लोक किंमत करत असलेल्या गोष्टी, ते लोक किंमत करत नसलेल्या गोष्टी, त्यांच्या जीवनाच्या सवयी, त्यांच्या कलाकृती, ते काय करतात आणि त्यांना काय आवडते हे होय. भौतिक गोष्टी म्हणजे मानवी भौतिक सभ्यता, शस्त्रे, अस्त्रे, कपडेलत्ते यंत्रे व उद्योग या सर्व बाबी आणि अभौतिक घटक म्हणजे भाषा, कला, धर्म, नैतिकता, कायदा आणि सरकार.

विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८-४९ संस्कृतीची व्याख्या अशी करतो की, "मनाचा दृष्टीकोन आणि आत्म्याचा कल." T.S. Eliot नुसार "संस्कृती या संज्ञेत लोकांचे सर्व वैशिष्ट्यपूर्ण क्रियाकलाप आणि आवड यांचा समावेश होतो."

महात्मा गांधीजींनी संस्कृतीची व्याख्या पुढील शब्दात केली आहे. "संस्कृती हा पाया आहे, एक प्राथमिक गोष्ट आहे. ती तुमच्या अगदी लहान सहान वर्तनात आणि तुम्ही कसे बसता, कसे चालता, कसे कपडे परिधान करता वगैरे व्यक्तित्व वर्तनात प्रतिबिंबीत व्हायला हवी. आंतरिक संस्कृती ही तुमचे भाषण, ज्या पद्धतीने तुम्ही पाहुण्यांना वागवतात आणि एकमेकांशी व तुमच्या शिक्षक व वडिलधाऱ्यांशी वागतात यातून प्रतिबिंबीत व्हावी."

संस्कृती, शिक्षण, समाज आणि व्यक्तिमत्व हे एकमेकांशी संबंधीत आहे. कारण संस्कृती व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करते आणि सामाजिक संस्कृतीच्या प्रकारानुसार शिक्षणाचा प्रकार प्रभावित होतो. समाजात शिक्षणाचे स्त्रोत हे सुद्धा शाळेपेक्षा वेगळे असतात.

संस्कृती म्हणजे निकष आणि मानकांची पद्धती जी समाज बऱ्याच पिढ्यांच्या कालावधीत विकसीत करतो आणि जी त्या समाजातील लोकांच्या दैनंदिन वर्तनावर खोलवर परिणाम करते.

संस्कृतीचा मुख्य उद्देश म्हणजे समाजाला अध्ययन व अनुभवाच्या जाणीवपूर्वक प्रक्रियेद्वारे वर्तणुकीचे असे आकृतीबंध प्रधान करते जे सर्व व्यवसाय आणि सुसंवादात सुमधुर अस्तित्व आणि सुरळीत कामकाजासाठी उपयोगी सिद्ध होते.

१.२.२ संस्कृतीची वैशिष्ट्ये :

- संस्कृती सामाजिक असते; ती एकांतात अस्तित्वात असणार नाही ती समाजाची निर्मिती आहे. ती सामाजिक देवाणघेवाणीतून विकसित पावते. कुठलाही मनुष्य इतरांशी देवाण घेवाण न करता संस्कृती प्राप्त करुन घेऊ शकणार नाही.
- संस्कृती ही व्यक्तीकंडून एकसारखी वाटून घेतली जाते. ही गोष्ट अशी नाही जी एकट्याची असू शकेल. संस्कृती ही सामाजिक जाण आहे जी वाटून घेतली जाते. जसे समाजातील लोकांद्वारे रूढी, परंपरा, श्रद्धा, कल्पना आणि नैतिक गोष्टी या वाटून घेतल्या जातात.
- संस्कृती ही शिकून येणारी बाब आहे. ती जन्मजात येत नाही ती शिकावी लागते. संस्कृतीला "वर्तणूकीचे शिकलेले मार्ग असेही बऱ्याचदा म्हटले जाते." जे शिकून आलेले वर्तन नाही ती संस्कृती नाही.
- संस्कृती ही पिढ्यांपिढ्यांपासून संक्रमित केली जाते. भाषा हे शिक्षणाचे मुख्य वाहन आहे. वेगळ्या स्वरूपातील भाषेमुळे सध्याच्या पिढीला आधीच्या पिढीची कामगिरी समजणे शक्य होते. संस्कृतीचे संक्रमण हे प्रजननाद्वारे तसेच सुचनांद्वारे घडून येऊ शकते.
- संस्कृती ही गतीशील आहे. संस्कृती ही स्थिर नाही ती भौतिक जगाच्या बदलत्या परिस्थितीशी प्रतिसादात्मक आहे म्हणून ते गतिशील आहे.
- संस्कृती ही समाजासमाजात बदलते. प्रत्येक सरल किंवा जटील समाजाची स्वत:ची अशी संस्कृती असते ती समाजा समाजात बदलते. प्रत्येक समाजाची संस्कृती ही एकमेवाद्वीतीय असते.
- संस्कृती ही निरंतर आणि सामुहिक असते. संस्कृती ही निरंतर प्रक्रिया म्हणून अस्तित्वात असते. तिच्या ऐतिहासिक वृद्धीत ती संचित बनत जाते. समाजशास्त्रज्ञ लिंटन संस्कृतीला "मानवाचा 'सामाजिक वारसा' म्हणतात."
- संस्कृती जवळ अनुकुलीत व एकात्मिक गुण असतो.
- संस्कृती ही आदर्श तत्वे निकष आणि व्यक्तींची मुल्ये दर्शविते.
- सांस्कृतिक वर्तणूक जीवनाचा मार्ग बनते.



आकृती १.१ संस्कृती

"समाजाचा घटक म्हणून लोकांजवळ जे काय असते, ते विचार करतात आणि कृती करतात."
संस्कृती सापेक्ष आहे.

१.२.३ संस्कृतीचे प्रकार :

संस्कृतीचे विविध प्रकार आहेत.

- वैयक्तिक संस्कृती
- जातीय संस्कृती
- राष्ट्रीय संस्कृती
- जागतिक संस्कृती

प्रत्येक व्यक्तीची काही वैयक्तिक वैशिष्ट्ये आणि गुण असतात जे त्या व्यक्तीच्या सवयी विचारसरणी आणि वर्तणूकीला मार्गदर्शन करतात. या व्यक्तिगत आवडी-निवडी, रूची, विचार करण्याच्या पद्धती आणि सामाजिक वर्तणूकीचे प्रकार याद्वारे त्या व्यक्तीची-वैयक्तिक संस्कृती बनते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या समुदायाच्या वेगवेगळ्या रूढी, परंपरा, श्रद्धा आणि जीवनशैली असतात ज्याला–जातीय संस्कृती म्हणतात. अशाचप्रकारे प्रत्येक देशाचे स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण असे आदर्शतत्व, मूल्ये, विचार व वर्तणूकीचे प्रकार असतात. अशा राष्ट्रीय वैशिष्ट्यांना-राष्ट्रीय संस्कृती संबोधले जाते. याहून अधिक म्हणजे परिवहन व दळणवळणाची साधने वाढल्याने सर्व जग हे छोट्याशा गटात संकूचीत झाले आहे. संपूर्ण जगाजवळ सहयोग, सहानुभूती, समाजसेवा, सामाजिक जागरूकता आणि सामाजिक संवेदनशीलता ही सामाईक जीवनमूल्ये आहेत असे समजले जाते. ज्याला–जागतिक संस्कृती असे म्हणतात.

समाविष्ट असलेल्या गोष्टीवरून प्रत्येक समाजातील संस्कृतीचे दोन प्रकार आहेत.

- भौतिक संस्कृती (मूर्त संस्कृती)
- अभौतिक संस्कृती (अमूर्त संस्कृती)

- **भौतिक संस्कृती :** यामध्ये मानवाने त्याच्या भौतिक कल्याणासाठी निर्माण केलेल्या सर्व मानवनिर्मित गोष्टी व वस्तूंचा समावेश होतो. उदा. कपडे, भांडी, टीव्ही, रेडिओ, वेगवेगळ्या मशिनी.
- **अभौतिक संस्कृती :** यामध्ये व्यक्तीच्या वर्तणुकीत बदल घडवून आणणाऱ्या आदर्श तत्वे, दृष्टीकोन आणि मूल्यांचा समावेश होतो. भाषा, साहित्य, कला, संगीत, धर्म, रूढी, परंपरा इत्यादी ही अभौतिक संस्कृती काही उदाहरणे आहेत.

कृती १.१

भारतातील वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या अभौतिक सांस्कृतिक गटांची यादी करा.

आपली प्रगती तपासा :

१) संस्कृतीची तुमच्या शब्दात व्याख्या करा.

२) भौतिक संस्कृती म्हणजे काय ? एक उदाहरणासह स्पष्ट करा.

३) संस्कृती ही जीवनाचा एक मार्ग आहे हे स्पष्ट करा.

१.३ आधुनिकीकरणाची संकल्पना

१.३.१ आधुनिकीकरणाचा अर्थ :

आधुनिकीकरणाची घोषणा ही जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात निनादत आहे, ही प्रक्रिया पारंपारिक समाजापासून आर्थिक, राजकीय, मानसशास्त्रीय आणि शिक्षण क्षेत्रातील आधुनिकतेतील बदलाची आहे. आधूनिकीकरण ही फक्त एक संकल्पना नाही तर तो एक प्रतिसाद आहे. व्यक्ती त्याला कसा प्रतिसाद देतात ते महत्त्वाचे आहे ते म्हणजे समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक प्रगत रुपांतरण आहे. आधुनिकीकरण जी सामाजिक आर्थिक आणि राजकीय पद्धतीतील विकासाशी संबंधीत बदलाची प्रक्रिया आहे. ती आता फक्त एक संकल्पना राहिलेली नाही. तर तो आपला विचार आपली जाण बनलेली आहे. जेव्हा आपण आधुनिकीकरणाविषयी बोललो तेव्हा त्याचा संबंध जीवनशैलीतील बदल (अधिक चांगली जीवनशैली), दळणवळण, साक्षरता, निवासातील बदल, व्यवसाय इ. यांच्याशी असतो. आधुनिकीकरण आपल्याला बोलण्याकडून चँटींगकडे, चटईकडून टेबलाकडे बलुतेदारी पद्धतीकडून ऑनलाईन शॉपिंगकडे इ. घेऊन जात आहे. शिक्षणाशिवाय या गोष्टीला स्पर्श केला जाऊ शकत नाही. शिक्षणाचा भारतातील आधुनिकीकरणावर जबरदस्त प्रभाव आहे.

कोठारी संक्रमण आयोगाने आधुनिकीकरणाच्या संक्रमण समस्येवर चर्चा केली आणि तोडगा दिला. संक्रमण समस्येवरील एकमेव उपाय म्हणजे वेगाने पुढे जाणे आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेच्या पूर्ण परिणामावर आधारित नवीन संतुलन निर्माण करणे.



आकृती १.२ : आधुनिकीकरणाचे पैलू

स्वतःच्या संस्कृतीतून शिक्षणाचा विकास साधण्यासाठी शिक्षणाचे आधुनिकीकरण आणि सांस्कृतिक पुनरूत्थान गरजेचे आहे. भारत नवीन पुर्नजागरणाच्या वचनासह एक पाऊल पुढे टाकत आहे. पुनरूत्थान आणि आधुनिकीकरणाच्या या प्रक्रियेत सर्वात शक्तीशाली साधन म्हणजे एका बाजूला नैतिक आणि अध्यात्मिक मुल्यांवर आधारित शिक्षण तर दुसऱ्या बाजूला विज्ञान आणि तंत्रज्ञान आहे.

या संदर्भात पंडित जवाहरलाल नेहरूंनी सांगितल्यापेक्षा अधिक चांगले आपण करू शकत नाही. "विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती आणि मन आणि आत्म्याची प्रगती यांचा आपण संयोग करू शकतो का?" आपण विज्ञानाशी अप्रामाणिक असू शकत नाही कारण ती सद्यस्थितीतील जीवनाची मुलभूत बाब आहे. तसेच युगा न युगापासून भारत ज्या अत्यावश्यक तत्वांना जोपासत आला आहे त्यांच्याशी तरी आपण अप्रमाणिक होऊ शकणार नाही. तर मग आपण औद्योगिक प्रगतीच्या मार्गाचा आपल्या सर्व शक्ती व सामर्थ्यानिशी पाठपुरावा करूया. पण त्याच वेळेस लक्षात ठेऊ या कि संयम, करुणा आणि शहाणपणाशिवाय भौतिक समृद्धी मातीमोल होऊ शकते. म्हणून भूतकाळाच्या प्रकाशात, बहुसांस्कृततेच्या प्रभावाच्या संदर्भात आणि व्यक्ती आणि समाजाच्या भावी गरजांच्या प्रकाशात शिक्षणाने संस्कृती नवीन पिढीकडे संप्रेक्षित करावी आणि तरूण वर्गाचा जीवनाप्रती असलेल्या दृष्टीकोन रूपांतरीत करावा.

१.३.२ आधुनिकीकरणाचे घटक :

आधुनिकीकरणाचे बरेच घटक आहेत त्यांची चर्चा पुढीलप्रमाणे -

१) शिक्षणाचे जागतिकीकरण - भारतीय राज्यघटना ही समाजाच्या गरजांच्या पूर्ततेसाठी शिक्षणाच्या जागतिकीकरणावर भर देते. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा उद्देश हा सार्वत्रिक साक्षरतेवर आहे.

२) भारतातील लोकशाही शिक्षणाचे विकेंद्रीकरण - आपल्या देशाने लोकशाही प्रशासनातील विकेंद्रीकरणाचा अवलंब केला आहे यामध्ये शिक्षण ही एक महत्त्वपूर्ण बाब म्हणून समाविष्ट आहे. लोकशाही दृष्टीकोन हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सहिष्णुता दर्शवितो. कायद्यासमोर प्रत्येक जण समान आहे.

३) शहरीकरण - भारतातील लोकसंख्येची जलद वृद्धी ही शहरीकरणाकडे नेत आहे. शहरी भागातील लोकांना अधिक चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील लोक हे शहरी भागात स्थलांतरीत होतात. खेडूत लोक हे शहराच्या मोहक दुनियेकडे आकर्षिले जातात आणि शहरीकरणाची समस्या वाढते.

४) विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती - दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे लोक जीवनाच्या पारंपरिक पद्धती, शेती व परिवहनाची धोरणे (पारंपरिक) यात बदल किंवा त्याग करतात. पूर्वीच्या काळी भारतातील बहुतांश लोक हे खेड्यातील कच्च्या घरात जुन्या पद्धतीने राहायचे आणि ते त्यांची जमीन नांगरानी कसायचे आणि बैलगाडी ने प्रवास करायचे. आता परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे कारण लोक आता प्रगत घरामध्ये राहतात आणि त्यांच्या शेतीची मशागत ट्रॅक्टर आणि शेतीच्या आधुनिक पद्धतींद्वारे करतात. आता लोक प्रवासासाठी विमान आणि अतिजलद आगगाडी या पद्धतीचा वापर करतात. दुसऱ्या शब्दात याचाच अर्थ म्हणजे लोक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाचा आधुनिक पद्धती वापरत आहे.

५) औद्योगिकीकरण - पूर्वीच्या काळी लोक हातमागावर कापड विणायचे. पारंपारिक पद्धतीने राहायचे आणि व्यवसायाचे जुने नमुने आणि रहिवासाचे जुनेच ठिकाणे वापरायचे. देशाच्या औद्योगिकीकरणाने लोक त्यांच्या पारंपारिक, ग्रामीण आणि शेतकी अर्थव्यवस्थेचा त्याग करतात आणि त्यांची जागा औद्योगिकीकरणाने घेतली जाते. नवनवीन कारखाने आणि गिरण्या दररोज उदयास येतात आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरतात.

६) वैज्ञानिक दृष्टीकोन - वैज्ञानिक दृष्टीकोन असलेली व्यक्ती ही मुक्त विचारसरणीची व निर्णायक विचारसरणीची असते. समस्या सोडवण्यासाठी ती व्यक्ती सुनियोजित प्रक्रिया अवलंबिते.

७) ज्ञानाचा विस्फोट - विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. माणसाने यंत्रे, संगणक, बिनतारी उपकरणे आणि दळणवळणाचे आधुनिक साधने वापरण्यास सुरुवात केली आहे.

८) आधुनिकीकरणामुळे बदलांमध्ये विश्वास आणि खात्री घडून येते.

९) अंधश्रद्धेच्या निराकरणाने आधुनिकीकरण घडले आहे.

१०) मानवाचा आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन

१.३.३ आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे :

भारतात प्रभावी आधुनिकीकरणाच्या मार्गात बरेच अडथळे आहेत.

१. तत्वे आणि प्रत्यक्ष व्यवहार्यता यांच्या दरम्यान खूप मोठी दरी आहे. सिद्धांत आणि लोकांची प्रत्यक्षकृती यादरम्यान मोठी दरी आधुनिकीकरणाच्या मार्गात आडवी येते.

२. लेखन विरूद्ध यश पेचप्रसंग

३. सांस्कृतिक परंपरेचा ताण बरेच रूढीप्रिय लोकांना जलद बदलत्या सामाजिक व्यवस्थेशी जुळवून घेणे कठीण जाते.
४. अपेक्षा व बक्षिसांची विखुरलेली प्रणाली
५. श्रेणीबद्ध स्तरीकरणाची कठोर प्रणाली
६. संकुचित, धार्मिक श्रद्धा, रूढी आणि परंपरा
७. विधायक दृष्टीकोनाचा अभाव
८. देशातील एकात्मतेची कमीपणाची भावना
९. विविधता
१०. गरीबी
११. निरक्षरता
१२. जातीवाद

भारताच्या संदर्भात आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी साहित्य आणि भौतिक बक्षिसे यांच्या दरम्यान संतुलन आवश्यक आहे.

१.३.४ भारतातील शिक्षण आणि आधुनिकीकरण :

१) शिक्षणाची उद्दिष्ट्ये :

आधुनिकीकरणाच्या वरील घटकांच्या संदर्भात शिक्षणाच्या उद्दिष्टांना वेगळ्याप्रकारे बघण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासेसह ज्ञान रूजवणे आणि विधायक दृष्टिकोनाची आवडमूल्ये विकसित करणे गरजेचे आहे.

२) विज्ञान आधारित शिक्षण :

विज्ञान आधारित शिक्षण हा शालेय अभ्यासक्रमाचा अविभाज्य घटक बनायलाच हवा. विज्ञानाचा काही अभ्यास हा सर्व अभ्यासक्रमाचा जसे विद्यापीठ स्थरावरील मानवता, भाग बनायला हवा. विज्ञान शिकवण्याचा दर्जा वाढावयास हवा आणि त्याद्वारे जिज्ञासा व प्रयोगशिलता त्यांची भावना विकसित व्हायला हवी.

३) शिक्षणाचे व्यावसायीकरण :

व्यावसायिक विषय आणि संशोधनावर अधिक जोर द्यायलाच हवा.

४) जनशिक्षण :

शिक्षित आणि कुशल नागरीक निर्माण करणे आणि शक्य तितक्या लवकर समाजाला आधुनिक बनवण्यासाठी पुरेसा बुद्धीजीवी वर्ग प्रशिक्षित करणे अत्यंत गरजेचे आहे.

५) सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्यासाठी शिक्षण :

ही आधुनिकीकरणासाठीची पूर्व अट आहे.

६) कुशल मनुष्यबळाचा विकास :

शेती, उद्योग, आणि जीवनाच्या इतर क्षेत्रासाठी संबंधीत संशोधन आणि पद्धतशीर अनुप्रयोगासाठी गरजेचे असलेले कुशल मनुष्यबळ हे फक्त वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान विषयक शिक्षणाच्या विकासापासून येऊ शकते.

७) शिकविण्याची गतिशील पद्धती :

आधुनिक समाजात लोक हे एखादी गोष्ट जाणून घेण्याच्या संकल्पनेऐवजी काहीतरी कृतीशीलपणे शोधले जाण्याविषयी सजग असतात.

८) विज्ञान आणि अध्यात्मातील सुसंवाद :

भौतिक संपन्नता व सामर्थ्य यांच्या पाठपुराव्याचा उच्च मुल्यांशी मेळ घातला जावा.

भारत नवीन पुर्नजागरणाच्या वचनासह एक पाऊल पुढे टाकत आहे. पुनरूत्थान आणि आधुनिकीकरणाच्या या प्रक्रियेत सर्वात शक्तीशाली साधन म्हणजे एका बाजूला नैतिक आणि अध्यात्मिक मुल्यांवर आधारीत शिक्षण तर दुसऱ्या बाजूला विज्ञान आणि तंत्रज्ञान आहे.

कृती १.२

भारतातील आधुनिकीकरणाच्या कारणीभूत घटकांची यादी करा.

आपली प्रगती तपासा :

१) आधुनिकीकरणाचा अर्थ काय ?

२) शिक्षण आणि आधुनिकीकरणाच्या संबंधाद्वारे तुम्ही काय जाणता ?

३) आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे स्पष्ट करा.

१.४ शिक्षण आणि संस्कृती यांच्यातील संबंध

संस्कृती ही अशी संकल्पना आहे जी शिक्षणाचा स्पर्श झाल्याविना संरक्षित संप्रेशित आणि वृद्धींगत केली जाऊ शकत नाही. शिक्षण हे सामाजिक बदल आणि सामाजिक नियंत्रणाचा दुवा म्हणून कार्य करते. शिक्षण आणि संस्कृतीमध्ये परस्पर संबंध आहे.

१.४.१ शिक्षण हे संस्कृतीचे एक साधन :

संस्कृतिचे साधन म्हणून शिक्षणाचे तीन कार्य आहे.

अ) संरक्षण

ब) संप्रेषण

क) संस्कृतीचे पुर्ननविकरण

संस्कृतीच्या संदर्भात शिक्षण ही पारंपारिक वंशपरंपरागत आणि समकालीन नूतनीकरण केलेली मूल्ये आणि श्रद्धा जी संस्कृतीच्या गाभ्यात दडलेली आहे, ती तरूण मुलांवर बिंबवण्याची प्रक्रिया आहे. शिक्षणाची ही भूमिका सांस्कृतिक शिक्षणाचा हेतू ठेवून आहे. शिक्षणाचे कार्य हे पिढ्यान पिढ्या संस्कृतीचे संरक्षण व संप्रेषण करणे आहे असे समाजशास्त्रज्ञ सहसा मानतात. समाजात संस्कृती टिकवण्यासाठी व स्मरणात राहण्यासाठी शाळा ही प्रौढ पिढीद्वारा गुंफलेली एक प्रमुख संस्था आहे.

जगण्यासाठी आवश्यक साधने देण्याव्यतिरिक्त ते पुढील पिढीला ज्ञान आणि मुल्ये संप्रेशित करते. समाजाची मूल्ये, श्रद्धा आणि दृष्टिकोन हे फक्त त्यांच्याविषयी शिकविण्यानेच नव्हे तर संस्कृतीच्या अत्यावश्यक भागाच्या मागणीनुसार शिक्षणाची पूर्ण प्रक्रिया पुन:प्रस्थापित करून सुद्धा टिकवली जातात आणि पुढच्या पिढीकडे पाठवली जातात.

आधुनिकतेच्या प्रवाहाखाली बदलत्या काळाला अनुसरून श्रद्धा, मुल्ये, शिष्टाचार, समाजाचा दृष्टिकोन आणि व्यक्ती व गटांच्या वागणूकीच्या निकषात बदल घडवून आणून शिक्षण हे संस्कृतीच्या वाढीत पुरेसे योगदान देते.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीया आणि जातीव्यवस्था प्रती असलेल्या दृष्टिकोनात दृश्य बदल घडून आलेला आहे. जुन्या रूढी व विधींमधील विश्वासाने उत्तरोत्तर त्यांची ताकद व तीव्रता गमावलेली आहे.

शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणाने (१९८६) सुद्धा शिक्षणाचे हे तीन कार्य म्हणजे संरक्षण संप्रेषण आणि पुनर्नविकरण प्रकर्षाने मांडले आहे. त्यांने जोर दिला आहे की शिक्षण हे बदलानुवर्ती तंत्रज्ञान आणि देशाच्या संस्कृत परंपरेची सलगता यामधील सुक्ष्म संयोग आहे.

शिक्षणाचा अभ्यासक्रम आणि प्रक्रिया ही शक्य तितक्या जास्त प्रकटीकरणात संस्कृतिक सामग्रीद्वारे समृद्ध व्हायलाच हवी. शिक्षणाची भूमिका संचलनाची असते जेणेकरून वैज्ञानिक स्वभाव, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाहीतील विश्वासाच्या विकासाकरीता व्यक्तीच्या संवेदनशीलता व जाणीवेला शुद्ध करणे.

कृती १.३

शैक्षणिक संस्थांचे निरिक्षण करा आणि शिक्षण व संस्कृतीचे पाये ओळखा.

१.४.२ सांस्कृतिक अंतर :

लोक फक्त समाजाच्या चिरस्थायीपणाशीच नव्हे तर त्याच्या सुधारणेशी संबधीत आहे, शाळा ही समाजाचा आरसा नाही जेथे समाजाचे विश्वास, श्रद्धा, परंपरा, रूढी प्रतिबिंबीत होतील. शाळेने विशिष्ट समाजातील आढळणाऱ्या परंपरा, मूल्ये, श्रद्धा आणि प्रवृत्तीच्या तपासणीसाठी प्रयोगशाळा म्हणून कार्य करावयास हवे आणि समाजाला एक चांगल्या स्थितीत नेण्यासाठी कार्य स्विकारायला हवे हे आपल्याला पुढील समस्यांपर्यंत आणून ठेवते.

- सांस्कृतिक अंतराचे निराकरण आणि
- आदर्श समाजाचे नियोजन

सांस्कृतिक अंतर म्हणजे संस्कृतीचे काही घटकांचे त्यांच्याशी संबंधीत इतर आशयातील बदलांच्या मागे पडण्याचे प्रमाण दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे भौतिक आणि अभौतिक संस्कृतीमधील प्रचंड फरक म्हणजेच सामाजिक किंवा सांस्कृतिक अंतर होय. आपल्या आधूनिक संस्कृतीचे सर्व अंग त्याच गतीने बदलत नाही आहेत आणि हे अंग परस्पर संबंधी किंवा परस्परावलंबी असल्याने एका भागातील जलद बदलासाठी विविध संबंधीत भागातील इतर बदलांद्वारे पुनर्समयोजन गरजेचे आहे.

जेव्हा समाजाचे वेगवेगळे घटक त्याच्याच काही भागातील घडून आलेल्या बदलांशी जुळवून घेण्यास अयशस्वी होतात तेव्हा सांस्कृतिक अंतर घडते. उदा. कल्पना श्रद्धा आणि मूल्य पद्धतीतील बदल हे भौतिक परिस्थितीतील बदलांपेक्षा संथगतीने घडून येतात. आपल्या समाजात अर्थव्यवस्था ही झपाट्याने वाढत आहे, औद्योगिक अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची जागा घेत आहे. यंत्राद्वारे खूप सारे कार्य केले जात आहे किंवा आपण म्हणून शकतो की मानवी मजुरांची जागा यंत्रे घेत आहेत. परंतु आर्थिक रचनेतील बदलानुसार धार्मिक आणि सामाजिक रचना बदलत नाही आहेत. सांस्कृतिक अंतर भरून काढण्यासाठी शिक्षण हा एकमेव घटक किंवा साधन आहे.

१.४.३ शिक्षणाचा संस्कृतीवरील प्रभाव :

संस्कृती आणि शिक्षण हे दोन्ही विविध बाबतीत परस्पर पुरक व भरपाई करणारे आहेत. पुढील संकल्पना शिक्षणाचा संस्कृतीवरील प्रभाव.

१) संस्कृतीचे जतन :

प्रत्येक समाजाचे स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते म्हणून तो त्याची संस्कृती आणि तिचे वेगळेपण मुळ स्वरूपात टिकविण्याचा प्रयत्न करतो. शिक्षण हे एकमेव साधन आहे ज्याद्वारे हे कार्य पूर्ण केले जाऊ शकते. अशाप्रकारे शिक्षण हे समाजातील संस्कृतीचे जतन करते.

२) संस्कृतीचे संप्रेषन (पिढी दर पिढी) :

सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ ओट्टाचे यांनी परिभाषित केल्यानुसार 'शिक्षणाचे कार्य म्हणजे सामाजिक मूल्ये आणि आदर्श तत्वे ही तरूण आणि समाजाच्या सक्षम सदस्यांकडे संप्रेषित करणे होय.'

३) संस्कृतीचा विकास :

शिक्षणाचे कार्य म्हणजे ज्याशिवाय सामाजिक प्रगती घडून येऊ शकत नाही अशा सांस्कृतिक आदर्श आणि तत्वातील बदल हे समाजाची प्रगती आणि सततच्या विकासासाठी गरजेनुसार घडवून आणणे, शिक्षण हे व्यक्तीला सुसंस्कृत बनवते आणि मानवी गरजांच्या सर्व क्षेत्रांमधील संशोधन आणि सखोल तपासांद्वारे सांस्कृतिक प्रक्रिया रूपांतरीत करते.

४) संस्कृतीचे सातत्य :

संस्कृती म्हणजे समाजाचे जीवन आहे. याच्याविना समाज कुजू लागतो. शिक्षण हे त्याच्या विविध कृती आणि कार्यक्रमांद्वारे संस्कृतीचे सातत्य नियंत्रित करते. एक समाज हा येणाऱ्या पिढ्यांसाठी संस्कृतीचे जतन व संप्रेषण करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन करतो. विविध संस्कृतीतील सांस्कृतिक संवादापासून अधिकाधिक शिकण्यासाठी मुलांना प्रेरीत करायला हवे. अशाप्रकारे सांस्कृतिक एकीकरणाने समाजाची संमिश्र संस्कृती समृद्ध होईल.

५) व्यक्तीमत्व विकास :

शिक्षणाचा उद्देश मुलाच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे होय. विचारसरणी, प्रवृत्ती आणि सांस्कृतिक मुल्यांचे विविध सांस्कृतिक नमुने अमलात आणते जेणेकरुन मुले ही समाजाच्या विकासासोबत अधिक प्रमाणात शारीरिक रित्या, मानसिक रित्या, नैतिक रित्या, सामाजिक रित्या आणि बौद्धिकरित्या विकसित होतील.

६) सांस्कृतिक अंतराचे निराकरण :

वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानविषयक प्रगतीमुळे भौतिक संस्कृती ही जलद गतीने विकसित पावते तर कल्पना मुल्ये आणि निकष असलेली अभौतिक संस्कृती ही मागे पडते आणि त्यामुळे त्या दोघांदरम्यान दरी निर्माण होते. शिक्षण हे एकमेव साधन आहे. ज्याद्वारे ही पोकळी भरून काढली जाऊ शकते.

अशाप्रकारे शिक्षण आणि संस्कृती हे परस्परावलंबी आणि परस्परपुरक आहे तथापी भारतातील सध्याची शिक्षण पद्धती ही तिच्या स्वत:च्या संस्कृतीपासून विकसीत झालेली नाही. शिक्षण आपल्या संस्कृतीशी संबंधित असणे गरजेचे आहे, आपली शिक्षण पद्धती ही सांस्कृतिक वारश्याची संबधीत नाही. कुणीतरी अगदी अचूकच म्हटले आहे, "शिक्षणाची सध्याची पद्धती ही मुख्यत्वे करुन विस्तारणाऱ्या पाश्चात्य विज्ञान व साहित्याची तत्वे, लोकसंख्येच्या छोट्या गटाची जीवनपद्धत आणि सरकारच्या अधिपत्याखाली सेवांसाठी व्यक्ती प्रशिक्षित करणे यावर आधारीत आहे. ही पद्धती अजूनसुद्धा शिक्षण आणि पुस्तक केंद्रित आहे आणि योग्य दिशेने सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक किंवा राजकीय विकास करण्यात अयशस्वी ठरत आहे." भारतातील सांस्कृतिकवारसा विचारात न घेता भारतात एक परकी शिक्षण पद्धती सुरु केली गेली ती भारतीय सांस्कृतिक परंपरेपासून कापली गेली आहे आणि जनतेसाठी तिऱ्हाईत आहे. शिक्षणाचे पुनर्गठन हे स्वातंत्र्यापासूनच आव्हानात्मक कार्य राहिलेले आहे.

एक प्रख्यात शिक्षण तज्ज्ञ के.जी. सैयुद्दीन यांच्यानुसार "आज आपण आपल्या इतिहासाच्या एक मोठ्या चौफुलीवर येऊन ठेपलेला आहे जेथे आपली संस्कृती आणि आपली समाजव्यवस्था या दोहोंचे नमुने पुनर्रचित केले जात आहे. हे स्पष्टच आहे की सामान्य काळात शिक्षण हे नेहमीच भविष्य वेधीकृती असावयास हवी. जेव्हा बदल हे संथगतीने व शोभिवंतपणे

घडून येतात. तेव्हा त्याचे मुख्य कार्य म्हणजे जतन होय. ज्यात मुलाला तुलनात्मकदृष्ट्या स्थीर वातावरणात समायोजित केले जाते. पण सध्याच्या काळात जेव्हा जुने मरत आहे आणि नवीन जन्माला आलेले नाही आहेत, तेव्हा संस्कृतीच्या जुन्या प्रकारांनी तरूणांच्या निष्ठेची पकड गमावलेली आहे आणि नवीन जडणघडण ही स्पष्ट दिसण्यापासून अजून दर आहे तेव्हा शिक्षणाची भूमिका ही विशेष कठीण आणि निर्णायक आहे."

स्वतःच्या संस्कृतीपासून शिक्षणाचा विकास करण्याकरता शिक्षणाचे आधुनिकीकरण आणि सांस्कृतिक पुनरूज्जीवन गरजेचे आहे. भारत नवीन पुनर्जागरणाच्या वचनास पुढे वाटचाल करत आहे. पुनरूत्थान आणि आधुनिकीकरणाच्या या प्रक्रियेत सर्वात शक्तीशाली साधन म्हणजे एका बाजूला नैतिक आणि अध्यात्मिक मूल्यावर आधारीत शिक्षण तर दुसऱ्या बाजूला विज्ञान आणि तंत्रज्ञान आहे.

यासंदर्भात पंडित नेहरूंचे विचार अधिक चांगले ठरु शकतात. "विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती आणि मन आणि आत्म्याची प्रगती यांचा आपण संयोग करु शकतो का?" आपण विज्ञानाशी अप्रामाणिक असू शकत नाही. कारण ती सद्यस्थितीतील जीवनाशी मुलभूत बाब आहे. तसेच युगान युगापासून भारत ज्या अत्यावश्यक तत्वांना जोपासत आला आहे त्याच्याशी तरी आपण अप्रामाणिक होऊ शकणार नाही.

तर मग आपण औद्योगिक प्रगतीच्या मार्गाचा आपल्या सर्व शक्ती व सामर्थ्यानिशी पाठपुरावा करूया, पण त्याच वेळेस लक्षात ठेऊ या की संयम, करूणा आणि शहाणपणाशिवाय भौतिकसमृद्धी मातीमोल हाऊ शकते. म्हणून भूतकाळाच्या प्रकाशात भिन्न सांस्कृतिकतेच्या प्रभावाच्या संदर्भात आणि व्यक्ती आणि समाजाच्या भावी गरजांच्या प्रकाशात शिक्षणाने संस्कृती नवीन पिढीकडे संप्रेषित करावी आणि तरूण वर्गाचा जीवनाप्रती असलेला दृष्टीकोन रूपांतरीत करावा.

१.४.५ संस्कृतीचा शिक्षणावरील प्रभाव :

ज्याप्रमाणे संस्कृती शिक्षणाला प्रभावित करते त्याच पद्धतीने शिक्षणसुद्धा समाजाच्या संस्कृतीला प्रभावित करते याची चर्चा खालीलप्रमाणे केली जाऊ शकते.

१. शिक्षणाची ध्येय आणि उद्दिष्ट्ये ही बहुत करुन समाजाची मुल्ये आणि नमुन्याद्वारे ठरविले जातात.

२. समाजाच्या संस्कृतीनुसार अभ्यासक्रम तयार केला जातो. सांस्कृतिक मुल्ये कृतीत आणण्यासाठी समाजाची तत्वे व गरजांनुसार त्याची आखणी केली जाते.

३. शिक्षणाच्या पद्धती आणि संस्कृती यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. समाजाचे बदलते सांस्कृतिक नमुने शिक्षणाच्या पद्धतींवर सुद्धा शक्तीशाली प्रभाव दाखवितात. याचेच उदाहरण म्हणजे पूर्वीच्या शिक्षक केंद्रित अध्यापनाकडून विद्यार्थी केंद्रित शिक्षणाकडे होणारा बदल संस्कृतीच्या प्रभावामुळे अध्यापन अध्ययन प्रक्रियेत समाजीकृत पद्धती जसे प्रकल्प पद्धत, चर्चासत्र, संमेलन चर्चा इत्यादींचा मुबलक वापर केला जातो.

४. संस्कृतिक मुल्याद्वारे शिस्त सुद्धा प्रभावित होते. सध्याचे विचारसरणी व जीवनाचे सांस्कृतिक नमुने हे आपल्या शिस्तीच्या संकल्पनेशी प्रत्यक्षपणे जोडले गेले आहे.

५. पाठ्यपुस्तके जी तयार अभ्यासक्रमानुसार लिहिली जातात आणि सांस्कृतिक कल्पना आणि मुल्यांना वाढवितात व उत्तेजन देतात त्यांचे स्वागत केले जाते.

६. प्रशिक्षित शिक्षक : ज्या शिक्षकाने समाजाची सांस्कृतिक आदर्श व मूल्ये आत्मसात केलेली आहेत तेच फक्त ही मोहीम यशस्वीपणे पार करू शकतात. फक्त अेच शिक्षक हे मुलांच्या मनात उच्च तत्वे आणि नैतिक मूल्ये बिंबवू शकतात.
७. शाळा ही समाजाचे छोटे रूप आहे. शाळेतील एकूणच सर्व कृती आणि कार्यक्रम हे समाजाचे सांस्कृतिक आदर्श व मूल्ये यानुसार आयोजित केली जातात.

म्हणूनच शाळा ही समाजाच्या सांस्कृतिक नमुन्यांना वाढविण्याचे आकार देण्याचे सुधारण्याचे व विकसित करण्याचे केंद्र आहे.

आपली प्रगती तपासा :

१) सांस्कृतिक अंतराची तुमच्या शब्दात व्याख्या करा.

_____

_____

_____

_____

_____

२) संस्कृतीद्वारे प्रभावित होणाऱ्या शिक्षणाचे मुख्य पैलू कोणते ?

_____

_____

_____

_____

_____

१.४ कृति

तुमच्या स्थानिक समाजाचे अवलोकन करा आणि त्यातून सांस्कृतिक प्रभावामुळे घडून येणाऱ्या बदलांना ओळखण्यासाठीचे चार उदाहरणे द्या.

१.५ सारांश

या विभागात आपण समाजातील सामाजिक, सांस्कृतिक बदलांवर प्रभाव पाडण्याचे साधन म्हणजे शिक्षण याविषयी चर्चा केली. संस्कृती व शिक्षण हे एकमेकांशी घनिष्ठपणे निगडीत आहे. शिक्षण हे संस्कृतीला पिढी दर पिढी जतन करते व संप्रेशित करते आणि चिरस्थायीपणा आणण्याकडे योगदान देते. तसेच ते भारतीय समाजातील संस्कृतीला वृद्धींगत व शुद्ध करते. आधुनिकीकरण सुद्धा समाजातील सामाजिक सांस्कृतिक रुपांतरणावर जोर देते. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील सर्वात शक्तीशाली साधन म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण होय. आधुनिक समाजाचे वाढत जाणारे ज्ञान आणि वाढणाऱ्या शक्तीचा शक्तीशाली व सखोल होत जाणाऱ्या सामाजिक जबाबदारी आणि नैतिक व अध्यात्मिक मुल्यांचा

स्विकार यांच्याशी मेळ घातला जायलाच हवा. शिक्षण हे तंत्र आहे तर संस्कृती ही मूल्ये आहे. शिक्षण ही सांस्कृतिक मुल्यांची निर्मिती, चिरस्थायीपणा, संप्रेषण व समृद्धीची प्रक्रिया आहे. शिक्षण व संस्कृती हे परस्पर संबंधी असल्याने ते त्याचे ध्येय व उद्दिष्टांची पुर्नव्याख्या करुन आणि त्याची सामग्री व प्रक्रियांची पुर्नप्रस्थापना करुन समाजातील घडणाऱ्या सामाजिक, सांस्कतिक बदलांना प्रतिसाद देते. मागील काही दशकात उत्कर्ष व बहुसांस्कृतिकपणा हे एकत्र राहतात असे लक्षात आले आहे. जो २१ व्या शतकातील शिक्षणाचे इष्ट ध्येय आहे यावर जोर दिला जात आहे.

थोडक्यात म्हणजे संस्कृती व शिक्षण हे परस्परपुरक असून दोघही एकाचवेळेस पुरेशे गतिशील आहे. म्हणजेच शिक्षण हा व्यक्तीच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जो संस्कृतीचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे.

१.६ विभागवार अभ्यास

प्र. १ खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. संस्कृतीच्या वैशिष्ट्यांवर चर्चा करा.

२. सांस्कृतिक अंतर म्हणजे काय ?

३. आधुनिकीकरणाच्या मार्गातील ५ अडथळे लिहा.

४. 'संस्कृतीचा एक भाग म्हणून संस्कृतीचे जतन, संप्रेषण व संवर्धन असे शिक्षणाचे दुहेरी कार्य आहे. हे विधान विस्तृतपणे स्पष्ट करा.'

५. सद्यपरिस्थितील संदर्भ लक्षात घेता भारतीय समाजाचे वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या आधुनिकीकरणाच्या घटकांचे स्पष्टीकरण करा.

६. शिक्षणाचा संस्कृतीवरील प्रभाव सोदाहरण स्पष्ट करा.

प्र. २ रिकाम्या जागा भरा.

१. भौतिक संस्कृतीत ————- चा समावेश होतो.

२. भौतिक आणि अभौतिक संस्कृतीतील फरकाला ———— म्हणतात.

३. संस्कृती ही ———— असून ती एकांतात अस्तित्वात असत नाही.

४. जातीयवाद हा ————– च्या प्रक्रियेतील एक अडथळा आहे.

५. शिक्षण हे एक तंत्र आहे तर संस्कृती ही एक ————- आहे.

प्र. ३ योग्य पर्याय निवडा.

१) आधुनिकीकरणाचा मुख्य कोणता ?

अ) औद्योगिकीकरण ब) संस्कृती क) समाज ड) मानव

२) संस्कृती ही ————– आहे.

अ) ताठ ब) लवचिक क) अंशतः ताठ ड) स्थिर

❖❖❖❖

२

विकासासाठी शिक्षण

घटक रचना :

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ राष्ट्रीय एकात्मकता
२.२.१ राष्ट्रीय एकात्मकतेचा अर्थ व गरज
२.२.२ राष्ट्रीय एकात्मकतेतील अडथळे
२.२.३ राष्ट्रीय एकात्मता विकासामध्ये शिक्षणाची भूमिका
२.३ आंतरराष्ट्रीय मतैक्य (Understanding)
२.३.१ आंतरराष्ट्रीय मतैक्य ची गरज व अर्थ
२.३.२ आंतरराष्ट्रीय मतैक्यातील अडथळे
२.३.३ आंतरराष्ट्रीय मतैक्यामध्ये शिक्षक व शिक्षणाची भूमिका
२.४ नागरीकत्व
२.४.१ नागरीकत्व शिक्षणाचे अध्यापन
२.४.२ वैश्विक नागरीकत्व
२.५ सारांश
२.६ स्वाध्याय

२.० उद्दिष्ट्ये

ह्या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्ही करु शकाल.

- राष्ट्रीय एकात्मता, आंतरराष्ट्रीय मतैक्य व नागरीकत्व संज्ञेची व्याख्या कराल.
- राष्ट्रीय एकात्मता संज्ञेचा खुलासा कराल.
- आंतरराष्ट्रीय मतैक्य गरजेचे समर्थन कराल.
- आंतरराष्ट्रीय मतैक्य विकासामध्ये शिक्षणाच्या भूमिकेचा खुलासा कराल.
- वैश्विक नागरीकत्वाची गरज समजून घ्याल.
- खऱ्या अर्थाने नागरीकत्वाची जबाबदारी स्विकारण्यामध्ये शिक्षणाच्या भूमिकेची चर्चा कराल.
- शिक्षणाच्या वैशिष्ट्यांची यथार्थता व सूत्रबद्ध मांडणी कराल.

२.१ प्रस्तावना

मागील भागामध्ये आपण संस्कृती व शिक्षण यांचा एकमेकांशी जवळचा संबंध पाहिलेला आहे. शिक्षक संस्कृतीचे रूपांतरण व जतन एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे करुन संस्कृतीची शाश्वता ठेवण्याचे योगदान देते. शिक्षण हे सामाजिकरणाच्या प्रक्रियेमधील महत्त्वाचा घटक आहे. वैयक्तिकदृष्ट्या शिक्षण हा सामाजिकरणामध्ये संस्कृतीचा प्रचंड प्रमाणात महत्त्वाचा पैलू आहे.

ह्या घटकामध्ये आपण राष्ट्रीय एकात्मता राखण्यामध्ये शिक्षणाची भूमिका, आंतरराष्ट्रीय आकलन विकास, आणि राष्ट्रीय व वैश्विक नागरीकत्वाची समज पाहणार आहोत.

२.२ राष्ट्रीय एकात्मकता

भारतीयांना शांततेने राहण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये भारतीयांनी मानवतावादी दृष्टिकोनातून अहिंसा दाखविली होती. अहिंसेच्या योजनेतून परकीयांपासून आपल्या देशास मुक्त केले होते. भारतीय संस्कृतीमध्ये विविधता असून देखील विविधतेमधून एकता व एकात्मता सद्या देखील असणे ही गरज आहे.

२.२.१ राष्ट्रीय एकात्मकतेचा अर्थ व गरज :

अर्थ :

देशाच्या नागरीकत्वामध्ये राष्ट्रीय एकात्मता असणे हे जागरुकतेचे लक्षण आहे. जरी भारतामध्ये विविध प्रांत, भाषा, जाती-जमाती असल्यातरी सुद्धा आम्ही सारे एक आहोत ही वस्तुस्थिती आहे. ही भावना देशाला बळकट, शक्तीशाली व सुक्तावान बनविण्यासाठी फार महत्त्वाची आहे.

गरज : पुढील कारणांसाठी राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे.

- **परदेशी (देशांकडून) युद्धाची धमकी :** ज्यावेळी परदेशी देशांकडून युद्धाची धमी दिलेली दिसते व अंतर्गत लोक जाती-जमाती, स्पर्धा, भाषा, प्रांत, धर्माच्या आधारावर विभागलेले असतात त्यावेळी राष्ट्रीय एकात्मकता फार महत्त्वाची आहे.
- **राष्ट्रीय चारीत्र्य विकासासाठी :** राष्ट्रीय चारीत्र्य विकासामध्ये एकात्मता हा महत्त्वाचा घटक आहे. ह्यावेळी राष्ट्रीय चारीत्र्याचा अभाव आहे. भ्रष्टाचार हा दिवसेंदिवस वाढत आहे. पैसा मिळविण्यासाठी आपण राष्ट्रीय आवड, एकात्मता ह्यांचा त्याग करीत आहोत. त्यावेळी आपलया भावना राष्ट्रीय एकात्मते संदर्भात दृढ होतील त्यावेळी राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती होण्यास मदत होईल.
- **लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी :** कोणत्याही देशांच्या प्रत्येकी वेळी राष्ट्रीय एकात्मता अत्यावश्यक आहे. भारतामध्ये विविधते मध्ये एकता आहे. परंतु सद्या ती धोक्यात आहे. विविधतेमध्ये एकता हे मूल्य जपण्यासाठी राष्ट्रीय एकात्मकता आवश्यक आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर शांतता राहण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता अत्यावश्यक आहे. आधुनिक युग हे विज्ञानाचे युग आहे. म्हणून मानवामध्ये शांततेसाठी शास्त्रीय कामगिरी भरीव असली पाहिजे. राष्ट्रीय एकात्मेमधून शांततेची भावना विकसित होऊ शकते.

२.२.२ राष्ट्रीय एकात्मकतेतील अडथळे :

भारतामध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी भारतामध्ये पुढील अडथळे दिसून आले.

संप्रेषण (Communication) :

राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गामधील संप्रेषण हा मोठा अडथळा आहे. भारतामध्ये विविध जाती-जमाती, आदीवासी गट, समाजाचे हित लक्षात न घेता स्वतःच्या इच्छेनुसार, स्वसमाधानासाठी, स्वार्थासाठी प्रयत्न करीत आहेत. परिणामी सद्य परिस्थितीमध्ये देशाच्या विविध भागामध्ये सांप्रदायिक दंगली घडून येत आहेत.

प्रादेशिक वाद :

प्रादेशिक वाद हा राष्ट्रीय एकात्मतेमधील मोठा अडथळा आहे. सद्या आपला देश विविध राज्यामध्ये विभागला आहे. ह्यामुळे विविध राज्यामध्ये, विविध धर्मामध्ये प्रतिस्पर्धीपणा वाढत आहे. सद्या आसाम, मेघालय व मनीपूर ह्या राज्यामध्ये दुसऱ्या राज्यातील लोकांना त्यांच्या राज्यामध्ये राहण्याविरोधात आंदोलन करीत आहेत. हे राष्ट्रीय एकात्मतेच्या विरोधात आहे.

प्रांतियवाद :

विविध प्रांतातील लोक त्यांच्या विचारसरणीनुसार मी बंगाली, गुजराती, मारवाडी, मराठी, पंजाबी आहोत असा विचार करतात. परंतू आम्ही भारतीय आहोत असा विचार करीत नाही. अशा प्रकारची वृत्ती आपणास एकात्मतेपासून दुरावण्याची शक्यता आहे.

भाषावाद :

भारतीय धरतीवर विविध भाषा बोलल्या जातात. ह्या विविध भाषा ह्या भारतीय संस्कृती महान असल्याचे लक्षण आहे. परंतु दुःखाचे कारण म्हणजे आपल्या देशामध्ये भाषावाद हा 'संघर्ष' होऊ पहात आहे. लोकांच्या मते दुसऱ्या भाषेस स्थान न देण्याची प्रवृत्ती (बळावत) वाढू लागली आहे. भाषा संघर्षाचे भांडण हे आपणास राष्ट्रीय एकात्मतेपासून दूर नते.

धर्माबद्दल पूर्वग्रह :

प्रत्येक जाती-जमाती आपल्या धर्माचा मुक्तपणे वाढ करु शकतो. परंतु हे करत असताना दुसऱ्या धर्माचा बळी देता कामा नये. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. परंतु सद्या धर्माच्या नावावर हिंसा चालू आहे. आपल्या लोकांना विविध धर्माबद्दल पुरेसे ज्ञान नाही म्हणून ते दुसऱ्या धर्माच्या तिरस्कार करतात हा भारतीय एकात्मतेमधील मोठा अडथळा आहे.

आर्थिक परिस्थिती :

आर्थिक परिस्थिती भारतीय एकात्मतेवर परिणाम करते. लाखो लोक गरीबीशी झूंज देत आहेत. गरीबी हा सर्वात मोठा एकात्मतेमधील अडथळा आहे. बहुसंख्य भारतीय आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. भारतातील रोजगार योजनेमार्फत तरूणांना रोजगार देऊन राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यास मदत होईल.

२.२.३ राष्ट्रीय एकात्मता विकासामध्ये शिक्षणाची भूमिका :

राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रगतीसाठी सर्व राज्यातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक १९६० मध्ये आयोजित केलेली होती. सर्व बाजूंनी विचार करुन राष्ट्रीय एकात्मता ह्या समस्येवर चर्चा झाली. डॉ. संपूर्णानंद ह्यांच्या नेतृत्वाखाली एक मंडळ (Committee) देशामध्ये राष्ट्रीय एकता व भावनात्मक एकता ह्यांच्या वाढीसाठी नेमण्याचे ठरले.

ह्या समस्येव्यतिरिक्त (कमिटीने) मंडळाने शिक्षणाच्या एकनिष्ठ भूमिकेतून राष्ट्रीय एकात्मतेची प्रगती / विकास करण्याचे ठरविले. १९६१ साली ही (कमिटी) मंडळ स्थिरस्थावर होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली.

राष्ट्रीय एकात्मता व शिक्षण मंडळाच्या शिक्षण व शिफारशी :

शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शुद्धपणे ज्ञान प्राप्ती करणे आहे. परंतु विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व व्यक्तीमत्व विकास करणे हे सुद्धा शिक्षणाचे कार्य आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये त्याग व समानता दिसून येत नाही. म्हणून राष्ट्रीय एकात्मतेकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

मंडळाच्या (कमिटीच्या) महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

१) **शैक्षणिक संस्थांची अधिकृत मान्यता :** ज्या शिक्षणसंस्था जात, धर्म, पंथ, वंश ह्यामध्ये भेदभाव करत नाहीत फक्त त्या शिक्षण संस्थाचा मान्यतेसाठी विचार करावा.

२) **प्रवेशाच्या आधारावर :** शैक्षणिक संस्थांचा प्रवेश हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार व्हावा. त्यांचा प्रवेश जात, धर्म, पंथ, वंश ह्या आधारावर होऊ नये.

३) **शाळांचा गणवेश :** प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा पोषाख (Uniform) एकसारखाच असावा.

४) **विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा करवून घ्यावी :** प्रत्येक वर्षी वर्षातून दोन वेळा देशसेवा व देशवासीयांची सेवा ही भावना विद्यार्थ्यांमध्ये दृढ होण्यासाठी प्रतिज्ञेची गरज आहे. "भारत माझा देश आहे." "सारे भारतीय माझे बांधव व भगीनी आहेत." प्रतिज्ञेच्या माझे व माझ्या ह्या भावनेतून राष्ट्रीय एकात्मतेचा विकास होण्यास निश्चितच मदत होते. मी माझ्या देशावर प्रेम करतो. माझ्या देशातील परंपरांचा मला अभिमान आहे. मी माझ्या देशाचा योग्य तो सन्मान ठेवण्याचा प्रयत्न करेन.

५) **राष्ट्रगीत :** राष्ट्रगीता अर्थ विद्यार्थ्यांना शिकवावा व राष्ट्रगीत सूरात व व्यवस्थित सन्मानपूर्वक गावे.

६) **राष्ट्रध्वजाचा मान :** राष्ट्रध्वजाचे महत्त्व विद्यार्थ्यांना शिकवावे व राष्ट्रध्वजाप्रती योग्य मान स्वत: शिक्षक व विद्यार्थ्यांनी ठेवावा.

७) **राष्ट्रीय दिवस साजरा करणे :** १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व २ ऑक्टोबर असे राष्ट्रीय दिन विद्याथी-शिक्षक व समाजाच्या सहकार्याने साजरे करावेत.

८) **राष्ट्रीय एकात्मता व्याख्यानाचे आयोजन :** राष्ट्रीय एकात्मता वर भर देऊन विविध उपक्रमांचे संमेलन एकत्रिकरण शाळांनी राष्ट्रीय एकात्मतेचा उद्देश ठेवून आयोजन करावे.

९) शालेय प्रकल्प : देशाविषयी स्वाभिमान व आदर निर्माण होईल असे प्रकल्प शालेय स्तरावर असावेत. ह्या प्रकल्पांमुळे देशातील विविध भागाचे ज्ञान वाढीस लागून देशप्रेम वाढीस लागेल.

१०) सहलींचे व चित्रपटांचे आयोजन : राष्ट्रीय विकास व राष्ट्रीय एकात्मतेचा पैलू लक्षात ठेवून विविध चित्रपटांचे आयोजन करावे. स्थळांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन सहलींचे आयोजन करावे.

११) मुक्त नाट्यगृह : कमीत कमी वर्षातून ४ वेळा विद्यार्थ्यांना विशिष्ट उद्दिष्ट संपादनासाठी मुक्त रंगमंच उपलब्ध करुन द्यावा. ह्यांचे मुख्य विषय, हे स्वतंत्र भारत, स्वातंत्र्यपूर्व भारत, ऐतिहासिक चळवळी, स्वातंत्र्य चळवळी व राष्ट्रीय एकात्मतेचा विकासा संदर्भात असावेत.

१२) अभ्यासक्रमाची पुनर्रचना : शालेय अभ्यासक्रम हा आधुनिक भारताची लोकशाही व सामाजिक, समाजवादी मूल्यांचा अंतर्भाव असावा व अश्याप्रकारे अभ्यासक्रमाचे आयोजन करावे.

अ) प्राथमिक स्तर : सामूहिक प्रार्थना राष्ट्रगीताचे सामूहिक गायन, महान व्यक्तींच्या राष्ट्र प्रेमाच्या गोष्टी, देशप्रेमाचे गीत व सामाजिक अभ्यास ह्यांना महत्त्व द्यावे.

ब) माध्यमिक स्तर : नैतिक व अध्यात्मिक शिक्षणावर भर द्यावा. तसेच अभ्यासक्रम पूरक उपक्रम, भाषांचे ज्ञान, वाङ्मय व सामाजिक अभ्यास ह्यावर विशेष भर असावा.

क) विद्यापीठ स्तर : विविध सामाजिक विज्ञान, भाषा, वाङमय, कला व संस्कृती वर भर असावा.

आपली पग्रती तपासा :

१) राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ सांगा ?

_____

_____

_____

_____

_____

२) राष्ट्रीय एकात्मतेची भारतामध्ये गरज काय असते ?

_____

_____

_____

_____

_____

२.३ आंतरराष्ट्रीय मतैक्य (UNDERSTANDING)

आंतरराष्ट्रीय आकलन (समज) साठी शिक्षण म्हणजेच विश्वबंधुत्वाचे शिक्षण होय. हे आपणामध्ये जागतिक नागरीकत्वाची भावना निर्माण करते. आंतरराष्ट्रीवाद ही भावना व्यक्त करण्यासाठी पुष्कळ मार्ग आहे. शिक्षक आंतरराष्ट्रीय आकलनासाठी महत्त्वाची व योग्य अशी भूमिका निभावतात.

२.३.१ आंतरराष्ट्रीय मतैक्याची गरज व अर्थ :

डॉ. राधाकृष्णन ठामपणे म्हणतात, 'एकमेकांपासून वेगळे न राहता एकत्र राहण्याची नितांत आवश्यकता आहे. एकमेकांची भिती, काळजी, आकांक्षा, व समजून घेण्याची गरज आहे.' आपण सर्वांनी वंशिक सुसंवाद साधण्याची गरज आहे. अमेरीकन असो व रशियन पण प्रथम आपण मानव आहोत हे विसरता कामा नये. जागतिक समुदायामध्ये आपण कसे राहावयाचे ते शिकूया.

आंतरराष्ट्रीय आकलनासाठी शिक्षण म्हणजेच विश्वबंधुत्वाचे शिक्षण हे आपणास जागतिक नागरीकत्वाच्या निर्माणामध्ये विश्वास व निष्ठा देते. हे शिक्षण आपणास वांशिक सहकार्य देऊन विद्यार्थी शिक्षक विचारांचे आदान-प्रदान देते. तसेच मागास भागातील सांस्कृतिक पुनर्वसन, समाज माध्यमातून एकमेकांबद्दल समज शालेय माध्यमातून मिळते.

गरज :

आधुनिक युगामध्ये आंतरराष्ट्रीय आकलन हे फार अत्यावश्यक आहे. संप्रेषणामध्ये (Communication) क्रांतीकारक बदल झाल्यामुळे दिवसेंदिवस जगातील देश एकमेकांच्या जवळ येऊ लागले आहेत. जगामध्ये विश्वबंधूत्व जपण्यासाठी एकतेची जाणीव, सहकार्य नाते अंतरसंबंध लोकांमध्ये दृढ करण्याची गरज आहे. युनेस्को युनो व जागतिक बँक टी.व्ही. वरील कार्यक्रम आंतरराष्ट्रीय आकलन (समज) वाढविण्यासाठी मोलाची भूमिका बजावतात.

मूलतः विभिन्न संस्कृतीच्या लोकांनी एकत्र येऊन एकमेकांना एकमेकांच्या संस्कृतीत समजून घेऊन मिळून मिसळून शांततामय मार्गाने राहण्याची गरज आहे.

२.३.२ आंतरराष्ट्रीय मतैक्यातील अडथळे :

ह्या संदर्भात सर्व देशांची समस्या एकच आहे. जगातील लोक आपसामध्ये भांडत असतात व विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये प्राविण्य मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा मुख्य उद्देश म्हणजे जगामध्ये सुबत्ता व शांती प्रत्येकाकडे पुरेशा प्रमाणात पाहिजे. परंतु शांतता सक्षमता व सुबत्ता ही आंतरराष्ट्रीय सामंजस्याशिवाय शक्य नाही. जर मानवाच्या मनामध्ये युद्धाची भिती, तणाव असेल तर मानव शांततामय जीवन जगू शकत नाही. म्हणून मानवाच्या मनातील भीती, ताणतणाव नष्ट करुन शांतता व सुबत्ता प्रस्थापित केली पाहिजे. हे ध्येय लक्षात ठेवून आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी लढले पाहिजे व त्यासाठी जागतिक स्तरावर सरकार बनले पाहिजे.

आता जगला समजले आहे कि आंतरराष्ट्रीय सामंजस्यामधील अडथळे नाहीसे केले पाहिजेत. हे अडथळे मानव व देश ह्या दोन्हीमध्ये विभाजन करतात. आता मानव समाज आंतरराष्ट्रीय सामंजस्यामधील समस्यांवर विचार करु लागला आहे. मानव समाज आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या आधारावर जगामध्ये एक सत्ता - एक सरकार व एकच सदिच्छा जोरावर आणू पाहात आहे. ते आंतरराष्ट्रीय सरकार जगामध्ये शांती व प्रगतीची संधी देईल. तसेच ते सरकार जगातील लोकांना धनवान होण्याची सुद्धा संधी देईल.

जर आपण मानवी स्पर्धेमध्ये आहोत तर त्याचा विचार जरूर केला पाहिजे. जागतिक आधार तत्वाच्या जोरावर निश्चितर मानवी समाज शांततामय मार्गाने राहून प्रगती करेल. हे तेव्हा शक्य होईल जेव्हा आंतरराष्ट्रीय सामंजस्यामधील अडथळे नष्ट होतील आणि विज्ञान व तंत्रज्ञान गरीबी संपवून शांतता राखण्याचा प्रयत्न करेल. ह्या ध्येयाने चालना मिळून आपण हे आपल्या राज्यामध्ये देखील राबवू शकतो. जर आपण आंतरराष्ट्रीय सामंजस्यामधील समस्या नाही सोडवल्या तर खरोखरच आपण दु:खी होऊ.

ह्या ठिकाणी आपण जागतिक युद्धांची व त्यांच्या परिणामाची चर्चा करणार आहोत. त्यामुळे आपणास आंतरराष्ट्रीय सामंसज्यास चालना मिळणार आहे. आपणास माहित आहे पहिले महायुद्ध १९१४-१९१९ व दुसरे १९३९-१९४५ ह्या दोन्ही महायुद्धात संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था कोलमडली (नाहीशी झाली). ह्या युद्धांनी भिती, नारा, चिता, संशय ह्यांना जन्म दिला. परिणामी जगातील देश भितीने ग्रासले जाऊन दूसरे जागतिक महायुद्ध कधी होईल ह्या भितीने त्रस्त होऊन स्वकेंद्री बनले.

सध्या सर्व देश गरीबी व बेरोजगारी (Unemployment) ह्या समस्यांशी लढत आहेत. वैयक्तिक समस्याशी लढल्यामुळे लोकांची मनोवृत्ती संकूचित झालेली आहे व आंतरराष्ट्रीय मनोवृत्ती सुद्धा संकुचित झालेली आहे. सर्व देशांनी एकमेकांना सहकार्य करुन गरीबी व बेरोजगार ह्यांच्याशी मुकाबला करुन ह्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रीयत्वाची भावना आंतरराष्ट्रीय भावनेमध्ये बदलली पाहिजे. संबंधित विश्वबंधुत्वाची भावना, मित्रत्वाची भावना व सदिच्छा वाढीस लागली पाहिजे. अशी भावना प्रत्येकाच्या निर्माण होताच समस्या सुटण्यास मदत होईल.

जगातील देशात आंतरराष्ट्रीय सामंजस्याची भावना वाढवून गरीबीशी मुकाबला सर्व देशात सुबत्ता वाढविण्याची नितांत गरज आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी काही अटी आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रथम सर्व लष्करी करार (नष्ट) काढून टाकले पाहिजेत व संकुचित वृत्तीचा त्याग केला पाहिजे.
२. भविष्यात असे जाचक करार होणार नाहीत असे प्रयत्न केला पाहिजे व आपण फरक नाहीसा करुन आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या वाढीसाठी संघर्ष केला पाहिजे.
३. जगातील सर्व देशांमध्ये एकच सर्वसाधारण संकल्पनेची गरज आहे. फार वेळ राजकीय संकल्पनेचा सामना करावा लागतो, तसेच आंतरिक मिती, संशय तसेच राजकीय व आर्थिक स्फोट जगामध्ये होत आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्यामध्ये हा मोठा अडथळा आहे.

४. मूलतः आंतरराष्ट्रीय सामंजस्यामध्ये शोषण, वांशिक द्वेष, संकुचित राष्ट्रीय आवड हे टाळले पाहिजे. जगातील सर्व देशांनी एकत्र आले पाहिजे व आंतरराष्ट्रीय मंडळाच्या नियमांचे पालन केले पाहिजे. हे जागतिक नियामक मंडळाचे सूत्र आहे.

सरतेशेवटी जगामध्ये शांतता नांदण्यासाठी व गरीबी दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सामंजस्याची नितांत गरज आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्याची संकल्पना हे स्वप्न नाही. जग दिवसेंदिवस पुढे जात आहे व ह्या स्पर्धेच्या जगामध्ये टिकून राहायचे असेल तर आंतरराष्ट्रीय सामंजस्याची भावना असणे महत्त्वाचे आहे. ही भावना जगामध्ये शांतता व सुबत्ता प्रस्थापित करण्याचा एक मार्ग आहे.

२.३.३ आंतरराष्ट्रीय मतैक्यामध्ये शिक्षक व शिक्षणाची भूमिका :

अभ्यासक्रमापेक्षा शिक्षक हा फार महत्त्वाचा आहे ह्याला कारण म्हणजे शिक्षक हा अभ्यासक्रम उपयोगात आणण्याचे व उद्दिष्ट, ध्येय संपादनाचे माध्यम आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्यामध्ये शिक्षकांची भूमिका पुढीलप्रमाणे आहे.

१) विस्तृत बाह्य दृष्टिकोन :

शिक्षकाचा त्याच्या विद्यार्थ्याप्रती विस्तृत बाह्य दृष्टिकोन असला पाहिजे. विद्यार्थ्यामध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी भावना जागतिक स्तरावर वाढण्यासाठी त्याचा आंतरराष्ट्रीय बाह्य दृष्टिकोन पाहिजे.

२) माणूस म्हणून माणसास समजून घेणे :

शिक्षकाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे मुलांनी माणूस म्हणून माणसास समजून घेतले पाहिजे. प्रथम ते भारतीय, अमेरिकन, रशियन ज्यू हिंदू किंवा इतर असतील परंतु माणूस म्हणून मानवजात एकच आहे.

३) हिंसा व युद्धाची संकल्पना नाहीशी करणे :

शिक्षकांनी मनात पक्के केले पाहिजे की माणसाच्या मनातील युद्धाची भावना काढून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःमध्ये त्याच्या मनामध्ये भक्कम विश्वास वाढला पाहिजे.

४) शांततेवर जोर देणे :

सद्याच्या आजारी जगामध्ये आजारावर इलाज म्हणून शिक्षकांनी प्रत्येकाच्या मनामध्ये शांतता कायम राहिल अशाप्रकारे प्रयत्न जरूर केले पाहिजेत. प्रत्येकाच्या मनामध्ये शांतीचे नव-निर्माण करणे हे शिक्षकाचे मुख्य ध्येय आहे.

५) योग्य मूल्यांची (लागवड करणे) जोपासणे :

सहकार्य, मित्रत्व, न्यायाप्रती प्रेम, सत्याप्रती प्रेम, मानवजातीप्रती प्रेम अशा मूल्यांची जोपासणा मुलांच्या मध्ये शिक्षकांनी करावयासच पाहिजे.

६) समाजातील प्रौढांना शिक्षित करणे :

शिक्षकाने समाजातील प्रौढांच्या मध्ये शांतता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेच पाहिजेत.

७) योग्य अर्थ लावणे :

शिक्षकांनी इतर देशासंबंधी पक्षपाती भावना देऊ नये. शिक्षकांनी योग्य वस्तुस्थिती, ज्ञान, इतिहासाचा योग्य अर्थ, संस्कृती शिकवली पाहिजे.

८) योग्य अध्यापन पद्धतीचा वापर :

शिक्षकांनी जागतिक नागरीकत्वाची संकल्पना शिकवून "जगा व जगू द्या" ही भावना विकसित केली पाहिजे.

आपली पग्रती तपासा :

१) आंतरराष्ट्रीय सामंजस्यामधील कोणताही एक अडथळा स्पष्ट करा ?

२) आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी कार्य करणे का आवश्यक आहे ?

२.४ नागरीकत्व

नागरीकत्वाच्या शिक्षणाची व्याख्या म्हणजेच लहान वयातील मुलांपासून, विचार करण्यायोग्य मुलांना बनविणे ज्ञानी नागरीकांना समाजाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे हे होय. ह्या ठिकाणी समाज हा विशेष अर्थाने आलेला शब्द आहे. समाज म्हणजे सभोवतालच्या परिस्थितीमधील लोकांचे भारतातील एक घटक राज्य अशी संकल्पना आहे.

राष्ट्रीय संस्थाचे ज्ञान व कायद्याची भूमिका ह्याविषयी जागरुकतेचा उपयोग समाज व मानवी संबंधावर होतो. अर्थातच नागरीकत्व शैक्षणिक अभ्यासक्रम हा नागरीकशास्त्र शिक्षण पुढील फरकावर आधारित आहे.

- वैयक्तिक नैतिक व कायदे व मानवी परिस्थितीमध्ये मानवाचे अधिकार (मानवी अधिकार) आणि
- नागरीक - देशाचे संविधान दिलेले नागरीक व राजकीय अधिकार

सामाजिक नागरीकत्व हे समाजाच्या हक्काचे व वैयक्तिक मानवाच्या हिताचे आहे. म्हणून मानवी हक्क व नागरीकत्व हक्क हे स्वतंत्र वेगवेगळे आहेत.

जगातील पुरुष, स्त्रिया व मुले हे वैयक्तिक मानवी जमात आहेत. आपल्या ऐतिहासिक मानवी हक्काचे खरच मोठेपण आहे कारण आपण सर्वजण हक्क व प्रतिष्ठा ह्याने समान आहोत. सर्व मानव जातीसाठी समान मानवी हक्क आहेत. नागरीकत्वाच्या शिक्षणाचा मुख्य उद्देश हा भावी पिढी चे नागरिक सुशिक्षित करणे हा आहे. नागरीकत्वाचे शिक्षण हे मुलांसाठी, प्रौढांसाठी, तरुणांसाठी, संपन्न मानवी दर्जा संपादनासाठी, कर्तव्य जाणून घेण्यासाठी, कारणमीमांसासाठी फार महत्त्वाचे आहे. प्रत्येकाची वैयक्तिक राग, लोभ विशेषणे दूर ठेवून नागरीकत्वाची भावना जोपासली पाहिजे.

तथापि मानवी हक्कामध्ये नागरी व राजकीय हक्कांचा समावेश होतो. मानवी हक्कास नागरीकत्वाचे बंधन असते. अशाप्रकारे सर्वसमावेशक मानवी हक्कांचे शिक्षण हे नागरीकत्वाच्या संबंधित असून चांगले नागरीकत्व हे संबंधित मानवी हक्कांशी जोडलेले आहे.

उलटपक्षी नागरीकत्वाचे शिक्षण हे चांगल्या नागरीकत्वाचे प्रशिक्षण देते. ह्यामुळे नागरीक समाजाच्या व देशाच्या समस्येविषयी जागरूक असतात. ह्या संबंधी प्रत्येक नागरीकाकडे नैतिक गुणवत्ता असली पाहिजे. सर्व प्रकारच्या नागरिकत्वाच्या शिक्षणाने सर्वाच्या मनावर एकमेकांचा आदर, मानसन्मान मानवजातीतील प्रत्येकासाठी समानता प्रत्येकाच्या मनावर बिंबवली पाहिजे. सर्व प्रकारच्या भेदभावाशी लढत (स्पर्धा, लिंग-आधारित, धर्म इ.) देवून मानवजातीमध्ये सहिष्णुता व चैतन्य वाढवले पाहिजेत.

अशाप्रकारे आपण एक तर नागरीकत्व शिक्षण किंवा मानवी अधिकार शिक्षणाविषयी बोलले पाहिजे. नागरीकत्व निर्माणाबरोबरच व नैतिक गुणवत्ते बरोबरच सामाजिक ज्ञान व राजकीय हक्कामधील नागरीकत्व व मानवी हक्कामधील फरक समजून घेतला पाहिजे.

प्रत्येक शैक्षणिक पद्धत ही पारंपारिक संस्कृतीवर अवलंबून असते. आपण नागरी शिक्षण, मानवी हक्क व ज्ञान विषयी स्वाध्याय केला पाहिजे. नागरीकत्वाच्या आधारावर मानवी हक्क शिक्षणामध्ये नागरी व राजकीय हक्कांचा अंतर्भाव आहे. राज्यांनी निश्चित केलेल्या व ठरवलेल्या राष्ट्रीय वैशिष्ट्यांचा समावेश असतो.

नागरीकत्वाचे शिक्षण म्हणजे केवळ नागरीकत्वाचे शिक्षण नसून मुलांना व प्रौढांना नागरीकत्वाचे प्रशिक्षण घेणे होय.

नागरीकत्वाचे शिक्षणाची तीन मुख्य उद्दिष्ट्ये :

- संस्थांची तत्वे समजून घेऊन त्याद्वारे मानवी हक्क व नागरीकत्वाचे शिक्षण घेणे ह्याचे नियंत्रण राज्य किंवा राष्ट्र करते.
- अध्ययन स्वाध्यायाचे न्यायदान व चिकित्सक विद्याशाखा
- वैयक्तिक संवेदना संपादन व सामाजिक जबाबदारी

वरील तीन उद्दिष्टे ही ही वैयक्तिक विषयाची नैतिकता, कायदा व नागरीकत्व शिकवतात ही उद्दिष्टे चार मुख्य नागरीकत्वाच्या संकल्पना सुचवितात.

- वैयक्तिक व सामाजिक संबंध, वैयक्तिक व एकमित स्वातंत्र्य, कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी न करणे.
- नागरिक व सरकारमधील संबंध राज्याचे मूळ लोकशाही मध्ये समाविष्ट असलेले राज्याचे मूळ घटक
- नागरिक व कायदेशीर जीवन
- वैयक्तिक जबाबदारी व आंतरराष्ट्रीय समुदायाचे नागरीकत्व.

२.४.१ नागरीकत्व शिक्षणाचे अध्यापन :

लोकशाही संस्कृतीमध्ये शाळांमध्ये सतत नागरिकत्वाचे शिक्षण चालू असते. ही शिक्षण पद्धत विद्यार्थी-पालक व शिक्षक ह्यांच्या मध्ये चर्चा करुन मुले पालक व तरुणांना नागरीकत्वाविषयी व्यक्त होण्याची संधी देणे, व्यक्त होण्याचे प्रकार पुढीलप्रमाणे :

- मौखिक देवाणघेवाण
- चित्रकलेद्वारे
- गाणे व कवितांमधून
- विविध प्रकारच्या लिखित लेखांद्वारे

वरील ह्या साधनांद्वारे उत्कृष्ट प्रकारे नागरीकत्वाचे प्रतिबिंब लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य व शांतता लोकांपर्यंत पोहचवता येते.

लोकशाहीमध्ये लोकांना जे नागरीकत्वाचे शिक्षण, मत, विधान व स्वतःची मते लोक व्यक्त करु इच्छितात अशांसाठी आहे. पूर्वीचे नागरीकत्वाचे कायदे सद्याचे कायदे व अधिक सुधारित कायद्यांचे नियोजन हे नागरीकांसाठी आवश्यक आहे. कायद्याचा सन्मान करणे हे देखील नागरीकत्वाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पूर्वीच्या कायद्यांवर आंधळा विश्वास ठेवू नये. त्यातील त्रुटी जाणून घेऊन नवीन सुधारीत कायद्यांमध्ये काय बदल जनहितासाठी केला पाहिजे ह्याचा उहापोह होणे देखील महत्त्वाचे आहे.

नागरीकशास्त्र शिक्षणाचे प्रात्यक्षिक ध्येय म्हणजे नियमांची देखभाल करणे व शाळेमध्ये नियमांची अंमलबजावणी करणे, नियम सुधारणे व सकारात्मक बदल करुन त्या नियमांचे नवनिर्माण करणे.

नागरीकत्वाच्या शिक्षणातून आलेली मूल्ये ही एकासाठी नसून सर्वांसाठी मुक्त असतात. राहण्याच्या संस्कृती मधून नवीन सर्जनात्मक मूल्ये निर्माण होतात. ह्या मुल्यांमुळे स्वतःचा इतरांचा व समाजाचा सन्मान, मान देण्याची वृत्ती वाढीस लागते.

अशाप्रकारे नियम, कायदे व मूल्ये समाजातील सर्व गटांकडून स्वीकारली जातात. नागरीकशास्त्र शिक्षण म्हणजे केवळ प्रश्न-उत्तर नव्हे. नागरीकत्व शिक्षण ही एक चळवळ

असावयास पाहिजे ह्यामध्ये सखोल, सत्य व आवश्यक अशी चर्चा व्हावयास पाहिजे. ज्या काही समस्या असतील त्या समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या समस्या पुढीलप्रमाणे :

- मानवी विकासाच्या समस्या
- नियम व कायदे यांचे संतुलन व स्थिरीकरण
- विचारांचा, संकल्पनांची देवाण घेवाण
- विधाने
- वैयक्तिक मते इ.
- तुमच्या मुलांचे व तरूणांचे सुसंवाद हे देखील आवश्यक आहेत.

नागरीकत्वाच्या शिक्षणांमधून ज्ञान व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक ह्यामध्ये कायम स्थिर जोडणी असते. संकल्पना व कृती ह्यामध्ये आंतरक्रिया होऊन हळूहळू विचार करण्याची क्षमता वाढून त्याचे रूपांतरण मुल्यांमध्ये होते. मूल्ये ही वैश्विक असतात ज्यावेळी ती मानवी अधिकारांशी संबंधित असतात. उदाहरणार्थ पुढीलप्रमाणे -

- मूल्यांचे स्वातंत्र्य
- प्रतिष्ठा
- एकता व सहिष्णुता

विविध संस्कृतीमध्ये आपण एकनिष्ठ राहून जगामध्ये / देशामध्ये / राष्ट्रामध्ये / धर्मामध्ये आपली संस्कृती टिकवून ठेवली पाहिजे. सर्वामध्ये विषयाची चर्चा करुन त्याचे प्रतिबिंब नागरीकशास्त्र शिक्षण अभ्यासक्रमामध्ये उमटणे गरजेचे आहे.

दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास नागरीकशास्त्र शिक्षण हे सतत ज्ञान, प्रात्यक्षिक मुल्ये ह्यांच्यामध्ये आंतरक्रिया होऊन होत असते. मूल्ये हळूहळू प्रात्यक्षिक व उपक्रमाकडे घेऊन जातात. मूल्यांविषयी जागरूकता ही मानवी अधिकाराचे ज्ञान व कौशल्य व समाजातील संस्थांचे नियमित जीवन जगण्यास मदत करते. नागरीकत्वाचे शिक्षण हे टप्प्याटप्प्याने विद्यार्थी व समाज ह्यांच्यामध्ये मूल्ये समाजामध्ये रुजवून एकत्रित मानवी समाज राहण्यास मदत होते.

२.४.२ वैश्विक नागरीकत्व :

जगातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. आधुनिक जगातील मुले ही विविध संस्कृतीच्या पार्श्वभूमीवरुन शाळेत एकत्र आलेली असतात. ह्या संस्कृतीच्या वारशाचा सन्मान करुन नागरीकशास्त्र शिक्षणाची संधी सर्वांना देणे आवश्यक आहे.

अशा परिस्थितीमध्ये वैयक्तिकरीत्या स्वत:ला समजून घेण्यापेक्षा संस्कृती समजून घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या विविध संस्कृती मधून नागरीक शिक्षणाची मूल्ये आपणास मिळतात. त्या मूल्यांचा स्वीकार केल्यावर आपणास वैश्विक मानवी अधिकार समजून घेण्यास मदत होते. "इतरांचा मान राखा" हे वैश्विक तत्व आहे.

म्हणजेच शाळेत असताना, घरी कुटुंबामध्ये, मित्रामध्ये संवाद करीत असताना, इतर कुटूंबाशी बोलताना दैनंदिन जीवनामध्ये, सामाजिक सवयी व प्रत्यक्ष संस्कृती आदानप्रदान मध्ये

इतरांचा मान राखला पाहिजे. नागरीक शिक्षण ही एक चळवळ आहे. ह्यामध्ये सामाजिक समस्यांवर चर्चा आयोजित करुन तज्ञांची मते विचारात घेऊन जगातील संस्कृतीचा विचार करुन सर्वसमावेशक नागरीक शिक्षणाची जडणघडण होत असते.

हा नवीन कृती स्वरूप वंशविद्वेष लढा आहे. वंशविद्वेष हे आपल्या देशातील विविध संस्कृतीचा संदर्भात मूल्ये ही संस्कृतीशी दुर्लक्षित असतात किंवा त्यांना संस्कृतीची माहिती नसते त्यावेळी घडून येतो. जरी वर्गामध्ये इतर संस्कृती किंबहुना बहुआयामी संस्कृती जीवन शिकवले जात असली तरी मुले इतरांच्या विरोधी ठाम तिरस्कार व ठामपणे दुर्लक्ष करतात. हे दोन्ही वंशविद्वेष स्त्रोतांमधून मिळतात.

आपली पग्रती तपासा :

१) नागरीकशास्त्र शिक्षण शिकवण्याची गरज काय आहे ?

२) जागतिक नागरीकांची भूमिका स्पष्ट करा ?

२.५ सारांश

राष्ट्रीय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य ह्याचा योग्य शिक्षणाद्वारे विकास होतो. ह्यामुळे जागरुकता, सुदृढ वृत्ती सृजनात्मक आवड, चिकित्सक विचार विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतात. संस्थामध्ये योग्य वातावरण निर्मिती करणे हे शिक्षणाचे दायित्व आहे. ह्या वातावरणामध्ये विद्यार्थ्यांच्या मध्ये जागतिक एकतेची भावना वाढीस लागण्यास मदत होते.

जगामधील समुदायाचा आपण एक भाग आहोत ही भावना विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना सहिष्णुता, एकमेकांस मदत, इतरांचा मान ठेवणे ह्यामध्ये प्रोत्साहन मिळते. शालेय अभ्यासक्रमपूरक उपक्रमांमधून विश्व नागरीकत्वाची भावना विद्यार्थ्यांच्या मध्ये वाढीस लागते. नागरीकशास्त्र शिक्षणामुळे विशेष व वैश्विक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैयक्तिक व सामाजिक, ह्यामध्ये संभ्रम काही प्रमाणात होऊ शकतो. ह्यामधील कठिण समस्यांचे निराकरण हे मानवी हक्क शिक्षणाचे एकात्मीकरण करुन नवीन नागरीकशास्त्र

ह्या विषयामुळे सोडवल्या जातात. नागरीकशास्त्र शिक्षणामुळे शांतता, मानवी हक्क व लोकशाही ह्या संदर्भात नवीन दृष्टिकोन मिळून एक नवीन मार्ग मिळतो.

अशाप्रकारे नागरीक शिक्षणामुळे वैयक्तिक व नागरीक अभिभाषण स्वातंत्र्य मिळते. ह्यामुळे जगातील शांततेच्या समस्यांचे वैयक्तिक नागरीकत्व समस्यांचे आकलन करण्याचा मार्ग मिळतो. तसेच जागतिक आव्हाने म्हणजे आर्थिक, पर्यावरण, व सांस्कृतिक समस्यांचे आकलन होण्यास मदत होते. म्हणून मानवी शाश्वत विकासासाठी, जगातील गुणवत्ता शिक्षणासाठी, नागरीकत्व शिक्षणाची हीच ती योग्य वेळ आहे. इतर शैक्षणिक पद्धती व अध्यापन कार्यक्रमांपेक्षा सद्यस्थितीत वैश्विक शांतता निर्माणासाठी नागरी शिक्षण हे महत्त्वाचे व योग्य आहे.

२.६ स्वाध्याय

१) राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व ह्यावर चर्चा करा. ह्या संदर्भात शिक्षणाची भुमिका स्पष्ट करा ?

२) राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय ? २१ व्या शतकामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचे गरज व महत्त्व विषद (स्पष्ट) करा ?

३) राष्ट्रीय एकात्मता संपादनामधील अडथळे काय आहेत. शिक्षण त्यावर कशाप्रकारे मात करु शकेल ?

४) आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणजे काय ? २१ व्या शतकामध्ये त्याचे महत्त्व काय ?

५) आंतरराष्ट्रीयपणा जपण्यामध्ये शिक्षकाची भूमिका फार महत्त्वाची आहे. टिप्पणी करा.

६) आंतरराष्ट्रीय सामंजस्य बदल कार्य करण्याची काय गरज आहे ?

७) विश्व नागरीकत्वाची गरज का आहे ?

८) नागरीकत्वाच्या उद्दिष्टा संदर्भातील स्थितीचा विस्तृत तपशील तयार करा.

❖❖❖❖

३

शाश्वत विकासाची संकल्पना

घटक रचना :

३.० उद्दिष्ट्ये
३.१ परिणाम
३.२ परिचय
३.३ शाश्वत विकासाची संकल्पना
३.३.१ शाश्वत विकासाचा अर्थ आणि व्याख्या
३.३.२ शाश्वत विकासाची व्याख्या
३.३.३ शाश्वत विकासाच्या आणखी काही व्याख्या
३.३.४ शाश्वत विकासाचे महत्त्वाचे पैलू
३.४ शाश्वत विकासाची गरज
३.५ शाश्वत विकासाची तत्वे
३.६ सारांश
३.७ अभ्यास

३.० उद्दिष्ट्ये

ह्या विभागाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्याला खालील गोष्टी शक्य होतील.

- शाश्वत विकासाची व्याख्या करणे.
- शाश्वत विकासाच्या इतिहासाचा भाग काढणे.
- शाश्वत विकासाचे तीन महत्त्वपूर्ण पैलू स्पष्ट करणे.
- शाश्वत विकासाची गरज स्पष्ट करणे.
- आर्थिक विकासाचे सामाजिक विकासासोबत एकीकरण का करायचे ते स्पष्ट करणे.
- भारत आणि परदेशातील शाश्वत विकासाची उदाहरणे तपासणे.
- शाश्वत विकासाची तत्वे स्पष्ट करणे.
- शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे मूल्यमापन करणे.
- दैनंदीन जीवन अनुभवांना शाश्वत विकासाची संकल्पना लागू करणे.

३.१ परिणाम

१) आर्थिक वाढ, विकास आणि शाश्वत विकासातील खर्चाचे सखोल आकलन.
२) पर्यावरण विषयक व सामाजिक आव्हानांसाठी शाश्वत विकासाच्या संकल्पनेचे उपयोजन.
३) शाश्वत विकासासाठी तातडीची संवेदनशीलता.
४) आजच्या जगातील शाश्वत विकासाच्या तत्वांचे मूल्यमापन करणे.

मागील विभागाशी संबंध :

मागील विभागात आपण विकास आणि नागरिकत्व आंतरराष्ट्रीय समज यासारख्या सामाजिक जाणीवांशी असलेला त्याचा संबंध याचा अभ्यास केला. म्हणून विकास ही फक्त नफा कमविण्यासाठी असलेली आणि काही मर्यादित शक्तीशाली लोकांसाठीची आर्थिक कृती नाही. या विभागातसुद्धा आपण बघणार आहोत की या पर्यावरण आणि सामाजिक बाबींशी गुंफलेले आहे आणि परस्परावलंबी आहे. विकासाने दुरदर्शी आणि उपयोगी असण्यासाठी आपण विकासाच्या योग्य दृष्टिकोनाविषयी शिक्षित असणे महत्त्वाचे आहे. जो विकास सद्यस्थितीतील लाभ, पर्यावरणाच्या जतनाचा दृष्टीकोन न गमावता स्त्रोतांचा केलेला उपयोग आणि सद्यस्थिती व भावी पिढीसाठी सावध सामाजिक आरोग्य यावर केंद्रित आहे. तो भरीव विकासा अंतर्गत येतो.

या विभागात आपण भरीव विकास म्हणजे काय, त्याची गरज, त्याची उद्दिष्ट्ये व तत्वे यावर लक्ष केंद्रित करू या. भरीव विकासाच्या वाढीसाठी तुम्हाला शहरे आणि खेड्यातील वेगवेगळे कार्यक्रम व योजनांविषयी जागरूक व परिचीत राहायला हवे.

३.२ परिचय

विचार करू या : काही उदाहरणे

मेट्रो III कार शेड साठीच्या बांधकामासाठी आरे कॉलनी देण्यासंदर्भात मुंबई हायकोर्टाने बजावले की नियोजनबद्ध व शाश्वत विकास ही काळाची गरज असून विकास हा पर्यावरण व परिसंस्थेची किंमत चूकवून केला जावू शकत नाही.

सुमन अनिलला म्हणाली, "उद्यापासून तुझी कार आणत जाऊ नकोस आपण सायकलने विद्यापीठात जाऊ."

ॲनी तिच्या आजीला म्हणाली, आजी तू लहान असताना किराणा माल आणण्यासाठी प्लॅस्टीक बॅग वापरायची त्याऐवजी आता आपल्याला सुपर मार्केटला आपल्या स्वत:च्या पुन:वापर करता येण्याजोगा पिशव्या न्याव्या लागतील."

सोसायटी सचीव म्हणाले, "आपण आपल्या इमारतीवर सौर पॅनल उभारणार आहोत हा एकमताचा निर्णय आहे."

विभाग कॅन्टींगने बोर्ड लावला, "ऑफिसमध्ये तुमचे स्वत:चे कप आणा कागदीकप पुरविले जाणार नाहीत."

"बगिचे, तलाव, जंगले यासारख्या हरित जागा ही शहराची फुफ्फुसे असतात ज्यांच्याविना शहरे श्वासरहित होऊन गुदमरते," शिक्षिका ८ वी च्या विद्यार्थ्यांना म्हणाल्या.

अशी विधाने आजकाल आपल्या कानावर पडणे नवीन नाही. आपण आपल्या लघुमार्गांनी पर्यावरणाच्या जतनात योगदान देत आहोत आणि आपल्या आर्थिक व सामाजिक कृती चालू ठेवून आहोत. व्यक्ती कडून राष्ट्रीय वाढीकडील आर्थिक वृद्धीने पर्यावरण विषयक व परिसंस्थेविषयक जतनाविषयी जागरूक राहणे गरजेचे आहे हीच ती शाश्वत विकासाची संकल्पना आहे जी आपल्याला समजून घ्यायची आहे व दुसऱ्यांना शिकवायची आहे. परंतु शाश्वत विकास म्हणजे काय ?

३.३ शाश्वत विकासाची संकल्पना

विकासाचा संबंध हा १८ व्या व १९ व्या शतकातील औद्योगिकरणाचा आणि तंत्रज्ञानविषयक प्रगतीच्या उदयाशी संबंधीत आहे. यामुळे आपले जीवन आरामदायक बनले आहे. परंतू आपण जसा २० व्या शतकात प्रवेश केला तसे ते जाणले गेले की विकसित संस्कृतीच्या नावाखालील ह्या जलद वाढीने आपल्या धरती मातेची किंमत चुकवून झालेली आहे. या नैसर्गिक संसाधनांच्या निर्दयी व अनियोजित वापराने आपल्याला पर्यावरणविषयक असंतुलन आणि एकांगी प्रगतीच्या जागी आणून सोडले आहे. जागतिक तापमानवाढ, सर्व प्रकारचे प्रदुषण, वाढती सामाजिक आर्थिक दरी, गरिबी, वेगवेगळे आजार यासह आपण अशा निर्णायक टप्प्यावर आलो आहोत की आपल्याला शाश्वत विकासाचा गंभीरतेने विचार करायलाच हवा. शाश्वतता आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्या जोडीने जाणे आवश्यक आहे. अन्यथा आपल्या आणि पृथ्वीच्या अस्तित्वाचा विनाश अटळ आहे.

३.३.१ शाश्वत विकासाचा अर्थ आणि व्याख्या :

१९७० पर्यंत आर्थिक प्रगतीशी संबंधीत वाढ, विकास व प्रगतीला आव्हान दिले गेले कारण ही प्रगती विकसनशील देशांचा वापर करुन फक्त विकसित देशांची आहे. आधीच्या दशकात मानले गेले की आर्थिक वाढ ही जागतिक असमानतेवर मात करण्यास मदत करु शकेल याऊलट बऱ्याच समस्या निर्माण झाल्या जसे पर्यावरणविषयक ऱ्हास, हवामान बदल, संसाधनाची कमतरता आणि यासोबतच श्रीमंत व गरीबांमधील वाढत जाणारी आर्थिक दरी.

असे मानले गेले की विकास आणि जतन या परस्पर विरोधी कल्पना आहे. कारण जतन म्हणजे संसाधनाचे संरक्षण आणि विकास म्हणजे संसाधनाचे शोषण (पॅक्स्टन १९९३) आणि म्हणून शाश्वतता आणि विकास या दोघांना एका मध्यम मार्गावर आणण्यासाठी शाश्वत विकास ही संज्ञा उदयास आली. हे जाणले गेले की विकासाने फक्त आर्थिक प्रगतीचाच विचार न करता उपलब्ध संसाधने आणि विशेषतः भावी पिढीसाठी अपारंपारिक संसाधने टिकून कशी राहतील याचा सुद्धा विचार करावा. अशाप्रकारे फक्त आर्थिक कार्यक्षमता विचारात न घेता सर्वांसाठी पुरेशी संसाधने असण्याचे ध्येय हवे.

शाश्वत विकास आणि शाश्वतता या गोष्टी १९८० मध्ये उदयास आल्या. कारण सजीवांचे संकलन आणि टिकाव यांच्याविषयीची वाढती चिंता निर्माण झाली आणि जाणले गेले की आर्थिक वाढ हेच एकमेव क्षेत्र नाही.

"अशाश्वत विकासाने पर्यावरणाला अशाप्रकारे खराब आणि प्रदुषित केले आहे की ती आता प्रमुख मर्यादा म्हणून कार्य करते आहे. आणि त्यामुळे सामाजिक असमानता निर्माण झाली

आहे जी नित्य वाढीच्या अंमलबजावणीस मर्यादित करते." एमील सलीम, शाश्वत विकास संस्थागत करणे संसाधनाच्या गैरप्रबंधाचे अप्रमाणित परिणाम होऊ शकतात. जे अपरिवर्तनीय नुकसानाकडे घेऊन जाऊ शकतात आणि समाजाला इतक्या प्रमाणात हानी पोहचवू शकतात की पर्यावरण आणि लोकांचा मोठ्या प्रमाणावर विनाश होऊ शकतो.

३.३.२ शाश्वत विकासाची व्याख्या :

ब्रुंडलँड आयोग : शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भावी पिढीच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता सध्याच्या गरजांची पूर्तता करणे. (जागतिक आयोग १९८७).

ब्रुंडलँड अहवालाने पुढील चिंता प्रकाशात आणल्या.

अ) आर्थिक वाढ ही विभाजक आहे. त्यामुळे गरीब व श्रीमंत, विकसित व विकसनशील यामधील दरी वाढत आहे.

ब) फार थोड्या लोकांच्या सुखसोयी आणि गरजा पूऱ्या केल्या जातात आणि इतर त्यांच्या मुलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी झगडतात. जीवनाचा दर्जा सुद्धा टोकाचा आहे जणू काही धरती ही सर्वांची नसून काहींच्या मालकीची आहे आणि संसाधने त्याचा फायद्यासाठी वापरली जातात.

क) उपलब्ध संसाधनांचा समान फायदा जरी नसला तरी निदान सर्वांना न्याय्य फायदा मिळावा म्हणून तरी शाश्वत लोकसंख्येची गरज आहे. आणि विकसनशील आणि अविकसीत लोकसंख्येचे शोषण होता कामा नये.

अशाप्रकारे शाश्वत विकास म्हणजे फक्त सद्यस्थिती विषयी विचार न करता भविष्यासाठी विचारसरणीचा जाणीवपूर्वक प्रयत्न आणि इतरांच्या सुरक्षित भविष्यासाठी पुढे पाऊल टाकणे होय. नेल्सन हेन्डरसन यांना नमूद केल्याप्रमाणे, "जीवनाचा खरा अर्थ म्हणजे झाडे लावणे. ज्याच्या सावलीत बसण्याची तुम्ही अपेक्षा ठेवत नाहीत." हा खऱ्या अर्थाने शाश्वत विकास आहे. जेथे भविष्याची फळे आणि मुळे ही सद्यस्थितीत रूजवली जातात. शाश्वत विकास हा तीन महत्त्वपूर्ण गोष्टींचे एकीकरण आहे - पर्यावरण विषयक, आर्थिक आणि सामाजिक या तीन गोष्टी एकमेकांत गुंतलेल्या असून वेगळ्या केल्या जाऊ शकत नाही.



शाश्वत विकास आंतर्जुडवणुक

३.३.३ शाश्वत विकासाच्या आणखी काही व्याख्या :

१. शाश्वत विकासात आर्थिक प्रगती, पर्यावरण विषयक दर्जा आणि सामाजिक समभाग या तीघांच्या एकाचवेळी केल्या जाणाऱ्या पाठपुराव्याचा समावेश होतो. (शाश्वत विकासावरील जागतिक व्यापारी परिषद.)

२. "शाश्वतता म्हणजे सर्व मानवांच्या गरजांची पूर्तता जी येणाऱ्या पिढीसाठी या मर्यादित ग्रहावर होऊ शकेल आणि त्यासोबतच आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी पुरेशा प्रमाणात मुक्तता व लवचिकता असण्याची खात्री मिळते." (जेरी स्मर्मर, सान्ता बार्बरा, साऊथ कोस्ट कम्युनिटी इंडिकेटर्स)

३. "शाश्वत विकासाच्या चिंतेच्या केंद्रस्थानी मनुष्यप्राणी आहे. निसर्गासोबत सुसंवाद असलेले आरोग्यदायी आणि उत्पादनक्षम जीवनाचा त्यांना हक्क आहे. (रिओ प्रकटीकरण, १९९२ मधील पर्यावरण आणि विकासावरील संयुक्त राष्ट्रपरिषद द्वारा)"

३.३.४ शाश्वत विकासाचे महत्त्वाचे पैलू :

१) शाश्वततेचा आर्थिक दृष्टिकोन :

आर्थिक शाश्वतता समष्टी अर्थशास्त्रात विश्वास ठेवते म्हणजेच विकास हा फक्त बाजारी वस्तू (मौल्यवान) किंवा नफ्यापुरता मर्यादित नाही तर तो सामाजिक समानतेसाठीचे साधन म्हणून आर्थिक वाढ किंवा संसाधनांचा विशेषत: अपारंपारिक संसाधनांचा जाणीवपूर्वक वापर यांच्या विस्तृत दृष्टिकोन होय तो फक्त लोकसंख्या नियंत्रण किंवा वस्तू व संसाधनाच्या नियंत्रित वापरापुरता मर्यादित नसून सामाजिक एकता व पर्यावरणविषयक संरक्षणाच्या उद्दिष्टासह वस्तू, तंत्रज्ञान व संसाधनाची योग्य निवड यांचाही समावेश करते.

जंगल क्षेत्र (अस्तित्वात असलेले)
१०३०० हेक्टर किंवा १०३ चौ.कि.मी. मुंबईच्या साधारण एक पंचमांश
धोक्यात आलेले ५५ हेक्टर
१) विरार चिर्ले बहुआयामी रस्ता १०,००० कोटी रू. प्रकल्प मूल्य
७९ किमी व्याप्ती
संपादीत जमीन ११०० हेक्टर
गरजेचे जंगल क्षेत्र
६ किमी चया बाजूने ६ हेक्टर
त्यापैकी २-३ किमी दाट जंगलातून

२) गोरेगाव मुलूंड लिंक रोड गरजेचे जंगल क्षेत्र २१.५ हेक्टर
३) राष्ट्रीय महामार्ग जंगल क्षेत्र १.५ हेक्टर गरजेचे
४) मुंबई दिल्ली फ्रेट कॉरीडॉर - संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून जाणारा
गरजेचे जंगल क्षेत्र १०.५५ हेक्टर
५) ठाणे- बोरीवली रोप वे - SGNP वरुन जाणारा
१००० कोटी चा प्रकल्प जंगलाला जबर हानी पोहोचवणारा
गरजेचे जंगलक्षेत्र - १ हेक्टर (स्तंभासाठी)
६) मुलूंड गायमुख लिंक रोड - ८०० कोटी रू. चा प्रकल्प
१४ किमी रस्त्यासाठी १४ हेक्टर जंगल क्षेत्र गरजेचे

राष्ट्रीय उद्यानाचे बहुआयामी धोके



बहुआयामी रस्ते बांधणीने (वरील चित्र) वेगवेगळे ठिकाणे नक्कीच जोडले जाऊ शकतात आणि व्यापार व फायदा वाढवू शकतो परंतु जंगल क्षेत्राची सूपीक जमीन नष्ट होईल. असा विकास हा फायदा आणि आर्थिक लाभाच्या तत्कालिक उद्दिष्टांसह एकांगी असतो परंतू पर्यावरण तिथे राहणारे लोक, त्यांची सामाजिक जोखीम आणि उत्तरदायित्व त्यांची किंमत चुकवून होतो. परंतु आर्थिक दृष्टीकोनाने कमीत कमी पर्यावरणविषयक हानीसह आर्थिक फायद्यासोबत संतुलन सादण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावयास हवा आणि तो सामाजिक समता आणि न्यायाने मार्गदर्शीत हवा याचाच अर्थ विकासाचे फायदे समाजाच्या दुरवरचा भागात पोहचावयास हवे फक्त मुठभर लोकांसाठी मर्यादित राहू नये. पर्यावरण विषयक शाश्वत विकासांतर्गत उत्पादन वापर आणि विस्तार याची आखणी जाणीवपूर्वक सामाजिक कृतीद्वारा केली जायला हवी.

२) पर्यावरण विषय शाश्वतता :

ही शाश्वतता जैवविविधतेचे संतुलन टिकवते. ही कचरा, हवेत सोडले जाणारे हानीकारक वायू, पर्यावरणाला हानीकारक असणारे विषारी द्रवपदार्थ कमी करण्यावर आणि मानवी आरोग्यावर जोर देते. अशाप्रकारे पर्यावरण विषयक शाश्वतता ही अशी एक विचारसरणी व संवेदनशील अर्थव्यवस्था आहे. ज्यात उद्योग कारखाने आणि इतर विकास हे पर्यावरणाची काय हानी करू शकतात ते लक्षात घेऊन उभारले जातात. अपारंपारिक संसाधनाचा वापर मर्यादित केला जावा आणि पारंपारिक संसाधनांचा वापर सुद्धा न्यायोचितपणे केला जावा. धरती माता ही काही थोड्या शक्तीशाली लोकांच्या एक किंवा दोन विकसीत देशांची एकाधिकारशाही नाही आणि सर्वांच्या अस्तित्वासाठी पृथ्वी टिकणे आवश्यक आहे.

३) सामाजिक शाश्वतता :

आपला समाज हा वैविध्यपूर्ण असून त्यात विविध आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले विविध प्रकारचे लोक राहतात. वाढीव अर्थव्यवस्थेसाठीच्या वाढीव उत्पादनासाठी कार्य करणे महत्त्वाचे आहे. पण त्यासोबतच विकासाचा महत्त्वाचा निकष म्हणून कामगारांचे आरोग्य टिकविणे गरजेचे आहे. काम करण्याठिकाणची परिस्थिती, वैद्यकीय आरोग्यविषयक सुविधा

आणि सर्वांसाठी शैक्षणिक संधी या गोष्टी सामाजिक न्याय व शाश्वतअंतर्गत येतात. विकासाने गरजा व साधने यांच्या अर्थात गल्लत करु नये. मानव व निसर्ग हे स्वतःच गरजा आहेत आणि त्यांच्या कुणा इतरांच्या प्रगती व विकासासाठी साधने किंवा उपकरणे म्हणून वापर करु नये. बेलगाम वाढणाऱ्या आर्थिक वृद्धीने श्रीमंत व गरीबांमधील सामाजिक दरी भरुन काढण्याऐवजी अधिक रूंदावलेली आहे. आर्थिक विस्तारासाठी सामाजिक ऐक्य, स्थानिक / मूळ संसाधनासाठी आदर अत्यावश्यक आहे. विकसित देशांची उत्पादने, वस्तू आणि सेवा बाजार काबीज करून घेऊन स्थानिक संसाधने लोप पावतात. अलिकडेच भारताच्या संदर्भात सुद्धा अन्न, औषधी आणि अनारोग्यकारक अन्न सवयी (खाण्याच्या सवयी) यांच्या व्यापारीकरणाने ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील नवीन बाजारपेठा शोधल्या जात आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण परिस्थितीसुद्धा निरुपयोगी अन्न (जंक फूड) आणि शीत पेये यांच्या मागणीने बदलत आहे. कारण मुले ही प्रसार माध्यमे व आकर्षक संधींनी भरलेल्या बाजारपेठा मुलांना प्रभावित करतात जेणेकरुन ग्रामीण भागातील आरोग्य आणि आरोग्य जीवनशैलीशी तडजोड केली जात आहे.

अशाप्रकारे शाश्वत विकास हा तळागाळाच्या स्तरापासून ते धोरण कर्त्या सरकारपर्यंत सर्वांना सामावते कारण त्याला विकेंद्रित, लोकशाही आणि सर्वसमावेशक आदर्शवादाची गरज आहे. बहुलतावाद (विपुलता) आणि वैविध्यता यांचा आदर केला जावा आणि ते मुठभर लोकांच्या फायद्यासाठी नैसर्गिक, मानवी आणि भौतिक संसाधनाशी श्रीमंत व शक्तीशाली लोकांनी खेळण्याचे मुक्त मैदान बनू नये. साधने व गरजा यामधील संतुलन टिकविले जायला हवे.

तुमची प्रगती तपासा :

प्र. १ रिकाम्या जागा भरा.

अ) ————————-, ———————— आणि ———————— हे शाश्वत विकासाचे महत्त्वपूर्ण पैलू आहेत.

ब) शाश्वत विकासात आर्थिक प्रगती, —————— दर्जा आणि ——————- या तिघांच्या एकाचवेळी केल्या जाणाऱ्या पाठपुराव्याचा समावेश होतो.

प्र. २ ब्रुडलँड आयोगानुसार शाश्वत विकासाची व्याख्या द्या.

प्र. ३ पर्यावरण विषयक शाश्वतता म्हणजे काय ?

प्र. ४ शाश्वत विकासावरील आर्थिक दृष्टिकोन आणि सामाजिक दृष्टिकोन मधील फरक द्या.

प्र. ५ https://www.youtube.com/watch?V=3eBLZR5fUgQ
वरील व्हिडीयो पाहून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

- शाश्वत विकास म्हणजे काय ?
- शाश्वततेचे तीन मुख्य पैलू कोणते ?

३.४ शाश्वत विकासाची गरज

पर्यावरण विषयक, सामाजिक आणि आर्थिक गरजा संतुलित करण्यासाठी शाश्वत विकासाची गरज आहे आणि अशाप्रकारे सध्याच्या व भावी पिढीच्या कल्याणासाठी मार्ग बनवणे मनुष्य स्वकेंद्रीत असल्याने नेहमीच एक ग्राहक बनून राहिलेला आहे आणि पृथ्वीच्या संसाधनाच्या क्वचितच पुनर्भरणशक्ती बनला आहे. परंतु अतिलोक संख्या वाढते. औद्योगिकीकरण, तंत्रज्ञानविषयक प्रगती, वाढते प्रदुषण आणि प्रत्येक जणाची स्वतःच्या प्रगतीसाठीची धडपड यामुळे मानवाद्वारे निसर्गाकडे दुर्लक्ष केले जाऊन दुजाभाव राखला जात आहे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी, आपल्या परिसंस्थेची हानी नियंत्रित करण्यासाठी आणि सर्वांच्या कल्याणासाठी शाश्वत विकासाची तातडीची गरज आहे. खालील मुद्दे शाश्वत विकासाची गरज स्पष्ट करतात.

१) पुढील पिढीसाठी दर्जा व सुरक्षित भविष्य निर्धारीत करणे. सध्याची पिढी ही भावी पिढीसाठी एक सुरक्षित आणि आरोग्यदायी धरती हस्तांतरीत करण्यासाठी नैतिक दृष्ट्या जबाबदार असणार आहे.

२) संसाधनाचे जतन, रक्षण आणि वापर न्याय रितीने केला जावा. उदा. जंगलतोड आणि पृथ्वीच्या संसाधनाच्या शोषणाने आपल्याला पर्यावरण समस्या, सामाजिक असंतुलन आणि संसाधनाचा ऱ्हास येथे आणून ठेवलेले आहेत. वनीकरण, उपलब्ध संसाधनाचे जतन आणि संसाधनांचा योग्य वापर करण्याबाबत लोकाना शिक्षित करणे ही काळाची गरज बनली आहे.

३) संसाधनांच्या अविचारी शोषणावर कडक निगराणी आणि तपासणी गरजेची आहे आणि गरज पडल्यास भावी काळात होऊ शकणाऱ्या हानीला थांबवणे गरजेचे आहे.

४) आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी मानवाने धरती आणि तिच्या क्षमतेला गृहीत न धरण्याची तातडीची गरज आहे. पृथ्वीच्या संसाधनांचे जतन आणि पुननिर्मितीकरण करण्यात मावनाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. हे अशाप्रकारचे स्वामित्व समजून घेणे म्हणजे पृथ्वीवरील आपला स्वामित्वाचा हक्क नव्हे तर या धरती मातेप्रती आपले कर्तव्य आणि जबाबदारी बजावणे होय. आपण फक्त धरती मातेचे ऋणको नाहीत तर धरती आणि तिच्या संसाधनाचे काळजी वाहक आहोत.

५) पर्यावरणाचे अर्थव्यवस्था आणि सामाजिक जबाबदारीशी एकीकरणाची गरज निर्माण झाली आहे. विकासाच्या सहभागी दृष्टिकोनाचे स्थानिक जमातीना नियोजन, अंमलबजावणी आणि सर्वांच्या भल्यासाठीच्या कृतीसाठी निधी देणे आणि शोषणात्मक असंतुलन टाळण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणे सुखर होते.

६) पर्यावरण पूरक आर्थिक विकासाच्या ज्ञान आणि कौशल्य सहभागाची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक जमाती, शिक्षणतज्ञ, एनजीओझ्, सरकारी धोरणे यांच्या मदतीने नियोजन व

अंमलबजावणी सह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भांडणतंटा निराकरण आणि सामाजिक विकासासाठी सृजनशील डावपेच गरजेचे आहे.

७) स्थानिक संसाधनांसाठी आदर वाढविण्याकरता स्थानिक जमातींच्या सबळीकरणासाठी पृथ्वीच्या संसाधनांचे जतन करण्याच्या स्थानिक पद्धतींचे जतन करण्यासाठी, स्थानिक संसाधनांच्या पुननिर्मितीसाठी शाश्वत विकासाची गरज आहे आणि त्याचवेळेस जागतिक नागरिक असण्याचा उदात्त विचार करण्याची गरज आहे. आपली कृती स्थानिक आणि विचारसरणी जागतिक असावी.

आपली प्रगती तपासा :

अ) एकदोन वाक्यात उत्तरे लिहा.

१) पर्यावरण विषयक असंतुलनाची कोणतीही दोन उदाहरणे लिहा.
२) शाश्वत विकासाच्या विचारसरणीचा एक भाग म्हणून आपण स्थानिकदृष्ट्या कसे वागावे आणि जागतिक दृष्ट्या कसा विचार करावा ?
३) सहभागी जबाबदारी आणि स्वामित्व म्हणजे काय ?

ब) शाश्वत विकासाच्या गरजेवर टिप लिहा.

३.५ शाश्वत विकासाची तत्वे / उद्दिष्ट्ये

शाश्वत विकासाचे मुख्य तत्व म्हणजे विकासाविषयी आपली दृष्टी, आपला दृष्टिकोन आणि पुर्नविचाराची क्षमता जग असे बघतेकी आपण संपूर्ण विश्वाचा एक छोटा भाग आहोत आणि आपल्याला फक्त व्यक्ती किंवा देशच नव्हे तर वेगवेगळ्या देशांच्या चांगलेपणा विषयी विचार करायला हवा. संपूर्ण जगाचा आपण एक भाग आहोत आणि जगाच्या एका टोकाला जे घडते त्याचा इतर भागांवर सुद्धा परिणाम होतो. आपण वेळ आणि स्थानाच्या पलिकडे मर्यादेच्या बाहेर जोडले गेलेलो आहोत. शाश्वत विकास हा तीन स्तंभावर उभा आहे - अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि समाज



आकृती ३.२ : शाश्वत विकासाचे तीन स्तंभ

शाश्वत विकासाची तत्वे पुढीलप्रमाणे

१) पर्यावरण विषयक आणि आर्थिक एकत्रीकरण - आर्थिक विकास व पर्यावरण यामधील आकलन व बंध ही फक्त तत्वाची बाब नाही तर आजच्या काळाची गरज आहे. आपल्याला मेट्रो ट्रेन शेडसाठी जागा हवी असल्यास त्यासाठी आपण जंगलतोड करु शकत नाही. अधिक चांगल्या व्यापारासाठी मेट्रो ट्रेन असणे आणि त्यासोबतच परिसंस्थेचे संतुलन टिकविण्यासाठी जंगल असणे या दोहोंसाठी आपल्याला आपले डावपेच, योजना व कल्पना यांचा विचार करणे गरजेचे आहे. उत्पादन आणि उपभोग नियोजन हे पर्यावरणाच्या हानीचे परिणाम विचारात घेऊन केले जावे. भावी शाश्वतेसाठी अर्थव्यवस्था आणि परिसंस्था यांनी वेगवेगळे न जाता किंवा एकाच्या लाभासाठी दुसऱ्याचे शोषण न होता, हातात हात घालून जायला हवे. निसर्गाला आपला गुलाम समजण्याच्या आपल्या प्रवृत्तीचे परिणाम म्हणजे अवेळी, अनियंत्रित येणारी नैसर्गिक संकटे, जागतिक तापमानवाढ, हिमखंडांचे वितळणे, इ. यामुळे विकसित व विकसनशील देशातील दरी भरुन काढण्यास सुद्धा मदत होईल. गांधीजींनी ही बाब अतिशय चपखलपणे मांडलेली आहे, "जगाजवळ प्रत्येकाच्या गरजेसाठी पुरेसे आहे, परंतु प्रत्येकाच्या लालसेसाठी मात्र पुरेसे नाही." यामुळे ही बाब अधोरेखीत होते की आपल्या लालसेच्या विचारी नियंत्रणाशिवाय आर्थिक विकास हा व्यक्ती, देश आणि धरतीच्या विनाशाकडेच घेऊन जाईल. जीवनशैलीचे काही स्वदेशी, स्थानिक मार्ग हे अर्थव्यवस्थेचे पर्यावरणाशी संतुलन साधण्यात मदत करु शकतात. कारण मागील काळात औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञान विषयक गैरवापर आणि अतिवापराने निर्माण केलेल्या समस्यांना मानवाला तोंड द्यावे लागत नव्हते.

२) नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन : संसाधनांचे रक्षण, जैवविविधतेचे जतन आणि आपल्या पर्यावरणविषयक वारश्यावर लक्ष केंद्रित करण्याची जबाबदारी आपली आहे. नैसर्गिक संसाधने ही फक्त आपला ऐषोआराम आणि फायद्यासाठीच आहे ही प्रवृत्ती आपल्या सध्याच्या निसर्गाच्या संथ विनाशाकडे आणि भावी काळातील अचानक विनाशाकडे किंवा हलाखीचे आणि चांगल्या जीवनासाठी अपूर्ण संसाधनांच्या जीवनाकडे घेऊन जाऊ शकते. आपल्या कृतींमुळे आधीच हवा, पाणी, जमीन यांची निकृष्टप्रत, सुर्यप्रकाशाचे घातक परिणाम आणि निसर्गाच्या

इतर घटकांमधील असंतुलन निर्माण झालेले आहे. अशाप्रकारे नैसर्गिक संसाधनांचे जतन हे आजच्या मानवाच्या आणि चांगल्या भविष्यासाठी रक्षणकर्ता होऊ शकते.

३) उपचारापेक्षा प्रतिबंध बरा आणि पश्चातापापेक्षा सुरक्षित असणे बरे - या म्हणी जाणीवपूर्वक नोंदविलेल्या आहेत ज्या आपल्याला आठवण करुन देतात की आपण जर आपल्या आत्मसंतुष्ठता आणि निद्रेतून जागे झाले नाही तर आपल्याला अशा परिणामांना तोंड द्यावे लागेल कि जे आपल्या पृथ्वीवरील दर्जेदार जीवनासाठी नव्हे तर भावी काळात आपल्या उदरनिर्वाहासाठी सुद्धा प्राणघातक ठरतील. पर्यावरणाची आणखी पुढील हानी टाळण्याकरता आपण स्वत:ला शिक्षित आणि कृतीशील करणे अधिक चांगले, म्हणून कुठलीही नवीन विकासात्मक आणि आर्थिक टप्प्याचे नियेजन करण्याआधी पर्यावरणविषयक व सामाजिक गतिशीलता लक्षात ठेवून दूरदृष्टीता ठेवणे व त्यानुसार नियोजन करणे अधिक चांगले असे म्हटले जाते की काही शक्तीशाली देशांसाठी नैसर्गिक संसाधनांपासून अधिकाधिक ओरबाडण्याच्या चढाओढीत पर्यावरण तसेच विकसनशील देश आणि समाजावर अन्याय होत आहे. हा अन्याय अस्तित्वाच्या लढाईकडे घेऊन जाईल आणि अशाप्रकारे जंगलराज आणि बळी तो कान पिळी कायद्याकडे घेऊन जाईल असे म्हटले जाते की तिसरे महायुद्ध झालेच तर ते पाण्याखाली होईल. आपले डोळे उघडण्याची हीच वेळ आहे. ज्याद्वारे आपल्याला हे सत्य समजेल की सावध असणे दुरदृष्टी असणे पश्चातापापेक्षा सुरक्षित असणे आणि शाश्वत विकासाचा स्विकार यावाचून गत्यंतर नाही.

४) सामाईक जबाबदारी आणि मालकी स्विकारणे : शाश्वत विकास हे काही एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या देशाचे सुद्धा कार्य नव्हे तर तो एक सहकारी प्रयत्न आहे. कारण विकासाच्या शाश्वत पैलूंना दुर्लक्षिल्याने होणारी हानी सुद्धा प्रचंड असेल. जास्तीत जास्त लोकांची हुशारी, आधार सृजनशीलता आणि प्रयत्न महत्त्वाचे आहे. राष्ट्रीयत्व, धर्म, तत्वे यांना विचारात न घेता आपल्या सर्वांना राहण्यासाठी आणि भावी पिढीसाठी एक सशक्त व सुरक्षित धरतीच्या बांधणीसाठी आपण एकत्र येणे गरजेचे आहे. उज्वल भविष्यासाठीच्या मार्गांचा विचार करण्यासाठी आपणा सर्वांच्या पुढाकाराने आणि मालकीने सामुहिक प्रयत्न व्हायला हवे. एकाच गोष्टीचे विविध भाग म्हणून, व्यक्तीगत, सामाजिक, पर्यावरणविषयक आणि आर्थिक हितावर लक्ष केंद्रित करावयास हवे यात समाविष्ट लोकांना आर्थिक प्रगती सोबतच निसर्गाचे संतुलन आणि ऐक्याचा विचार करायला हवा हे महत्त्वाचे आहे की आपण पर्यावरण विषयक मर्यादेत राहतो आणि सामाईक जबाबदारी स्विकारून शाश्वत विकासासाठीच्या डावपेचांसह आर्थिक विकासाचे व्यवस्थापन करतो.

५) कचरा कमी करणे, पुनर्वसन, पुनर्प्राप्ती : शाश्वत विकास संसाधनाच्या अतिशोषणाच्या नियंत्रणावर जोर देतो आणि पुनर्वसन व पुनप्राप्तीसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करुन कचरा कमी करण्याला बढती देतो.

६) सशक्त आरोग्यदायी आणि न्याय समाजाची खात्री : शाश्वत विकासाचा सामाजिक शाश्वतता पैलू हा विकासापासून काही फक्त थोड्यांना नव्हे तर बहुतांश लोकांना फायदा पोहचल्यावर केंद्रित आहे. तो पर्यावरण विषयक न्याय आणि सामाजिक शाश्वतता यावर जोर देतो. वास्तविक परिस्थिती फार थोडे शक्तीशाली देशच फक्त संसाधनांवर नियंत्रण मिळवतात आणि त्यांच्या वापरासाठी इतर देशाचे शोषण करु शकतात. परंतू शाश्वत विकासात संसाधनांचा

वापर व वितरण न्यायोचितपणे होणे याची खात्री आपल्यासाठी महत्त्वाची आहे कारण ती काही एक किंवा दोन देशांची एकाधिकारशाही नाही तर ते सर्वांची आहे जेणेकरुन एक सशक्त आरोग्यदायी आणि न्याय समाज तो शाश्वत समाजचा भाग आहे. त्याची खात्री मिळते त्याचप्रमाणे छोट्या समाजाचया संदर्भात सर्वांच्या भल्यासाठी संसाधनांचा वापर सर्वांकडून न्यायोचितपणे केला जायलाच हवा. अशाप्रकारे वैश्विक प्राथमिक शिक्षण प्राप्त करणे, मानसिक आरोग्य सुधारणे, बालमृत्यू पातळीत सुधारणा करणे, लिंग समानता, कचरा निर्मुलन, पुनर्चक्रीकरण यांना प्रोत्साहन देणे ही विकासाच्या सामाजिक शाश्वततेची उदाहरणे आहेत. विचार करु या.

शाश्वत विकासाची उदाहरणे : भारत

१) धारणा, विहार : भारतातील बहुतांश खेड्यांप्रमाणे विद्युत उर्जेसाठी एकेकाळी झगडत असलेले धारणी गावाने त्याचे नशीब बदलवले आणि ते आता पूर्णपणे सौरउर्जेचा वापर करणारे भारतातले पहिले खेडे बनले. धारणीचे रहिवासी कित्येक दशकापासून विद्युत उर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी डिझेलवर चालणारी जनित्र आणि गाईच्या शेणाच्या गोवऱ्यांसारखी त्रासदायक इंधने वापरत होती. जी महागडी व अनारोग्यकारक होती. २०१४ मधील ग्रीन पीस चे, सौरशक्तीवर चालणारे १०० किलोवॅटचे मायक्रोग्रीड उभारल्यापासून जिहानाबाद जिल्ह्यातील या खेड्यात राहणाऱ्या २४०० पेक्षा अधिक लोकांना दर्जेदार वीज पूरवली जात आहे.



२) २००४-०५ मध्ये निर्मल ग्राम पुरस्कार मिळवणारे तेलंगणा प्रांतातील पहिले खेडे रामचंद्रपूर जे एक दशकापूर्वी प्रकाशात आले जेव्हा तेथील खेडूतांनी अंध लोकांसाठी त्यांचे डोळे दान करण्याची प्रतिज्ञा घेतली. त्यांनी प्राप्त केलेल्या बऱ्याच कामगिरींमध्ये खेड्यतील प्रत्येक घरात निर्धुर चुली आणि नळाच्या पाण्याच्या सुविधेसह संडासी आहेत. त्या राज्यातील हे असे पहिले खेडे आहे ज्याने जवळचा नदीवर जमिनीखालील बंधारा बांधला आणि प्रत्येक घरावर दोन टाक्या ठेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला त्या खेड्यात सांडपाणी निचरा पद्धती नाही आणि प्रत्येक घरातून निघणारे सर्व पाणी हे प्रत्येक घराला असलेल्या परसबागेत सोडलेले आहे.

निष्कर्ष -

शाश्वत विकास हा विकासासोबत संसाधनांचा न्यायोचीत व समान वापराची खात्री देतो. तसेच सद्यस्थितीतील गरजा पूर्ततेची खात्री देतो परंतू जीवनाचा भावी दर्जाशी तडजोड करत नाही. तसेच तो संसाधनांच्या जतनावर जोर देतो. एक शाश्वत जग ते असते जेथे

सर्वांच्या मुलभूत गरजांचे समाधान होते आणि जेथे प्रत्येकाला स्वच्छ उर्जा आरोग्यदायी अन्न आणि शुद्धपाणी मिळते, जेथे वंचितांना सुद्धा समान अधिकार आहे आणि जेथे परिसंस्थेला हानी पोहचविल्याबिना व्यक्ती कार्याचा आणि वाढीचा आनंद लूट शकते.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ शाश्वत विकासाचे कोणतेही दोन तत्वे सोदाहरण सांगा.

प्र.२ शाश्वत विकासाचे तीन स्तंभ कोणते ?

प्र.३ "प्रत्येकाच्या गरजेसाठी जगाजवळ पुरेसे आहे परंतू प्रत्येकाच्या लालसेसाठी मात्र पुरेसे नाही." शाश्वत विकासाच्या संदर्भात हे वाक्य स्पष्ट करा.

प्र.४ अशाश्वत म्हणून समजल्या जाणाऱ्या कोणतेही दोन कृती सांगा.

प्र.५ चित्र अभ्यास शाश्वत विकासासाठी पुढील रचना स्पष्ट करा आणि त्याचे फायदे लिहा.



प्र.६ पुढील व्हिडीओ पाहून प्रश्नांचे उत्तर द्या.

https://www.youtube.com/watc?V=neGfgZ7k4LE

प्र.७ "आपण निसर्गाचा नाश केल्यास निसर्ग आपला नाश करेल." स्वर्गीय नोबल शांती पुरस्कार विजेत्या वंगारी माथाई यांचे शाश्वत विकासासंबंधीचे हे वाक्य आहे. चर्चा करा.

३.६ सारांश

अशाप्रकारे या विभागात आपण शाश्वत विकासाचा अर्थ समजून घेतला. तसेच पर्यावरण विषयक जतन आणि सामाजिक समानतेसह आर्थिक विकासामधील संतुलन साधणे किती महत्त्वाचे आहे ते अभ्यासले. शाश्वत विकासाची गरज आणि शाश्वत विकास ज्या तत्वावर आधारीत आहे त्यांची सुद्धा चर्चा केली गेली. काही उदाहरणांच्या साहाय्याने शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याकरता छोटी शहरे, खेडे, मोठी शहरे यांनी केलेले प्रयत्न सुद्धा प्रकर्षाने

मांडले गेले आहेत. तसेच शाश्वत विकासाविषयी अधिक शिकण्यासाठी अधिक उदाहरणे आणि प्रयासांचे संदर्भ दिले जाऊ शकतात. अशाप्रकारे हा विभाग आपल्याला धरतीविषयी अधिक काळजी करायला आणि व्यक्तीगत आणि सामाजिक उद्दिष्ट्ये यांची एकमेकांशी तडजोड न करता कशी प्राप्त करावी हे समजण्यास मदत करते.

३.७ अभ्यास

प्र. १ योग्य पर्याय निवडा.

१) ब्रुडलँड आयोगानुसार शाश्वतता म्हणजे ————————–

अ) नैसर्गिक संसाधनाचा सुयोग्य वापर

ब) मानवी विकासासाठी नैसर्गिक पर्यावरणाचे शोषण केले जाऊ नये.

क) संसाधनांचे सर्व नियंत्रण विकसीत आणि विकसनशील देशांद्वारे सामाईकपणे केले जावे.

ड) सध्याच्या गरजांची पूर्तता ही भावी पिढीच्या त्यांच्या स्वत:च्या गरजांच्या पूर्ततेसाठीच्या क्षमतेशी तडजोड न होता व्हावी.

२) ब्रुडलँड आयोगाची व्याख्या पुढीलपैकी कोणत्या संकल्पनेला सामावते.

अ) चांगल्या भविष्यासाठी सध्याच्या गरजा न्यायोचीतपणे वापरण्याची संकल्पना.

ब) भावी पिढीच्या गरजांच्या पूर्ततेसाठी त्यांची क्षमता वाढविण्याची संकल्पना.

क) भावी गरजांच्या पूर्ततेसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता.

ड) भावी पिढी त्यांच्या गरजांची पूर्तता स्वत: करु शकते.

३) शाश्वततेचे तीन स्तंभ म्हणजे

अ) पर्यावरण विषयक, सामाजिक आणि आर्थिक घटक

ब) ज्ञान, सहभाग आणि उर्जा

क) माणूस प्राणी आणि वनस्पती

ड) वरील सर्व

४) विकास आणि पर्यावरणाच्या संकल्पनाचे पुढीलपैकी उदाहरण कोणते ?

अ) सौरउर्जा

ब) पाऊसपाणी संचयन

क) सर्वांसाठी स्वच्छता

ड) वरील सर्व

प्र. २ आजच्या घडीला शाश्वत विकासाची तातडीची गरज उदाहरणासह स्पष्ट करा.

प्र. ३ शाश्वत विकासासाठी सामाजिक आणि पर्यावरणविषयक विकासाला चालना देण्याऱ्या तत्वांची तपासणी करा.

प्र. ४ शाश्वत विकासाच्या संकल्पनेवर आधारीत शाश्वत विकासाची प्राथमिक उद्दिष्ट्ये तर्काने मिळवा.

प्र. ५ शाश्वत विकासात योगदान देण्यासाठी तुम्ही अवलंबणारे पाच मार्ग लिहा.

प्र. ६ ग्लोबल फूटप्रिंट नेटवर्क आणि भारतीय उद्योजकता संघटन यांनी २००८ मधील अहवालात सूचविले की भारताजवळ जगाच्या तिसऱ्या सर्वात मोठ्या पर्यावरण विषयक पदचिन्हे आहे आणि त्याच्या जैवकक्षमतेच्या दुप्पट एवढा त्यांचा संसाधनांचा वापर आहे आणि मागील काही दशकात ही जैवक्षमता निम्म्यानी घसरली आहे. या विधाना संदर्भात भारताला शाश्वत विकास अवलंबण्याची गरज का आहे ते स्पष्ट करा.

प्र. ७ शाश्वत विकासाच्या गरजा आणि तत्वे दुर्लक्षिणे विपरित परिणामांकडे घेऊन जाऊ शकते. या विधानाशी तुम्ही सहमत आहात का ? तुमच्या उत्तराचे स्पष्टीकरण द्या.

❖❖❖❖

४

शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका

घटक रचना :

४.० उद्दिष्ट्ये
४.१ परिचय
४.२ शालेय अभ्यासक्रमात शाश्वत विकासाचे स्थान
४.३ शाश्वत विकासात शिक्षकाची भूमिका
४.३.१ परिचय
४.३.२ शिक्षकाची भूमिका
४.४ UNESCO ची भूमिका
४.४.१ परिचय
४.४.२ UNESCO ची भूमिका
४.५ सारांश
४.६ अभ्यास

४.० उद्दिष्ट्ये

या विभागाचा अभ्यास केल्यावर तुम्ही खालील गोष्टी करु शकाल.

- शालेय विकासातील शाश्वत विकासाचे स्थान स्पष्ट करणे.
- शाश्वत विकासातील शिक्षकाची भूमिका स्पष्ट करणे.
- शाश्वत विकासातील UNESCO ची भूमिका स्पष्ट करणे.

४.१ परिचय

मागील विभागात तुम्ही शाश्वत विकासाचा अर्थ, त्याची गरज व उद्दिष्ट्ये यांचा अभ्यास केला आहे. या विभागात आपण शालेय अभ्यासक्रमातील शाश्वत विकासाचे स्थान त्याचप्रमाणे शाश्वत विकासातील शिक्षकाची भूमिका व UNESCO ची भूमिका याचा अभ्यास करणार आहोत.

बहुतांश पर्यावरणविषयक समस्या या मानवनिर्मित आहेत. आणि त्या फक्त मानवाद्वारेच सोडवल्या जाऊ शकतात. ज्यासाठी शिक्षण हे गुरुकिल्लीचे काम करू शकते. मागील काही वर्षात आपण पर्यावरणाच्या दर्जातील जलद ऱ्हासाला तोंड देत आहोत. ज्यात हवा, पाणी आणि जमीनीचे प्रदूषण, परिसंस्था आणि प्रजातींचा नाश इ. चा समावेश आहे. हवामान बदल हे शाश्वत विकासाला आजच्या घडीचे सर्वात गंभीर जागतिक आव्हान म्हणून उभे ठाकले आहे आणि त्याच्या विपरित परिणामांना तोंड देण्यासाठी तात्काळ कृतीची गरज आहे.

४.२ शालेय अभ्यासक्रमातील शाश्वत विकासाचे स्थान

अधिक चांगल्या शाश्वत जगाच्या प्राप्तीसाठी चांगल्या प्रतीचे शिक्षण हे एक अत्यावश्यक साधन आहे. या गोष्टीवर २००२ मधील जोहान्स बर्ग येथील संयुक्त राष्ट्रांच्या (UN) जागतिक परिषदेत जोर दिला गेला जेथे शाश्वत विकासाची किल्ली म्हणून सध्याच्या शिक्षणाच्या पुनर्स्थापनेची रूपरेषा आखली गेली. शाश्वत विकासासाठी शिक्षण हे शाश्वत जगाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या ज्ञान, कौशल्य, आकलन, मुल्ये आणि कृतींच्या विकासाला चालना देते आणि जे पर्यावरणविषयक रक्षण व जतनाची खात्री देते, सामाजिक समानतेला चालना देते आणि आर्थिक शाश्वतेला उत्तेजन देते. ESD ची संकल्पना ही प्रामुख्याने पर्यावरणविषयक शिक्षणापासून विकसित झाली, ज्याने लोकांमध्ये त्यांच्या पर्यावरणाविषयी काळजी करण्यासाठी ज्ञान, कौशल्य, मुल्ये, दृष्टीकोन आणि प्रवृत्ती विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे. ESD चे ध्येय म्हणजे आपल्या धरतीशी तडजोड न करता आपल्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी निर्णय घेण्यास आणि कृती करण्यास लोकाना सक्षम करणे. याचा अजुन एक उद्देश म्हणजे शाश्वत विकासातील मूलतत्वांचा शिक्षणाच्या सर्व संकल्पना आणि स्तर यांच्यात समावेश करणे.

एक अभ्यासक्रम हा सूचना वजा सराव, अध्ययन अनुभव आणि विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन यांचा संयोग असून जो एखाद्या विशिष्ट अभ्यासक्रमाच्या अपेक्षित अध्ययन परिणामांना शोधणे आणि त्यांचे मूल्यमापन करणे या दृष्टीने संरचित केलेले आहे. शाश्वत विकासासाठी शिक्षणाची उद्दिष्ट्ये, संकल्पना आणि अध्ययन अनुभव यांचा अभ्यासक्रम आणि अध्यापन कार्यक्रमात समावेश करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. 'शाळेद्वारा पुरविल्या जाणाऱ्या औपचारिक आणि अनौपचारिक अध्यापन व अध्ययन यांची एकुण गोळाबेरीज' अशी अभ्यासक्रमाची व्याख्या केली गेली तर शाश्वत विकासासाठीच्या शिक्षणाची फक्त एक नवीन विषय म्हणून भरती केली जाऊ शकत नाही. याउलट हे एक परिमाण आहे ज्यावर शालेय जीवनाच्या प्रत्येक संकल्पनेला जोर दिला जावा.

शालेय अभ्यासक्रमात पुढील कृतींचा समावेश करुन शाश्वत विकास साधला जाऊ शकतो.

१) शैक्षणिक दिनदर्शिका :

सर्व शैक्षणिक तसेच बिगर शैक्षणिक कृतींच्या सुरळीत कार्यरत असण्यासाठी शैक्षणिक दिनदर्शिका महत्त्वाची भूमिका बजावते. शाश्वत विकासाशी संबंधित बरेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दिवस शाळेत साजरे केले जाऊ शकतात. पूर्ण वर्षभर शाश्वत विकासाप्रती

विद्यार्थ्यांना जागरूक करण्यासाठी कृतींची योजना केली जाऊ शकते. उदा. वृक्ष लागवड, एकांकी नाटक, पाहुण्यांची वाख्याने, प्रदर्शन, मैफिली, सहली, भेटी इ.

२) अंत: विषय अध्ययन :

सर्व शालेय विषयात शाश्वत विकासासाठीचे शिक्षण अशा प्रकारे शिकवले जाऊ शकते की त्याविषयाची अध्ययन उद्दिष्ट्ये प्राप्त केली जातात, तसेच त्याद्वारे शाश्वत विकासाचे ज्ञान दिले जाते. प्रत्येक विषय क्षेत्रात हा विषय समाविष्ट करुन किंवा अभ्यासक्रमात वेगळा विषय म्हणून याचा समावेश करुन हे साध्य केले जाऊ शकते.

३) ज्ञान आणि मूल्ये मनावर बिंबवणे :

अभ्यासक्रम घडामोडीतून आपण विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाची संबंधित मुद्याचे ज्ञान देवू शकतो. ज्ञानाची निवड करण्यासाठी वापरली जाणारी तत्वे जी पाठात शिकविली जातात त्यांनी विद्यार्थी अध्ययन गजरा, स्थानिक समाज आवडी आणि शाश्वत जीवनासाठीचे अध्ययनाचे मार्ग यांचा विचार करावा.



आकृती ४.१ शालेय अभ्यासक्रमात शाश्वत विकासाचा वाव

४) अध्यापन-अध्ययन पद्धती :

विद्यार्थी काय शिकतो यापेक्षा तो कसा शिकतो हे अधिक महत्त्वाचे आहे. याला कारण म्हणजे 'माध्यम' हे 'संदेशा' इतकेच महत्त्वाचे आहे. माध्यम हे बरोबर असेल तर विद्यार्थ्यांना संदेश खचितच मिळेल. विद्यार्थी केंद्रित परस्पर संवादी दृष्टिकोन हा विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाप्रती त्यांची जबाबदारी समजण्यास मदत करू शकतो.

५) अधिकार व कर्तव्याची जाण :

विद्यार्थ्यांना त्यांचे अधिकार व कर्तव्यांची जाण ही विषयांद्वारे शिकवली जायला हवी. शालेय जीवन व व्यक्तीगत जीवनाचा सर्व संकल्पनेत लोकशाहीचा सराव केला जावा. यामुळे त्यांना शाश्वत विकासाप्रती त्यांचे अधिकार व कर्तव्ये समजण्यास मदत होईल.

६) गट प्रकल्प / कृती :

औपचारिक अभ्यासक्रमात गटप्रकल्पांचा समावेश करणे खूप सोपे आहे. छोट्या वर्गकृती म्हणून सुरु केलेले प्रकल्प हे संपूर्ण शाळेत प्रदर्शित केले जाऊ शकतात किंवा त्यांची स्पर्धा घेतली जाऊ शकते. तो एकवर्ग किंवा मंडळाद्वारे शालेय परिसरात आणि स्थानिक समाजात सुद्धा पार पाडला जाऊ शकतो. ज्याद्वारे विद्यार्थ्यांना मौल्यवान अध्ययन अनुभव प्राप्त होऊ शकतो. याची उदाहरणे म्हणजे पर्यावरण जागृती, आरोग्य समस्या यांवरील सर्वेक्षण, बगिच्याची देखरेख आणि रखरखाव, जेष्ठ नागरिकांना भेटी देणे व मदत करणे. बालगृह किंवा अनाथालयात कार्य करणे, स्थानिक हवा किंवा पाण्याच्या दर्जाची देखरेख आणि इतर. अशा कृती विद्यार्थ्यांना एकमेकांना मदत करायला आणि ज्ञानाची परस्परांना देवाणघेवाण करायला मदत करतात.

७) शालेय परिसरात संसाधनांचा वापर (हरित परिसर) :

पुनर्चक्रीकरण, पुनर्वापर, पुनरूत्पादनाची संकल्पना ही शालेय परिसरात ध्येय होवू शकते. शाळा ही संसाधनाचे पर्यावरण विषयक लेखापरिक्षण घेऊ शकते, जसे की पाणी आणि उर्जेचा वापर आणि शाळेत निर्मान होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण यामुळे शाळेला समस्या ग्रस्त क्षेत्रे आणि त्यासंबंधीचे मुल्य याविषयी माहिती गोळा करण्यास मदत होईल. लेखा परिक्षण आणि त्याद्वारे घेणारी संसाधनांची बचत यामुळे पाणी आणि विद्युत यांसारख्या संसाधनांची किंमत कमी झाल्याने शाळेचा पैसा वाचू शकतो. छोट्या प्रमाणावर पुनर्चक्रीकरणाच्या कृती या शाळेच्या परिसरात चालवल्या जाऊ शकतात जसे कागदाचे पुनर्चक्रीकरण, गांडुळखत, प्रयोगशाळेत ई-कचऱ्याचा वापर, पर्जन्य जलसंचयन, सौर पॅनलची उभारणी, इत्यादी.

८) विद्यार्थी मंडळांची उभारणी :

बरेच अभ्यासेतर उपक्रम हे विद्यार्थ्यांद्वारे किंवा विद्यार्थ्यांसाठी मधल्या सुटीत, शाळा सुटल्यावर, आठवड्याच्या शेवटी आणि सुटींमध्ये योजले जाऊ शकतात. तरूण मुलांच्या विचारसरणी व कृतींमध्ये शाश्वत विकासामध्ये सामावण्यासाठी विद्यार्थी मंडळे (उदा. पर्यावरण मंडळ, निसर्ग मंडळ, स्काऊट्स, गाईड्स, इ.) हे चांगले मार्ग आहेत.

आपली प्रगती तपासा :

१) शालेय अभ्यासक्रमात शाश्वत विकासाचे स्थान स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

४.३ शाश्वत विकासात शिक्षकाची भूमिका

४.३.१ परिचय :

शिक्षणाने सर्व लोकांना व्यक्तीशः आणि सामुदायिकरित्या अशा दोन्ही प्रकारे जबाबदार आणि प्रगल्भ निर्णय घेण्यास सक्षम बनवायलाच हवे. अशाप्रकारे सद्यस्थिती आणि भावी आव्हांनाना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी आणि सर्वांसाठी सामाईक भविष्य रचनेत सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी त्यांना तयार करायला हवे. शिक्षक आणि शिकणारा समाज हे या शाश्वत तत्वाच्या प्रसारातील प्रमुख घटक आहेत जे विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनात आवश्यक बदल घडवून आणतील.

शैक्षणिक विषयाला विचारात न घेता शिक्षकाची एकूणच महत्त्वाची जबाबदारी म्हणजे विद्यार्थ्याला सामाजिक दृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्या घडविणे जेणेकरुन विद्यार्थी एक चांगला जुडवून घेणारा व्यक्ती होईल आणि शाश्वत विकासाप्रती त्याची जबाबदारी समजून घेईल.

४.३.२ शिक्षकाची भूमिका :

शिक्षक विद्यार्थ्याला कशाप्रकारे मदत करु शकतात ते आता आपण बघू.

१) वर्गात शिकवण्याच्या रणनीतीचा वापर : वर्ग म्हणजे एक चल-वातावरण असते जेथे वेगवेगळी क्षमता व व्यक्तीमत्व असलेले वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेले विद्यार्थी एकत्र येतात. म्हणून एक परिणामकारक शिक्षक घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीगत गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने सृजनशील आणि नाविण्यपूर्ण शिकवण्याच्या रणनीतीची अंमलबजावणी गरजेची आहेत. शिकवण्याच्या रणनीतीची काही उदाहरणे.

अ) सहकारी अध्ययन : यामध्ये एखादा प्रकल्प किंवा कार्य पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी गटात एकत्रितपणे कार्य करतात. यात विद्यार्थ्यांची ध्येय म्हणजे गटात योगदान कसे द्यावे ते शिकणे, वैयक्तिक जबाबदारी दर्शवणे आणि गटाच्या फलनिष्पत्तीसाठी जबाबदारी सामाईकपणे उचलणे. शाश्वत विकासाच्या जाणिवेवर आधारित कृती या पद्धतीद्वारे शिकवल्या जाऊ शकतात.

ब) प्रायोगिक अध्ययन : प्रायोगिक अध्ययन विद्यार्थ्याला प्रत्यक्ष अनुभवाद्वारे शिकण्याची संधी प्रदान करते. पारंपारिक शैक्षणिक वर्गाच्या बाहेर कौशल्य, ज्ञान आणि अनुभव प्राप्त केला जातो. यामध्ये कामाचा अनुभव (internship), परदेशात अभ्यास, सहली, संशोधन आणि प्रकल्प.

क) वर्गात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर : अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर हा विद्यार्थ्याला सक्रीयपणे गुंतवून ठेवण्याचा एक चांगला मार्ग आहे. यामुळे त्यांना इंटरनेटद्वारे अत्याधुनिक ज्ञानाशी अद्ययावत करण्यात मदत होईल. उदा. ब्लॉग्झ आणि इतर सामाजिक नेटवर्कींग वेबसाईट्सचा वापर, व्हिडियो कॉन्फरन्सिंग, गुगल अर्थ. गुगल अर्थ हा मोफत गुगल अर्थ कार्यक्रम आहे. गुगल अर्थ कार्यक्रम (http://earth.google.com) ज्याद्वारे तुम्ही तुमच्या परिसराच्या अगदी अलीकडील उपग्रह प्रतिमा अगदी तुमचे घर सुद्धा बघू शकतात.

ड) समस्या निराकरण : समस्या निराकरण पद्धतीत, मुले ही समस्येवर काम करुन शिकतात. निराकरण करण्याच्या समस्येला तोंड देऊन मुले नवीन ज्ञान अर्जित करतात. विद्यार्थ्यांनी यात निरिक्षण करणे, आकलन, विश्लेषण, अर्थ लावणे, उकल शोधणे आणि उपयोजन करणे अपेक्षित असते जे विद्यार्थ्याला संकल्पनेच्या समग्र आकलनाकडे घेऊन जातात.

इ) टीकात्मक विचारसरणी : बाह्य परिणामाला विचारात न घेता यामुळे विद्यार्थ्याला त्यांचे स्वत:चे मत व निष्कर्ष काढण्यास मदत होते. ही बाब विद्यार्थ्याला विश्लेषणाची शिस्त शिकविते आणि कल्पना व इतर मत-मतांतरे व दृष्टिकोनांना वाव देताना त्यामधील संबंध बघणे शिकविते. शिक्षक या तंत्रांचा वापर विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाप्रती जागरूक करण्यासाठी प्रत्येक पाठ व विषयात टीकात्मक विचारसरणी कौशल्य शिकविण्यासाठी करु शकतो.

फ) भूमिका बजावणे : भूमिका निभावणे हे सक्रीय अध्ययन व अध्यापन रणनीतचे एक मनोरंजक उदाहरण आहे. यामध्ये कुठल्याही विषयाशी संबंधित वास्तव जीवनातील घटनेचे नाटक, नक्कल, खेळ आणि प्रात्यक्षिकाचा समावेश केला जाऊ शकतो.

ग) विचारमंथन : हे तंत्र विद्यार्थ्यांमधील नवीन कल्पनांना उत्तेजन देते जे सामान्य परिस्थितीत कधीही घडले नसते. याद्वारे विद्यार्थी नवनवीन कल्पना मांडतात.

२) वर्गखोलीबाहेरील अध्ययन : शैक्षणिक उत्कृष्टता साधण्यासाठी वर्गखोलीच्या चार भिंतीत शिकणे हे नेहमीच पुरेसे नाही. काही वेळेस शिक्षकांना वर्गखोलीबाहेर वर्ग चालवणे आवश्यक असते. शिकविल्या जाणाऱ्या पाठाशी संबंधित सहली किंवा भेटी ते आयोजित करु शकतात. थोडफार बाहेर फेरफटका मारणे किंवा अधूनमधून निसर्गाच्या सानिध्यात वर्गाबाहेर वर्ग चालविणे ताजेतवाने करते. अशा कृतींमधून विद्यार्थी खूप काही शिकतात आणि जे शिकविले जाते ते सहज लक्षात ठेवतात.

३) व्यावसायिक विकास : नियमित व्यावसायिक विकासात गुंतवून ठेवल्याने शिक्षक त्यांचे ज्ञान वेळोवेळी अद्ययावत करतात, वर्गात अध्यापन व अध्ययन प्रक्रियेला उत्तेजन देण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे व्यावसायिक विकास कार्यक्रम

४) अभ्यासक्रम रचनाकार : शिक्षकाने अभ्यासक्रम संप्रेषकाऐवजी अभ्यासक्रम रचनाकार म्हणून कार्य करावे. योग्य सामग्री, अध्ययन अनुभव आणि मूल्यमापन तंत्र यांचा वापर करुन हे केले जाऊ शकते.

५) शिक्षकाने पर्यावरणाप्रती जागरूकता रूजविणे आणि विधायक वृत्ती व मूल्ये वाढविणे गरजेचे आहे.

६) उपलब्ध संसाधनांचा वापर : विद्यार्थ्यांचे अध्ययन, संदर्भबद्ध करण्यासाठी शिक्षकाने स्थानिकदृष्ट्या उपलब्ध संसाधनांचा (कमी किंमतीचे किंवा बिना किंमतीचे) वापर करावयास हवा.

७) शिक्षकाने शाळा आधारीत आणि समाजानुवर्ती दृष्टीकोनांचा अंगिकार करावा.

आपली प्रगती तपासा :

१) शाश्वत विकासासाठी शिक्षकाने वापरावयाच्या अध्यापन डावपेच स्पष्ट करा.

४.४ शाश्वत विकासात UNESCO ची भूमिका

४.४.१ परिचय :

शाश्वत विकासासाठी शिक्षण (ESD) साठी UNESCO ही अग्रगण्य संयुक्त राष्ट्र एजन्सी आहे. आणि ESD वरील जागतिक कृती कार्यक्रमाच्या (GAP) एकूणच व्यवस्थापन, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी जबाबदार आहे. (GAP) ही पाच प्राधान्यकृती क्षेत्राभोवती विविधकृती निर्मिती आणि त्यांच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करते. त्यांचे कार्य म्हणजे धोरणांना गती देणे, अध्ययन व प्रशिक्षण वातावरण रूपांतरीत करणे, शिक्षक व प्रशिक्षकांची क्षमतेची बांधणी करणे. तरूणांना सक्षम करुन त्यांची जमवाजमव करणे आणि स्थानिक पातळीवर शाश्वत उकलींना गती देणे.

४.४.२ UNESCO ची भूमिका :

- युनेस्को मुख्य भागीदारांना पाठिंबा देते. जाणीव आणि स्पष्टता वाढवते. आंतरराष्ट्रीय पातळीवर ESD चे समर्थन करते आणि सदस्य राष्ट्रांना शैक्षणिक योजना व कार्यक्रमात ESD चा समावेश करण्यास पाठिंबा देते.
- युनेस्को शाश्वत मुद्यांवर केंद्रित असणाऱ्या शैक्षणिक कृतींच्या विकास आणि विस्तारासाठी देशांना पाठिंबा देते जसे हवामानाबद्दल जैवविविधता आपत्ती जोखिम कमी करणे, पाणी सांस्कृतिक विविधता, आणि ESD द्वारे शाश्वत शहरीकरण आणि शाश्वत जीवनशैली ते धोरण कर्त्यांना ESD चा समावेश शैक्षणिक धोरणे, अभ्यासक्रम आणि शिक्षक प्रशिक्षणात कसा करावा याचा सल्ला देते. UNESCO शिकणाऱ्यांना जबाबदारी स्विकारण्यात आणि जटील जागतिक आव्हांनाना सामोरे जाण्यास बळकट करण्यास जोर देते. याचाच अर्थ शिक्षणाला टिकात्मक विचारसरणीला उत्तेजन देणे. भावी परिस्तितीची कल्पना करणे आणि सामुहिक पद्धतींनी निर्णय घेणे गरजेचे आहे.
- शाळांनी ESD चा समावेश करावा याची खात्री देण्यासाठी UNESCO शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी उत्तेजन देते. उदा. माध्यमिक शिक्षकांसाठी हवामान बदल शिक्षणावर ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध आहे. “शाश्वत विकास उद्दिष्टांसाठी शिक्षण : अध्ययन हेतू” यासारखे महत्त्वपूर्ण स्त्रोत प्रकाशित करुन युनेस्को आंतरराष्ट्रीय सभा आणि घटनांचे आयोजन व सहभागाद्वारे ESD विषयी चर्चा निर्मिती करते.

- UNESCO, ESD च्या भवितव्यावर चर्चासत्राच्या विविध मालिका आयोजित करते. जसा उद्देश म्हणजे GAP च्या पलिकडे ESD वरील चर्चेला प्रोत्साहित करणे तसेच शाश्वत विकासासाठी २०३० च्या मसुद्याच्या संदर्भात चर्चा घडविणे आणि UNESCO ला GAP ची पहिली अवस्था जी २०१९ मध्ये संपते त्याच्या पलिकडे योजना आखण्यास मदत करते.

- UNESCO ने ESD साठी संयुक्त राष्ट्राचे दशकाचे (२००५ ते २०१४) नेतृत्व केले. जापान मधील आयविनायोगा येथे भरलेल्या २०१४ मधील ESD वरील UNESCO जागतिक परिषदेने या दशकाचा शेवट केला आणि ESD वरील आयचिनागोया घोषणेची सुरुवात आणि ESD वरील GAP च्या अंमलबजावणीसाठीच्या आराखडा पाहिला. UNESCO चा उद्देश हा शाश्वत विकासावरील दर्जेदार शिक्षणाचे मार्ग हे सर्व स्तरावर आणि सर्व सामाजिक संदर्भात सुधारणे हा आहे. जेणेकरुन शिक्षणाच्या पुनर्प्रस्थापनाने समाज रूपांतरीत होईल आणि शाश्वत विकासासाठी गरजेचे ज्ञान कौशल्य मुल्ये आणि वर्तन विकसित होण्यास लोकांना मदत होईल.

मानते की शिक्षण हा सर्वांचा जीवनभरासाठी अधिकार आहे आणि त्याचे मार्ग दर्जेदार असायला हवे. ही संघटना संयुक्त राष्ट्रांची एकमेव एजन्सी आहे जिला शिक्षणाच्या सर्व संकल्पना व्यापण्याचा आदेश आहे. शाश्वत विकासाद्वारे जागतिक शिक्षण २०३० पत्रकाचे नेतृत्व त्याकडे सोपविलेले आहे.

आपली प्रगती तपासा :

१) शाश्वत विकासातील युनेस्कोची भूमिका स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

४.५ सारांश

शाश्वत विकास हा असा विकास आहे जो भावी पिढीला त्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या त्यांच्या क्षमतेशी तडजोड न करता सध्याच्या गरजांची पूर्तता करतो. पर्यावरणविषयक शिक्षणापासून मुख्यत्वेकरुन विकसित झालेल्या ESD च्या संकल्पनेने लोकांमध्ये पर्यावरणाची काळजी करण्यासाठी ज्ञान, कौशल्य, मुल्ये, प्रवृत्ती व वर्तणूक विकसित करण्याचा प्रयत्न केला. ESD चा उद्देश म्हणजे पृथ्वीशी तडजोड न करता जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी लोकांना निर्णय घेणे व कृती-कार्यक्रम पार पडणे शक्य केले. तसेच याचा उद्देश म्हणजे शाश्वत विकासातील मूलतत्त्वांचा शिक्षणाच्या सर्व दृष्टीकोन व स्तरांत समावेश करणे.

४.६ अभ्यास

प्र. १ थोडक्यात उत्तरे द्या.

१. शालेय अभ्यासक्रमातील शाश्वत विकासाचे स्थान स्पष्ट करा.
२. शाश्वत विकासात शिक्षकाची भूमिका काय ?
३. शाश्वत विकासासाठी शिक्षकाने वापरावयाच्या अध्यापन रणनीती स्पष्ट करा.
४. शाश्वत विकासात UNESCO ची भूमिका स्पष्ट करा.

प्र. २ टीपा लिहा.

१) शाश्वत विकास
२) शालेय अभ्यासक्रम
३) अध्यापन रणनीती
४) UNESCO
५) अंत:विषय अध्ययन
५) शैक्षणिक दिनदर्शिका
७) प्रायोगिक अध्ययन
८) सहयोगी अध्ययन (सहकारी अध्ययन)

प्र. ३ योग्य पर्याय निवडा.

१) शाळेत सर्व अभ्यासक्रम विषयक तसेच अभ्यासक्रम बाह्य कृती सुरळीतपणे पार पाडण्यासाठी ———————— महत्त्वाची भूमिका बजावते.
अ) शैक्षणिक दिनदर्शिका
ब) शाश्वत विकास
क) प्रायोगिक अध्ययन
ड) अंत:विषय अध्ययन

२) ज्या प्रक्रियेत विद्यार्थी प्रकल्प किंवा कार्य पूर्ण करण्याकरिता गटामध्ये एकत्रितपणे कार्य करतात तिला ————- म्हणतात.
अ) अध्ययन
ब) सहकारी अध्ययन
क) प्रायोगिक अध्ययन
ड) अंत:विषय अध्ययन

३) ESD म्हणजे ————————-.
अ) शाश्वत विकासासाठी शिक्षण
ब) शाश्वत विकासासाठी वातावरण
क) सुरळीत विकासासाठी शि३ण
ड) शाश्वत विकासासाठी शिकविणे

४) UNESCO म्हणजे ————–
अ) द युनियन ऑफ नॅशनल एनव्हीरॉनमेंटल, सायंटीफीक अँण्ड कल्चरल ऑर्गनायझेशन
ब) द युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटीफीक अँण्ड कल्चरल ऑर्गनायझेशन
क) द युनायटेड नेशन्स एनव्हीरॉनमेंटल, सायंटीफीक ॲण्ड कल्चरल ऑर्गनायझेशन
ड) द युनियन ऑफ नॅशनल एज्युकेशनल, सायंटीफीक ॲण्ड कल्चरल ऑर्गनायझेशन

५) GAP म्हणजे ————–
अ) ग्लोबल ॲक्टीव्ह प्रोग्रॉम
ब) ग्लोबल ॲक्शन प्रोग्रॉम
क) ग्लोबल ॲक्शन प्लॅन
ड) ग्लोबल ॲक्टीव्ह प्लॅन

❖❖❖❖

५

शिक्षण समाजशास्त्राची मुलतत्वे

घटक रचना :

५.० उद्देश

५.१ परिचय

५.२ शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ आणि व्याप्ती

- ५.२.१ समाजशास्त्राचा अर्थ
- ५.२.२ शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ
- ५.२.३ शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती

५.३ शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यामधील फरक

- ५.३.१ शैक्षणिक समाजशास्त्राचा अर्थ
- ५.३.२ शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यामधील फरक

५.४ शांतता शिक्षणाची संकल्पना आणि शांतता शिक्षणाची ध्येये

- ५.४.१ शांततेची संकल्पना
- ५.४.२ शांतता शिक्षणाची संकल्पना
- ५.४.३ शांतता शिक्षणाची ध्येये
- ५.४.४ तुमची प्रगती तपासा

५.५ सारांश

५.६ विभागवार अभ्यास

५.० उद्देश / उद्दिष्ट्ये

हा विभाग वाचल्यावर तुम्हाला खालील गोष्टी शक्य होतील.

- समाजशास्त्र आणि शिक्षण समाजशास्त्राची व्याख्या करणे.
- शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ स्पष्ट करणे.
- शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती सांगा.
- शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यामधील फरक स्पष्ट करणे.
- शांतता आणि शांतता शिक्षणाची संकल्पना यांचे वर्णन करा.
- शांतता शिक्षणाची ध्येये सांगणे.

५.१ परिचय

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे तो समाजात राहतो आणि समाजाचा उत्पादनक्षम सदस्य बनण्यासाठी स्वत:ला विकसित करतो. समाज म्हणजे लोकांचा गट जो संघटीरित्या एकाचवेळी अस्तित्वात असतो. ही आंतरसंबंधाची एक प्रणाली आहे जी व्यक्तीला एका सामाईक संस्कृतीत जोडते. लोक भागीदारी करत असलेल्या जीवनाच्या सर्व संकल्पना यात सामावतात. म्हणजेच घर, कार्य, जीवन, दर्म, शाळा, राजकारण इ. हे सर्व समाजाच्या संकल्पना आहेत. सामाजिक ही संज्ञा लोकांमध्ये घडणारा सुसंवाद आणि संबंधांशी संबंधीत आहे. म्हणजेच माणूस समाजात राहतो आणि सामाजिक बनतो.

१९ व्या शतकात युरोपमध्ये समाजशास्त्राचा एक वेगळे शास्त्र म्हणून उदय झाला आणि त्याचा उद्देश म्हणजे समाजाचा अभ्यास करणे ऑगष्टी कोम्टे, हर्बर्ट स्पेन्सर आणि एमिल डर्कहीम हे समाजशास्त्राचे जनक आणि इतर बरेच सामाजिक विचारवंत यांना समाजाच्या कल्पनेची स्थापना ही अभ्यासबाब म्हणून करायची होती जी स्वत:मध्येच एक विशिष्ट अभ्यास असेल. त्यांनी संपूर्ण समाजाची एक संपूर्ण गट म्हणून तपासणी केली समाज हा नेहमीच वैयक्तिक सदस्यांच्या कृती, विचार, मूल्ये, विश्वास आणि इच्छा यांच्यापेक्षा अधिक असतो. तो जरी एक जटील आणि अमूर्त वास्तविकता असली तरी सर्व मनुष्य समाजात राहतात.

५.२ शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ आणि व्याप्ती

५.२.१ समाजशास्त्राचा अर्थ :

समाजशास्त्र हा शब्द लॅटीन आणि ग्रीक या दोहोंपासून तयार केला गेला आहे. लॅटीन मध्ये 'सोशियस' म्हणजे 'सहकारी' आणि ग्रीकमध्ये 'लोगोस' म्हणजे 'चा अभ्यास' होय. म्हणून या शब्दाचा शब्दश: अर्थ साहचर्याचा किंवा सामाजिक संबंधाचा अभ्यास.

१८३७ मध्ये फ्रेंचतत्ववेत्ता ऑगष्टी कोम्टे याने पहिल्यांदा समाजशास्त्र हा शब्द जुळवून आणला त्यांच्यानुसार समाजशास्त्र म्हणजे समाज आणि व्यक्तींमधील संबंधांच्या अभ्यासात वैज्ञानिक पद्धतींचे उपयोजन. समाज म्हणजे लोकांचा एक गट जो एक समुदाय म्हणून राहतो. एक खेडे, एक शाळा, एक विश्रामगृह, एक कॉलेज किंवा एक विद्यापीठ सुद्धा एक समाज होऊ शकतो. या गोष्टी माणूस आणि त्याचे सामाजिक वातावरण याचे भाग आहे. मानवांच्या वेगवेगळ्या गटात त्यांच्या सामाजिक वातावरणात समाजीकरण घडून ये आणि ते एकमेकांना प्रभावित करतात.

'माणूस आणि त्यांचे पर्यावरण यांच्या एकमेकांमधील संबंधात त्यांचा अभ्यास' अशी ही समाजशास्त्राची व्याख्या केली जाऊ शकते.

डंकननुसार 'समाजशास्त्र म्हणजे व्यक्तींच्या सुसंवादांच्या प्रक्रियेचा शास्त्रीय अभ्यास.'

इ.टी. हीलर नुसार 'सोशिऑलॉजी म्हणजे व्यक्ती आणि त्यांचे वर्तन यामधील संबंध, त्यांचा एकमेकांशी असलेला संदर्भ आणि त्यांचे संघटन ते ज्या आदर्शाद्वारे निर्मित करतात त्याचा अभ्यास होय.' अशाप्रकारे समाजशास्त्र हे मुख्यत्वेकरुन सामाजिक संबंधाशी जुळलेले आहे. ते समाजातील लोकांमध्ये असलेल्या सुसंवादांचा अभ्यास करते. सामाजिक संबंधांच्या जाळ्याला समाज म्हणतात. समाजशास्त्राचा मुख्य जोर हा मानवाच्या सामाजिक संबंधावर आहे तो गटामधील मानवी वर्तणूकीचा शास्त्रीय अभ्यास आहे. हे लोक परस्परांशी कसा संवाद साधतात, गट व्यक्तीला कसा प्रभावित करतो आणि व्यक्ती गटाला कशी प्रभावित करते हे जाणून घेण्यात समाजशास्त्रज्ञांना जास्त रूची आहे. या गोष्टी कार्यावर कसा प्रभाव टाकतात आणि व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासात कसे बदल घडवून आणतात हे स्पष्ट करण्याचा एक प्रयत्न समाजशास्त्र करते.

समाजशास्त्र हे ज्या सामाजिक जगात आपण राहतो आणि जे आपल्या जीवनाला आकार देते त्याचे आकलन करण्यास मदत करते ते आपल्या स्वत:ला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करते कारण ते सामाजिक जग आपली विचारसरणी, जाणीव, कृती यांच्या प्रकारावर कसा प्रभाव करते याची तपासणी करते. समाजशास्त्र हे समस्यांची उकल करत नाही परंतु लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी माहिती गोळा करण्यास मदत करते. ते एक देखावा (जागतिक दृश्य) प्रधान करते. जगाच्या दृश्याला सामाजिक देखावा संबोधले जाते. त्याद्वारे सामाजिक संबंध, विविध संस्कृती आणि सामाजिक संस्था ज्या आपले जीवन आणि मानवी इतिहासाला आकार देतात याविषयीची आपली जाण विस्तारित होते.

५.२.२ शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ

थोडक्यात, शिक्षण समाजशास्त्राची व्याख्या ही 'शिक्षण व समाजातील संबंधांचा अभ्यास' अशी केली जाते. हा शैक्षणिक संस्थेमधील सामाजिक प्रक्रियांचा तपास आहे. ओट्टावेनुसार (१९६२) हा एक सामाजिक अभ्यास आहे आणि त्याच्या पद्धती वैज्ञानिक असल्याने ती समाजशास्त्राची शाखा आहे.

पीटर हेरॉल्ड (१९६८) शिक्षण समाजशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात, 'मानवी समाजाचा उगम, संघटना, संस्था आणि विकास यांचा अभ्यास म्हणजे शिक्षण समाजशास्त्र.' हा दृष्टीकोन समाज आणि संस्था कशा विकसित झाल्या ते स्पष्ट करतो. ते समाजातील तसेच समाज व इतर संस्थांमधील सुसंवादांचा अभ्यास करते.

एमिल डर्कहीम शिक्षण समाजशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमो करतात 'समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा एक पद्धतशीर अभ्यास.' हा देखावा जगाचा असतो. तो आपल्याला सामाजिक जीवनाची एक नवीन दृष्टी प्रदान करतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे तो आपल्याला लोक जे करतात ते का करतात जसे खाणे, बोलणे व इतर बरेच काही ते शोधण्यास मदत करतो. डर्कहीमने पुढे सांगितले की शिक्षण समाजशास्त्र म्हणजे शिक्षणाचा अभ्यास. शिक्षण पद्धतीच्या आकलनासाठी त्याने समाजशास्त्रीय दृष्टीकोन वापरला. त्यांनी अशी कल्पना मांडली की शिक्षणाचा अभ्यास हा सामाजिक दृष्टिकोनातून केला जावा ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण समाजशास्त्र समजण्यास मदत होईल.

शिक्षण समाजशास्त्रात आपण शिक्षणाच्या समस्या ह्या सामाजिक दृष्टिकोनातून समजून घेण्याचा प्रयत्न करतो. समाजाची आर्थिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बळे यांच्याशी संबंधित आणि ज्यात ते कार्य करतात त्या शैक्षणिक ध्येये, पद्धती, संस्था, प्रशासन आणि अभ्यासक्रम यांच्याशी संबंधित आहे. जोपर्यंत व्यक्तिगत शिक्षणाचा संबंध आहे, शिक्षण समाजशास्त्र हे व्यक्तिमत्त्व विकासावरील सामाजिक जीवन आणि सामाजिक संबंधांच्या प्रभावावर जोर देते. शिक्षण समाजशास्त्र हे शैक्षणिक संस्थांच्या सामाजिक पैलूंवर जोर देते. येणाऱ्या समस्या ह्या शैक्षणिक कृतींच्या समस्या नसतात तर त्या मुख्यत्वेकरुन समाजशास्त्राच्या समस्या असतात. म्हणूनच शिक्षण समाजशास्त्राचे स्पष्टीकरण असे दिले जाऊ शकते की, शैक्षणिक पद्धतीत समाविष्ट सामाजिक प्रक्रिया आणि सामाजिक नमुन्यांचे शास्त्रीय विश्लेषण, सार्वजनिक संस्था आणि व्यक्तिगत अनुभव हे शिक्षण आणि त्यांच्या परिणामांना कसे प्रभावित करते. त्याचा हा अभ्यास आहे. ते मुख्यत्वे करुन शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित करते.

५.२.३ शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती :

शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती खूप विस्तृत आहे आणि त्यात खालील क्षेत्रे येतात -

- समाज, संस्कृती, समुह, वर्ग, पर्यावरण, सामाजिकरण, अंतर्गतकरण, निवास, एकीकरण, सांस्कृतिक अंतर, उपसांस्कृतिक दर्जा, भूमिका आणि इतर अशा सर्वसाधारण संकल्पनांशी त्याचा संबंध आहे.
- तसेच ते एकुणच सामाजिक पद्धती आणि शाळेचा सूक्ष्म समाज जसे अध्ययन, प्रवाह, अभ्यासक्रम यांचे संघटन, राज्य, सामाजिक बळ, सांस्कृतिक बदल, भूमिका रचनेच्या विविध समस्या, भूमिका विश्लेषण अशा घटनांमध्ये समाविष्ट आहे.
- याचा संबंध विविध भौगोलिक आणि वांशिक संदर्भातील, शैक्षणिक परिस्थितींच्या विश्लेषणाशी आहे. उदा. वेगवेगळे वंश, संस्कृती यांच्या पार्श्वभूमीसह ग्रामीण, शहरी, आदिवासी क्षेत्रे, देशाचे / जगाचे विविध भाग यातील शैक्षणिक परिस्थिती.
- यामुळे आपल्याला वेगवेगळ्या प्रकारची बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना शिकवण्यातील वेगवेगळ्या शैक्षणि पद्धतींची परिणामकारकता समजण्यास मदत होते.
- विद्यार्थ्यांना प्रदान केल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या प्रकारावरील अर्थव्यवस्थेच्या परिणामाचा ते अभ्यास करते. उदा. IB, ICSE, CBSE, SSC बोर्ड संस्थांत दिले जाणारे शिक्षण.
- यामुळे आपल्याला विविध सामाजिक संस्था जसे कुटुंब, शाळा त्यांच्या विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम अभ्यासण्यास मदत होते.
- ते सामाजिक वर्ग, संस्कृती, भाषा, पालक, शिक्षण, व्यवसाय आणि विद्यार्थ्यांची कामगिरी यामधील संबंधाचा अभ्यास करते.
- ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वावर शाळेची भूमिका व रचना, मित्रमंडळींचा प्रभाव यांचा अभ्यास करते.
- ते वंशवाद, जातीय वाद, लिंगभेद इ. समस्यांच्या आकलनात मदत करते.
- ते विद्यार्थ्यांच्या समानिकरणात शाळांच्या भूमिकेचा अभ्यास करते.

- राष्ट्रीय ऐक्य, आंतरराष्ट्रीय जाण, वैज्ञानिक प्रवृत्तीचे चैतन्य, जागतिकीकरण यांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास करण्याचा मार्ग सुचवते.
- ते शिक्षणातील विविध सिद्धांतांच्या योजना, संघटन आणि उपयोजनाशी संबंधित संशोधन अभ्यासाला प्रोत्साहन देते.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

प्र.२ शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ स्पष्ट करा.

प्र.३ शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती सांगा.

५.३ शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यामधील फरक

५.३.१ शैक्षणिक समाजशास्त्राचा अर्थ :

शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यांमधील फरक समजून घेण्याआधी आपण प्रथम शैक्षणिक समाजशास्त्राचा अर्थ समजून घेऊन.

शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे समाजशास्त्राची सर्वसाधारण तत्त्वे व शोध यांचे शिक्षणाचे प्रशासन व प्रक्रिया यांच्याशी उपयोजन होय.

एमिल डर्कहिम हे पहिले व्यक्ती होते ज्यांनी शिक्षणाला समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची गरज दर्शविली. त्यांनी मानले की "शिक्षण हे मुलतः वैशिष्ट्ये व त्याच्या कार्यात सामाजिक आहे आणि याचाच परिणाम म्हणून शिक्षणाचा सिद्धांत हा इतर कुठल्याही शास्त्रापेक्षा समाजशास्त्राशी अधिक संबंधित आहे." त्यांनी जोर देऊन सांगितले की, "शिक्षण ही स्थिर बाब नसून चल आणि सतत बदलती प्रक्रिया आहे. प्रत्येक समाजाच्या स्वतःच्या अशा सामाजिक-सांस्कृतिक गरजा असतात, ज्या पूर्ण करण्यासाठी शिक्षणाची गरज असते. या गरजा सतत बदलत असल्याने शिक्षणसुद्धा बदलायला हवे. अशा प्रकारे समाज हा समाजांच्या गरजांचे समाधन करु शकणाऱ्या शिक्षणाचा प्रकार ठरविण्यात महत्त्वाचा घटक आहे. व्याख्येनुसार शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे 'शिक्षणाचा अभ्यास समाजशास्त्रीयरित्या करणारी शाखा.' यासाठी आधार म्हणजे ते शिक्षणाला सामाजिक कार्य व सामाजिक दृष्ट्या ठरविली जाणारी एक सामाजिक वस्तुस्थिती, एक प्रक्रिया आणि एक संस्था म्हणून ओळखते. शिक्षकांना त्यांच्या भावी कार्यासाठी तयार करणारी एक शाखा म्हणून ती विकसित झाली."

ओट्टाचे शैक्षणिक समाजशास्त्राचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात.

"शैक्षणिक समाजशास्त्र हे या मान्यतेपासून सुरु होते की शिक्षण ही समाजात चालू असणारी कृती आहे आणि त्याचे ध्येय आणि पद्धती या ज्या समाजात घडून येतात त्या समाजाच्या स्वरूपावर अवलंबून असतात."

शैक्षणिक समाजशास्त्राचे जनक जॉर्ज पेने यांच्यानुसार, "शैक्षणिक समाजशास्त्र हे असे शास्त्र आहे जे त्याचा विकास आणि बदलत्या कार्यात शैक्षणिक पद्धतींशी संबंधित संस्था, गट सामाजिक प्रक्रिया यांचे वर्णन करते व स्पष्टीकरण देते." त्यांनी शिक्षण व सामूहिक जीवनाचा एकमेकांवर होणारा प्रभाव व परिणाम यांची चर्चा केली आणि त्या सर्व सामाजिक प्रभावांचा अभ्यास करण्यावर जोर दिला जे मानवाच्या वाढ व विकासात मानवाला प्रभावित करतात.

शैक्षणिक समाजशास्त्र हे शैक्षणिक कृतींच्या योजनात आणि परिणामकारक पद्धतींच्या विकासात या योजनांच्या अंमलबजावणीसाठी समाजशास्त्रीय संशोधनांच्या निष्कर्षांचा वापर करते. शैक्षणिक समाजशास्त्राचे मुख्य ध्येय हे सामाजिक सुसंवादाचा अभ्यास करणे आहे. ते शिक्षणाच्या गरजा पूर्ण करणाऱ्या सर्व सामाजिक कृती, मानवी, गट, सामाजिक संस्था व एजन्सींचा अभ्यास करते.

फ्रान्सिस ब्राउन यांनी शैक्षणिक समाजशास्त्राची व्याख्या केली की अशी शाखा जी शिक्षणाच्या प्रक्रियेला समाजशास्त्राची सर्वसाधारण तत्त्वे आणि शोध प्रयुक्त करते. ते समाजशास्त्रीय तत्त्वे व पद्धतींचे शैक्षणिक पद्धतीतील समस्यांच्या उकलींशी असलेले उपयोजन आहे.

५.३.२ शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यामधील फरक :

'शिक्षण समाजशास्त्र' आणि 'शैक्षणिक समाजशास्त्र' या संज्ञा विद्याशाखेत वेगवेगळे दृष्टिकोन म्हणून वापरल्या जातात. या दोन संज्ञांचा वापर तज्ञांच्या पसंतीवर अवलंबून असतो. शैक्षणिक समाजशास्त्र असो की शिक्षण समाजशास्त्र मुख्य जोर आणि संबंध हा अजुनसुद्धा शिक्षणावर आहे.

शैक्षणिक समाजशास्त्र हे समाजशास्त्राची सर्वसाधारण तत्त्वे व शोध यांचे शिक्षणाचे प्रशासन व प्रक्रियांशी असलेले उपयोजन आहे. हा दृष्टिकोन म्हणजे समाजशास्त्राचे शिक्षणाच्या संस्थांशी एक वेगळे सामाजिक एकक म्हणून असलेले उपयोजन आहे. आणि शिक्षणशास्त्र म्हणजे शैक्षणिक संस्थांमधील गुंतलेल्या समाजशास्त्रीय प्रक्रियांचे विश्लेषण होय. ते शिक्षणाच्या संस्थामधील अभ्यासाला प्रकर्षाने मांडते. ते शैक्षणिक संस्थांचे समाजशास्त्रीय पैलू ठळकपणे दाखवते.

शिक्षण समाजशास्त्र हे सर्वसाधारण कल्पना जसे स्वतः समाज, संस्कृती, समुदाय, वर्ग, पर्यावरण, समाजीकरण, अंतर्गतकरण, वसाहत, एकीकरण, सांस्कृतिक अंतर, उपसंस्कृती, दर्जा, भूमिका इ. यांच्याशी संबंधित आहे. यामध्ये अजुन पुढील गोष्टी सामावतात - शिक्षणावरील राजकारण व अर्थव्यवस्थेचा परिणाम, शैक्षणिक व सांस्कृतिक बदलांवर परिणाम करणारे सामाजिक बले आणि निश्चयके; शैक्षणिक प्रक्रियेत समाविष्ट होणाऱ्या सामाजिक संस्था, एकूणच सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात भूमिका रचना व भूमिका विश्लेषणाच्या विविध समस्या आणि शाळेचा सूक्ष्म समाज; शाळा म्हणजे एक औपचारिक संघटना म्हणून बघितली जाते ज्यात अध्ययन व प्रवाहांचे अधिकार, निवड, संघटन असे मुद्दे येतात; सामाजिक वर्ग, संस्कृती व भाषांमधील संबंध आणि शिक्षण व व्यवसायातील संबंध आणि इतर.

शैक्षणिक समाजशास्त्राची आव्हाने ही शिक्षणाच्या क्षेत्रातून घेतली जातात. शैक्षणिक समाजशास्त्र हे समाजाच्या वेगवेगळ्या घटकांचे व्यक्तीशी असलेल्या सुसंवादाच्या महत्त्वावर प्रकाश टाकते. ते शिक्षणाच्या माध्यमाद्वारे समाजाच्या प्रगतीवर जोरे देते. ते पुढील प्रश्नांची उत्तरे द्यावयाचा प्रयत्न करते - मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे? अभ्यासक्रम काय असावा? मुले अपराधी का बनतात? ते अशा संस्था, संघटना आणि सामाजिक सुसंवादांवर प्रकाश टाकते ज्या शैक्षणिक प्रक्रियेत महत्त्वाच्या आहेत. ते शैक्षणिक सुसंवादाचाा वापर करते जे व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्व विकासात मदत करते जेणेकरुन तो एक चांगला सामाजिक व्यक्ती बनेल.

शैक्षणिक समाजशास्त्र हे शिक्षकांना त्यांच्या भावी कार्यास तयार करण्यासाठी आरेखित केलेली एक विद्याशाखा म्हणून विकसित झाली. ते शैक्षणिक कृतींच्या योजनांत आणि परिणामकारक पद्धतींच्या विकासात या योजनांच्या अंमलबजावणीसाठी समाजशास्त्रीय संशोधनांच्या निष्कर्षांचा वापर करते. याऊलट शिक्षण समाजशास्त्र ही ज्ञानाची ती शाखा आहे जी औपचारिक किंवा अनौपचारिक शिक्षण परिस्थितीत व्यक्तींमधील सुसंवादाच्या विश्लेषणात्मक अभ्यासाद्वारे विकसित शिक्षणाचा सामाजिक सिद्धांत सादर करते.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे काय?

_____

_____

_____

_____

_____

प्र.२ शिक्षण समाजशास्त्र व शैक्षणिक समाजशास्त्र यातील फरक सांगा.

५.४ शांतता शिक्षणाची संकल्पना आणि शांतता शिक्षणाची ध्येये

५.४.१ शांततेची संकल्पना :

प्रत्येकाच्या जीवनात शांतता अतिशय महत्त्वाची आहे ही एक जागतिक संकल्पना आहे आणि आपले जीवन शांततामय मार्गाने पुढे जाण्यासाठी आपल्या प्रत्येकाला शांततेने परिपूर्ण होण्याची गरज आहे. तिला मानवतेच्या उच्च मूल्यांपैकी एक मानले जाते कारण आपण जन्मापासून मृत्यूपर्यंत तिला ह्रदयात जतन करतो. असे असले तरी शांततेच्या अर्थावर एकमत होत नाही.

शांततेची व्याख्या पहिल्यांदा फक्त "युद्ध किंवा प्रत्यक्ष हिंसेचा अभाव अशी केली गेली." याचाच साधा अर्थ म्हणजे युद्ध किंवा भौतिक हिंसेचा परिणाम म्हणून घेणारे मृत्यू व विनाश व विनाशाचा अभाव होय. यालाच सकारात्मक शांतता म्हटले जाते.

परंतु शांतता म्हणजे नक्कीच यापेक्षा अधिक आहे. याचा अर्थ म्हणजे फक्त युद्धाचा अभाव नव्हे तर सर्व प्रकारच्या हिंसा, जसे अत्यंत गरिबी, उपासमार, टाळता येण्याजोगे आजार अल्पसंख्या गटाविरुद्ध भेदभाव, भांडण ते हे, शोषण, अन्याय, मानवी अधिकार नाकारले जाणे आणि इतर यांचा सुद्धा अभाव हवा. शांतता ही अशा हिंसक सामाजिक वातावरणात मिळवली जावू शकत नाही कारण ते हिंसेकडे घेऊन जाते. चांगल्या जीवनासाठी अडथळा ठरणाऱ्या अशा सर्व घटकांच्या अभावाला नकारात्मक शांतता म्हटले जाऊ शकते.

अशाप्रकारे शांतता म्हणजे व्यक्तीगत किंवा प्रत्यक्ष हिंसेचा अभाव म्हणजेच सकारात्मक शांतता आणि सामाजिक न्याय आणि समानतेचे सान्निध्य व संरचनात्मक किंवा अप्रत्यक्ष हिंसेचा अभाव म्हणजेच नकारात्मक शांतता असे दोन्ही होय.

डिक्लरेशन ॲन्ड प्रोग्रॅम ऑफ ॲक्शन ऑफ कल्चर ऑफ पिस जनरल असेंब्ली रिझोलूशन.

A/53/243, 1999 नुसार, "शांतता म्हणजे फक्त भांडण ते त्यांचा अभाव नसून त्यासाठी त्याला एक विधायक, चल सहभागाची प्रक्रीया गरजेची आहे जेथे संवादाला उत्तेजन दिले जाते आणि भांडण तंटे हे परस्पर समज आणि सहकार्याच्या भावनेतून सोडविले जाते."

"शांतता ही अशी प्रवृत्ती आहे जी लोक परस्परांशी ज्या पद्धतीने बोलतात, ऐकतात आणि संवाद साधतात त्याच्या एकोप्याला आणि एकमेकांना जखमी करणे हानी पोहचवणे किंवा नष्ट करण्याच्या कृतींना नाउमेद करते." (बे आणि टर्नर १९९५)

शांतता ही सर्वसमावेशक संकल्पना आहे म्हणून शांततेची सर्वमान्य व्याख्या शोधणे कठिण आहे. ती ज्या संदर्भात विचारात घेतली जाते त्यावर अवलंबून असते. वर चर्चिलेली प्रत्येक व्याख्या ही तिच्या स्वतःच्या संदर्भात सत्य आहे. प्रत्येकीचा स्वतःचा असा अर्थ आहे त्या सर्वांना एकत्र केले जाऊ शकते आणि शांततेचा एक समग्र अर्थ आपल्याला मिळू शकतो. अशाप्रकारे शांततेच्या अर्थाचे सर्व रंग तीन मुख्य स्त्रोतांच्या अंतर्गत येऊ शकतात.

१) **अंतर्गत शांतता :** ही शांतता म्हणजे स्वतःमधील शांतता, चांगले आरोग्य आणि अंतर्गत संघर्षाचा अभाव याचा एकोपा होय. ती म्हणजे आनंद, स्वातंत्र्य, अंतर्मुखता, दयाळूपणाची भावना, कणव आणि कलेचे कौतुक यांची जाण होय.

२) **सामाजिक शांतता :** ही शांतता म्हणजे सर्व स्तरावरील मानवी संबंधापासून निर्माण होणारा एकोपा होय. ती म्हणजे भांडण निराकरण, प्रेम, मैत्री, बंधूभाव, संयम, लोकशाही, समुदायबांधणी मानवी अधिकार आणि नैतिकता.

३) निसर्गाशी असलेली शांतता नैसर्गिक वातावरण आणि धरती मातेशी असलेला एकोपा म्हणजे ही शांतता होय. निसर्गाशी असलेली शांतता ही पर्यावरण आणि परिसंस्थेचा ऱ्हास व शोषण याद्वारे तिच्या प्रतिष्ठेचे उल्लंघन थांबविणे दर्शविते.



आकृती ५.१ शांततेचे स्त्रोत

शांततेचा हा समग्र अर्थ हा त्याच्या खंडीत अर्थापेक्षा अधिक उपयोगी आहे.

५.४.२ शांतता शिक्षणाची संकल्पना :

शांतता शिक्षणासारख्या काही घटकांशिवाय कुठलीही शिक्षण पद्धती ही पूर्ण होऊ शकत नाही. यामध्ये नैतिक मुल्ये किंवा लोकशाही नागरिकत्व किंवा जागतिक शिक्षणासारखे

प्रकार येऊ शकतात. शांतता शिक्षणाचे भिन्नत्व दर्शक वैशिष्ट्य म्हणजे मानवी हिंसेच्या समस्येवरील त्याचा जोर होय. थोडक्यात म्हणजे शांतता शिक्षणाची व्याख्या मानवी हिंसेच्या समस्येला दिलेला शैक्षणिक प्रतिसाद अशी केली जाऊ शकते. याची पुढील मुलभूत वैशिष्ट्ये आहेत. त्याचा उद्देश समाजातील हिंसेने मुलांच्या मनावर होणारा परिणाम रोखणे हा आहे. ते त्यांना आवश्यक ज्ञान प्रवृत्ती आणि कौशल्याने बळकट करुन एक शांततामय जग बांधणीसाठी तयार करते. ते मुलांना शाळेतील अध्ययन अध्यापनाद्वारे मानवता शिकविते.

पुढे काही शांतता शिक्षणाच्या व्याख्या दिलेल्या आहेत.

शांतता शिक्षण म्हणजे जागतिक आणि राष्ट्रीय स्तरापासून ते स्थानिक आणि व्यक्तिगत स्थरापासूनच्या भांडणे आणि हिंसेच्या समस्यांच्या प्रतिसादाचा एक प्रयत्न आहे. ते म्हणजे अधिक न्याय आणि शाश्वत भविष्य निर्माण करण्याचे मार्ग शोधण्या विषयी आहे. आर. डी. लैंग (१९७८)

शांतता शिक्षण समग्र आहे ते पारंपारिक मानवी मूल्यात खोलवर रूतलेल्या चौकटीतील मुलांची भौतिक, भावनिक, बौद्धिक आणि सामाजिक वाढ सामावते ती प्रेम, कणव, विश्वास, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि मानवी कुटूंब व आपल्या ह्या सुंदर ग्रहावरील सर्व जीवनाबद्दल असलेली श्रद्धा या गोष्टी शिकविणाऱ्या तत्वज्ञानावर आधारित आहेत.

युनिसेफ मधील शांतता शिक्षणाचा अर्थ म्हणजे, "मुले, तरूण आणि प्रौढ यांच्यामध्ये वर्तणुकविषयक बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञान, कौशल्य दृष्टीकोन आणि मुल्यांना चालना देण्याची प्रक्रिया जी त्यांना उघड आणि संरचनात्मक भांडणतंटा आणि हिंसेला अटकाव करण्यास; भांडणे शांततामय मार्गाने सोडविण्यास; आणि व्यक्ति अंतर्गत, व्यक्ती व्यक्तींमधील, गटांमधील, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अशा कुठल्याही शांततेसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यास सक्षम बनवते."

अशाप्रकारे आपण बऱ्याच व्याख्या पाहिल्या ज्या शांतता शिक्षणावर अशी एक प्रक्रिया म्हणून प्रकाश टाकलेला आहे. जी शिकणारांमध्ये ज्ञान, कौशल्य, दृष्टीकोन आणि मूल्ये विकसित करतात, जी वर्तणुकविषयक बदल घडवून आणते आणि जी शिकणारांना त्यांच्या समस्या हातळण्यास सक्षम बनवते आणि शांततामय जीवनाकडे घेऊन जाते.

शांतता शिक्षण म्हणजे शांततेविषयी शिकणे आणि शांततेसाठी शिकणे. शांततेविषयी शिकणे म्हणजे शांततेसाठी कशाचे योगदान लागते, ती कशाने नष्ट होते, युद्धाकडे मार्गक्रमण कशाने होते, प्रत्येक स्तरावरील शांतता म्हणजे काय आणि यात माझी भूमिका काय? याविषयीचे ज्ञान आणि समज मिळविणे. शांततेसाठी शिकणे म्हणजे शांततेत योगदान देण्यासाठी आणि ती टिकवण्यास मदत करण्यासाठी एखाद्याला गरजेच्या असलेल्या कौशल्ये, दृष्टिकोन आणि मुल्ये शिकणे. उदा. त्याचा अर्थ हिंसेच्या आधाराशिवाय भांडणे हाताळणे शिकणे, सृजनशीलपणे विचार करणे शिकणे, कृतीशील अहिंसात्मक पद्धती वापरायला शिकणे, किंवा सांस्कृतिक फरकांशी विधायक पद्धतीने जुळवून घेणे शिकणे.

वरील व्याख्यांवरुन आपण म्हणू शकतो की शांतता शिक्षण हे समग्र अत:विषय क्षेत्र आहे, जे शांततेसाठी ज्ञान, कौशल्ये, दृष्टीकोन आणि मुल्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करते, ते म्हणजे मानवी हिंसेच्या समस्येला दिलेला शैक्षणिक प्रतिसाद आहे. आजच्या जगाच्या आव्हांनाना तोंड देण्यासाठी आणि भांडणे अहिंसक पद्धतीने सोडवण्यासाठी एखाद्याने आवश्यक कौशल्ये जसे समस्या निराकरण, निर्णायक विचारसरणी, निर्णय घेण्याची क्षमता, परिणामकारक संवाद, भांडवल निराकरण इत्यादी आणि आवश्यक तत्वे जसे स्वाभिमान जीवन आणि निसर्गाबद्दल आदर संयम, करूणा, प्रेम, सहकार्य इत्यादी गोष्टी संपादन करणे आवश्यक आहे. शांतता शिक्षण हे अशी उच्च मानवी मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न करते आणि एक नवीन दृष्टिकोन आणि एक वर्तणूक विषयक कौशल्यांचा संच विकसित करते. जे शांततामय शिक्षणासाठी गरजेचे आहे. त्याचा उद्देश शांततेची एक संस्कृती उभारणे हा आहे. ज्याद्वारे संपूर्ण मानव जातीला फायदा होईल.

५.४.३ शांतता शिक्षणाची ध्येये :

शांतता शिक्षणाचे एकूण ध्येय म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला शांतता निर्माते बनवण्यासाठी शिक्षित करणे आणि शांततेच्या संस्कृतीवर आधारित सुसंस्कृत जग निर्मित करण्याप्रती त्यांची बुद्धी, संभाव्यता, क्षमता आणि उर्जा वापरणे.

१९९४ मध्ये जिनेव्हा येथे भरलेल्या शिक्षण आंतरराष्ट्रीय परिषदेच्या ४४ व्या सत्राच्या घोषणेने शांतता शिक्षणाच्या ध्येयांची यादी पुढीलप्रमाणे.

१) प्रत्येक व्यक्तीत वैश्विक मूल्यांची जाण विकसीत करणे.

२) नागरिकांना कठीण आणि अनिश्चित परिस्थिती हाताळण्यास तयार करणे आणि वैयक्तिक स्वायत्तता आणि जबाबदारीसाठी त्यांना योग्य बनवणे.

३) व्यक्तीला शिक्षित करणे आणि व्यक्तींच्या वैविध्यतेत असलेल्या मुल्यांना ओळखणे आणि स्विकारण्याची क्षमता विकसित करणे.

४) व्यक्तींमधील आणि लोकांमधील शांतता मैत्री आणि एकता मजबूत करणे.

५) व्यक्तींमधील अहिंसक पद्धतीने भांडण, तंटा निर्मुलनाची क्षमता विकसित करणे.

६) व्यक्तींमधील सद्यस्थितीचे विश्लेषण आणि त्यांच्या पसंतीच्या भविष्याची दृष्टी यावरुन त्यांच्या निर्णय व कृतींवर आधारित सामान्यज्ञान निवड करण्याची क्षमता रूजवणे.

७) नागरिकांना सांस्कृतिक वारशाचा आदर करण्यास आणि पर्यावरण विषयक व सामाजिक एकोप्याचे संरक्षण करण्यास शिकविणे.

८) एक संकलित आणि दीर्घकालीन विकासाच्या देखाव्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील एकोपा व समानतेचा भावनेत लोकांना आणणे.

अशाप्रकारे शांतता शिक्षण हे वेगवेगळ्या प्रकारच्या विषयांवर लक्ष केंद्रित करते. शांतता आणि शिक्षण हे हातात हात घालून जाते. ते अभिन्न आहे. समाजाच्या योग्य विकासासाठी शिक्षण पद्धती ही शांततेच्या वैश्विक तत्वांवर आधारलेलीच हवी आणि एक समाज हा शिक्षणाशिवाय प्रगती करू शकत नाही.

शांतता शिक्षण हे पुढील उद्दिष्टांसह औपचारिक आणि अनौपचारिक शालेय संरचनेत टिकवले जाऊ शकते.

१) जगाला एक चांगले आणि अधिक मानवीय ठिकाण बनवण्यासाठी बदलांना गती देणे.
२) जीवनाच्या परिपूर्णतेसाठी झगडतांना मुलांना साहाय्यक होण्यासाठीची मूल्ये व कौशल्य विकसित करणे.
३) एक दृश्य जागतिक समाज निर्मितीसाठी शांततेची एक समृद्ध दृषटी विकसित करण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.
४) भांडणतंटा कमी करण्यास व नष्ट करण्यासाठी समस्यांना तोंड देतांना विधायक वृत्ती निर्माण करणे.
५) सकारात्मक मानवी संबंधांना चालना देण्यासाठी एक स्थिती म्हणून आणि एक क्रियाशील प्रक्रिया म्हणून अशा दोन्ही प्रकारे शांततेचा शोध घेणे.

म्हणून शांतता शिक्षण हा जीवनाचा समग्र मार्गाप्रती असलेला एक समावेशक दृष्टिकोन आहे जो शिक्षणाच्या सर्व स्तरावर वापरला जावयास हवा.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ शांततेची संकल्पना स्पष्ट करा.

प्र.२ शांतता शिक्षणाची व्याख्या द्या आणि शांतता शिक्षणाची संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

प्र.३ शांतता शिक्षणाची उद्दिष्ट्ये सांगा.

५.५ सारांश

हा विभाग शिक्षण समाजशास्त्राच्या मुलतत्वांशी निगडीत आहे. लोकांच्या संवादाच्या प्रक्रियेचा वैज्ञानिक अभ्यास म्हणून समाजशास्त्राच्या अर्थाची आपण चर्चा केली. त्यानंतर पुढे आपण शिक्षण समाजशास्त्राची व्याख्या शैक्षणिक पद्धतीत सामावलेल्या सामाजिक प्रक्रिया आणि सामाजिक नमुने यांचे वैज्ञानिक विश्लेषण अशी केली. आपण शिक्षण समाजशास्त्राची व्याप्ती चर्चिली आणि शैक्षणिक समाजशास्त्राचा अर्थ समजून घेतला ते म्हणजे शिक्षणाचे प्रशासन आणि प्रक्रियांशी समाजशास्त्राची सर्वसाधारण तत्वे आणि शोध यांचे उपयोजन होय. शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यामधील फरकाची चर्चा केली.

त्यांनतर शांततेच्या संकल्पनेचे थोडक्यात विश्लेषण पाहिले. शांतता म्हणजे दोन्ही प्रकारची शांतता व्यक्तिगत किंवा प्रत्यक्ष हिंसेचा अभाव म्हणजेच सकारात्मक शांती आणि सामाजिक न्याय आणि समानतेचे साहचर्य व संरचनात्मक किंवा अप्रत्यक्ष हिंसेचा अभाव म्हणजे नकारात्मक शांती. शांततेच्या समग्र अर्थात अंतर्गत शांतता, सामाजिक शांतता आणि निसर्गाशी असलेली शांतता यांचा समावेश होतो. शांतता शिक्षणाची संकल्पना व ध्येये अभ्यासली गेली. मुले तरूण आणि प्रौढ यांच्यामध्ये वर्तणूक विषयक बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञान, कौशल्य, दृष्टिकोन आणि मुल्यांना चालना देण्याची प्रक्रिया म्हणजे शांतता शिक्षण जी त्यांना भांडणे व हिंसेला अटकाव करण्यास. भांडणे शांततामय रितीने सोडवण्यास आणि शांततेसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यास सक्षम बनवते. शांतता शिक्षणाचे एकूणच ध्येय म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला शांतता निर्माते बनवण्यासाठी शिक्षित करणे आणि शांततेच्या संस्कृतीवर आधारित शांततेचे सुसंस्कृत जग निर्मित करण्याप्रती त्याची बुद्धी, संभाव्यता, क्षमता आणि उर्जा वापरणे.

५.६ विभागवार अभ्यास

अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) समाजशास्त्राची व्याख्या लिहा.
२) शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ स्पष्ट करा आणि त्याची व्याप्ती सांगा.
३) शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यातील फरक सांगा.
४) तुमच्या दृष्टीने शांततेचा अर्थ काय ? शांतता शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा.
५) शांतता शिक्षणाची उद्दिष्ट्ये सांगा.
६) शांतता शिक्षणाचा अर्थ व उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

ब) पर्यायवाचक प्रश्न

१) शिक्षणाला समाजशास्त्राच्या तत्वांचे उपयोजन करणे म्हणजे
   अ) शिक्षण समाजशास्त्र ब) शिक्षणाचे सामाजिक शास्त्र
   क) शैक्षणिक समाजशास्त्र ड) शिक्षणाचा सामाजिक पाया

२) युद्धाचा अभाव किंवा प्रत्यक्ष हिंसेचा अभाव म्हणजे
   अ) अंतर्गत शांतता ब) नकारात्मक शांतता
   क) सकारात्मक शांतता ड) सामाजिक शांतता

३) शैक्षणिक समाजशास्त्र हे शिक्षणाच्या कोणत्या पैलूशी निगडीत आहे ?

अ) सामाजिक ब) राजकीय

क) आर्थिक ड) मानसिक

४) शाळा ह्या सामाजिक संस्था आहेत कारण त्या

अ) सामाजिक प्रगतीचे मार्ग व साधने सुचवतात

ब) समाजाद्वारे समाधान सुचवितात

क) समस्यांचे समाधान सुचवितात

ड) आपल्या संस्कृतीचे ज्ञान, कल्पना आणि रितीरिवाज भावी पिडीत रूजवतात व जतन करतात

५) शांतता शिक्षण हे समग्र असते ते पुढीलपैकी कोणती गोष्ट शिकवणाऱ्या तत्वज्ञानावर आधारित आहे ?

अ) प्रेम ब) तफावत

क) भांडण ड) हिंसा

❖❖❖❖

६

भारतीय संदर्भात बहुसांस्कृतिकता

घटक रचना :

६.० उद्देश
६.१ परिचय
६.२ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे वैशिष्ट्ये आणि ध्येये
६.२.१ बहुसांस्कृतिक शिक्षणाची वैशिष्ट्ये
६.२.२ बहुसांस्कृतिक शिक्षणाची ध्येये
६.३ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे परिमाण
६.४ जेम्स ए. बँक्स् यांच्यानुसार बहुसांस्कृतिक अभ्यासक्रम सुधारणांचे दृष्टिकोन
६.५ सारांश
६.६ अभ्यास

६.० उद्देश

या विभागाची पुढील उद्दिष्ट्ये आहेत.

- भारतीय संदर्भात बहुसांस्कृतिकतेची संकल्पना विद्यार्थ्यांना समजणे शक्य करणे.
- बहुसांस्कृतिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये आणि ध्येये विद्यार्थ्यांना समजण्यास सक्षम करणे.
- बहुसांस्कृतिक शिक्षणाचे परिमाण आणि बहुसांस्कृतिक शिक्षणाचे दृष्टिकोन यांची समज विकसित करणे.

६.१ परिचय

या दुसऱ्या भागाच्या पाचव्या विभागात तुम्ही शिक्षण समाजशास्त्राचा अर्थ आणि व्याप्ती अभ्यासली तसेच तुम्ही शांतता शिक्षणाची संकल्पना आणि उद्दिष्ट्ये यांचा सुद्धा अभ्यास केला. आता तुम्हाला शिक्षण समाजशास्त्र आणि शैक्षणिक समाजशास्त्र यांची पुरेशी कल्पना आलेली आहे. आपण आपले लक्ष भारतीय संदर्भातील बहुसांस्कृतिक शिक्षण, त्याची वैशिष्ट्ये आणि ध्येये यावर केंद्रित करुया. या विभागात तुम्ही बहुसांस्कृतिक शिक्षणाचे परिमाण आणि दृष्टिकोन सुद्धा शिकणार आहोत.

बहुसांस्कृतिकता ही विश्वास व वर्तनांची अशी एक पद्धती आहे जी एखाद्या संघटना किंवा समाजातील सर्व विविध गटांच्या अस्तित्वाला ओळखते व मान देते, त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक फरकांना जाणते व त्यांची किंमत करते आणि समावेशक सांस्कृतिक संदर्भातील त्यांच्या सततच्या योगदानाला प्रोत्साहन देते व सक्षम करते ज्यामुळे संघटना किंवा समाजातील सर्व सक्षम होतात.

'बहुसांस्कृतिकता' ही फक्त वंचित व उपेक्षित गट जसे आदिवासी, भाषिक-सांस्कृतिकृधार्मिक अल्पसंख्यांक, LGBT, अक्षम इत्यादी. यांचीच नव्हे तर वंशिक, धार्मिक, अल्पसंख्यांका अंतर्गत तसेच अल्पसंख्यांक राष्ट्रे आणि स्वदेशी लोक अंतर्गत आलेल्या स्थलांतरीतांची सुद्धा व्याख्या करण्यासाठी वापरली जाते.

भारतातील बहुसांस्कृतिकता हे बहुसांस्कृतिक समाजाचे सर्वात चांगले उदाहरण आहे.जेथे लोक १२२ मुख्य भाषा आणि १५९९ इतर भाषा बोलतात. विविधतेतील एकता हे भारताचे सौंदर्य आहे आणि लिंग, जात, वर्ग, समुदाय, भाषा आणि धर्म यांना विचारात न घेता भारतीय राज्यघटना सर्व लोकांना समान अधिकार, विशेष अधिकार, आणि कर्तव्ये प्रदान करते. भारतीय समाज हा अनादी काळापासून बहुसांस्कृतिक, बहुधार्मिक, बहुवंशिक, बहुजमाती आणि बहुभाषिक राहिलेला आहे. त्याचवेळेस आपल्या देशाने फुटीच्या शक्तींशी सामना केलेला आहे. म्हणून भारतासारख्या प्रमुख बहुसांस्कृतिक देशांसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे बहुलवादी परंपरेचे जतन करणे आणि बहुसांस्कृतिकतेच्या भावनेला चालना देऊन विविध समुदायांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे आहे.

बहुसांस्कृतिक शिक्षण म्हणजे अशा कुठल्याही स्वरूपाचे शिक्षण किंवा अध्यापन होय जे वेगवेगळ्या सांस्कृतिक पार्श्वपिठीका असलेल्या लोकांचे इतिहास, मूल्ये, विश्वास, पाठ आणि दृष्टिकोन समाविष्ट करते. उदा. वर्गस्तरावर एखाद्या विशिष्ट वर्गातील विद्यार्थ्यांची सांस्कृतिक विविधता परावर्तित करण्यासाठी शिक्षकांनी पाठ रूपांतरीत करावे किंवा समाविष्ठ करावे.

जेम्स ए. बँक्स यांना बहुसांस्कृतिक शिक्षणाचे जनक मानले जाते.

बँक्स् आणि बँक्स् १९९५ यांनी बहुसांस्कृतिक शिक्षणाची व्याख्या एक अभ्यासाचे क्षेत्र आणि एक उगवती विद्याशाखा म्हणून केली जिचे मुख्य ध्येय हे विविध वंशिक, सामाजिक, वर्ग आणि संस्कृतीपासून समान शिक्षणाच्या संधी निर्मित करणे आहे.

जेम्स् बॅक्स् २००१ - बहुसांस्कृतिक शिक्षणाचे प्राथमिक ध्येय म्हणजे शाळांना रूपांतरीत करणे जेणेकरुन स्त्री व पुरुष विद्यार्थी, अपवादात्मक विद्यार्थी आणि विविध सांस्कृतिक सामाजिक वर्गिय वंशिक व जमातीय गटांचे विद्यार्थी शिकण्याची एक समान संधी अनुभवते

६.२ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे वैशिष्ट्ये आणि ध्येये

भारत हा वादविवादात्मक रित्या ह्या धरतीवरील सर्वात जुनी संस्कृती आहे आणि काळाच्या ओघात तो सांस्कृतिक दृष्ट्या भाषिक दृष्ट्या, धार्मिक दृष्ट्या आणि वंशिक दृष्ट्या

जगाच्या सर्वात वैविध्य पूर्ण देशांपैकी एक बनला. ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आणि २०० भाषांसह त्याला जगाचे सांस्कृतिक द्रवणपात्र म्हणून सहजपणे संबोधले जाऊ शकते. ही सांस्कृतिक विविधता टिकवण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक पैलूची काळजी घ्यावी. आणि याची सुरुवात शिक्षणापेक्षा इतर कशाने अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते.

शिक्षण हे खरोखर प्रभावी बनविण्यासाठी आणि भारताच्या सांस्कृतिक विविधतेचे ज्ञान हे भारतातील सर्व मुलांना उपलब्ध होण्याची खात्री देण्यासाठी बहुसांस्कृतिक शिक्षण ही काळाची गरज आहे. भारतीय राज्यघटना जेव्हा ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मुक्त व अनिवार्य शिक्षणाची हमी देते तेव्हा याची खात्री पटते की भारतासारख्या सुसंस्कृतीची सांस्कृतिक मूल्ये ही पुढे पुढेच जातील. सध्याच्या भारतात मुले दोन प्रकारच्या शाळांपैकी एकाची निवड करतात, खाजगी निधी शाळा किंवा सरकारी निधी शाळा - जे त्याच्या कुटूंबाचा कल आणि संपत्तीवर अवलंबून असते परंतु दोन्ही प्रकारच्या शाळांमधील अभ्यासक्रम हा, मुख्यत्वे करुन केंद्रसरकारद्वारा रचित आणि भारतीय राज्यघटनेद्वारा मार्गदर्शित, मूलतः बहुलतावादी स्वरूपाचा आहे. अशाप्रकारे बहुसांस्कृतिक शिक्षणाचे मूख्य ध्येय हे सर्व मुलांसाठी दर्जेदार शिक्षण हे आहे.

६.२.१ बहुसांस्कृतिक शिक्षणाची वैशिष्ट्ये :

- भारत हा संस्कृतीच्या तळाशी असलेला जगातील एकमेव द्वितीय देश आहे. कारण या देशात खूप साऱ्या संस्कृती आहेत आणि येथील संस्कृती ही जगातील सर्वात जुन्या संस्कृतींपैकी एक आहे. म्हणून भारतीय परिस्थितीची बहुसांस्कृतिक शिक्षण ही मागणी आहे. बहुसांस्कृतिक शिक्षण ही मान्यता सुचविते की विद्यार्थी आणि त्यांचा जीवन इतिहास व अनुभव हे अध्यापन व अध्ययन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवले जावेत आणि हे अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांना परिचित असलेल्या संदर्भात घडून यावे आणि ते विचारसरणीचे बहुविध मार्ग सुचविते. अजून म्हणजे विद्यार्थी व शिक्षकांनी त्यांचा समुदाय, समाज व जगातील जुलूम व शक्ती संबंधांचे टीकात्मक विश्लेषण करायलाच हवे.

- बहुसांस्कृतिक शिक्षण हे वर्गाबाहेर वर्णविद्यार्थ्यांच्या जीवनातसुद्धा योगदान देऊ शकते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक आत्मप्रतिष्ठा विकसित होणे सुलभ होऊ शकते जे विद्यार्थ्यांना ते स्वतः व त्यांच्या कार्याबद्दल अधिक चांगले वाटण्याकडे घेऊन जाते. हा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांचा घरगुती संस्कृतीथसुद्धा पसरतो व त्यांच्या घरगुती संस्कृतीच्या सुखसोई व गर्व प्रत्यक्षपणे वाढतो. बहुसांस्कृतिक शिक्षण हे इतर वांशिक गटांशी असलेले वर्णविद्यार्थ्यांचे कौशल्य सुद्धा वाढवू शकते. ज्यामुळे सकारात्मक आंतरसांस्कृतिक सुसंवाद वाढतो. अखेरचे म्हणजे बहुसांस्कृतिक शिक्षण या विद्यार्थ्यांना प्रबल प्रतिमान मुख्य श्वेत जगासोबत चांगल्या प्रकारे तरुन जाण्यासाठी साधन पूरवू शकते.

- बहुसांस्कृतिक शिक्षण हे शिक्षणाला रूपांतरीत करण्याचा पुरोगामी दृष्टिकोन आहे जो शिक्षणातील सध्याच्या कमतरता, अपयश आणि भेदभावाच्या कृतींचे समग्रपणे विश्लेषण करुन सुचविते. ते सामाजिक न्याय, शिक्षण समानता आणि शिक्षण अनुभव सुकर करण्यासाठीचे समर्पण या आदर्शात घट्ट रोवलेले आहे ज्यात सर्व विद्यार्थी एक अध्ययनकर्ता म्हणून त्यांच्या सर्व संभाव्यतापर्यंत पोहोचतात, सामाजिकदृष्ट्या जागरूक होतात आणि स्थानिक, राष्ट्रीय व जागतिकदृष्ट्या सक्रीय होतात. (पॉल गोर्स्की, २०००) बहुसांस्कृतिकता ही फक्त वर्ण लोकांपर्यंत मर्यादित नाही तर ती वैश्विक बाब आहे. ज्याला

शिक्षण संस्थातील सर्व स्तरावर अंमलबजावणीची गरज आहे. प्रत्येक इमारतीत एकभाषिकता किंवा द्विभाषिकता असणे म्हणजे समाजता नव्हे तर त्याला अभ्यासक्रम विकासातील बहुसांस्कृतिक जागरुकतेची गरज आहे जी समानता प्रदान करते.

बहुसांस्कृतिक शिक्षणाची सात मूलभूत वैशिष्ट्ये :

१. **बहुसांस्कृतिक शिक्षण हे वंशविरोधी शिक्षण आहे :** बहुसांस्कृतिक शिक्षण हे वंशविरोधी शिक्षण आहे. वंशिकताविरोधी म्हणजेच सामान्यपणे भेदभावविरोधी ही संकल्पना बहुसांस्कृतिक दृष्टिकोनाच्या गाभ्यात आहे आपण जरी आपल्या इतिहासाचे सुंदर आणि विरोचित पैलू शिकवित असलो तरी कुरूप आणि अपवादात्मक बाबी सुद्धा शिकवायला हव्या.

२. **बहुसांस्कृतिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे :** बहुसांस्कृतिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. बहुसांस्कृतिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण म्हणूनच समजून घेतले जावे. विस्तृतरित्या संकल्पित बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या अंमलबजावणीतील प्रमुख अडथळा म्हणजे धर्म कायद्याची कठोरता जी मानते की ज्ञान जे अतिमौल्यवान आहे ते आधीच मिळालेले आहे.

३. **बहुसांस्कृतिक शिक्षण हे सर्व विद्यार्थ्यांसाठी आहे :** बहुसांस्कृतिक शिक्षण हे सर्व विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे आहे. बहुसांस्कृतिक शिक्षण हे फक्त वर्णविद्यार्थी किंवा वंचित किंवा जोखिमग्रस्त विद्यार्थ्यांसाठीच आहे. ही सर्वदूर पसरलेली गैरसमजुत आहे. बहुसांस्कृतिक शिक्षण हे व्याख्येनुसार समावेशक आहे. कारण ते सर्व लोकांविषयी आहे तसेच ते सर्व लोकांसाठी आहे.

४. **बहुसांस्कृतिक शिक्षण हे व्यापक आहे :** बहुसांस्कृतिक शिक्षण हे व्यापक आहे. एक खराखुरा बहुसांस्कृतिक दृष्टिकोन व्यापक आहे. त्यातून सर्व काही झिरपते : शालेय वातावरण, भौतिक पर्यावरण, अभ्यासक्रम आणि शिक्षक, विद्यार्थी व समाजातील संबंध. बहुसांस्कृतिक शिक्षण हे एक तत्वज्ञान आहे, जगाकडे पाहण्याचा एक मार्ग आहे.

५. **सामाजिक न्यायासाठी सांस्कृतिक शिक्षण :** बहुसांस्कृतिक शिक्षण हे सामाजिक न्यायासाठीचे शिक्षण आहे. बहुसांस्कृतिक पैलू विकसित करणे म्हणजे अधिक समावेशक आणि विस्तारित मार्गांनी विचार कसा करायचा हे शिकणे. बहुसांस्कृतिक शिक्षण हे विद्यार्थी आणि शिक्षकांना सामाजिक न्यायासाठी त्यांचे शिकणे कृतीत आणण्यासाठी आमंत्रित करते. लोकशाहीत विद्यार्थ्यांना सक्रीय सदसत्वासाठी तयार करणे. देवेइयन तत्वज्ञानाचा पाया आहे.

६. **बहुसांस्कृतिक शिक्षण ही एक प्रक्रिया आहे :** बहुसांस्कृतिक शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. अभ्यासक्रम आणि साहित्य ही बहुसांस्कृतिक शिक्षणाची सामुग्री दर्शविते. परंतु बहुसांस्कृतिक शिक्षण हे एक प्रक्रियेपेक्षा खूप काही आहे. पहिली गोष्ट म्हणजे ते सतत चालणारे 'चल' आहे. दुसरी म्हणजे ती एक 'प्रक्रिया' आहे. कारण त्यात लोकांमधील संबंधाचा समावेश होतो. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बहुसांस्कृतिक शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. कारण ती पुढील बाबींवर जोर देते जसे शिक्षकांच्या अपेक्षा, अध्ययन वातावरण विद्यार्थ्यांची शिकण्याची शैली आणि इतर सांस्कृतिक चलबाबी अशा अमूर्त गोष्टी ज्या शाळांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांबाबत कसे यशस्वी व्हायचे हे समजून घेण्यासाठी

अत्यावश्यक असतात. बहुसांस्कृतिक शिक्षणाची प्रक्रिया ही सामान्यता अधिक जटील, राजकीयदृष्ट्या अधिक अस्थिर आणि स्वार्थी हेतूला अधिक धोकादायक असते. काही विद्यार्थ्यांसाठी नुकसानकारक असलेली धोरणे व कृती रद्द करणे त्याचप्रमाणे न शिकता येणारे पारंपारिक शहाणपण याची सुद्धा याला जोड द्यायला हवी.

७. **बहुसांस्कृतिक शिक्षण हे टिकात्मक अध्यापनशास्त्र आहे :** बहुसांस्कृतिक शिक्षण हे टीकात्मक अध्यापनशास्त्र आहे. ज्ञान हे उदासीन नसते की अराजकीय नसते. तरी ही ते तसे असल्यासारखे विद्यार्थी व शिक्षकांकडून वागवले जाते. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की शिक्षक म्हणून आपण जे काय सर्व निर्णय घेतो ते कितीही निपक्षपाती दिसत असले तरी अजाणतेपणी परंतू मुलभूत मार्गांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या जीवन व अनुभवांवर प्रभाव पाडू शकतात. बँक्स् यांच्या नुसार बहुसांस्कृतिक अभ्यासक्रमाचा मुख्य हेतू हा विद्यार्थ्यांना निर्णय घेण्याची व सामाजिक कृती कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे हा आहे. असे केल्याने विद्यार्थी विविध दृष्टिकोनातून घटना व परिस्थितीकडे पाहण्यास शिकतो. बहुसांस्कृतिक दृष्टिकोन हा विविधतेचे मूल्य जाणतो आणि टिकात्मक विचारसरणी चिंतन आणि कृती यांना उत्तेजन देतो. टिकात्मक अध्यापनशास्त्र सांस्कृतिक व भाषिक विविधतेला दाबण्यापेक्षा मान्यता देते. "एक अस्सल बहुसांस्कृतिक कल जो अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणास उत्तेजन देतो. ते अध्यापन शास्त्राच्या संप्रेषण प्रतिकृतीत अशक्य आहे." (क्यूमीन्स)

टिकात्मक अध्यापनशास्त्र म्हणजे फक्त शिक्षकाकडून विद्यार्थ्याकडे ज्ञानाचे हस्तांतरण आणि जरी ते ज्ञान विद्यार्थ्याने आधी काय शिकले होते त्याच्याशी विरोधाभासी असले तरी. टीकात्मक अध्यापन शास्त्र हे दंतकथा विस्फोटक सुद्धा आहे. टीकात्मक अध्यापनशास्त्र हे लादलेल्या संस्कृतीवर आधारित नसून विद्यार्थ्यांच्या अनुभव व दृष्टीकोनावर आधारित आहे.



आकृती ६.१ बहुसांस्कृतिक शिक्षणाची वैशिष्ट्ये

बहुसांस्कृतिकतेची व्याख्या विविध संस्कृतीच्या सहजीवनाची अवस्था अशी केली जाते. संस्कृतीमध्ये वंशिक, धार्मिक भाषिक इ. समावतात. ज्यांच्यात पारंपारिक वर्तणूक, सांस्कृतिक गृहीतके आणि मूल्ये, विचार करण्याचे नमुने आणि संवादशैली या बाबतीत भिन्नता व वेगळेपणा असू शकतो. एक राज्य किंवा देश म्हणून एका एकीकृत समाजातील वेगवेगळ्या संस्कृती व त्यांची वैशिष्ट्य टिकविणे हे सुद्धा त्याचे ध्येय आहे.

६.२.२ बहुसांस्कृतिक शिक्षणाची ध्येये :

भारत हा बहुवंशिक, बहुभाषिक, बहुजातीय, बहुधार्मिक देश आहे. देशाची सर्वसमावेशक वाढ ही या वेगवेगळ्या अल्पसंख्याक गटांच्या विकासावर अवलंबून आहे आणि या सर्व समावेशक वाढीला आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्व सामाजिक गटांना सेवा व संधीचे समान मार्ग मिळणे गरजेचे आहे.

सर्वसामान्यत बहुसांस्कृतिक शिक्षण हे संस्कृतीला विचारात न घेता सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक समानतेच्या तत्वावर आधारलेले आहे आणि ते विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधी व यशाचे अडथळे दुर सारण्याचा प्रयत्न करते. प्रत्यक्ष कृतीत शिक्षकांनी असे शैक्षणिक धोरणे, कार्यक्रम, साहित्य, पाठ आणि सूचना वजा कृती ज्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक दृष्टिकोनाशी भेदभावयुक्त किंवा अपूर्ण समावेशक असतील त्या रूपांतरीत कराव्या किंवा नष्ट कराव्या. बहुसांस्कृतिक शिक्षण असेही मानते की ज्या मार्गांनी विद्यार्थी शिकतात आणि विचार करतात ते त्यांची सांस्कृतिक ओळख आणि वारशाने खोलवर प्रभावित असतात आणि म्हणून सांस्कृतिक दृष्ट्या विभिन्न विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी परिणामकारक शैक्षणिक दृष्टिकोन गरजेचे आहे. ते त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वपिठिकेची किंमत करतील आणि ओळखतील अशाप्रकारे बहुसांस्कृतिक शिक्षणाचा उद्देश म्हणजे सर्व विद्यार्थ्यांचे अध्ययन व यश सुधारणे विशेषत: अशा सांस्कृतिक गटाचे विद्यार्थी जे ऐतिहासिकदृष्ट्या कमी मानांकन दिले गेलेले आहेत किंवा जे निम्न शैक्षणिक कामगिरी ने पिडीत आहेत.

बहुसांस्कृतिक शिक्षणाचे ध्येय म्हणजे सांस्कृतिक भेद आणि समानता ओळखण्यास आणि तिचे मूल्य जाणण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे आणि वेगवेगळ्या वंशिक, जातीय, सामाजिक, आर्थिक गटांच्या सिद्धी ओळखणे. ही अशी एक कृती आहे जी समाजातील सर्व गटांच्या योगदानाकडे समान लक्ष देऊन विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शिकविले जाते त्यांच्या रुपांतरणाची आशा करते. असे अल्पसंख्याक गट ज्यांना भूतकाळात कमी लेखले गेले त्यांच्यावर विशेष लक्ष दिले जाऊ शकते.

बहुसांस्कृतिक शिक्षणाची ध्येये :

१. शैक्षणिक समानता
२. विद्यार्थी आणि त्यांचे पालक व काळजीवाहक यांचे बळकटीकरण
३. सांस्कृतिक बहुलतावादाची किंमत करणाऱ्या समाजाचा विकास
४. वर्ग, शाळा आणि समाजात आंतरसांस्कृतिक / आंतरवंशिक / आंतरगटीय आकलन
५. व्यक्ती आणि गटांसाठी स्वातंत्र्य
६. विविध संस्कृतिक आणि वंशिक गटांचे विस्तारित ज्ञान.

७. विद्यार्थी, पालक आणि व्यवसायिक (शिक्षक, परिचारिका, पत्रकार, सल्लागार, प्राचार्य, संरक्षक, माहितीपट निर्माते, बसचालक, अभ्यासक्रम, समन्वयक इ.) यांचा विकास ज्यांचे विचार व कृती या माहिती प्रच्युर आणि जिज्ञासू बहुसांस्कृतिक पैलूद्वारे मार्गदर्शी.

द नॅशनल असोसिएशन फॉर मल्टीकल्चरल एज्युकेशन ॲडव्हान्सिंग अँड ॲडव्होकेटींग फॉ सोशल जस्टीस अँड इक्वीटी (NAME) बहुसांस्कृतिक शिक्षणावर शिक्षणावर सहमत होण्यास सहा मुद्दे आहेत जे NAME च्या तत्वज्ञानाच्या केंद्रस्थानी आहेत आणि NAME ची तत्वे म्हणून कार्य करतात.

- सांस्कृतिक विविधतेचा आदर व कौतुक करणे.
- एकमेवद्वीतीय सांस्कृतिक आणि वंशिक वर्षाच्या आकलनाला प्रोत्साहन देणे.
- सांस्कृतिक दृष्ट्या जबाबदार आणि प्रतिसादात्मक अभ्यासक्रमाच्या विकासाला चालना देणे.
- विविध सांस्कृतिक कार्य करण्यासाठी दृष्टिकोन, कौशल्ये आणि ज्ञानाचे संपादन सुलभ करणे.
- वंशिक वाद आणि समाजातील भेदाभेद नष्ट करणे.
- सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक समानता संपादन करणे.

बहुसांस्कृकि शिक्षणाची ध्येये :

१. दुसऱ्या संस्कृतीच्या पैलूंचे अवलोकन करुन व्यक्तीला अधिकचे स्वयंआकलन प्राप्त करण्यास मदत करणे.

२. विद्यार्थ्यांना सांस्कृतिक, वांशिक आणि भाषिक पर्याय पुरविणे.

३. विद्यार्थ्यांना त्यांचा समाज, संस्कृती आणि इतर वंशिक संस्कृतीत कार्य करण्यास आवश्यक असलेले कौशल्य, वृत्ती आणि ज्ञान पुरविणे.

४. विशिष्ट अशा वंशिक, भौतिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे काही वंशिक आणि जातीय गटांच्या सदस्यांना सोसाव्या लागणाऱ्या यातना व भेदाभेद कमी करणे.

५. विद्यार्थ्यांना एक जागतिक तंत्रज्ञानयुक्त जगात कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी गरजेचे वाचन, लिखाण आणि गणितीय कौशल्ये संपादन करण्यास मदत करणे.

६. शिक्षकांनी हे जाणून घ्यायलाच हवे की बऱ्याच व्यक्तिगत सदस्यांसाठी व्यक्तिगत सदस्यता ही व्यक्तिशः ओळखीचा महत्त्वाचा भाग नाही. परंतू अधिक महत्त्वाच्या ओळखी या व्यक्तीगत ओळखी आहेत जसे धर्म, सामाजिक वर्ग, लिंग

७. शिक्षण आणि जागतिक नागरिकत्व - विविध वंशिक, सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक गटांच्या व्यक्तींना त्यांच्या सांस्कृतिक जमातीत, त्यांच्या राष्ट्रीय नागरी संस्कृतीत, त्यांच्या प्रादेशिक संस्कृतीत (जागतिक समुदायातील) परिणामकारकरित्या कार्य करण्यासाठी आवश्यक ज्ञान, वृत्ती आणि कौशल्ये संपादन करण्यासाठी मदत करणे.

८. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या वांशिक, जातीय सांस्कृतिक आणि धार्मिक गटांप्रती सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

९. लोकशाही आणि लोकशाही जीवनाला चालना देणे.

१०. चिंतनीय निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान व बांधिलकी संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणे.

११. शाळा रूपांतरीत करणे जेणेकरुन विविध सांस्कृतिक, सामाजिक वर्ग, वांशिक व जातीय गटांच्या अपवादात्मक विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी अनुभवता येतील.

१२. बहुलतावादी लोकशाही समाजात परिणामकारकरित्या कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, वृत्ती आणि कौशल्ये संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणे.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे मुख्य ध्येय कोणते ?

_____

_____

_____

_____

_____

६.३ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे परिमाण

आपण २१ व्या शतकात आगेकूच करत असताना बहुसांस्कृतिकता ही एक खराखुरा जागतिक समाज मिळविण्यासाठी अधिक संबंधित बनत आहेत. डॉक्टर जेम्स-ए-बँक्स हे बहुसांस्कृतिक शिक्षण आणि त्याचा समाजावरील संभाव्य परिणाम याच्या अर्थाची व्याख्या करतात जेव्हा ती अमेरिकन वर्गात खरोखरच एकीकृत केली गेली. लोकशाही, विविधता आणि सामाजिक न्याय: जागतिक युगातील शिक्षण या बँक्स यांच्या भाषणात (२००६) ते बहुसांस्कृतिक शिक्षणाचा पाच आयामांची व्याख्या करतात जी जेव्हा बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या अंमलबजावणीचा प्रयत्न होतो तेव्हा शाळा सुधारणासाठी मार्गदर्शक म्हणून सिद्ध होते. बहुसांस्कृतिक शिक्षणाचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांनी त्यांची स्वत:ची संस्कृती आणि त्याच्या आजूबाजूला असलेल्या विविध संस्कृती यांच्या फरकात राजकारण न करता त्यांचे मूल्य जाणण्यासाठी उत्तेजन देणे होय.

सामग्री एकीकरण :

सामग्री एकीकरण हे बहुसांस्कृतिक शिक्षणाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे आणि ते त्या मार्गांशी संबंधित आहे ज्यात एक शिक्षक त्यांच्या विषय क्षेत्र किंवा शाखेतील संकल्पना सामान्यीकरण आणि कल्पनांचा वापर करतो. उदा. एक शिक्षक जे कार्य शिकवले जात असते त्याचे उदाहरण म्हणून चर्चेमध्ये एक वंशिक अल्पसंख्याक कलाकार आणतो.

ज्ञान बांधणी प्रक्रिया :

ज्ञान बांधणी प्रक्रिया ही विद्यार्थ्यांना सांस्कृतिक गटातील ज्ञानाचे आकलन कसे केले जाते व त्याचा अर्थ कसा लावला जातो याचे आकलन करणे शिकवते. बहुसांस्कृतिक शिक्षणाचे हे वैशिष्ट्या विद्यार्थ्यांना ज्ञान हे विशिष्ट सांस्कृतिक अनुभव आणि मूल्ये पद्धती यांचे प्रतिबिंब कसे आहे हे ओळखण्यास मदत करते. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची ज्ञानप्रणालीची पुनर्बांधणी करण्यास आणि त्यांच्या ज्ञानाची बांधणी करण्यास मदत करते.

पूर्वग्रहातील कमी :

पूर्वग्रह कमी करण्याचे पाठ हे विशेषत: वेगवेगळ्या वांशिक व सांस्कृतिक गटांचे सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना शिकविण्याचे ध्येय ठरुन आहे. अशा पाठांमध्ये बहुतकरुन वंशिक अल्पसंख्यांकाच्या सकारात्मक प्रतिमांचा समावेश केला जाईल. संशोधनाने दाखवून दिले हे की अशाप्रकारचे वर्ग हे दुसऱ्या सांस्कृतिक गटांच्या सखारात्मक प्रतिमा विकसित करण्यास विद्यार्थ्यांना मदत करू शकतात.

नि:पक्षपाती अध्यापन शास्त्र :

बहुसांस्कृतिक शिक्षणाचा हा भाग मिश्र जातींच्या वर्गाला तोंड देताना पाठ कसे शिकवले जावे याच्याशी संबंधीत आहे. संशोधनाने दाखवून दिले आहे की मेक्सिकन, अमेरिकन आणि आफ्रीकन अमेरिकन विद्यार्थी स्पर्धात्मक वातावरणापेक्षा सहकारी अध्ययन वातावरणात अधिक चांगलया प्रकारे शिकतात. नि:पक्षपाती अध्यापनशास्त्र अध्ययन शैलीतील या फरकावर केंद्रित आहे आणि तो विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षमता सर्वात चांगल्याप्रकारे संपादन करण्यासाठी आवश्यक असलेल्या अध्ययन शैली आयोगात आणतो.

शालेय संस्कृती व सामाजिक संरचनेचे बळकटीकरण :

वेगवेगळ्या संस्कृतीच्या विद्यार्थ्यांना सामावण्यासाठी आणि त्या सर्वांना एकसमानतेची भावना जाणवण्यासाठी शाळेची संस्कृती कशाप्रकारे बदलावी याचे वर्णन ही संज्ञा करते. वर वर्णिलेल्या अध्ययन पद्धती अमलात आणून आणि बहुवंशिक गटांच्या विद्यार्थ्यांना योग्य होईल असे दृष्टीकोन व विश्वासातील बदलांचा जाणीवपूर्वक प्रयत्न करुन हे साध्य केले जाते.



आकृती ६.२ : बहुसांस्कृतिक शिक्षणाची परिमाणे (आयाम)

बहुसांस्कृतिक शिक्षण परिणामकारक रित्या अमलात आणण्यासाठी शिक्षक आणि कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी वर वर्णिलेल्या बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या ५ आयामांकडे जातीने लक्ष द्यायलाच हवे. संकल्पना आणि कौशल्ये शिकवताना त्यांनी विविध गटापासून आलेली सामग्री वापरायला हवी, विविध शाखातील ज्ञानाची बांधणी कशी होते हे समजण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी. गटागटातील सकारात्मक दृष्टीकोन व वर्तन विकसित करण्यास विद्यार्थ्यांना मदत करावी आणि त्यांची अध्यापन रणणिती रूपांतरीत करावी जेणेकरुन वेगवेगळ्या वंशिक, सांस्कृतिक आणि समाजवर्गातील विद्यार्थी समान शैक्षणिक संधीचा अनुभव घेतील. शाळेचे एकूणच वातावरण आणि संस्कृती रूपांतरीत व्हायला हवी. जेणेकरुन वेगवेगळ्या वंशिक व सांस्कृतिक गटातील विद्यार्थी हे संस्कृती व शालेय जीवनात समान दर्जा अनुभवतील.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे परिमाणे कोणती ?

६.४ जेम्स ए. बँक्स् यांच्यानुसार बहुसांस्कृतिक अभ्यासक्रम सुधारणांचे दृष्टिकोन



आकृती ६.२ बहुसांस्कृतिक अभ्यासक्रम सुधारणांचे दृष्टीकोन योगदान दृष्टीकोन

वंशिक सामग्रीचे अभ्यासात एकत्रीकरण करण्याचे विविध ओळखण्याजोगे दृष्टीकोन हा वारंवारपणे वापरल्या जाणाऱ्या दृष्टीकोनापैकी एक आहे आणि वंशिक पुनरूज्जीवन चळवळीच्या पहिल्या टप्प्यात व्यापक प्रमाणात बऱ्याचदा वापरला गेला. या दृष्टीकोनाचे वैशिष्ट्य म्हणजे वंशिक नायकांची अभ्यासक्रमातील भर ज्यांची निवड अभ्यासक्रमातील मुख्य प्रवाहातील नायकांच्या निवडीसाठी वापरल्या जाणाऱ्या निकषांप्रमाणेच केली गेली. मुख्य प्रवाहातील अभ्यासक्रम हा त्याची पायाभूत संरचना, उद्दिष्ट्ये आणि ठळक वैशिष्ट्यांच्या बाबतीत न बदलता तसाच राहतो.

नायक आणि सुट्टी दृष्टीकोन हा योगदान दृष्टीकोनाचा एक प्रकार आहे. या दृष्टीकोनात वंशिक सामग्री ही प्राथमिक रित्या वंशिक घटना आणि समारंभाशी संबंधीत विशिष्ट दिवस, आठवडे आणि महिन्यापुरती मर्यादित आहे. शाळांमध्ये साजरे केल्या जाणाऱ्या वांशिक दिवस आणि आठवड्याची उदाहरणे म्हणजे सिंको डी मायो, मार्टीन ल्यूथर किंग चा वाढदिवस आणि काळा इतिहास आठवडा या समारंभात शिक्षक विद्यार्थ्यांना स्मरण केल्या जाणाऱ्या अंशिक गटांशी संबंधित पाठ, अनुभव आणि स्पर्धांमध्ये सामावून घेतात.

योगदान दृष्टीकोन हा वंशिक सामग्री अभ्यासक्रमात एकीकृत करण्यासाठी शिक्षकांसाठी वापरावयाचा सर्वात सुलभ दृष्टीकोन आहे. तथापी त्याला बऱ्याच गंभीर मर्यादा आहे. विद्यार्थ्यांना U.S. समाजातील वंशिक व सांस्कृतिक गटांच्या भूमिकेचा जागतिक दृष्टीकोन मिळत नाही. उलट ते वंशिक समस्या आणि घटनांना प्राथमिकपणे अभ्यासक्रमातील भर म्हणून पाहतात आणि परिणामी आणि देशाच्या विकासाच्या मुख्य बाबीशी व भाषिक कला, सामाजिक अभ्यास, कला, आणि इतर विषयक्षेत्रे यातील अभ्यासक्रमाच्या गाभ्याशी एक परिशिष्ठ म्हणून पाहतात. नायक, सुट्टी आणि योगदानाचा वापर करुन वंशिक समस्या शिकवणे हे वंशिक गटाचे बळी व अत्याचार आणि जातीयवादाविरुद्ध आणि शक्तीसाठी त्यांचा लढा यांच्याशी संबंधीत महत्त्वाचे आशय व संबंधानासुद्धा चमक देतात. अभ्यासक्रमात योगदान आयोग एकीकृती करण्यास जातीयवाद गरिबी आणि अत्याचार अशे मुद्दे टाळले जाण्याची शक्यता असते. याउलट जोर हा यशावर असतो आणि हॉरटिओ अर्ल्गर दंतकथेचे प्रमाणीकरण ज्याप्रमाणे प्रत्येक अमेरिकन साध्य करण्यास उत्सुक असतो ते दरिद्रयतेकडून श्रीमंतीकडे जाऊ शकते.

योगदान दृष्टीकोनाची परिणती ही बऱ्याचदा वंशिक संस्कृतीच्या शुल्लकतेत, अपरिचित आणि विदेशी व्यक्तिरेखेच्या अभ्यासाने आणि रूढीवादी व गैरसमजूतीच्या बळकटीकरणात होते. जेव्हा जोर हा वंशिक संस्कृतीच्या एकमेव आशय अशा योगदानावर असतो तेव्हा विद्यार्थ्यांना त्यांना पूर्णपणे समजून घेण्यास मदत होत नाही.

वांशिक जोड दृष्टीकोन :

वांशिक सामग्री अभ्यासक्रमात एकीकृत करण्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मूलभूत रचना, हेतू आणि वैशिष्ट्ये न बदलता अभ्यासक्रमात सामग्री, आशय, कथानक आणि दृष्टिकोनातील भर होय. वांशिक जोड दृष्टिकोण हा अभ्यासक्रमाची पुनर्रचना न करता शिक्षकाला त्यात वांशिक सामग्री टाकण्यास परवानगी देतो जो पुरेशा प्रमाणात वेळ, प्रयत्न, प्रशिक्षण घेतो आणि अभ्यासक्रम व त्याचा उद्देश स्वरूप व ध्येयाविषयी पुनर्विचार करावयास लावतो. वंशिक जोड दृष्टिकोण हा संपूर्ण अभ्यासक्रम पुनर्रचित करण्यास आणि त्याला वंशिक

सामग्री, दृष्टिकोण आणि संदर्भ चौकटीत एकीकृत करण्यास अरेखीत केलेल्या एक संपूर्ण अभ्यासक्रम सुधारणा प्रयत्नातील पहिली अवस्था असू शकते. तथापि हा दृष्टिकोण योगदान आयोगासह बऱ्याच तोट्यांना सहभागी करतो. याचा सर्वात महत्त्वाचा तोटा म्हणजे त्याची परिणती वांशिक सामग्रीला मुख्यप्रवाही इतिहासकार लेखक कलाकार आणि वैज्ञानिक यांच्या दृष्टीकोनातून पाहिले जात होते. कारण यात अभ्यासक्रमाची पुनर्रचना संभवत नाही. अभ्यासासाठी निवडल्या गेलेल्या घटना, आशय, मुद्दे आणि समस्या या मुख्य प्रवाह केंद्रीत आणि युरोकेंद्रित आशय व दृष्टीकोण वापरून निवडल्या जातात. U.S. इतिहास वर्गातील ५ व्या श्रेणीतील पश्चिमेकडील चळवळ (The West and Movement) हा विभाग शिकविताना या विभागात लाकोटा (Sioux) भारतीयांविषयी सामग्री टाकू शकतो. तथापि हा विभाग मुख्य प्रवाह केंद्रित राहतो कारण त्याचा दृष्टिकोन 'The West World Movement' हे मुख्य प्रवाही आणि युरो केंद्रित आहे कारण ते युरोपिअन, अमेरिकनांची अमेरीकेतील पूर्वेकडून पश्चिमेकडील भागाच्या चळवळीवर जोर देते. लखोटा भारतीय हे मुळातच पश्चिमेकडे होते आणि परिणामी ते पश्चिमेकडे जात नव्हते. या विभागाला लकोटांच्या दृष्टिकोनातून 'पूर्वेकडील आक्रमण' असेही म्हटले जाऊ शकते. या विभागाचे वस्तुनिष्ठ शिर्षक अमेरिकेतील दोन संस्कृतीची गाठभेठ असेही केले जाऊ शकते.

वांशिक जोड दृष्टिकोण हा विद्यार्थ्यांना समाजाकडे विविध सांस्कृतिक व वांशिक दृष्टिकोनातून पाहण्यास मदत करण्यास अपयशी ठरतो आणि ज्यात देशाचे विविध वांशिक सांस्कृतिक आणि धार्मिक गट हे बेबनावपणे बांधले गेलेले आहेत त्यांच्या इतिहास व संस्कृती मधील मार्ग समजण्यास सुद्धा अपयशी ठरते.

परिवर्तनीय दृष्टीकोण :

परिवर्तनीय दृष्टिकोन हा योगदान दृष्टिकोन आणि जोड दृष्टिकोन यापेक्षा मुलभूतदृष्ट्या वेगळा आहे. हा दृष्टिकोन अभ्यासक्रमाची मुलभूत गृहीतके बदलवतो आणि विद्यार्थ्यांना आशय, मुद्दे, कथानक आणि समस्या विविध वंशिक पैलू व दृष्टिकोनातून बघण्यास मदत करतो. परिवर्तनीय दृष्टिकोनात समाविष्ट मुख्य अभ्यासक्रम मुद्यांमध्ये वंशिक गट, नायक आणि योगदान यांच्या लांब यादीची भर नाही. परंतू वेगवेगळ्या गटांचे विविध दृष्टिकोन, संदर्भ चौकटी आणि सामग्रीचा समावेश आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांचे निसर्ग विकास आणि US समजाची जटीलता यांचे आकलन विस्तारित होईल. विद्यार्थी जेव्हा ब्रिटीश वसाहतीतील उठावाचा अभ्यास करतात तेव्हा अँग्लो निष्ठावंत, अफ्रो अमेरिकन्स, भारतीय आणि ब्रिटीश, अँग्लो क्रांतिकारी यांचा दृष्टिकोन यांच्यासाठी महत्त्वाचा आहे. जेणेकरुन अमेरिकेच्या इतिहासातील वरील वैशिष्ट्यपूर्ण घटना पूर्णपणे समजण्यास त्यांना मदत होईल. विद्यार्थ्यांनी या विविध गटांशी असलेल्या क्रांतीचा वेगवेगळा आणि काही वेळा दुर जाणारा अर्थाचा संपूर्ण आकलनासाठी अभ्यास करायलाच हवा.

भारतीय इतिहास, भाषा, संगीत, कला, विज्ञान आणि गणिताचा अभ्यास करताना विविध वंशिक व सांस्कृतिक गटानी मुख्य प्रवाहातील भारतीय समाज व संस्कृतीत कोणत्या मार्गांनी योगदान दिले आहे त्यावर भर नसावा उलट भर हा विविध सांस्कृतिक घटक जे विविध सांस्कृतिक, जातीय, वंशिक व धार्मिक गट ज्यांच्यापासून भारतीय समाज बनतो. यातून उगम पावलेले आहे. त्यांच्या जटील संयोग व सुसंवादापासून सामान्य भारतीय संस्कृती व समाज कसा

निर्मित झाला त्यावर हवा. विजयाचा एक उपहास म्हणजे ज्यांच्यावर विजय मिळविला जातो ते विजेत्यांच्या संस्कृतीला खोलवर प्रभावी करतात.

निर्णय घेणे व सामाजिक कृती दृष्टिकोन :

हा दृष्टिकोन परिवर्तनीय दृष्टिकोनाचे सर्व घटक सामावतो परंतू अशा घटकांची भर घालतो ज्याला त्या विभागात विद्यार्थी शिकत असलेल्या आशय, मुद्दे, समस्यांशी संबंधित निर्णय घेण्याची व कृती करण्याची विद्यार्थ्याला गरज असते. या दृष्टिकोनात विद्यार्थी अशी सामाजिक समस्या अभ्यासतात जसे आपल्या शाळेत पुर्वग्रह व भेदभाव कमी करण्यासाठी आपण काय कृती करावी. शाळांमधील पूर्वग्रह व भेदाभेद दूर करण्याकरता ते संबंधीत सांख्यिकी सामग्री गोळा करतात त्यांचे मूल्य व मान्यतेचे विश्लेषण करतो, त्यांचे ज्ञान व मूल्यांचे संश्लेषण करतात आणि त्रुटींचा पर्यायी मार्ग ओळखतात आणि शेवटी ठरवतात की कोणत्या कृती करावी. निर्णय घेणे व सामाजिक कृती दृष्टिकोनाचे मुख्य उद्दिष्ट्ये म्हणजे विद्यार्थ्यांना विचार करण्याचे व निर्णय घेण्याचे कौशल्य शिकविणे, त्यांचे सक्षमीकरण करणे आणि राजकीय कार्यक्षमतेची जाण प्राप्त करण्यास त्यांना मदत करणे.

संमिश्रीत दृष्टिकोन :

आपण वरती वर्णन केलेले अभ्यासक्रमात एकीकृत केल्या जाणाऱ्या वंशिक सामग्रीचे चार दृष्टिकोन हे बहुधा प्रत्यक्ष अध्यापन पद्धतीत मिश्रीत केले जातात. योगदान दृष्टिकोन हा एक दृष्टिकोन दुसऱ्या दृष्टिकोनाकडे घेऊन जाणारे वाहन म्हणून वापरला जाऊ शकतो आणि अधिक चातुर्यपूर्ण आव्हानात्मक दृष्टिकोन म्हणजे परिवर्तनीय दृष्टिकोन आणि निर्णय घेणे व सामाजिक कृती दृष्टिकोन. एक उच्च मुख्य प्रवाही केंद्रित अभ्यासक्रमाकडून एका अशा अभ्यासक्रमाकडे जो निर्णय घेणे व सामाजिक कृतीवर केंद्रित होतो. त्यावर प्रत्यक्षपणे जाणे अशी एखाद्या शिक्षकाकडून अपेक्षा करणे वास्तववादी नाही. याऊलट अभ्यासक्रमात वंशिक सामग्री एकीकरणाच्या पहिल्या पातळीवरुन उच्च पातळीकडे जाणे हे क्रमिक व संचित असायला हवे.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ जेम्स ए बॅक्स् द्वारा दिल्या गेलेल्या बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या दृष्टिकोनाची नावे सांगा.

_____

_____

_____

_____

_____

६.५ सारांश

बहुसांस्कृतिक शिक्षण ही अशी कल्पना आहे जी सांगते की सर्व विद्यार्थी मग ते कुठल्याही लिंग, वंश, जात, संस्कृती, भाषा, सामाजिक वर्ग, धर्म, लैंगिक कल किंवा अपवादात्मक गटाचे असो त्यांनी शाळेत शैक्षणिक समानता अनुभावला हवी. काही विद्यार्थी त्यांच्या विशेष वैशिष्ट्यामुळे शाळेत यशस्वी होण्याची अधिक चांगली संधी प्राप्त करतात. कारण

त्यांची संरचना इतर गटाच्या विद्यार्थ्यांपेक्षा नुकतीच झालेली आहे. बहुसांस्कृतिक शिक्षण ही आदर्श ध्येयामुळे एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती शैक्षणिक समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते परंतु मानवी समाजात सर्व प्रकारच्या भेदाभेदाचे निर्मुलन कधीही पूर्णपणे साध्य केले जाऊ शकणार नाही.

६.६ अभ्यास

१. भारतातील बहुसांस्कृतिक शिक्षणाचा तुमच्या दृष्टीने काय अर्थ आहे? बहुसांस्कृतिक शिक्षणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. बहुसांस्कृतिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये सांगा.

३. जेम्स ए. बँक्स द्वारा दिल्या गेलेल्या बहुसांस्कृतिक शिक्षणाचे दृष्टिकोन स्पष्ट करा.

४. जेम्स ए. बँक्स द्वारा दिल्या गेलेल्या बहुसांस्कृतिक शिक्षणाचे दृष्टिकोन सोदाहरण स्पष्ट करा.

५. बहुसांस्कृतिक शिक्षणाचे परिमाण, आयाम वर्णन करा.

६. बहुसांस्कृतिक शिक्षणात समाविष्ट केली जाऊ शकणारी वर्गातील काही क्षेत्रे ओळखा. तुमच्या उत्तराचे उदाहरणासह स्पष्टीकरण द्या.

७. सत्य की असत्य ते सांगा. असत्य असल्यास कारण सांगा.

   अ) बहुलतावादी लोकशाही समाजात परिणामकारकरित्या कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, वृत्ती आणि कौशल्ये संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणे हे बहुसांस्कृतिक शिक्षणाचे एक ध्येय आहे.

   ब) बहुसांस्कृतिक शिक्षण हे एकाधिकारशाहीला चालना देते.

   क) बहुसांस्कृतिक शिक्षण हे फक्त लोकांच्या विशिष्ट गटासाठी आहे.

८. रिकाम्या जागा भरा.

   १) ————- यांना बहुसांस्कृतिक शिक्षणाचे जनक समजले जाते.

   २) बहुसांस्कृतिकतेची व्याख्या ———— सहजीवनाची अवस्था अशी केली जाते.

❖❖❖❖

७

शिक्षणातील समस्या

घटक रचना :

७.० उद्दिष्ट्ये

७.१ परिचय

७.२ मानवी अधिकार शिक्षण

७.३ मानवी अधिकार शिक्षणातील मुद्दे

७.४ बहुसांस्कृतिक शिक्षण

- ७.४.१ संस्कृती म्हणजे काय ?
- ७.४.२ बहुसांस्कृतिक शिक्षण म्हणजे काय ?
- ७.४.३ बहुसांस्कृतिक वर्गाची ध्येये
- ७.४.४ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे आयाम
- ७.४.५ बहुसांस्कृतिक शिक्षणातील समस्या

७.५ मूल्यशिक्षण

- ७.५.१ उद्देश
- ७.५.२ मुल्य शिक्षणाची मुख्य उद्दिष्ट्ये
- ७.५.३ मुल्य शिक्षणाचे मुद्दे

७.० उद्दिष्ट्ये

या विभागानंतर विद्यार्थ्यांना खालील गोष्टी शक्य होतील.

- मानवी अधिकार शिक्षणाची व्याख्या करणे.
- मानवी अधिकार शिक्षणाची गरज तपासणे.
- मानवी अधिकार शिक्षणाशी संबंधीत समस्या स्पष्ट करणे.
- बहुसांस्कृतिक शिक्षणाची व्याख्या करणे.
- बहुसांस्कृतिक शिक्षणाची गरज तपासणे.
- बहुसांस्कृतिक शिक्षणाशी संबंधीत समस्या स्पष्ट करणे.
- मूल्यशिक्षणाची व्याख्या करणे.

- मूल्य शिक्षणाची गरज तपासणे.
- मूल्य शिक्षणाशी संबंधीत समस्या स्पष्ट करणे.
- शिक्षणातील समस्या सोडवण्यासाठीचे मार्ग स्पष्ट करणे.

७.१ परिचय

जग हे जागतिक खेडे बनलेले आहे. जेथे जगाचा एक भाग एकापेक्षा अधिक मार्गांनी जगाला प्रवाहित करतो. म्हणूनच मानवी जीवनाच्या प्रतिष्ठेचा आदर आणि विविधतेचा स्विकार याची गरज आहे. जगात शत्रूता, युद्ध, असहिष्णुता या गोष्टी वाढत असताना प्रभावी तरूण वयातच शांतता, सुसंवाद आणि मूल्य पद्धतींचे बीज मजबूत करणे आवश्यक आहे. ही मूल्ये लोकांच्या मोठ्या समुदायाकडे अगदी त्याचवेळेस शिक्षणाच्या साधनासह त्याचे माध्यम म्हणून प्रसारित केले जाऊ शकते. आणि म्हणून मानवी अधिकार बहुसांस्कृतिक आणि मूल्य आधारित शिक्षणाची गरज आहे.

७.२ मानवी अधिकार शिक्षण

उपविषय 'अ'

अ) मानवी अधिकार शिक्षण :

मानवी अधिकार कोणते?

मानवी अधिकार म्हणजे शिक्षणातील अलिकडील पद्धतींचा छेदनबिंदू किंवा सामाईक वैशिष्ट्य असेही संबोधले जाऊ शकते. या पद्धती जसे की भांडणतंटा निवारण, कायद्यासंबंधी शिक्षण, विकास शिक्षण, समस्या संबंधी शिक्षण, शांतता शिक्षण, पक्षपात विरोधी शिक्षण, बहुसांस्कृतिक शिक्षण आणि जागतिक शिक्षण.

मानवी अधिकार शिक्षण म्हणजे काय?

मानवी अधिकार शिक्षण म्हणजे मानवी अधिकारांच्या चालनेप्रती ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोन. मानवी अधिकाराचे महत्त्व समजण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे. मानवी अधिकार शिक्षण म्हणजे असे सर्व शिक्षण जे मानवी अधिकारांचे ज्ञान, कौशल्य आणि मूल्ये विकसित करते.

मानवी अधिकार शिक्षणासाठीच्या संयुक्त राष्ट्र दशकाने (१९९५ ते २००४) मानवी अधिकार शिक्षणाची व्याख्या पुढील प्रमाणे केली. "ज्ञान, कौशल्ये देऊन आणि दृष्टीकोनांना आकार देऊन त्याद्वारे मानवी अधिकारांच्या जागतिक संस्कृतीच्या बांधणीचे उद्दिष्ट ठेऊन केलेले प्रशिक्षण, प्रसार आणि माहितीचे प्रयत्न जे पुढील बाबींकडे निर्देश करतात."

अ) मानवी अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्यासाठी आदर बळकट करणे.
ब) मानवी व्यक्तिमत्व आणि त्याच्या प्रतिष्ठेची जाण यांचा पूर्ण विकास.

क) सर्व देश, मूळचे लोक आणि जातीय, राष्ट्रीय, वंशिक, भाषिक गट यांच्यामध्ये समज, आदर, लिंगसमनाता आणि मैत्रीला चालना देणे.
ड) एक मुक्त समाजात सर्व लोकांनी परिणामकारकरित्या सहभागी होणे शक्य करणे.
इ) "शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या कृतींचा उत्कर्ष."

(मानवी अधिकार शिक्षणासाठी संयुक्त राष्ट्र दशकाच्या कृती आराखड्यातून साभार (१९९५-२००४), परिच्छेद २)

मानव अधिकार शिक्षण हे मानव अधिकाराविषयी आणि मानव अधिकारासाठी शिकविते. त्यांचे ध्येय म्हणजे लोकांना मानवी अधिकार, मानवी अधिकाराची किंमत करणे आणि मानवी अधिकारांना आदर देणे, संरक्षण करणे आणि चालना देणे यासाठीची जबाबदारी स्विकारणे हे समजण्यास मदत करते. मानवाधिकार शिक्षणाची महत्त्वपूर्ण निष्पत्ती म्हणजे सबलीकरण, एक प्रक्रिया ज्यातून लोक आणि जमाती त्यांचे स्वत:चे जीवन आणि त्यांच्यावर परिणाम करणारे त्यांचे निर्णय यावरील त्यांचे नियंत्रण वाढवते. मानवाधिकार शिक्षणाचे अंतिम ध्येय म्हणजे लोकांनी एकत्रपणे कार्य करुन सर्वांसाठी मानव अधिकार न्याय आणि प्रतिष्ठा प्राप्त करणे.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ मानवाधिकार शिक्षणाची व्याख्या दया.

प्र.२ मानवाधिकार आणि मानवाधिकार शिक्षण यामधील संबंध काय आहे ?

प्र.३ मानवाधिकार शिक्षणाची गरज तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

७.३ मानवी अधिकार शिक्षणातील मुद्दे

१) शिक्षणाने मानवाधिकारांसाठी भक्कम पाया पुरवायला हवा : मानवाधिकार शिक्षण हे सर्व स्तरांवर घडून यावयास हवे. प्राथमिक, द्वितियक आणि तृतीयक. प्राथमिक स्तरापासूनचे शिकवणे हे मानवाधिकार शिक्षणातील संरचना आणि सखोलतेची वाढीव पातळी देऊल. अशाप्रकारे अशी संरचना विद्यार्थ्यांच्या रचनात्मक वयापासून त्यांच्या अंगभूत होईल आणि त्यांच्या शालेय जीवनाचा अविभाज्य घटक बनेल.

२) मानवाधिकार शिक्षणाला विस्तृत व्याप्ती असायलाच हवी : अशाप्रकारचे शिक्षण हे फक्त औपचारिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता अनौपचारिक पद्धतीसाठी सुद्धा लागू व्हायला हवे. याद्वारे खात्री पटेल की ते अधिका अधिक तरूणांपर्यंत पोहचेल. त्यातल्या त्यात असे तरूण ज्यांना औपचारिक उच्च शिक्षण परवडू शकत नाही. शिक्षण तज्ज्ञांनी सुद्धा त्यांना स्वत:ला अशा प्रश्न विचारावा. प्राथमिक पासून ते तृतीयक स्तरापर्यंतच्या आपल्या शिक्षण संस्था आपण रूजवत असलेली मुल्ये कशाप्रकारे प्रतिबिंबीत करतात ?

३) आंतरशाखीय प्रभाव : मानवाधिकार शिक्षण हे फक्त मानवतावादी प्रवाहापुरते मर्यादित नको. ते असे विभाग किंवा शाखांचा भाग असावयास हवे. ज्यांच्या अभ्यासक्रमात मानवाधिकार शिक्षण नाही. अशा शाखा किंवा विभागाच्या अभ्यासक्रमात सुद्धा मानवाधिकार शिक्षणाच्या संबंधीत भागाची भर हवी.

मानवाधिकार हे वेगवेगळ्या शाखांद्वारे स्पष्टपणे तपासले जाऊ शकतात. जेणकरुन त्याला मानवता आणि भाषांपासून विज्ञानापर्यंतच्या विद्यार्थ्यांना एक आढावा प्रदान करेल आणि त्यांचे आकलन गहन होईल. अशाप्रकारे त्या अभ्यासक्रमाच्या केंद्रस्थानी मानवाधिकार असून त्याच्या सभोवती सृजनात्मक अभ्यासक्रम आखला जाऊ शकतो आणि अशाप्रकारे आंतरशाखीय प्रभाव प्राप्त होऊ शकतो.

४) मानवाधिकार शिकविण्यासाठी सर्वोत्कृष्ठ मार्ग विकसित करणे : मानवाधिकार शिक्षण हे व्याख्यानपद्धती म्हणून प्रसारित केले जाऊ शकत नाही. त्याला प्रत्यक्ष अनुभवाची जोड दिली जायला हवी. जेणेकरुन विद्यार्थ्याला मानवाधिकार शिक्षणाविषयी जाण येईल व सहानुभूती वाटेल. आणि ही गोष्ट मौखिक प्रथा जसे गोष्टी सांगून, तत्वज्ञान आणि साहित्याचा लिखित कार्याद्वारे, नाटक आणि भूमिका वठवण्याद्वारे, कलात्मक कार्य, चित्र काढणे किंवा कटिनद्वारे, लोकांशी प्रत्यक्षपणे बोलण्याद्वारे खेळाद्वारे आणि मानवी अधिकाराच्या सेवेत असलेल्या आरोग्य शिक्षण व विज्ञानाद्वारे साध्य केले जाऊ शकते.

निष्कर्ष : मानवाधिकार शिक्षणाचा एक महत्त्वपूर्ण नमूना सादर केला गेला. ज्यात दाखवले गेले की सहभागी शिक्षण (ऐकून शिकणे) सक्रीय शिक्षण (जेथे विद्यार्थी शिकण्यासाठी मिळवतो) आणि प्रायोगिक शिक्षण (प्रत्यक्ष अनुभवापासून अनुभव काढण्याची प्रक्रिया हे मानवाधिकार शिक्षणात कशाप्रकारे भूमिका बजावतात या नमुन्याने शाळा आणि त्यांच्या जमाती यामधील आणि मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टांचा इतिहास असलेल्या देशांमधील ज्ञान अडथळ्यांना तोडणे दर्शविले. या मंडळाने धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांच्या महत्त्वांना सुद्धा स्पर्श केला

त्यांच्याजवळ प्रतिष्ठा, कायदा आणि मानवी अधिकारांची कल्पनांची माहिती होती. या गोष्टींची आठवण करुन देणे मोलाचे आहे कि मानवी प्रतिष्ठेची संकल्पना ही १९४८ मध्ये शोधली गेली किंवा मानवी अधिकाराच्या कल्पना किंवा समानतेची तत्वे ही पूर्णपणे धर्मनिरपेक्ष मूलतत्वाची आहे.

आपली प्रगती तपासा :

प्र.१ मानवाधिकार शिक्षणातील मुद्दे सध्याच्या काळातील उदाहरणाने स्पष्ट करा.

प्र.२ शैक्षणिक प्रवाहाच्या वेगवेगळ्या स्तरातील मानवाधिकार शिक्षणाच्या व्यवहाराचे परिणामकारक मार्ग तपासा.

प्र.३ मानवाधिकार शिक्षणाच्या आंतरशाखीय प्रभावाचे वर्णन करा.

७.४ बहुसांस्कृतिक शिक्षण

उपविषय ब : बहुसांस्कृतिक शिक्षण

७.४.१ संस्कृती म्हणजे काय?

संस्कृती मध्ये एका विशिष्ट गटाची सामाईक मूल्ये मान्यता परंपरा व न्यायाचा समावेश होतो. एका गटापासून दुसरा गट वेगळा कसा होईल हे दाखवणारे दृष्टिकोन, चिन्हे, व्याख्या, आणि मान्यताप्राप्त निकष त्यात सामावतात.

जोपर्यंत एक समरस (सुसंवादी) समाज होता तोपर्यंत एक संस्कृती आणि सुक्ष्म सांस्कृतिक नमुने हे मान्यताप्राप्त निकष होते परंतु जग हे जागतिक खेडे बनत असताना गोष्टी बदलायला सुरुवात झाली आणि वांशिक केंद्रियतेपासून बहुलतावाद आणि सांस्कृतिक सापेक्षतेकडे वाटचाल करण्याची गरज निर्मान झाली. अशा प्रकारच्या बदलाचे ऐतिहासिक व सामाजिक-सांस्कृतिक अव्यक्त केलेले अर्थ आहेत आणि ते जसे दिसते तितके सोपे नाही. ते म्हणजे फक्त स्विकार व सहनशीलता नाही तर वर्चस्ववादी संस्कृती इतकेच अल्पसंख्याक संस्कृतीची मान्यता व साजरे करणे आहे. अशाप्रकारे समाज जसा बहुसांस्कृतिक, विषमांगी आणि बहुलतावादी बनला तशाप्रकारे विविधांगी संस्कृतीचा गरजा व ध्येये प्राप्त करण्यासाठी शिक्षणाने सुद्धा बदलणे अपेक्षित होते ते फक्त पाठ्यपुस्तकातील काही पाठापुरतीच मर्यादित नाही किंवा त्याच्या ऐतिहासिक, राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातील संस्कृतीचे संदर्भ देत असलेल्या सामग्रीपुरतेच मर्यादित नाही. अशाप्रकारे बहुसांस्कृतिक शिक्षण हे त्याच्या संदर्भातील ज्ञान, मूल्ये, वृत्ती आणि कौशल्ये यांचे समग्र आकलन आहे.

७.४.२ बहुसांस्कृतिक शिक्षण म्हणजे काय?

गे (२०००) लॅडसन बिलिंग्झ् यांनी बहुसांस्कृतिक शिक्षणाची व्याख्या प्रशिक्षित शिक्षकांच्या सुविधेसह सांस्कृतिक दृष्ट्या प्रतिसादात्मक अध्यापनशास्त्राचा अंगीकार अशी केली. अशाप्रकारे बहुसांस्कृतिक शिक्षणाला काय शिकवले जाते, कसे शिकवले जाते आणि कोणाकडून शिकवले जाते याचे पुनर्लोकन गरजेचे आहे. हा बहुसांस्कृतिक शिक्षणाचा प्रमुख मुद्दा आहे.

बहुसांस्कृतिक शिक्षण हे एका बहुलतावादी समाजात परिणामकारकरित्या जगण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञान कौशल्ये आणि दृष्टिकोनासह विद्यार्थ्यांना सुसज्ज करण्याचे लक्ष्य ठेवते. बहुसांस्कृतिक शिक्षण हे दुसऱ्या संस्कृतीची मान्यता व साजरी करण्याच्या दृष्टिकोनाला चालना देते. बहुसांस्कृतिक शिक्षणातील सांस्कृतिक फरकांकडे उत्तरदायित्व म्हणून बघितले जात नाही तर त्याची किंमत केली जाते व त्याचा आनंद लुटला जातो. बहुसांस्कृतिक शिक्षण हे विविध संस्कृतीशी संबंधित विद्यार्थ्यांच्या गरजा, आवडी आणि आव्हानांशी संवेदनशील आहे. ते वेगवेगळ्या वंशिक पार्श्वभूमी, जाती, भाषिक भिन्नता, सामाजिक वर्ग व धार्मिक सलगी असलेल्या लोकांसाठी समान संधी आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे ध्येय ठेवून आहे. त्याचा उद्देश म्हणजे विविध संस्कृती आणि त्यांच्या परंपराचे समृद्ध आणि सर्वसमावेशक आकलन पुरवणे हे आहे.

७.४.३ बहुसांस्कृतिक वर्गाची ध्येये :

१. सांस्कृतिक विविधतेसाठी आदर व जबाबदारी, धरतीसाठी प्रचंड आदर, मानवी प्रतिष्ठेसाठी आदर आणि निसर्ग व संस्कृतील बहुलतावादाची मान्यता विकसी करणे.
२. विविधांगी दृष्टिकोनाला उत्तेजन देणे, आणि वेगवेगळ्या दृष्टिकोनातील अर्थांना मुक्तपणे स्विकारणे.
३. तार्किक व वस्तुनिष्ठ विचारसरणीला उत्तेजन देण्यासाठी वैज्ञानिक दृष्टी विकसित करणे आणि पूर्वग्रह भेदाभेद आणि पक्षपाताविरुद्ध लढणे.
४. स्वत:बद्दलची जाण आणि स्वत:च्या व इतरांच्या संस्कृतीची जाण विकसित करणे.

भारत हा लोकसंख्येच्या आधारे दुसरा सर्वात मोठा देश आहे. या देशात खुप साऱ्या संस्कृती, धर्म, जाती आणि वंशिक गट आहेत. त्यामुळे अभ्यासक्रमात प्रत्येक सांस्कृतिक विधीचा समावेश करणे शक्य नाही.

७.४.४ बहुसांस्कृतिक शिक्षणाचे आयाम :

सीटल येथील वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीतील बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या केंद्राचे संचालक प्रोफेसर जेम्स ए. बँक्स यांना बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या क्षेत्रातील अग्रगण्य विद्वान समजले जाते. त्यांनी बहुसांस्कृतिक शिक्षणाचे निर्णायक आयाम तपशीलवारपणे शोधून काढलेले आहे.

- **सामग्री एकीकरण -** शिक्षकांनी त्यांचा विषय किंवा शाखेतील मुख्य आशय, सामाजिकरण आणि समस्या स्पष्ट करण्याकरता विविध संस्कृती आणि गटापासूनची उदाहरणे व सामग्री किती प्रमाणात वापरावी याच्याशी हे संबंधीत आहे. यामध्ये इतिहास भाषा तसेच गणित व विज्ञान या विषयांचा समावेश होतो.
- **ज्ञानबांधणी -** विद्यार्थी त्यांचे स्वतःचे ज्ञान कसे बांधायचे हे शिकतात. यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी ज्ञानाकडे कसे बघतात आणि कसा संवाद साधतात यातील बदलत्या मार्गांचा समावेश होतो. ज्यामुळे ते फक्त दुसऱ्याने निर्माण केलेल्या ज्ञानाचे अभोक्ते राहत नाहीत तर स्वतः ज्ञाननिर्माते बनण्यास त्यांना मदत होते. बहुसांस्कृतिक सिद्धांत प्रतिपादन करतात की संशोधकाची मुल्ये, व्यक्तिगत इतिहास, दृष्टिकोन आणि मान्यता ते निर्माण करत असलेल्या ज्ञानापासून वेगळे केले जाऊ शकत नाही.



आकृती ७.४ : बहुसांस्कृतिक शिक्षणाचे आयाम

- **पूर्वग्रहातील कमी -** हा आयाम विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे वंशिक जातीय आणि सांस्कृतिक गटाप्रती सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शिक्षकाद्वारा वापरल्या जाणाऱ्या पाठ व कृतींचे वर्णन करतो.
- **समानता अध्यापन शास्त्र -** जेव्हा शिक्षक त्यांचे शिकवणे अशा मार्गांनी रूपांतरीत करता जे विविध वंशिक, सांस्कृतिक व सामाजिक वर्ग गटांच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीला सुलभ करतात. तेव्हा समानता अध्यापनशास्त्र अस्तित्वात असते. समानता अध्यापनशास्त्र मानते की विविध संस्कृती व गटांचे विदयार्थी हे शाळेत खूप साऱ्या क्षमता घेऊन येतात. जेव्हा समानता अध्यापनशास्त्राची अंमलबजावणी होते तेव्हा शिक्षक सांस्कृतिकदृष्ट्या प्रतिसादात्मक अध्यापन कृतीत आणतात.
- **शालेय संस्कृती आणि समाजरचनेचे बळकटीकरण -** हे तेव्हाच निर्माण होते जेव्हा शाळेची सांस्कृतिक संघटना ही अशा पद्धतीने रूपांतरीत होतात ज्या विविध वंशिक जातीय आणि लैंगिक गटांच्या विद्यार्थ्यांना गुणात्मक व समान दर्जा अनुभवणे शक्य होते.

शिक्षकांना सामुहिक योजना आणि सूचनांसाठी संधी प्रदान करुन आणि लोकशाही संरचना निर्मित करुन जी शिक्षक, पालक आणि शालेय कर्मचाऱ्यांना शाळा चालविण्याची सामाईक जबाबदारी देते त्याद्वारे एक सबळ शालेय संरचना बहुसांस्कृतिक शिक्षणाचा सराव सुकर करते.

७.४.५ बहुसांस्कृतिक शिक्षणातील समस्या :

१) आंतरसांस्कृतिक कार्यक्षमतेचा अभाव : वर्गात जर शिक्षकांजवळ आंतरसांस्कृतिक कार्यक्षमतेचा अभाव असेल तर ते एक आव्हान बनू शकते. शिक्षक हा विद्यार्थ्यांची संस्कृती समजून घेण्यास कमी पडू शकतो, त्याच्याजवळचे ज्ञान अपुरे किंवा चुकीचे सुद्धा असू शकते, बहुलतावादी पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसोबत कार्य करण्याच्या कौशल्याचा अभाव असू शकतो किंवा अनुकूल दृष्टिकोन असू शकत नाही. बहुसांस्कृतिक वर्गातील हे सर्व अडथळे ठरु शकतात (गोपाल २०११) एक विविधांगी वर्गात शिकविण्यासाठी विविध दृष्टिकोनाचा वापर करण्यासह शिक्षकांना सुसज्य व प्रशिक्षित केले गेले पाहिजे.

२) बहुसांस्कृतिक अभ्यासक्रमाचे आकलन : सर्व प्रकारच्या विविधतेला सामावून घेणारा अभ्यासक्रम हा फक्त माहितीचे ओझे बनुन जातो. बहुसांस्कृतिक वर्गात सर्व माहिती अंदाधुंदपणे समाविष्ट करणे, सर्व धर्म किंवा भाषा विषयी भर घालणे हे आव्हान नाही आणि ही गोष्ट शक्यही नाही वा आवश्यक पण नाही. विविधांगी लोकसंख्येला सेवा देण्यास पुरेशा विस्तृत अशा सामाईक अभ्यासक्रमाची तेथे गरज आहे. विशाल विविधतेच्या लोकांना जे पर्याय पूरवू शकतात अशा साहित्य व कृतींच्या साधनांद्वारे अभ्यासक्रमाचा एक वैश्विक आराखडा साध्य केला जाऊ शकतो.

३) फक्त सामाजिक अभ्यास आणि भाषांमध्येच नाही : बहुसांस्कृतिक शिक्षण हे फक्त सामाजिक अभ्यास आणि भाषा याच प्रांतात येते आणि गणित व सायन्स हे सर्व दूर सारखे असतात असा समज शिक्षकांचा आणि खास करुन गणित व सायन्स शिक्षकांचा असतो. परंतू ही कल्पना अपुरी व चुकीची आहे. बहुसांस्कृतिक शिक्षणाची व्याख्या विस्तृतपणे केली जायला हवी, आणि त्याला विषय सामग्रीने मर्यादित केले जाता कामा नये आणि त्यामध्ये विविध

सांस्कृतिक दृष्टिकोनातील सामग्रीचे आकलन समाविष्ट व्हावे जेणेकरुन तेथे बहुसांस्कृतिक आकलनाचा जास्तीत जास्त स्विकार होईल आणि बहुसांस्कृतिक वर्गाप्रती कमी प्रतिरोध असेल.

४) पूर्णपणे वेगळ्या संस्कृतीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी प्रकारची शैक्षणिक कामगिरी : जर शैक्षणिक सामग्री ही विद्यार्थ्यांच्या द्वितीय भाषेत असेल जेथे विद्यार्थ्यांना भाषांतर करुन अर्थ लावण्यास वेळ लागतो आणि त्यानंतर आकलन होते तर त्यामुळे ही प्रक्रिया त्याच्या निम्न शैक्षणिक कामगिरीकडे घेऊन जाते. जर दृष्टिकोन हा सांस्कृतिक पार्श्वपिठीकेपासून वेगळा असेल तर काही वेळेस वर्गकृतीत सहभागी होण्यास विद्यार्थी नाराज असतो. उदा. विद्यार्थी हा जर आदिवासी क्षेत्रातील दुरच्या भागातील असेल तर तो शांत राहणे पसंत करतो आणि वर्गात प्रश्न विचारण्यास किंवा मोकळेपणे उत्तर देण्यास बिचकतो. यामुळे त्यांच्या शैक्षणिक कामगिरीत अडथळा येऊ शकतो. शिक्षकांनी याबाबतीत संवेदनशील असायला हवे आणि वर्गसंवादातील वेगवेगळे दृष्टिकोन स्विकारण्यास विद्यार्थ्यांना हळूहळू मदत करावी.

५) अध्यापन कार्यप्रणाली : वर्गातील विविधता लक्षात घेऊन शिक्षकांना वेगवेगळ्या प्रकारची अध्यापन कार्यप्रणाली अवलंबण्यास हवी. जी संस्कृती वेगळी आहे. त्या संस्कृतीच्या विद्यार्थ्यांचा विश्वास व आत्मविश्वास प्राप्त होण्यास शिक्षकांनी त्यांची शैली व दृष्टिकोन रूपांतरीत करावयास हवा. विविधांगी अध्यापन प्रणाली जसे भूमिका वठवणे, गोष्टी, समस्या निराकरण, नक्कल आणि सहकारी अध्ययन अंगिकारल्या जाऊ शकतात ज्या वेगवेगळ्या संस्कृतीच्या विद्यार्थ्यांच्या सोयी पूरवू शकतात.

६) शिक्षण पध्दतीत संरचनात्मक सुधारणात वंशिक सामग्रीच्या समावेशात बदल : आफ्रिकन अमेरिकनांना मुख्य प्रवाही शाळांमध्ये समाविष्ट करण्याबाबतची अमेरिकेत १९५० मध्ये सुरु झालेल्या चळवळीने १९८० पर्यंत पाळेमुळे रोवलेली होती. आणि फक्त विविध संस्कृतीतील विद्यार्थ्यांचा शाळेत समावेश करण्याच्या वरपांगीपणा त्या नव्हता तर विविध सांस्कृतिक पार्श्वपिठीकेच्या लोकांचा इतिहास व लिखाणाचा सुद्धा त्यात समावेश होता. तसेच तेथे वैज्ञानिक संशोधन पुराव्यासह सांस्कृतिक परंपरा अर्थ स्पष्टीकरण, पक्षपाती पूर्वग्रहदुषित आणि नकारात्मक विश्वासांना प्रश्न विचारण्याची गरज होती.

७) सांस्कृतिक एकिकरण आणि सांस्कृतिक ओळख गमावणे यातील समतोल : वेगवेगळ्या संस्कृतींचा समावेश व एकीकरण आणि अल्पसंख्यांक संस्कृतीला तिची ओळख व सांस्कृतिक समृद्धी गमवू न देणे यामधील समतोल टिकवणे हे एक आव्हान आहे.

८) बहुसांस्कृतिकतेप्रती शिक्षकांचा दृष्टिकोण : शिक्षक हे बहुसांस्कृतिक शिक्षणाप्रती खरीखुरी मुल्ये व दृष्टिकोनाचे मुख्य अंमलबजावणीकर्ते आहेत. परंतू तेच स्वतः जर वस्तूनिष्ठ, पक्षपाती आणि एकसुरी असले तर ते बहुसांस्कृतिक शिक्षणाचे आकलन पुढे पाठवू शकणार नाही. काही वेळेस शिक्षकांना अभ्यासक्रमातील बहुसांस्कृतिक दृष्टिकोण अमलात आणणे. बहुलतावादी समाजाची मूल्ये चेतविणे कठिण जाते. शिक्षकांना अभ्यासक्रमाचा चौकटीत राहुन मूल्याच्या एकीकरणाचे सृजनशील मार्ग शोधणे आणि वर्ग अध्यापनातील विविध समजांची मान्यता देणे गरजेचे आहे. पाठ्यपुस्तकातील पक्षपाती व एकांगी अनुकुलता ही शिक्षकाद्वारे चांगल्या प्रकारे हाताळली जावयास हवी. काहीवेळेस विविध संस्कृतीशी संबंधित चर्चा ही वर्गात भांडणाकडे नेऊ शकते. ही परिस्थिती शिक्षकांनी काळजीपूर्वक हाताळावयास हवी आणि वर्गात त्यांचे वेगवेगळे पैलू दाखवून द्यावयास हवे.

९) विविध दृष्टिकोनाचा संवाद : अध्यापनाच्या पद्धती विषयाप्रती दृष्टिकोन आणि भाषिक अडथळे हे शैक्षणिक संस्थाद्वारे प्रेमळ मार्गांनी हाताळले जावयास हवे. रचनात्मक व कार्यात्मक सुधारणा व बहुसांस्कृतिक शिक्षणाप्रतीची धोरणे चांगल्या प्रतीने हाताळली जावयास हवी, विद्यार्थ्यांना वंशिक गट आणि इतर आदिवासी गटांप्रती संवेदनशील बनवण्यासाठी एखादा अभ्यासक्रम विभाग किंवा प्रकरणांची भर घातली जाऊ शकते.

आपली प्रगती तपासा :

१) बहुसांस्कृतिक शिक्षणाची गरज तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

२) बहुसांस्कृतिक शिक्षणाचे आयाम कोणते ?

३) बहुसांस्कृतिक शिक्षणातील वेगवेगळ्या समस्या टिकात्मक रित्या अभ्यासा.

४) बहुसांस्कृतिक वर्गाचा तुमचा अनुभव विषद करा.

५) बहुसांस्कृतिक वर्ग हा फूट पाडू शकतो या विधानाशी तुम्ही सहमत आहात का? तुमच्या उत्तराचे स्पष्टीकरण करा.

७.५ मूल्यशिक्षण

उपविषय क : मुल्यशिक्षण

७.५.१ उद्देश - परिचय :

शिक्षण हे फक्त आकलनविषयक विकासासाठी किंवा परिक्षा पास होण्यासाठी ज्ञान प्राप्त करण्यासाठी नाही. शिक्षण हे बुद्धीमत्ता वाढवण्यासाठी आहे. त्याचवेळेस चारित्र्य विकास हा सुद्धा त्याचा महत्त्वाचा भाग आहे. चांगल्या नागरिकत्वाची मूल्ये चेतवणे, सहकारी, मानवी आणि सहानुभूतीची भावना ठेवणे सुद्धा महत्त्वाचे आहे.

शिक्षण म्हणजे शैक्षणिक सलग्नतेसोबत शिस्त, जबाबदारी लोकशाही जीवन व सुसंवादाला चालना देणारी सामाजिक संस्था होय. मूल्यशिक्षण हे समाजातील प्रेमळ तत्वे आणि आदर्शासह जीवनाला चालना देते जी समाजाच्या सुरळीत चालण्यासाठी गरजेची आहे.

मूल्यशिक्षण हे कट्टर, हुकुमशाही, तत्वप्रणाली किंवा प्रसार नाही याऊलट ती एक सुयोग्य मुल्यांचा संचाचे प्रत्यक्ष रूजवण्याची प्रक्रिया आहे. एखाद्याशी किंवा मानवतेशी संबंधित समस्याग्रस्त मुद्यावर चिंतनीय विचारसरणी आणि स्वतंत्र अनुमानाची क्षमता विकसित करण्यासाठी एखाद्याचे दृष्टिकोन, विश्वास आणि जाणिवेवर कार्य करण्याची ती एक प्रक्रिया आहे.

मूल्यशिक्षणाचा उद्देश म्हणजे निकष प्रस्थापित करण्यासाठी निष्क्रिय अनुरूपता आणि अविचारी अधिनता विकसित करणे नव्हे परंतु ते स्वयंस्फुर्तीने जबाबदार प्रवृत्ती दर्शविण्यासाठी चिंतन आणि तार्किक विचारसरणीच्या स्विकाराला उत्तेजन देते. ही काही सवयीची बाब नाही परंतू स्वतः व समाजात इष्ट बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे. शिक्षण म्हणजे जाणीवा, मूल्ये, दृष्टिकोन इ. च्या विकासाशी संबंधीत शैक्षणिक उद्देशांच्या प्रेमळ आयामात हे बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण हे साधन आहे असे निदर्शनास आले आहे की शिक्षणाचा भर हा ज्ञानाचा विकासावर अधिक आहे आणि प्रवृत्ती व मुल्ये यांचा प्रेमळ विकास हा दुर्लक्षिला जातो. अशाप्रकारे अभ्यासक्रम तसेच सुफ्त अभ्यासक्रमाचा भाग म्हणून शिक्षणाद्वारे मुल्यांच्या विकासासाठी तातडीची गरज निर्माण झाली आहे. मूल्य शिक्षण ही समाजात जे जे काही चांगले व योग्य समजले जाते त्याचे निर्माण जतन व प्रसार करण्याची प्रक्रिया आहे.

७.५.२ मुल्य शिक्षणाची मुख्य उद्दिष्ट्ये :

१. व्यक्तीचा अविभाज्य व संपूर्ण विकास घडवून आणणे.
२. एक अधिक शाश्वत मानवी समाजाप्रती दृष्टिकोण व मूल्ये निर्माण करणे.
३. समाजाच्या सर्व थरात प्रेम, सहकार्य, मानवता व सुसंवादाची मूल्ये चेतविणे.
४. शिक्षणाचे साधन म्हणून तसेच ध्येय म्हणून मूल्ये विकसित करणे.
५. विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात कशाचे मूल्य आहे ते ओळखण्यासाठी निर्णायक विचारसरणी विकसित करणे.
६. मनोवैज्ञानिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्ये विकसित करणे.



७.५.३ मुल्य शिक्षणाचे मुद्दे :

काही शैक्षणिक आयोग व धोरणांच्या शिफारशी :

शिक्षण पद्धतीत मूल्यांचा समावेश करण्याच्या शिकणारांमध्ये कुठली मुल्ये चेतवावी हे समजण्यापासून ते मुल्यांचे मुल्यमापनापर्यंत अनेक समस्या आहेत. राधाकृष्णन शिक्षण आयोगापासून १९४८ ते राष्ट्रीय अभ्यासक्रम चौकट २००५ आणि इतर राष्ट्रीय शिक्षण धोरणे इथपर्यंतच्या आपल्या शैक्षणिक धोरणांमध्ये शिक्षणातील मुल्ये आणि मुल्यांसाठी शिक्षण हा महत्त्वपूर्ण घटक राहिलेला आहे. या सर्व शिफारशींचा घोषवारा दर्शवितो की, जर अध्यात्मिक प्रशिक्षण वगळले गेले तर शिक्षण अपूर्ण राहिल. (विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८) त्यांने हे ओळखले की सामाजिक, नैतिक आणि अध्यात्मिक मूल्यात शिक्षणासाठीच्या सोयींचा अभाव म्हणजे अभ्यासक्रमातील एक गंभीर त्रुटी होत शिक्षण आयोग १९६६. सामाजिक आणि नैतिक मुल्यांच्या मशागतीत शिक्षणाला शक्तीशाली साधन बनवले जायला हवे. राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६६. एक जबाबदार नागरिक म्हणून स्वतः व इतरांसह सुसंवादित जीवन जगण्यासाठी आवश्यक मुल्ये व दृष्टिकोनासह विद्यार्थ्यांना सुसज्ज करणे हे शिक्षणाचे ध्येय असायला हवे (NCF 2005).

मुल्य शिक्षण हे समाजाची गरज व काळानुसार धार्मिक व नैतिक मुल्यांपासून शांती व समरसतेचे शिक्षणाकडे वळलेले आहे. मुल्य शिक्षण हे महत्त्वाचे आहे कारण ते व्यक्तीगत रूपांतरण व सामाजिक बदलासाठी प्रमुख बाब आहे. मुल्यशिक्षणाचे ध्येय हे विद्यार्थ्यांना विशिष्ट दृष्टिकोन व कौशल्यांसह सबळ करणे, तसेच त्यांना आव्हानाने भरलेल्या या समकालीन दैनंदिन जगात वापरण्यासाठी निर्णायक क्षमता प्रदान करणे. मुल्य शिक्षणाच्या अंमलबजावणीतील काही मुद्दे पुढीलप्रमाणे.

१) मुल्यांची व्याख्या करणे : शिक्षणाचे मुळ मूल्य हे आहे परंतु प्रश्न असा उभा रहतो की मुल्य कोणती, त्यांच्यात धार्मिक मुल्यांपासून ते सामाजिक व अध्यात्मिक मुल्यांपर्यंत फरक असा करावा. शिक्षणात कोणती मुल्ये चेतवावी हे सुद्धा एक आव्हान आहे. मुल्यशिक्षणाने मुल्यांची व्याख्या करताना कोणत्याही धर्मापुरते मर्यादित राहू नये. तर त्यात मानवतेपर्यंत पोहचण्यासाठीच्या मुल्यांचा समाविष्ट होत असावा. ही मुल्ये एकूणच राष्ट्रीय व वैश्विक दृष्टिकोनातून घेतली जावीत, जी लोकशाही, सामाजिक, धर्मनिरपेक्ष, समाजव्यवस्था यांच्यावर भर देते. ही मुल्ये सामाजिक सुसंवादाला चालना देतात. जी सर्वांसाठी दर्जेदार जीवन, समानता, पर्यावरणाचे रक्षण, संस्कृतीचे जतन आणि स्वप्राप्ती यांची खात्री देते. ही मुल्ये तीनपत्री संबंध स्पष्ट करतात. स्वत:विषयीची मूल्ये, समाजाविषयीची मुल्ये, पर्यावरणांविषयीची मुल्ये.

२) परंपरा व आधुनिकतेचा संबंध : एक असा दृष्टिकोन ज्याला काय मुल्यवान आहे त्याचे एकीकरण, संश्लेषण आणि टिकाव गरजेचा आहे आणि सत्यपरिस्थितीशी अनुकुल होणे व भारतीय संस्कृती व परंपराची मुल्ये पूर्णपणे न नाकारणे ही मुल्ये तरूण मुलांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे.

३) बहुसांस्कृतिक समाज : भारत ही बहुसांस्कृती व बहुविश्वासाची भूमी आहे, म्हणूनच तेथे वैज्ञानिक दृष्टिकोन, तार्किकता, रणशिलता, सर्वसमावेशकता, वस्तुनिष्ठता, संयम व कट्टरता वाद, हिंसा, दहशतवाद इ. पासून अलगपणा आणि तसेच एखाद्याचे पूर्वग्रह, पक्षपात, नकारात्मक कठोर विचार, वांशिक केंद्रवाद इ. बद्दलची जाण या मुल्यांची गरज आहे. अशाप्रकारे मुल्य शिक्षण हे बहलतावाद, विविधतेत एकता आणि बहुसांस्कृतिक विचारांचा स्विकार या गोष्टींना चालना देते.

४) वर्गाबाहेरील मूल्यशिक्षण : मूल्यशिक्षणाने फक्त वर्गाच्या चार भिंतीतच कौशल्ये, दृष्टिकोन व क्षमतांना प्रोत्साहन देऊ नये. तर त्याने समाज संबंधापर्यंत विस्तारित होऊन समाजात ती मुल्ये रूजवावीत म्हणून या शिक्षणाचा जोर हा फक्त बाजारू गरजा आणि रोजगारांशी बांधिल असलेल्या शैक्षणिक ज्ञान, व्यावहारिक व तांत्रिक कौशल्ये त्यांच्यापुरती असु शकत नाही, तर संपूर्ण शिक्षणावर हवा ज्यात ज्याचा भर समाज व राष्ट्राच्या संपूर्णता आणि आरोग्याला अनुकुल, भावनिक व संबंधिक कौशल्यावर असावा. अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या संपूर्ण विकासाचे ध्येय हे मूल्य शिक्षणामध्ये दडलेले असू शकते.

५) मूल्यशिक्षणांचा व्यवहार : मूल्यशिक्षण म्हणजे हुकुमशाही पद्धतीने मुल्यांची धोकपट्टी करणे व फक्त शाब्दीक सूचनांच्या व्याख्यान पद्धतींची भर घाले नव्हे. तो वापरण्याचा मार्ग म्हणजे मुल्यशिक्षणाचा सार आहे. मूल्यशिक्षण हे विचार करणे, चिंतन करणे, संवेदनशील असणे या विषयी आहे. म्हणून त्याच्या पद्धती म्हणजे संवाद, चर्चा, भूमिका वठवणे, नक्कल परिस्थिती, गोष्टी सांगण्याद्वारे, क्षेत्रभेटी, बहुसंवेदी अनुभव, शैक्षणिक चित्रपट, बहुमाध्यमिक आणि

सामाजिक माध्यमिक या हव्यात. मूल्यव्यवहारांचे वातावरण हे धमकावणारे किंवा निवाडा देणारे नसावे. शिक्षकांचा प्रतिसाद हा उत्साहवर्धक, वस्तुनिष्ठ व नि:पक्षपाती असावा.

६) अभ्यासक्रमात मुल्यशिक्षणाचा समावेश : मुल्यशिक्षण हा एक स्वतंत्र विषय आणि अभ्यासकार्य असावे की त्याचा अभ्यासक्रमात समावेश करावा हा पेचप्रसंग आहे. मूल्यशिक्षणाच्या NCERT पुस्तकात हे प्रकर्षाने मांडले आहे की मुल्यशिक्षणावरील अभ्यासक्रम अंगीकारण्याची गरज नाही. मूल्ये ही अध्यापन अध्ययन प्रक्रियेत स्पष्टपणे बिंबवली जाऊ शकतात किंवा शाळेच्या प्रछन्न अभ्यासक्रमात जसे शिक्षकांची शिकवण्याच्या पद्धतीची निवड, स्वानुभव आणि वर्गसंवादांद्वारे विद्यार्थ्यांना दिले गेलेले संदेश पूर्णपणे रूजवले जाऊ शकतात (हॉलस्टीड १९९६) प्रछन्न छुपा प्रचलीत अभ्यासक्रम तसेच सहअभ्यासक्रम कृतींचा एक भाग म्हणून सुद्धा नियमीत अभ्यासक्रमात योग्य आणि जाणीवपूर्वक तडजोड करुन त्याचा समावेश केला जाऊ शकतो. खोटी विधानसभा, खोटी संसद, खोटी संयुक्त राष्ट्रे, वृद्धाश्रम व अनाथालयांना भेटी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिवस सांस्कृतिक कार्यक्रम समरसतेने साजरे करणे इ. सुद्धा शैक्षणिक कार्यक्रमात मूल्यांचा समावेश करण्याचा मार्ग बनू शकतात.

७) मूल्यशिक्षणाचे मुल्यांकन : मूल्यशिक्षण राबविण्याच्या योजनेची उद्दिष्ट्ये व फलित पूर्व निर्धारित असावयास हवे. म्हणून काही प्रश्न आधीच विचारण्यासारखे म्हणजे मूल्यशिक्षणाचा उद्देश काय? त्या उद्देशाद्वारे काय संपादण्याचा प्रयत्न केला जातो? ही उद्दिष्ट्ये अभ्यासक्रमात कशाप्रकारे समाविष्ट केली जातील? ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी कोणत्या अध्ययन अनुभवांची योजना केली जाईल? म्हणून मूल्यशिक्षणाचे एक आव्हान म्हणजे उद्दिष्टप्राप्तीच्या मुल्यांकनासाठी मूल्यमापनाचे आयोजन करणे.

८) मूल्यशिक्षणाचे मार्ग : गरज व परिस्थितीनुसार एखाद्या व्यक्तीने मुल्यशिक्षणाचे विविध मार्ग ठरवायला पाहिजे.

अ) आकलन विकास मार्ग - हा नैतिक विकासाच पायऱ्यांमधून होणारी चळवळ म्हणून बघितला जातो. यामुळे विद्यार्थ्यांला कार्यकारणभाव सुधारण्यास आणि चांगल्या व वाईट निर्णयात फरक करण्यात मदत होते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मूल्यांच्या अधिक विकासासाठी पेचप्रसंगकृती, छोटी गटचर्चा, निर्णय घेण्याचे कार्य यांचा समावेश होतो. जटील नैतिक परिस्थितीथ भूमिका वठवणे ही बहुस्तरीय मूल्यांचा शोध घेते.

ब) सेवा अध्ययन मार्गात शाळा व समाजातील कृतींचा समावेश होतो. जेथे शाळांनी कृतींची निवड करण्यात सरावाच्या संधी म्हणून अनुभव प्रदान करावयास हवे.

क) सामाजिक कृती आणि सहभाग मार्ग मान्य करतो की व्यक्ती मुल्यांचा प्रत्यक्ष सराव करुन ही मूल्ये सर्वात चांगल्या परीने शिकतात. सामाजिक कृती आणि सहभाग प्रकल्पाची बरीच उदाहरणे आहेत जसे EFS (शाश्वततेसाठी शिक्षण) "सर्कल्स ऑफ डेमोक्रसी" (गुडमॅन १९९४), मानवाधिकार शिक्षण, सामाजिक न्याय इत्यादी.

ड) वैशिष्ट्य मार्ग : जो इतरांपेक्षा जास्त महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या मुल्यांशी संबंधीत आहे आणि ज्यात प्रामाणिकपणा, इमानदारी आणि करूणा यासारख्या गुणांच्या शिकवणीचा समावेश होतो.

मुल्य स्पष्टीकरण विद्यार्थ्यांना सामाजिक दृष्ट्या अधिक जाणकारकरते आणि निर्णायक विचारसरणीचा बनवते तसेच ती विद्यार्थ्यांना प्रत्येकाची मूल्ये आणि विश्वास समजण्यास व स्विकरण्यास मदत करते. अशाप्रकारे या कल्पनेवर जोर देते की मूल्ये जोपासायची असतात शिकवायची नसतात. मूल्ये रुजविण्यासाठी भूमिका प्रतिकृती, वर्गात वा वर्गाबाहेर मूल्यांचा सराव शिक्षणात विविध कार्यक्रमात मूल्यांचा समावेश त्यांची गरज असते.

आपली प्रगती तपासा :

१) मूल्यशिक्षणाचे महत्त्व विषद करा.

२) मूल्यशिक्षणातील मुद्दे (समस्या) अभ्यासा.

३) 'मूल्य जोपासायची असतात शिकवायची नसतात.' हे वाक्य मूल्य शिक्षणाच्या व्यवहाराच्या आव्हानांच्या संदर्भात स्पष्ट करा.

४) प्रछन्न अभ्यासक्रम (दडलेला) हा मूल्य शिक्षणाचे साधन कसे बनू शकतो हे स्पष्ट करा.

१. मानवाधिकार शिक्षण आणि बहुसांस्कृतिक शिक्षणातील संबंध स्पष्ट करा.

२. आजच्या काळात शाळा व कॉलेजांमध्ये मानवाधिकार शिक्षण शिकवण्याची अत्यंत गरज आहे हे विधान स्पष्ट करा.

३. योग्य पर्याय निवडा.

अ) मानवाधिकार शिक्षण हे कशाविषयी शिकविते ?

१) मानव अधिकारांविषयी आणि मानवधिकारांसाठी

२) स्वत:विषयी

३) सामाजिक-चळवळीविषयी

ब) बहुसांस्कृतिक शिक्षण हा पुढीलपैकी कोणत्या गोष्टींतील समतोल आहे ?

१) मूल्ये व मानवाधिकार

२) सांस्कृतिक एकिकरण आणि सांस्कृतिक ओळख गमावणे

३) सबळीकरण जोर कशावर आहे ?

क) मूल्यशिक्षणाचा जोर कशावर आहे ?

१) सांस्कृतिक सांमजस्य

२) सामाजिक निकषांची अधिनता

३) मूल्याच्या हेतूची निर्णायक विचारसरणी

❖❖❖❖

८

शिक्षणातील नविन कल (प्रथा)

घटक रचना :

८.० उद्दिष्ट्ये

८.१ परिचय

८.२ मुक्त शिक्षण मानवी अधिकार शिक्षण

- ८.२.१ मुक्त शिक्षण पद्धतीची अत्यावश्यक वैशिष्ट्ये
- ८.२.२ मुक्त शिक्षणाची गरज व महत्त्व
- ८.२.३ मुक्त शिक्षण व दूरशिक्षण पद्धतीची संकल्पना
- ८.२.४ मुक्त शिक्षणाचे फायदे

८.३ ऑनलाईन शिक्षण

- ८.३.१ परिचय
- ८.३.२ ऑनलाईन शिक्षणाची वैशिष्ट्ये
- ८.३.३ ऑनलाईन शिक्षणाच्या रिती

८.४ माहिती व संपर्क तंत्रज्ञान (ICT)

- ८.४.१ परिचय
- ८.४.२ ICT पद्धतीचे घटक
- ८.४.३ शिक्षणात माहिती व संपर्क तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये
- ८.४.४ शिक्षणात ICT ची गरज
- ८.४.५ शिक्षणात ICT चे महत्व

८.५ मोठ्या प्रमाणावरील मुक्त ऑनलाईन अभ्यासक्रम (MOOC)

- ८.५.१ MOOC चा संक्षिप्त इतिहास
- ८.५.२ MOOC चे प्रकार
- ८.५.३ MOOC चे फायदे व तोटे

८.६ सारांश

८.७ अभ्यास

८.० उद्दिष्ट्ये

या विभागाचा अभ्यास केल्यावर तुम्हाला खालील गोष्टी शक्य होतील.

- शिक्षणातील नविन रिती समजणे.
- मुक्त शिक्षणाची संकल्पना व अर्थ स्पष्ट करणे.
- मुक्त शिक्षणाची वैशिष्ट्ये, गरज आणि फायदे स्पष्ट करणे.
- ऑनलाईन शिक्षणाची संकल्पना व अर्थ स्पष्ट करणे.
- ऑनलाईन शिक्षणाचे फायदे व तोटे लिहिणे.
- समकालीन आणि असमकालीन शिक्षणातील फरक स्पष्ट करणे.
- माहिती व संपर्क तंत्रज्ञानाच्या संकल्पनेचे वर्णन करणे.
- शिक्षणात ICT ची गरज व महत्त्वाचे वर्णन करणे.

८.१ परिचय

मागील दोन दशकात शिक्षण क्षेत्राने खूपच कठोर बदल पाहिले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेची बदलती परिस्थिती आणि माहिती व प्रसारण तंत्रज्ञानातील प्रगतीची परिणती शिक्षणात खूप नवीन रिती सुरु होण्यास झाली. आधुनिक शिक्षण हे सर्व नाविन्य, सुलभता, आणि योग्यतेविषयी आहे. शिशुविहारपासून विद्यापिठापर्यंत विद्यार्थ्यांना सुसंवादी व व्यवहार्य साधनांद्वारे शिकण्यास प्रोत्साहित केले जाते. उच्च शिक्षण हे आज कधी नव्हे एवढे व्यवसायाकडे काम असलेले आहे. वेळ व काळ युगाचे अडथळे सुद्धा दूर सारले गेले आहे आणि भौगोलिक सिमांचा काहीच अडथळा येत नाही. या क्रांतीकारी रितींनी त्या लोकांना फायदा आहे ज्यांना त्याच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक वाढीसाठी व्यावहारिक ज्ञान हवे असते. तिथे आपण शिक्षणातील काही सर्वात लोकप्रिय रितींवर प्रकाशझोत टाकणार आहोत ज्या तुम्हाला आज जगाला हवा असलेल्या नाविण्यपूर्ण नायक बनण्यास मदत करते. या विभागात आपण शिक्षणाच्या त्या काही प्रमुख रितींवर लक्ष केंद्रित करु या.

८.२ मुक्त शिक्षण - मानवी अधिकार शिक्षण

मागील विभागात तुम्ही शिक्षणातील समस्यांविषयी अभ्यास केला या विभागात आपण शिक्षणातील वेगवेगळ्या रितींविषयी चर्चा करु या. आजघडीला शिक्षणात तीन प्रमुख रिती आहेत त्या म्हणजे मुक्त शिक्षण, ऑनलाईन शिक्षण आणि शिक्षणातील माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचा वापर. सुरुवातीला आपण मुक्त शिक्षणाविषयी बघू.

मुक्त शिक्षण ही शिक्षणातील नाविन्यपूर्ण चळवळ आहे जी १९७० मध्ये उदयास आली. आणि सराव व अभ्यासाच्या क्षेत्रात विकसित झाली. ही संज्ञा सामान्यपणे त्या कृतींशी संबंधित आहे. ज्या एक तर औपचारिक शिक्षण पद्धतीतील अध्ययन संधींना उत्तेजन देतात किंवा

औपचारिक शिक्षण पद्धतीच्या पलिकडील अध्ययन संधींना विस्तारित करतात. कोलिन्स डिक्शनरी नुसार मुक्त शिक्षण म्हणजे एक लवचिक अंशकालीन तत्वावरील पुढील शिक्षणाची पद्धती होय.

केंब्रीज डिक्शनरीत मुक्त शिक्षणाची व्याख्या अभ्यासाचा एक मार्ग जो लोकांना कोठेही आणि जेव्हा त्यांना वाटेल तेव्हा शिकण्यास आणि लिखित सामग्री मेल किंवा इ मेल द्वारे स्विकारण्यास किंवा पाठवण्यास परवानगी देतो, अशी करतो.

आपण मुक्त विद्यापीठाची व्याख्या शिक्षणाची एक पद्धती जी पारंपारिक रिती ज्या मुलतः मर्यादा आणणाऱ्या असतात त्यांच्या द्वारे कार्यान्वित नाही, अशी करु शकतो. पारंपारिक मर्यादा जसे, अभ्यासक्रमाला लागणाऱ्या कालावधी वरील मर्यादा, एका वर्षात घेतल्या किंवा दिल्या जाणाऱ्या परिक्षांच्या संख्येवरील मर्यादा एखाद्या विशिष्ट पदवीसाठी विषय मिश्रणावरील मर्यादा उपदेशात्मक संपर्क आणि उपदेशात्मक कार्य यांच्या प्रकारावरील मर्यादा इत्यादी. जितक्या जास्त मर्यादा दुर्लक्षित सोडल्या जातील तितके त्या प्रकारच्या शिक्षणाच्या मुक्ततेचे प्रमाण अधिक. आपण हा मुद्दा स्पष्ट करुन घेऊ या कि दुरशिक्षण संस्था या आपण वर्णन केल्या संदर्भाप्रमाणे मुक्त असू किंवा नसू शकतात किंवा फक्त काही प्रमाणात मुक्त असू शकतात. आणि त्याचप्रकारे एक पारंपारिक कॉलेज / विद्यापीठ सुद्धा एका मान्यताप्राप्त पदवीसाठी मुक्त बनू शकते.

काही मुक्त शिक्षण संस्था पुढे दिल्या आहेत.

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) नाशिक
- महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा
- मुंबई विद्यापीठ (IDOL) मुंबई
- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त दुरस्थ शिक्षण विद्यापीठ (IGNOU) दिल्ली
- मुक्त विद्यापीठ (UK)

८.२.१ मुक्त शिक्षण पद्धतीची अत्यावश्यक वैशिष्ट्ये :

१. या पद्धतीने विद्यार्थ्याला सुरुवातीला ध्येय निवडणे, त्याचा अर्थ लावणे आणि विश्लेषण करणे यासाठी आणि सूचना कार्यक्रमासह संपूर्ण अभ्यासक्रमात विद्यार्थ्याच्या संपर्क ठेवून त्याला मार्गदर्शन करायलाच हवे.

२. या पद्धतीने अध्ययन उद्दिष्ट्ये अशाप्रकारे तयार करायलाच हवी की ते मुल्यमापनासह सूचनात्मक आराखड्यात निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत पाया म्हणून कार्य करतील आणि अशाप्रकारे की ते विद्यार्थ्याला पूर्णपणे माहित असतील त्या विद्यार्थ्याकडून स्विकारले जातील किंवा विद्यार्थ्याकडून रूपांतरित केले जाऊ शकतील.

३. या पद्धतीने विद्यार्थ्याचा सहभाग हा पारंपारिक शैक्षणिक प्रवेश गरजा लादल्याशिवाय व एक अनन्य बक्षिस म्हणून एखादी शैक्षणिक पदवी किंवा इतर प्रमाणपत्राचा पाठपुरावा केल्याशिवाय सुलभ करायला हवा.

४. या पद्धतीची किंमत ही मूलांच्या संख्येवर प्रत्यक्षपणे व कठोरपणे अवलंबून नसावा. एक कार्यकारी तत्व म्हणून, एक निर्णायक किमान संदर्भात कमी होत जायला हवी.

५. विविध प्रकारच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक लवचिकता प्रदान करण्यासाठी या पद्धतीने मध्यस्थी अध्ययन अनुभवासाठी पर्याय म्हणून ध्वनी, दुरदर्शन, चित्रपट आणि छपाई यांची अंमलबजावणी कार्यात्मकरित्या शक्य करायलाच हवी.

६. या पद्धतीने विशिष्ट अध्ययन उद्दिष्ट्ये किती प्रमाणात साध्य झाली त्याचे विश्लेषणासाठी तपासणी व मुल्यमापन तत्वे वापरायलाच हवी. दुसऱ्या शब्दात म्हणजे ही पद्धती कार्यक्षमतेवर आधारित असायला हवी.

७. या पद्धतीला सूचना देणारे कर्मचारी आणि शिकणारा यांच्यामधील अंतर सामावून घेणे शक्य व्हायलाच हवे आणि शिकण्यातील स्वातंत्र्याच्या विकासात एक सकारात्मक घटक म्हणून अंतराला योजायला हवे.

८. या पद्धतीने शिकणारा आणि शिकण्यासाठीचे वातावरण म्हणून त्याचा परिसर यांचा स्विकार करायलाच हवा आणि ते वातावरण समृद्ध करण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे.

९. या पद्धतीने जमात व स्थानिक स्त्रोतांचे सक्रीय सहकार्य मिळवायला व टिकवायलाच हवे. जे अध्ययन वातावरण दैनंदिन जीवनाचा एक भाग बनण्यात आणि 'शिकणाऱ्या समाजाची' कल्पना वाढवण्यात मदतगार ठरु शकतात.

८.२.२ मुक्त शिक्षणाची गरज व महत्त्व :

मुक्त शिक्षण हे सर्व वयाच्या अधिकाअधिक लोकांना औपचारिक आणि अनौपचारिक कार्यक्रमात नावनोंदणी करण्याची संधी देते मग ते लोक कुठेही राहो त्यांचे वय, त्यांचा आधीचा अनुभव शालेय शिक्षण किंवा सामाजिक आर्थिक परिस्थिती विचारात घेतली जात नाही.

- ❖ ही पद्धती घरात, लायब्ररी, नोकरीवर असताना समाजात तसेच शाळांमधील शिकण्याचे मुक्त मार्ग प्रदान करते. दुसऱ्या शब्दात म्हणजे अध्ययन वातावरण हे विस्तृत किंवा मुक्त स्वरूपात उपलब्ध होते.
- ❖ मुक्त शिक्षण हे ठिकाण, आधीच्या शिकण्यातील जमापूंजी, परिक्षेत कमावलेले गुण, जीवन व कार्य अनुभवांची ओळख या पुरते मर्यादित नाही.
- ❖ शिकण्यासाठी बहुविध मुक्त मार्गांचा वापर जसे रेडियो, टि.व्ही. टपला किंवा इतर माध्यम या अधिक सोयिस्कर बनवतात.
- ❖ मुक्त शिक्षण हे वेगवेगळ्या लोकांच्या जीवन व शिकण्याच्या शैलीशी संबंधीत मुक्त अभ्यासक्रम प्रदान करते जो त्यांना त्यांच्या स्वत:च्या शिकण्याशी संबंधीत अभ्यासक्रम विकास व निर्णय घेण्याची क्षमता यात मदत करते.
- ❖ जे लोक कमवणे व शिकणे अशा दोन्ही गोष्टी करतात अशा अंशकालीन शिकण्यांच्या मुक्त सहभागाला ते उत्तेजन देते.
- ❖ मुक्त शिक्षण हे नियमित व मुक्त शाळांमधील मुक्त मान्यता मिळवते.
- ❖ ते कार्यक्रम धोरण, कार्यक्रम विकास, कार्यक्रम पुरवठा, कार्यक्रम प्रवेश आणि कार्यक्रम मुल्यमापन यामध्ये नियमित व मुक्त शाळा यामधील, सार्वजनिक व खाजगी शाळांमधील ग्रंथालयामधील उद्योग व समाज संसाधनाच्या व्यवसायात मुक्त सहकार्य संसाधन आणि कर्मचारी सहभाग पुरविते.

८.२.३ मुक्त शिक्षण व दूरशिक्षण पद्धतीची संकल्पना :

हे शिक्षणासाठी मुक्त प्रवेश आणि शिकणाऱ्यांना वेळ व ठिकाणांच्या बंधनाशिवाय प्रशिक्षण देण्यावर आणि व्यक्ती व शिकणाऱ्यांच्या समुहाला लवचिक शिक्षण संधी प्रदान करण्यावर जोर देते व मुक्त व दुर शिक्षण (ODL) हे आजच्या काळातील अतिषय जलद वेगाने वाढणारे शिक्षणाचे एक क्षेत्र आहे आणि त्याचा सर्व शिक्षण देण्याच्या पद्धतीवर पुरेसा प्रभाव पडलेला आहे. नविन पद्धती ही अतिशय वेगाने वाढत आहे. कारण इंटरनेट आधारित माहिती तंत्रज्ञान आणि विशेषतः वर्ल्ड वाईड वेब चा विकास. जेथे शिकणारा आणि शिक्षक हे वर्गखोलीत नसतील आणि संपूर्ण शिक्षण पद्धती ही लवचिक बनवतील या कल्पनेतून ODL ची संकल्पना साकारण्यात आली.

मुक्त शिक्षण व दुरशिक्षण हे जे नियमितपणे शिक्षण घेऊ शकत नाही त्यांना शिक्षणाची संधी प्रदान करण्याचे सारखेच कार्य करत असली तरी त्यांच्यामध्ये थोडा फरक आहे. मुक्त शिक्षण हे कुठल्याही हजेरीविना परिक्षेला बसायला परवानगी देते तर दूर शिक्षणाच्या बाबतीत काही वर्गांना हजेरी लावणे गरजेचे असते. (PCP)

मुक्त शिक्षण हे शिकणाऱ्यांना पुढील बाबींविषयी पर्याय देते.

- माध्यम मग ते छपाई, ऑनलाइन दुरदर्शन किंवा व्हिडियो.
- अभ्यासाचे ठिकाण मग ते घरी कामाच्या ठिकाणी किंवा आवारात.
- अभ्यासाचा वेग मग तो सुक्ष्मवेगाने असो किंवा अप्रबंधीत
- आधारभूत तंत्र मग ते मागणीनुसार शिक्षक, श्राव्या परिषद किंवा संगणक साहाय्यक शिक्षण आणि प्रवेश आणि निर्गमन वेळी

मुक्त मार्ग

मुक्त मार्ग ही संज्ञा पुढील गोष्टींचा अभाव दर्शवते.

- औपचारिक प्रवेश गरजा
- पूर्व अट ओळख पत्रे
- प्रवेश परिक्षा

८.२.४ मुक्त शिक्षणाचे फायदे

१) भौतिक अंतरावर मात करणे. मुक्त व दूर शिक्षण हे दूर अंतरावरील शिकणारे यांना कॉलेज आवारात हजर राहणे शक्य नसते किंवा जे इच्छुक नसतात त्यांच्यासाठी भौतिक अंतराच्या समस्यांवर मात करु शकते तसेच शिकणारे व शिक्षक हे भौतिक दृष्ट्या वेगळ्या क्षेत्रात असतात जसे शहरी भागातील शिक्षक हे ग्रामीण भागातील शिकणाऱ्यांना सूचना देतात.

२) मुक्त व दूरशिक्षण हे वेळ आणि नियोजन समस्येचे समाधान करु शकते असे विद्यार्थी किंवा गट जे वर्गात वारंवार हजर राहण्यास असमर्थ किंवा नाखूष असतात किंवा काही वेळेस शिकणारा हा पुर्णवेळ किंवा अंशवेळ कामात गुंतलेला असतो किंवा कौटुंबिक व सामाजिक बांधिलकीत अडकलेला असतो व्यावेळेस मुक्त व दुरशिक्षण हे त्यांच्यासाठी वेळ व नियोजनाची समस्या सोडवते.

३) उपलब्ध स्थळांची मर्यादित संस्था वाढविते. मुक्त व दूरशिक्षण हे कँपस् आधारित संस्था ज्या खूप कमी आहेत त्यांच्यासाठी उपलब्ध स्थळाची मर्यादित संस्था विस्तारित करु शकते.

४) मुक्त व दूरशिक्षण हे कमी शिक्षक उपलब्ध असण्याचा पुढील बाबतीत सर्वात चांगला उपयोग करु शकते.

- मागणीनुसार प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव असताना
- शिक्षक हे भौगोलिक दृष्ट्या एकाच ठिकाणी एकत्रित आले असताना
- विशिष्ट कौशल्य असलेल्या शिक्षकांची कमतरता असताना

५) स्त्रियांच्या शिक्षणाच्या संधी विस्तृत करते. हे स्त्रियांना त्यांचे नियोजनात व्यत्यय आणल्याविना विविध अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यात संधी उपलब्ध करुन देते.

आपली प्रगती तपासा :

१) मुक्त शिक्षणाचे फायदे लिहा.

२) मुक्त व दूर शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा.

८.३ ऑनलाईन शिक्षण

८.३.१ परिचय :

प्रिय विद्यार्थ्यानो मागील मुद्यात तुम्ही मुक्त शिक्षणाविषयी अभ्यास केला आता आपण ऑनलाइन शिक्षणाविषयी अभ्यास करु. मुक्त शिक्षण हे ऑनलाइन माध्यमाद्वारे घेतले जाऊ शकते. ऑनलाइन शिक्षण, इ लर्निंग हे नेटवर्कद्वारे दूर शिक्षणाच्या वितरणाशी किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे डिजीटल सामग्रीच्या स्वरूपात शैक्षणिक कार्यक्रमाच्या वितरणाशी संबंधित आहे. ते तंत्रसाहाय्यभूत ज्ञान व कौशल्याच्या रचनेशी संबंधीत आहेत. ऑनलाइन शिक्षण हे सामग्री व सूचनांसाठी कोणत्याही वेळी, कोणत्याही ठिकाणापासूनचे अधिक लवचिक मार्ग उपलब्ध करण्याच्या त्याच्या क्षमतेमुळे लोकप्रिय बनलेले आहे. आता आपण ऑनलाइन शिक्षण कार्यक्रमासाठी प्रेरणादायी घटक कोणते ते बघु या.

- हे अशा शिकणारांसाठी अध्ययन अनुभवांची उपलब्धता वाढवते जे पारंपारिक प्रत्यक्ष शिकवण्याला हजर राहू शकत नाही किंवा जे हजर न राहण्याचा मार्ग निवडतात.
- शिकवण्याची सामग्री एकत्र करणे व तिचा प्रसार करण्याचा खर्च अधिक कार्यक्षमतेने होतो.
- जेथे पात्र शिक्षक उपलब्ध नसतात अशा ठिकाणी पात्र शिक्षक उपलब्ध करुन देणे.

८.३.२ ऑनलाईन शिक्षणाची वैशिष्ट्ये :

- हे डिजीटल सामग्रीचे वितरण आहे. एक बटण दाबण्याने कोणतीही सामग्री सहज उपलब्ध होते.
- संगणक किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर अत्यावश्यक आहे.
- ते शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी केंद्रित वातावरण निर्माण करते.
- ते दूरशिक्षण स्वरुपावर प्रकाश टाकते.
- ते नेटवर्क ने जोडलेले आहे. तुम्ही त्याच्याशी केव्हाही आणि कुठेही जोडले जाऊ शकतात.
- दूर शिक्षणाच्या तुलनेत याचा प्रतिसाद काळ अतिशय जलद आहे.
- अभ्यासक्रम सामग्रीचे सहज व जलद अद्ययावतीकरण.
- अभ्यासक्रम सामग्री ही अनुकुलीत असते.
- अभ्यासक्रम तज्ञ व इतर विद्यार्थी यांमधील सुसंवाद सहज होऊ शकतो.

८.३.३ ऑनलाईन शिक्षणाच्या रिती :

ऑनलाइन शिक्षणाच्या दोन रिती आहेत. त्या म्हणजे समकालीन शिक्षण व असमकालीन शिक्षण.

समकालीन शिक्षण :

अर्थ :

समकालीन इ लर्निंग मध्ये तत्काळ शिक्षण रिती जसे चाट आणि व्हिडियो कॉन्फरन्सिंग इ. द्वारे ऑनलाइन अभ्यासाचा समावेश होतो. या प्रकारचे शिक्षण साधन हे वास्तविक आहे. हे आभासी वर्गखोली प्रमाणे आहे जे विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारणे आणि शिक्षकांनी त्या प्रश्नाला चटकन उत्तर देण्याला परवानगी देते. जे तत्काळ मेसेज द्वारे शक्य होते म्हणून याला समकालीन म्हटलेले आहे. दुसऱ्या शब्दात आपण म्हणू शकतो की इंटरनेटला जोडल्या गेलेल्या संगणकाच्या वापराने होणारी अध्ययन प्रक्रिया. एक व्याख्यान हे प्रत्यक्ष वातावरणातील समकालीन शिक्षणाचे एक उदाहरण आहे. कारण विद्यार्थी व शिक्षक हे एकाच वेळी हजर असतात. समकालीन शिक्षण घटनेचे दुसरे उदाहरण म्हणजे विद्यार्थी एखाद्या वर्गाचा लाईव्ह वेब स्ट्रीम प्रत्यक्ष न्याहाळतो आणि त्याच वेळेस चर्चेत भाग घेतो. समकालीन शिक्षण हे वेब कॉन्फरन्सिंग साहित्याद्वारे विद्यार्थी व शिक्षक एका वर्गाग सहभागी होणे सुकर करु शकतात. हे समकालीन अनुभव शिक्षक-विद्यार्थी आणि विद्यार्थी. विद्यार्थी संबंध विकसित करण्यास व मजबूत करण्यास आरेखीत केले जाऊ शकतात जे दूर शिक्षण कार्यक्रमातील एक आव्हान बनू शकते.

समकालीन शिक्षणाची वैशिष्ट्ये :

- दोन किंवा अधिक लोकांमधील आभासी संपर्क
- दूर शिक्षण प्रदान करते
- वास्तविक किंवा समकालीन शिक्षण शक्य होते
- तात्काळ अभिप्राय हे नियोजीत शिक्षण आहे.

असमकालीन शिक्षण :

अर्थ :

असमकालीन शिक्षण हे ऑनलाइन किंवा ऑफलाइन पार पाडले जाऊ शकते. असमकालीन शिक्षण ही विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धत आहे. जी लोकांच्या एक जाळ्यातील वेळ आणि स्थळाच्या परिघीच्या बाहेर माहिती देवाण घेवाण सुरळीत करण्यासाठी ऑनलाइन शिक्षण स्त्रोतांचा वापर करते. असमकालीन शिक्षण हे रचनात्मक सिद्धांतावर आधारित आहे. जो विद्यार्थी केंद्रित असून व्यक्ती व्यक्तींमधील सुसंवादाच्या महत्त्वावर जोर देते. हा दृष्टिकोन शिकण्याला प्रोत्साहन देण्यासाठी असमकालीन सुसंवादासह स्वयंअभ्यासाला एकत्रित करतो आणि तो पारंपारिक शैक्षणिक आवारातील शिक्षण, दूरशिक्षण आणि निरंतर शिक्षण यातील अध्ययन सुलभ होण्यासाठी वापरले जाऊ शकते. अशाप्रकारे शिकणारे आणि इलेक्ट्रॉनिक नेटवर्क ज्या मध्ये ते संवाद साधतात अशा एकत्रीत जाळ्याला असमकालीन शिक्षण जाणे म्हणतात.

असमकालीन शिक्षणाला आधार देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ऑनलाइन शिक्षण स्त्रोतांमध्ये इमेल, इलेक्ट्रॉनिक मेलींग लिस्ट, थ्रेडेड कान्फरसिंग सिस्टिम, ऑनलाइन चर्चा मंडळे. बिकिझ आणि ब्लॉग्झ यांचा समावेश होतो. अभ्यासक्रम व्यवस्थापन पद्धती आणि कॅम्पस् क्रुझर एलएमएस, डिझायर टू लर्न, ब्लॅकबोर्ड, वेब टि.व्ही., मूडल इ. आहे. वापरकर्त्यांना चर्चा आयोजित करणे, संदेश पाठवणे, संदेशाला प्रतिउत्तर देणे आणि मल्टीमिडियाला अपलोड करणे याद्वारे ऑनलाइन सुसंवादाला पाठिंबा देण्यासाठी त्याला विकसित केले गेले आहे. समकालीन शिक्षणाचा एक फायदा म्हणजे तुम्ही स्वयंगतीने जाऊ शकतात. ऑनलाइन संपर्काच्या दोन मार्गांपैकी एक प्रकार जो सोयीनुसार प्रतिसाद देण्यासाठी उशिरा घडतो. हे विद्यार्थी केंद्रित अध्यापन अध्ययन आहे ज्यात ऑनलाइन शिक्षण स्त्रोतांचा लोकांच्या जाळ्यात वेळ व वेळेच्या मर्यादेत न राहता माहिती देवाणघेवाणीसाठी उपयोग केला जातो.

वैशिष्ट्ये :

- तत्काळ, मागणीनुसार
- पूर्वनिर्मित
- नेमक्या वेळेत
- व्यक्तीगत किंवा निकृष्ठ सहयोगी
- स्वतंत्र अध्ययन

समकालीन शिक्षण आणि असमकालीन शिक्षणामधील एक महत्त्वपूर्ण फरक म्हणजे तात्काळ संदेशन आणि लगेच अभिप्राय, समकालीन शिक्षणासह तुम्हाला तुमचे सहकारी विद्यार्थी

किंवा शिक्षकांकडून तात्काळ संदेश आणि तात्काळ अभिप्राय मिळू शकतो. असमकालीन शिक्षणात त्याचा समावेश होत नाही. जर तुम्हाला प्रश्नांचे उत्तर देण्यास त्रास असेल आणि तुम्ही त्यांना प्रत्यक्ष विचारू शकत नसाल तसेच समकालीन शिक्षणासह तुम्ही स्वत:च्या गतीने चालतात. हे समकालीन शिक्षणासोबत शक्य नाही. उदा. ऑनलाइन व्याख्यान पाहणे आणि त्या व्याख्याना दरम्यान शिक्षक काही प्रश्न विचारात आहे.

समकालीन शिक्षण :

तुम्हाला विशिष्ट वेळी व्याख्यान बघावे लागेल. तुम्ही उत्तरांविषयी विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधू शकतात. शिक्षक सुद्धा तुमचे उत्तर तत्काळ वाचू शकतात आणि व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधू शकतात. व्याख्यान ऑनलाइन दिले जावे लागते.

असमकालीन शिक्षण :

तुम्ही तुमच्या स्वत:च्या गतीने व्याख्यान पाहू शकतात. तुम्ही तुमच्या वर्गमित्रांसोबत तुमच्या उत्तरांविषयी लगेचच चर्चा करु शकत नाही. व्याख्या ऑफलाइन दिले जाऊ शकते.

ऑनलाइन शिक्षणाचे फायदे :

१) ऑनलाईन शिक्षण हे खूप परिणामकारक आहे कारण विद्यार्थी त्यांचे कार्य चटकन व सोयिस्कररित्या संपवू शकतात. एक व्यक्ती वेगवेगळ्या अभ्यासक्रमाना एकाच वेळेच हजर राहू शकतो.

२) आर्थिक दृष्ट्या फायदेशीर (परवडणारे) - विद्यार्थी इंटरनेटला जोडलेल्या कुठल्याही साधनाने शिकू शकतो आणि ती म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थी वर्गात ये जा करत नसल्याने त्यांचे पैसे वाचतात.

३) वेळेची बचत - शिक्षक किंवा प्रशिक्षकाला तेच व्याख्यान वेगवेगळ्या गटाच्या विद्यार्थ्यांना पुन्हा पुन्हा द्यावे लागत नाही. त्यांना तयारी एकदाच करावी लागते आणि त्यानंतर वेगवेगळ्या गटांसोबत कोणत्याही वेळी देऊ शकतात. विद्यार्थ्यांना अभ्यासाची वेळ निवडण्याचे स्वातंत्र्य असते.

४) स्वयंगतीने शिक्षण - विद्यार्थी किंवा प्रशिक्षणार्थी केव्हाही व कोठेही त्यांच्या स्वत:च्या साधनांनी अभ्यासक्रम घेऊ शकतात म्हणून नियमित वर्गांसाठी ज्यांना वेळ नसतो ते त्यांच्या सवडीनुसार ऑनलाइन शिक्षण घेऊ शकतात. विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारी व स्वयंशिस्त वाढते.

५) माहिती तंत्रज्ञान अद्ययावत सामग्रीसह असते - इंटरनेट हे खरोखरच जलद गतीने बदलणारे जग आणि ज्ञान त्यांच्या सोबत चालते.

तोटे :

- ऑनलाइन अभ्यासक्रम हा चर्चेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसोबत कार्य करु शकत नाही. तसेच ज्या विद्याशाखेत कृतीसरावांचा समावेश असतो त्यावेळी ऑनलाइन शिक्षण कठिण होऊ शकतो.
- एका गटात जे मानवी संबंध निर्माण होतात ते ऑनलाईन शिक्षणाद्वारे निर्माण होऊ शकत नाही. ऑनलाईन शिक्षण मानवी सुसंवाद प्रदान करु शकत नाही.

- एकाकीपणा - विद्यार्थ्यांना क्लासमध्ये प्रत्यक्ष हजर राहायचे नसल्याने त्यांचा इतर विद्यार्थ्यांसोबत संपर्क होणे कठिण असते किंवा जवळजवळ अशक्य असते त्यामुळे एकाकीपणा निर्माण होतो.
- वाङ्म चौर्य - तुमच्या विद्यार्थी संगणक वापरत आहे त्याच्यावर पूर्णवेळ नजर ठेवली जाऊ शकत नाही हे लक्षात घेता ते निबंध किंवा इतर अभ्यासाची चोरी करु शकतात.

फसवणूक :

वरील प्रमाणेच विद्यार्थी ऑनलाईन परिक्षेत सुद्धा लबाडी करु शकतो. हे प्रत्येकाला सोयीस्कर होते असे नाही. जर तुम्ही तुमचे घर, काम आणि अभ्यास यामधील वेळेचे व्यवस्थापन करु शकत नसाल तर ऑनलाइन शिक्षण तोट्याचे ठरु शकते.

ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेसाठी संगणकाची गरज असते त्यामुळे तुमच्या शरीराच्या ठेवणीवर परिणाम होऊ शकतो आणि डोळ्यांवर ताण येऊ शकतो.

आपली प्रगती तपासा :

१) समकालीन आणि असमकालीन शिक्षणातील फरक सांगा.

_____

_____

_____

_____

८.४ माहिती व संपर्क तंत्रज्ञान (ICT)

८.४.१ परिचय :

याआधी आपण ऑनलाईन शिक्षणाविषयी अभ्यास केला आहे. आता आपण ICT किंवा माहिती व संपर्क तंत्रज्ञानाविषयी अभ्यास करु. ICT हे पायाभूत सुविधा आणि संगणकीय कार्य शक्य करणारे घटक आहे. ICT ची जरी एक वैश्विक व्याख्या नसलि तरी ही संज्ञा सर्व सामान्यपणे मानली गेली आहे की असे सर्व उपकरणे नेटवर्किंग घटक उपयोजने आणि पद्धती ज्यांनी सर्व लोक व संघटना (म्हणजे व्यावसायिक) ना नफा एजन्सी सरकारी आणि अपराधी, उद्योग, डिजीटल जगात संवाद साधण्यासाठी एकत्रित केले आहे. यूनेस्को नुसार " ICT म्हणजे एक वैज्ञानिक तंत्रज्ञानविषयक आणि अभियांत्रिकी शाखा आणि व्यवस्थापन तंत्र आहे जे माहिती आकारणे त्याचे उपयोजन आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बाबींच्या संपर्कात वापरले जाते."

आपल्या समाजातील शैक्षणिक क्षेत्राचा मुख्य भाग शिक्षक आहेत. या डिजीटल युगात ICT चा वर्गातील वापर हा विद्यार्थ्यांना शिकण्याच्या संधी देण्यासाठी आणि २१ व्या शतकातील आवश्यक कौशल्ये वापरण्यासाठी महत्त्वाचा आहे. ICT अध्यापन व अध्ययनात सुधारणा करते आणि ते अध्यापनशास्त्रीय वातावरणाच्या निर्मात्यांची भूमिका पार पाडण्यात शिक्षकांसाठी

महत्त्वाचे आहे. ICT शिक्षकाला त्यांचे अध्यापन आकर्षकरित्या मांडण्यात मदत करते आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यक्रमाच्या कुठल्याही स्तरावर शिकण्यास समर्थ करते.

८.४.२ ICT पद्धतीचे घटक :

ICT ही इटरनेटचे वलय तसेच बिनतारी नेटवर्कद्वारे संचलित मोबाईल या दोघांना व्यापते. यामध्ये पुरातन तंत्रज्ञानाचा सुद्धा समावेश आहे जसे लँडलाईन टेलिफोन, रेडिओ आणि दुरदर्शन प्रसारण - ही सर्वच्या सर्व आजसुद्धा धारदार ICT सामग्री जसे कृत्रिम बुद्धीमत्ता आणि रोबोटिक्स् यांच्यासोबत मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. सर्वसामान्यपणे ICT म्हणजे त्याच्या घटकांच्या यादीपेक्षा अधिक आहे. ICT मध्ये कांम्प्युटर हार्डवेअर, सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन ऑफ टेलिकम्युनिकेशन टेक्नॉलॉजीस् प्रोटेक्शन डिव्हायसेस, लोकल एरिया नेटवर्क (LAN) वाईड एरिया नेटवर्क (WAN) डिजीटल कॅमेराज, कॉम्पॅक्ट डिस्क (CDS) डिजीटल व्हिडीओ डिस्क्स् (DVDS) सेल फोन, सॅटेलाईट आणि फायबर ऑफ्टीक्स्, E-books इ बूक्स / इ जर्नल्स, / इ डाटाबेसेस, कॉम्प्युटर मेडिटेटेड कॉन्फरन्सेस व्हिडियो कॉन्फरंसिंग, टेलीमेडीसीन, व्हर्चुअल रियॉलिटी, टेलिकम्युनिकेशन सॅटेलाईट इ.

आकृती ८.१ ICT चे घटक

८.४.३ शिक्षणात माहिती व संपर्क तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये :

शिक्षणात ICT म्हणजे कोणतेही हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर तंत्रज्ञान जे शैक्षणिक प्रक्रियेत योगदान देते. शिक्षणात ICT म्हणजे कोणतेही माहिती तंत्रज्ञान जे शैक्षणिक हेतूसाठी आवश्यक सांख्यिकी सामग्रीची प्राप्ती, साठवण हाताळणी, व्यवस्थापन, प्रसारण किंवा स्विकारण्यावर जोर देते. उदा. विद्यार्थ्यांची नोंद, त्यांचा प्रवेश, कृतींचे अद्ययावतीकरण.

शिक्षणात ICT म्हणजे असे कोणते तंत्रज्ञान जे अध्ययन अध्यापन प्रक्रियेत माहितीच्या देवाणघेवाणीशी संबंधीत आहे. उदा. टेलिकॉन्फरसिंग, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन इ. चा उपयोग शिक्षणात ICT म्हणजे शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षण प्रक्रियेत समाविष्ठ मानवी हातातील आधारभूत साहित्य आहे.

८.४.४ शिक्षणात ICT ची गरज :

- शिक्षण हे जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे म्हणून कोणत्याही वेळी व कुठेही ICT ची उपलब्धता ही काळाची गरज आहे.

- जग हे लहान झालेले आहे आणि नविन ज्ञान दिवसेंदिवस वाढत आहे आणि म्हणून माहिती मिळण्याची गरज निर्माण झालेली आहे.
- शिक्षणाने विविध विद्यार्थी व शिक्षकांच्या गरजांची पूर्तता करावयास हवी आणि म्हणून या गरजांच्या पूर्ततेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.
- प्रत्येक व्यक्तीजवळ तंत्रज्ञान साक्षरता असावयास हवी आणि म्हणून ICT ही समाजाची गरज आहे.
- आपल्याला निरक्षरता व गरिबीच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रवेश वाढविणे आणि शिक्षणासाठी येणारा खर्च कमी करणे गरजेचे आहे. ICT त्याचे उत्तर आहे.

८.४.५ शिक्षणात ICT चे महत्व :

- हे माहिती आणि विविध माहितीचे स्त्रोत चटकन मिळवून देते
- ते विविध अध्ययन स्त्रोत मिळवून देते
- ते शिक्षण आणि सामग्री मिळण्याच्या प्रक्रियेतील वेळ कमी करते
- ICT द्वारे शिक्षण हे कधीही, कोठेही आणि सहयोगी पद्धतीने होऊ शकते.
- शिक्षणात मल्टीमिडीया (बहुमाध्यम) दृष्टिकोन कार्यक्षमतेने वापरला जाऊ शकतो.
- ऑनलाईन ग्रंथालय, पुस्तक भांडार, मुक्त अभ्यासक्रम, आणि मुक्त शैक्षणिक संसाधने सहजपणे उपलब्ध होतात.
- विविध विषय शिकविणे हे विविध माहिती व संसाधनाच्या वापराने मनोरंजक बनवले जाते.
- ICT द्वारे दूर शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण सर्वांसाठी शक्य आहे.
- विद्यार्थी हा बहुविध संपर्क मार्ग जसे इ मेल चॅट, फोरम, ब्लॉग्झ, इ. वापरू शकतो.
- ICT विशेष गरज असलेल्या मुलांना अधिक चांगले मार्ग उपलब्ध करते.
- पारंपारिक वर्गशिक्षण हे इ लर्निंग पद्धतीसह एकत्रित करुन मिश्रीत शिक्षण मिळू शकते.
- प्रशासकीय व मूल्यमापन सामग्रीवर प्रक्रिया करणे.
- व्यावसायिक वृद्धीसाठी शिक्षकांमध्ये कल्पनांची देवाणघेवाण करणे.
- शैक्षणिक प्रक्रियेला चालना देण्यासाठी इंटरनेट आधारित संशोधन पार पाडणे.

आपली प्रगती तपासा :

१) शिक्षणात ICT ची गरज व महत्व विषद करा.

_____

_____

_____

_____

८.५ मोठ्या प्रमाणावरील मुक्त ऑनलाईन अभ्यासक्रम (MOOC)

MOOCS हे मुक्त प्रवेश असलेले वेब आधारित अभ्यासक्रम आहे जे एकाच वेळेस शेकडो किंवा हजारो विद्यार्थ्यांची नावनोंदणी करतात. MOOCS हे सामग्रीचे वितरण ध्वनिमुद्रित व्हिडिओ, व्याख्याने ऑनलाईन रिडिंग्ज् (वाचन) आणि ऑनलाईन मुल्यमापनाद्वारे सामग्रीचे तसेच विद्यार्थी विद्यार्थी आणि विद्यार्थी शिक्षक सुसंवादाच्या पदव्या वितरीत करते. MOOCS हे जगभरातील विविध स्वरूपाचे पार्श्वपिटीका, अनुभव आणि ठिकाणापासून सारख्याच आवडी असलेल्या विद्यार्थ्यांना सामावू शकते. तसेच बहुतांश MOOCS हे मोफत असतात ज्यामुळे जो कोणी आवड असलेला असेल ते सामावू शकतात. काही MOOCS प्रमाणपत्र देतात ज्यांची व्याप्ती किमान अभ्यासक्रम मानकांच्या प्राप्तीसाठी पूर्णत्वाच्या रोप्या पासून ते प्रॉक्टर्ड परिक्षा पास होण्यासाठीच्या सत्यापीत प्रमाणपत्रा पर्यंत आहे. बहुतांश MOOCS हे कॉलेजची पत विचारात घेत नाहीत.

८.५.१ MOOC चा संक्षिप्त इतिहास :

MOOCS हे पहिल्यांदा २००८ मध्ये जॉर्ज सिमन्स् आणि स्टिफन डॉन्स् यांच्या द्वारा सुरु केले आणि त्याला 'संयोजता व संयोजित ज्ञान २००८' (Connectivism and Connective knowledge 2008) किंवा CCK08 असे म्हटले गेले याची निर्मिती मॅनीटोबा युनिर्व्हिसिटी साठी क्रेडीट कोस म्हणून केली गेली. CCK08 मध्ये २५ विद्यार्थी होते ज्यांनी त्या अभ्यासक्रमासाठी फी भरली आणि जवळपास २२०० शिकणाऱ्यांना तो अभ्यासक्रम मोफत मिळाला.

ने वस्तुतः २०१२ मध्ये गती घेतली तेव्हा प्रोफेसर सिबॅस्टीअन थ्रून आणि क्विटर मार्पिंग या स्टँडफोर्ड विद्यापीठाच्या प्राध्यापंकानी (Introduction to artificial intelligence) (कृत्रीम बुद्धीमत्तेशी ओळख) हा अभ्यासक्रम ऑनलाईन प्रदान केला. या अभ्यासक्रमात १९० देशातील १६,००,००० विद्यार्थी सहभागी होते. या अभ्यासक्रमाच्या यशानंतर थ्रून आणि नार्विग युडासिटी, ऑनलाईन ज्ञान सहभागासाठी व्यावसायिक नमूना सुरु केला. येथे कोर्सेस आणि एडेक्स यासारखे काही इतर MOOCS प्रदानकर्ते सुद्धा आहे.

८.५.२ MOOC चे प्रकार :

१) XMOOCS :

XMOOCS हे पारंपारिक अभ्यासक्रम रचनेवर आधारित आहे आणि प्रस्थापित अध्ययन दृष्टिकोन आणि साहित्याचा वापर करतो. विद्यार्थी हे पूर्वध्वनीमुद्रित व्याख्याने पाहतात, आवश्यक वाचन पूर्ण करतात आणि चर्चेत सहभागी होतात. ज्या गोष्टी उच्च शिक्षण संस्थेच्या अभ्यासक्रम शिक्षक किंवा शिक्षकांच्या चमूद्वारा निर्मित व शुद्ध केलेले असते. XMOOCS हे विशेषतः स्वयंपूर्ण असतात आणि क्वचितच मुख्य सामग्री आणि शिक्षण व्यासपीठाच्या बाहेरील सामग्री वापरतात.

२) CMOOCS :

CMOOCS हे संयोजीत अध्ययन नमुन्यावर आधारित आहे जे सक्रीय अध्ययनाचे स्वरूपा म्हणून सहकार्याला विशेष अधिकार देतात. CMOOCS मधील विद्यार्थी अभ्यासक्रम सामग्री ओळखणे, मूल्यमापन करणे आणि योगदान देणेसाठी एकत्रीतपणे कार्य करतात. यासाठी ते अध्ययन व्यासपीठाचा वापर करुन अभ्यासक्रमात साहित्य (टिवटस्, ब्लॉग पोस्टस्, ब्लॉग्स् विकीझ) इ. टाकतात CMOOCS शिक्षक किंवा शिक्षकांचा चमू हा अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या योगदानाला अंतिम रूप देऊन, एकत्रीकरण करुन व मूल्यमापन करुन अध्ययन प्रक्रिया सुलभ करतो.

इतर असमकालीन ऑनलाईन अभ्यासक्रम दशकांपासून उपलब्ध असून सुद्धा MOOCS हे ऑनलाईन शिक्षणातील अगदी अलीकडील उत्क्रांतीपैकी एक आहे याला कारण म्हणजे असमकालीन स्वरूप, जागतिक पोहोच, कॉलेज क्रेडीटशी संबंध आणि पूर्णपणे ऑनलाईन रचना व वितरण, सध्याचे विद्यार्थी आणि तह ह्यात शिकणारे अशा दोघांसाठी असलेले यांची तत्काळ व सततची लोकप्रियतेमुळे MOOCS हे कित्येक महत्त्वाच्या रितींना खुणावत असल्याचे दिसते जे भावी काळात चालू राहिल.

जसे शैक्षणिक तंत्रज्ञान सूचनात्मक आराखडा आणि ऑनलाईन शिक्षण / सामग्री वितरण व्यासपीठ विकसीत होत राहील. अधिक शिकणारे हे अधिक गरजा आणि उद्देशांसह ऑनलाईन अभ्यासक्रम घेण्याकडे ओढले जातील. एक वाढती मागणी जी त्यापुढे तंत्रज्ञान व वितरणील सुधारणेला चालना देईल यावरुन असे दिसते की भावी ऑनलाईन शिक्षण पर्यायाला वैयक्तिकृत अध्ययन अनुभव जे फक्त सामग्री वितरणावर लक्ष ठेऊन असण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या विविध गरजा (मान्यता, परवडण्याजोगे आणि प्रवेश यासारखे इतर) पूर्ण करू शकतील. फायदा तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्याची गरज असेल.

८.५.३ MOOC चे फायदे व तोटे :

MOOCS चे फायदे -

१) अभ्यासक्रम हे मोफत प्रदान केले जातात.

२) उच्च श्रेणीच्या शाळांमधील प्रोफेसरांद्वारे अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो.

३) संपूर्ण जगभरातील प्रचंड आणि विविध श्रोत्यांसाठी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

४) अभ्यासक्रमाच्या सुरुवातीच्या काळातील गोळा केलेल्या सामग्रीच वापर करुन विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे सहजपणे परिक्षण केले जाऊ शकते.

५) प्राध्यापक व शिकणारे अशा दोघांनाही जगभर प्रदर्शन करायला मिळते. अशाप्रकारे अध्यापनशास्त्र विषयक तंत्र आणि ज्ञानाची देवाणघेवाण सुधारते.

६) मिश्रीत अध्ययन कार्यक्रमात एक साधन म्हणून वापरले जाऊ शकते. जिथे विद्यार्थ्यांना वर्गात दिल्या जाणाऱ्या माहितीपेक्षा अधिक माहिती मिळू शकते.

MOOCS चे तोटे :

१) वैयक्तीकृत अभ्यासक्रम आणि शिक्षकांकडून वैयक्तिक लक्ष पुरवले जाऊ शकत नाही.

२) विद्यार्थ्यांचे गृहपाठ आणि त्यांचा समावेश यांच्या नोंदी ठेवणे कठीण जाते.

३) अपंगत्व असलेले आणि निकृष्ठ इंटरनेट जोडणी असलेले विद्यार्थी MOOCS वापरू शकत नाही.

४) MOOCS प्रदान करताना भाषा अडथळा ठरु शकते.

५) MOOCS हे विद्यापीठात पैसा कमाविण्याचे अभ्यासक्रम म्हणून वापरले जाऊ शकत नाही.

जरी काही उणीवा असल्या तरी MOOCS जवळ आपण शिकत असलेल्या मार्गात पुन्हा संशोधन करण्यासाठीची प्रचंड क्षमता आहे. ते कसे प्रगती करतात आणि काळाच्या ओघात कसे वाढतात हे पाहणे मजेशीर ठरेल.

आपली प्रगती तपासा :

१) MOOCS वापरण्याचे फायदे आणि तोटे कोणते ?

_____

_____

_____

_____

८.६ सारांश

शिक्षण आयोग (१९६४-६६) नुसार या जगात सायन्स आणि तंत्रज्ञानावर आधारलेले शिक्षण हेच लोकांची प्रगती कल्याण आणि सुरक्षिततेची पातळी ठरवते. राष्ट्रबांधणीच्या उदात्त उपक्रमातील आपले यश हे आपल्या शिक्षणाची गुणवत्ता आणि आपल्या शाळा आणि कॉलेजातून उत्तीर्ण होणाऱ्या व्यक्तींची गुणवत्ता यावर अवलंबून असते म्हणून आपल्या शैक्षणिक पद्धतीचे पुनविकरण गरजेचे आहे. सद्य स्थितीतील समाजाच्या गरजांनुसार त्याची पुनर्बांधणी व्हायलाच हवी. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदलांचा शैक्षणिक पद्धतीवर पुरेसा प्रभाव पडत असतो. याचा उद्देश कार्यक्षमतेची पातळी वाढवण्याकरता तंत्रज्ञान परिणामकारकरित्या वापरण्याच्या हेतूस्तव एकमेकांच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लोकांची क्षमता विकसित करणे हा आहे म्हणूनच शैक्षणिक पद्धती बदलायलाच हव्या. आजकाल आपण शिक्षणातील बदलत्या रिती बघू शकतो. आता विद्यार्थ्यांजवळ मुक्त शिक्षण, ऑनलाईन शिक्षण असे पर्याय आहेत. शिक्षणातील अशा प्रकारची सुविधा ही नक्कीच विद्यार्थ्याला व्यत्ययाशिवाय किंवा तडजोडीशिवाय बदलत्या समाजासोबतची गती टिकवून ठेवण्यास मदत करेल.

संगणकाची कार्यक्षमता, अचूकता आणि उत्पादकता लक्षात घेता वेगवेगळे आयोग स्थापले गेले आणि त्यांनी भारतीय संदर्भात त्यांचे अहवाल सादर केले आहेत. नविन शैक्षणिक धोरणाने (१९८६) संगणकीय साक्षरतेवर जोर दिला आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेत सातशे कोटी रुपयांची प्रचंड राशी ही शिक्षणाच्या सर्व स्तरावरील संगणक साक्षरता आणि संगणक कार्यक्रमांच्या विस्ताराला बहाल केली गेली. शालेय शिक्षणावरील राममूर्ती आयोगाने सुद्धा संगणक शिक्षणावर भर दिला आहे.

संगणक हे शिक्षणाच्या सुलभतेसाठी आणि विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्यासाठीचे एक महत्त्वाचे साधन आहे. जगातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीसह नविन अध्यापनशास्त्र वापरणे आणि विद्यार्थी शिकत असलेल्या मार्गांनी कार्यक्षमता विकसित करणे ही तातडीची गरज आहे. वर्गातील अध्यापन परिणामकारक करण्यासाठी आपल्या अध्यापन पद्धतीचे नूतनीकरण गरजेचे आहे. बहुतांश बदल हे 'माहितीच्या क्रांतीमुळे' घडून आलेले आहेत. घडून येणारी बरेचसे रूपांतरण हे माहितीचा जलद प्रवाह आणि त्याच्या साठवणूकीची प्रचंड क्षमता यांच्याशी संबंधीत आहे. सध्याच्या माहितीत विद्यार्थ्यांच्या गरजांची पूर्तता करण्यास ICT ची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

८.७ अभ्यास

१) मुक्त शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करा.

२) शिक्षणातील दूर व मुक्त शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा.

३) मुक्त शिक्षणाचे फायदे लिहा.

४) ऑनलाईन शिक्षणाचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५) शिक्षणाच्या रिती स्पष्ट करा.

६) समकालीन व असमकालीन शिक्षणातील फरक स्पष्ट करा.

७) MOOC ची संकल्पना स्पष्ट करा.

८) शिक्षणात ICT ची गरज व त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

पुढील गोष्टींचा अर्थ लिहा.

१) वाङ्मयचौर्य
२) समकालीन शिक्षण
३) असमकालीन शिक्षण
४) स्वयंगतीने अध्ययन
५) ऑनलाईन शिक्षण
६) मुक्त शिक्षण
७) मुक्त व दूर शिक्षण
८) MOOC

पुढील गोष्टींची उदाहरणे द्या.

१) मुक्त शिक्षण संस्था
२) ऑनलाईन शिक्षण संस्था
३) समकालीन शिक्षणाच्या रिती
४) असमकालीन शिक्षणाच्या रिती
५) शिक्षणात ICT चा वापर

योग्य पर्याय निवडा.

१) अभ्यासाचा एक मार्ग जो लोकांना केव्हाही व कुठेही शिकायला आणि लिखित कार्य मेल किंवा ई-मेल द्वारे स्विकारायला किंवा पाठवायला मोकळीक देते त्याला ———— म्हणतात.

अ) मुक्त शिक्षण ब) दूर शिक्षण क) ICT ड) सहयोगी शिक्षण

२) ———————— च्या साहाय्याने तुम्हाला तुमच्या सहकारी विद्यार्थी किंवा शिक्षकांकडून तात्काळ संदेश आणि तात्काळ अभिप्राय मिळतो.

अ) समकालीन शिक्षण ब) असमकालीन शिक्षण

क) स्वयंगतीने शिक्षण ड) ऑनलाईन शिक्षण

३) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे डिजिटल साहित्याच्या स्वरूपात नेटवर्कद्वारे दूर शिक्षण किंवा शैक्षणिक कार्यक्रमाचे वितरण यालाच ———————— म्हणतात.

अ) ऑनलाईन शिक्षण ब) मुक्त शिक्षण

क) सहकारी शिक्षण ड) दूर शिक्षण

४) ———————— द्वारे दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण सर्वांसाठी शक्य आहे.

अ) ICT ब) PPT क) सहकारी शिक्षण ड) हार्डवेअर

५) ICT मध्ये ———————— चा समावेश येतो.

अ) संगणक हार्डवेअर

ब) सॉफ्टवेअर

क) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग, टेलिमेडीसीन, व्हर्चुअल रिॲलिटी, टेलिकम्युनिकेशन सॅटेलाईट

ड) वरील सर्व

६) MOOC चे प्रकार म्हणजे ————————.

अ) cMOOC व zMOOC ब) aMOOC व bMOOC

क) xMOOC व cMOOC ड) zMOOC व xMOOC

❖❖❖❖

9

PAPER 1 - SECTION I & II
PRACTICAL WORK I and II

UNIT STRUCTURE

9.0 Objectives of PWI and PWII
9.1 Introduction
9.2 Description of the PWI and PWII

9.0 OBJECTIVES OF PRACTICAL WORK I AND PRACTICAL WORK II

PRACTICAL WORK I

- To train them in multifaceted roles that a teacher plays in the **school**,
- To provide opportunity for enriched learning experiences beyond curriculum,
- To comprehend the functioning of school and get oneself about its activities carried out for quality education.

PRACTICAL WORK II

- To acquaint the learners with aims and objectives of YOGA education in present scenario,
- To provide opportunity for understanding the way YOGA activities carried out and its impact.
- To train the learners about the different types of NGO working for the cause of education, their organisation, activities and impact on society.
- To make learner aware about the different vocational courses linked with school curriculum and its usage for future career

9.1 INTRODUCTION

As a part of practical work the learner is expected to carry out two practical task during the course. The practical work is termed as Practical work 1 and Practical work 2

Practical Work I (PWI)

Visit a School (pre-primary /Primary /secondary School) to study its functioning and write a detailed report reflecting your own views.

(The report may include a brief history of the institution, its organisational hierarchy, vision, mission, goals, infrastructure, curricular and co-curricular activities etc.)

Practical Work II (PWII)

Every student must visit a Yoga centre/NGO in Education/ a Vocational Training centre to study its functioning and write a report on the same. (The report includes a brief history of the institution, its organisational setup, its mission and goals, the activities or courses conducted etc.)

9.2 DESCRIPTION OF THE PWI AND PWII

PWI: Every Learner is suppose to carry out the practical activity and prepare the report as per the guidelines / outline given

Guidelines /Outline for the Practical Work I

1) General Information:

- Name of the School:
- Address :
- Year of Establishment :
- Form of school: Aided/Unaided,
    - Boys/Girls/coeducation
    - Pre-primary/Primary/Secondary
- Name of The Management and its Hierarchy :
- Vision and Mission of The institution:
- Medium of Instruction:
- Number of shifts: Timings
- Total Number of students

2) School Building (Infrastructure):

- Total Area:
- Number of classrooms :
- Number of Conference Rooms:
- Number of A.V Room:
- Number of Computer Lab:
- Library : No of Books, Distribution of books ,periodicals , Utilization of Library services(each point to be explained separately)
- Playground : Sports Material (indoor and Outdoor) ,Games played ,other sports related activities (Mention it separately)
- Sanitation Blocks:
- Science Laboratory : Apparatus in Lab ,demonstration by teacher, and performance by student ---mention in detail

3) Academic (Teaching Staff and Non Teaching Staff) :

- Number of Teaching Staff (Their qualification with subject ,total number of teaching experience, subjects taught,

participation in seminar ,conference, workshops at various level like state national,,)

- Staff contribution other then curricular work like scholarship exam or competitive exams for students.
- Any other special academic work of staff
  Specify above points in detail.
  Similarly for non teaching staff the first point is to be written

4) Functioning (Administration):

The Division of work done i.e the different committees and its functions to be mentioned in brief

5) Co-curricular activities:

1) Number of Games(Indoor and Outdoor) in school.
2) Number of Competitions (sports and cultural) in which school participates at various levels
3) Awards and Trophies bagged at various levels in various competitions
4) NCC /Scout and Guide (specify activities)
5) Social Service (specify activities)
6) Celebration of important days and festivals (specify activities)
7) Educational tour/Excursion/Picnic
8) Different Competitions (Intra and Interschool) Conducted in school (Elocution, Debate, Drawing, Singing , poster (Specify Activities)
9) Any Association like Maths, Science, Dramatic etc. Specify activities
10) Community Work
11) Publication in form of School Magazine
12) Entertainment programme for students and by students (specify it activities)
13) Self Defence Activities, First Aid training
14) School Band
15) Inviting Resource Persons for expertise
16) Exhibitions (specify it kind and activities)
17) Annual Day

You can Mention any other activity as novel practice in school other than given above.

6) Office Records:

You can go through office records and mention in report

Muster roll, Attendance Register, Service book , GR, Report card ,Cumulative record card etc

7) Reflection (Your views on visit i.e. Experience): In Brief

PWII: Every Learner is suppose to carry out the practical activity by visiting either of Yoga centre/NGO in education/Vocational training centre and prepare the report as per the guidelines/outline given

Guidelines /Outline for the Practical Work II

1) General Information:(Brief History)

- Name of the Institution /Centre:
- Address :
- Year of Establishment:
- Name of The Management and its Hierarchy :
- Vision and Mission of The institution/Centre:
- Objectives of the institution
- Branches of the institution

2) Organisational setup of the institution:

Number of members (Chairman, Secretary, treasurer, acting members, trustees, volunteers etc,) Funding agencies or the sources of income. Specify it

3) Activities conducted:

The number activities conducted (in institution or outside the institution) along with its objectives and its impact on the target group is to be mentioned in detail

4) Courses conducted (in case of YOGA center and Vocational training centre)

Mention the number of programme and courses run along with its duration, fees and its impact on the learner is to briefed out

5) Reflection (Your views on visit i.e. Experience): In Brief

❖❖❖❖